मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

इतिहास ११ सन १८४९

लेखक :- बाळ गंगाधरशास्त्री जोशी

पु. नांव :- हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास

( श्री प्रिंटर्स अँण्ड स्टेशनर्स, ठाणे )

इति

# HISTORY OF BRITISH INDIA;

**Abridged from English Works**

---

BY THE LATE

BAL GUNGADHUR SHASTREE JAMBHEKUR;

REVISED AND PREPARED FOR THE PRESS

BY

MAJOR T. CANDY.

---

# हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास,

इंग्रेजी भाषेंतील मूळग्रंथांवरून संक्षेपरूपानें

**माज. बाळगंगाधर शास्त्री जांभेकर**

ह्यांनीं मराठी भाषेंत केला, तो

**मेजर क्यांडी साहेब**

पाठशाळेचे सुपरिंटेंडेंट ह्यांनीं शोधिला.

---

मुंबईमध्यें आमेरिकन मिशन छापखान्यांत छापिलें. संन १८४९.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणें
ई. क्र. ३९

# पुढील इतिहासाची अनुक्रमणिका.


## प्रकरण १ पृष्ठें १–३

### युरोपियन लोक हिंदुस्थानांत प्रथम येऊं लागले ह्याविषयीं.

इसवी संन १४९८–सं० १६१८

*१ पोर्टुगीस लोकांचा सरदार वासकोडिगामा हा हिंदुस्थानांत कालिकोटास येतो, व पोर्टुगीस लोक हिंदुस्थानांत ठाणीं घालतात. २ पोर्टुगीस लोक गोवें हें आपली मुख्य जागा करितात, व पूर्वेकडील कांहीं बेटें हस्तगत करितात, व चीन देशांत प्रवेश करितात. ३ पोर्टुगीस लोकांचें इकडील राज्य वाढतें, परंतु तें अव्यवस्थेमुळें निर्बळ होऊं लागतें. ४ स्पेनदेशचे लोक पोर्टुगीस ह्यांस जिंकून त्यांचीं कांहीं संस्थानें घेतात. ५ डच लोकांस व्यापाराविषयीं व राज्यें घेण्याविषयीं त्यांच्या सरकाराची सनद मिळती. ते कांहीं बेटें घेतात. ६ डच लोकांचा उत्कर्ष. ७. इंग्लिशांस त्यांच्या राणीपासून व्यापार करण्याची सनद मिळती. व ते सुरतेस वखार करितात.

---

## प्रकरण २ पृष्ठें ४–६

### युरोपियन लोकांच्या व्यापाराची व सत्तेची वृद्धि.

इसवी संन १६१८–सं० १७४०

१ डच लोकांच्या व्यापाराची वृद्धि. २ डच लोक कालिकोट वगैरे ठाणीं घेतात, व सिंहल द्वीपांत ठाणीं घालतात, व चीन व जापान येथें प्रवेश क-


* ह्या अनुक्रमणिकेंत प्रत्येक प्रकरणाच्या पोटीं जे १-२-३ इत्यादि अंक आहेत ते प्रकरणाच्या पोटच्या कलमांचे अंक आहेत असें समजावें.

रितात, व केपास वस्ती करितात. ३ इंग्लिश लोक मद्रासेस ठाणें करितात. इंग्लिशांचा राजा दुसरा चार्लस हा मुंबई बेट कंपनीस देतो. कलकत्त्यास जागा विकत घेऊन इंग्लिश कंपनी तेथें किल्ला बांधिते, व तीन ठिकाणीं तीन प्रेसिडेन्सी होतात. ४ इंग्लिश व्यापाऱ्यांच्या दोन्ही मंडळ्या एक झाल्यामुळें युनैटेड ईस्त इंडिया कंपनी असें त्या मंडळीस नांव पडतें. ५ फ्रेंच लोकांस हिंदुस्थानांत व्यापार करण्याविषयीं व मुलूक घेण्याविषयीं त्यांचे राजापासून सनद मिळती. ते सुरतेस वखार बांधितात, व पोंदेशरीस ठाणें घालतात. ६ डेनमार्क देशांतल्या लोकांची कंपनी जमती. पुढें ती कंपनी व्यापार सोडती.

---

## प्रकरण ३ पृष्ठें ७–१४

## इंग्लिश आणि फ्रेंच ह्यांच्या करनाटकांतील लढाया.

### इसवी सन १७४०–सं० १७५६

१ इंग्लिश कंपनी आणि फ्रेंच कंपनी ह्यांच्या कांहीं लढाया. फ्रेंचांचा सरदार लाबडोने हा मद्रासचा किल्ला वेढा घालून घेतो. २ इंग्लिश पोंदेशरीस वेढा घालतात. मद्रास इंग्लिशांस परत मिळती. ३ तंजावर येथील राजा शहाजी इंग्लिशांच्या मदतीनें देवीकोट घेतो. नंतर इंग्लिश प्रतापसिंव्हाचा पक्ष धरून शहाजीस प्रतिबंधांत ठेवितात. ४ फ्रेंचांचा सरदार मुलकाच्या कारभारांत मन घालूं लागतो. करनाटकच्या सुभ्याविषयींची गोष्ट. चंदा साहेब आणि मराठे ह्यांच्या लढाया. ५ करनाटकांतील नवाबगिरी करितां भांडणें व खून ह्यांची गोष्ट. तो अधिकार मिळविण्याकरितां चंदा साहेब फौज जमा करितो. ६ निजामउल्मुल्क मेल्यावर हैदराबादच्या गादीविषयीं त्याचे घराण्यांत तंटा पडतो. चंदा साहेब आणि फ्रेंच हे मुझफरजंगास अनुकूल होतात. इंग्लिश नासिरजंगाचा पक्ष धरितात. ७ मुझफरजंगास पाठबळ नाहींसें झाल्यावरून तो आपला मामा नासिरजंग ह्यास शरण जातो. ८ फ्रेंच नासिरजंगाच्या लष्कराचा नाश करितात. नासिरजंग इंग्लिशांशीं कांहीं बिघडलासें पाहून फ्रेंच त्याशीं तह करितात. त्यास

पठाण मारतात. फ्रेंच सलाबतजंगास गादीवर बसवितात. ९ इंग्लिशांची फौज त्रिचिनापल्ली घ्यावयास जाती. क्यापतन क्लैव साहेब थोडी फौज बरोबर घेऊन अर्काट किल्ला घेतो. तो किल्ला चंदा साहेब व फ्रेंच परत घ्यावयास यत्न करतात परंतु उपाय चालत नाहीं. क्लैव साहेब मराठ्यांच्या मदतीनें फ्रेंचांपासून कांची घेतो. १० क्लैव साहेब व लारेन्स साहेब हे चंदा साहेब व फ्रेंच ह्यांजवर स्वारी करून मोड करतात. तंजावरकर चंदा साहेबास ठार मारितो. ११ हैदराबादेच्या दरबारांत फ्रेंच लोकांचें वजन होतें. बुसी-नामें फ्रेंच सरदार ह्यास तीनशें कोस लांबीच्या प्रांताचा अधिकार मिळतो. १२ इंग्लिश आणि फ्रेंच ह्या दोघांस लढाईचा कंटाळा येऊन तह ठरतो. महंमद अल्ली हा करनाटकचा नबाब सर्व सम्मतें ठरतो.

---

## प्रकरण ४ पृष्ठें १४–२३

## बंगाल्यांत आणि करनाटक प्रांतांत इंग्लिशांचा उत्कर्ष.

### इसवी सन १७५६–सं० १७६१

१ बंगाल्याचा सुभेदार सुराजउद्दवला कलकत्त्यावर स्वारी करितो; व इंग्लिश लोकांचे मुख्य अधिकारी पळून जातात. कांहीं मागें राहिलेले लोक अंधार कोठडींत गुदमरून मरतात. २ क्लैव साहेब इंग्लंडाहून कलकत्त्यास परत येतो. ३ इंग्लिश कलकत्ता फिरून घेतात. कंपनीचा माल जसाचा तसा ह्यांस सांपडतो. ४ क्लैव साहेब हुगळी शहर घेतो. नंतर पराक्रमें-करून सुराजउद्दवला ह्यास दहशत घातल्यावर दोघांचा सल्ला होतो. तो फ्रेंचांपासून चंद्रनगर घेतो. ५ क्लैव साहेब कलकत्त्यास राहून बंगाल्यांत इंग्लिशांची सत्ता कायम करण्याची तजवीज चालवितो. ६–७ मीरजाफर नामें सुराजउद्दवला ह्याचा सरदार ह्याशीं मसलत करून क्लैव साहेब सुभेदारा-वर स्वारी करितो. ८ प्लासी एथें लढाई होऊन सुभेदाराचा मोड होतो. ९ सुराजउद्दवला पळून जात असतां मीरजाफराच्या हातीं सांपडून प्राणास मुकतो. १० मीरजाफरास मदत केल्याबद्दल इंग्लिश त्यापासून द्रव्य घेतात. ११ क्लैव साहेब आदिकरून मंडळी उमीचंद सावकार ह्यास फसवितो. १२

करनाटकांत इंग्लिश फ्रेंच आणि मराठे ह्यांच्या स्वाऱ्या होतात. १३ फ्रेंच सरकाराकडून लाली नामें सरदार फौज व आरमार घेऊन हिंदुस्थानांत येतो. तो सेंट डेविड नामें किल्ला घेतो. १४ त्याजवर त्याच्या क्रूरपणामुळें व दुष्कर्मामुळें सर्व लोकांची इतराजी होती. १५ फ्रेंच तंजावरावर स्वारी करितात-ती इंग्लिशांनीं तेथील किल्लेकऱ्यास कुमक केल्यामुळें व्यर्थ जाती. कार्तिकल येथें इंग्लिश आरमार फ्रेंच आरमाराचा पराजय करितें. १६ लाली साहेब मद्रासेस वेढा घालतो, मग मुंबईहून कुमक आल्यावर फ्रेंच पळून जातात. कांची इंग्लिशांचे हस्तगत होती १७ त्रिकोमाली येथें इंग्लिश आरमार फ्रेंच आरमाराचा पराजय करितें. कूट साहेब वांदिवाश किल्ला घेतो. तो किल्ला परत घेण्यासाठीं लाली ह्यानें स्वारी केली असतां त्याचा पराभव होतो. १८ कूट साहेब अर्काट वगैरे किल्ले घेऊन पोंदेशरीस वेढा घालतो. ह्यामुळें लालीस संकट प्राप्त होतें. १९ मंडळींत वैमनस्य पडल्यामुळें लाली ह्याचा पराक्रम व शाहाणपण व्यर्थ जाऊन पोंदेशरी इंग्लिशांचे हस्तगत होती. २० पोंदेशरी घेतल्यावर माही वगैरे दरोबस्त ठाणीं इंग्लिशांचे हातीं गेल्यामुळें हिंदुस्थानांतील फ्रेंचांच्या राज्याची समाप्ति होती. २१ फ्रेंच कंपनीच्या फिर्यादीवरून फ्रेंच सरकार लालीचा शिरच्छेद करितें. २२ फ्रेंच कंपनीचें आयुष्य संपतें.

---

## प्रकरण ५ पृष्ठें २३–३३.

### इंग्लिशांस बंगाल्यांत व करनाटकांत प्रांत मिळाला ह्याविषयीं.

### इसवी सन १७६१–सं० १७६६.

१ इंग्लिशांस देऊं केलेला पैका द्यावयास मीरजाफर ह्यास फार संकट पडतें. २ दिल्लीच्या बादशाहाचा मुलगा शाहआलम बहार प्रांतावर स्वारी करितो. त्याजवर क्लैव साहेब बंगाल्याच्या नवाबाचा मुलगा बरोबर घेऊन स्वारी करितो. ३ मीरजाफर हा क्लैव सहेबास किताब देऊन जहागीर देतो. ४ कलकत्त्याजवळ इंग्लिश व डच ह्यांच्या जहाजांची लढाई होती. क्लैव साहेब इंग्लंडास निघून जातो. ५ वान्सितार्ट साहेब कलकत्त्यास प्रेसिडेन्त होतो.

इंग्लिश २१

हा साहेब मीरजाफराचा कारभार काढून त्याचा जांवई मीरकासिम ह्यास देतो. मग मीरजाफर कलकत्त्यास येऊन राहतो. ६ शाहआलम बहार प्रांतावर फिरून स्वारी करीत असतां त्याचा पराजय होतो, व तो प्रांत सोडून जाणें त्यास आवश्यक होतें. ७ जकातीबद्दल मीरकासिम व इंग्लिश ह्यांचा तंटा होतो. ८ मीरकासिम हा एलियट साहेब व आमियात साहेब वगैरे कितीएक इंग्लिश लोक ह्यास ठार मारवितो. ९ मीरकासिम ह्याजबरोबर युद्ध करण्याची मसलत कलकत्त्यास ठरून गिरिया येथें युद्ध होतें. ह्या युद्धांत मीरकासिमाचा पराभव होतो. मोंगीर नामें त्याची राजधानी इंग्लिश घेतात. १० मीरकासिम हा फार निर्दयपणा आरंभितो. नंतर अयोध्येच्या नवाबाकडे पळून जातो. ११ इंग्लिश लष्करांत फिसाद होती. मुंबईहून आलेला मेजर मनरो साहेब ती फिसाद मोडून बंदोबस्त करितो. १२ मेजर मनरो साहेब हा शत्रूवर स्वारी करितो. त्याची बक्सर येथें लढाई होती. शाह आलम नवाबास सोडून इंग्लिशांस मिळतो. १३ इंग्लिश हे मीरजाफर ह्यास नवाब हा किताब पुन्हा देऊन त्याच्या प्रांताचा अर्धा वसूल आपणाकडे लावून घेतात. द्रव्य देण्याच्या काळजीनें व ह्मातारपणामुळें मीरजाफर मरण पावतो. १४ मीरजाफराचा धाकटा मुलगा निजामउद्दवला ह्यास इंग्लिश गादीवर बसवून महंमद रिझाखान ह्यास त्याचा कारभारी करितात. १५ क्लैव साहेब लार्ड ही पदवी पावून कलकत्ता येथील गवर्नराच्या अधिकारावर फिरून येतो. तो कंपनीच्या कामदारांकडील व्यापाराचा बंदोबस्त करितो. १६ क्लैव साहेब बंगाल्याचा नवाब निजाम उद्दवला ह्याच्या कारभाराचा बंदोबस्त करितो. १७ अयोध्येच्या नवाबाशीं इंग्लिश तह करितात. शाहआलम ह्यास अलाहाबाद व कोरा हे प्रांत देऊन बंगाला बहार व उदिसा ह्या प्रांतांचें दिवाणीचें फर्मान त्यापासून मागून घेतात. १८ सलाबतजंग हा दक्षिणेचा सुभेदार व महंमद अली हा करनाटकचा नवाब असा ठराव होऊन महंमद अली ह्याची सत्ता कायम होती. १९ सलाबतजंगास महंमद अली पदच्युत करून त्यास ठार मारतो. इंग्लिशांनीं पांच प्रांत मिळविण्यासाठीं बादशाहापासून फर्मान घेतल्यावरून निजामअली युद्धाची तयारी करितो. नंतर त्या प्रांतांविषयीं बंदोबस्त होऊन तह होतो.

## प्रकरण ६ पृष्ठें ३३-४०

## हैदरअल्लीचें वर्त्तमान व त्याची आणि इंग्लिशांची पहिली लढाई झाली ह्याविषयीं.

### इसवी सन १७६६-सं०१७७२

१ कंपनीचें राज्य वाढल्यामुळें कंपनीस खर्चाची अडचण पडती. २ अशा समयीं इंग्लिशांस फिरून युद्ध करण्याचें कारण पडतें. ३ करनाटकांत महिसूर येथें हैदरनायकाची उत्पत्ति. ४ हैदरनायकाचा उत्कर्ष. ५ श्रीरंगपट्टण येथील दरबारांत राजा व प्रधान ह्यांत वैमनस्य पडल्यामुळें हैदर नाईक हा युक्तीनें तेथील कारभार आपणास मिळवितो. ६ पहिला दिवाण नंदराज व हैदरनाईक ह्यांचा युद्धप्रसंग होतो. खंडेरावाच्या उत्कर्षामुळें हैदरास पळून जावें लागतें. ७ हैदर नाईक नंदराजास फसवून व खंडेरावाचा पराभव करून राजास व नंदराजास नेमणुका देऊन आपण राजाप्रमाणें वागूं लागतो. ८ हैदरास सत्ता प्राप्त झाल्यावर तो इंग्लिशांविषयीं निजामाच्या मनांत विरोध उत्पन्न करितो. पुढें कितीएक लढायांत इंग्लिशांचा उत्कर्ष पाहून निजाम त्यांशीं फिरून तह करितो. ९ घाटाखालीं मंगलूर होनावर इत्यादि प्रांतांत इंग्लिशांचा अमल बसतो. १० हैदर हा इंग्लिशांस नानाप्रकारें उपद्रव देऊन एकाएकीं मद्रासेजवळ जाऊन तेथील अधिकाऱ्यांस भिववून इंग्लिशांकडून तह करून घेतो. ११ कलकत्ता येथें कार्तियर साहेब अधिकार चालवीत असतां मोठा दुष्काळ पडून बंगाल्यापैकीं तृतीयांश लोक मरतात. कार्तियर साहेबाच्या मागून वारन् हेस्तिंग्स साहेब ह्याची नेमणूक होती. कंपनीच्या कारभाराच्या अव्यवस्थेविषयीं पार्लमेंटांत विचार होऊन तिजविषयीं नवा कायदा ठरतो.

## प्रकरण ७ पृष्ठें ४०–४९

## वारन् हेस्तिंग्स साहेबाची कारकीर्द. मुलकाचा बंदोबस्त. अयोध्येचा नवाब व मराठे ह्यांचें वर्तमान.

### इसवी संन १७७२–सं० १७७६.

१ प्रांतांच्या वसुलाच्या कायद्यांत फेरफार होऊन वसुलाच्या कामावर इंग्लिश कलेकटरांची नेमणूक होती. २ इनसाफाच्या प्रकरणांतही फेरफार होऊन कलेकटरांनीं दिवाणी व फौजदारी इनसाफ करावा असा हुकूम होतो. सदर फौजदारी व सदर दिवाणी ह्या नावांच्या दोन कोर्टांची स्थापना होती. ३ मुर्शिदाबादचा नायब व बहार प्रांताचा नायब ह्यास गवरनरजनरल साहेब कैद करून कलकत्त्यास आणितो. मुर्शिदाबाद येथील नवाबाच्या खासगी कारभाराचा बंदोबस्त होतो. ४ शाह आलम हा मराठ्यांच्या मदतीनें पुनः दिल्लीच्या तक्तावर बसतो, व इंग्लिशांकडून मिळालेले अलाहाबाद प्रांत व कोरा प्रांत हे मराठ्यास देतो. हे प्रांत मराठ्यांच्या हातीं न जावे ह्मणून गवर्नर जनरल लष्कर पाठवितो. पुढें ते प्रांत अयोध्येच्या नवाबास विकतो. ५ रोहिल्यांवर मराठे स्वारी करून त्यांचा सर्व देश उद्ध्वस्त करितात. त्यांचा सरदार अयोध्येच्या नवाबाच्या आश्रयास जातो. ६ रोहिल्यांची व मराठ्यांची गोष्ट. मराठे रोहिलखंडांतून निघून फिरून दक्षिणेकडे जातात. ७ रोहिल्यांनीं देऊं केलेला पैसा दिला नाहीं ह्मणून सुजाऊद्दवला त्यांसीं युद्ध चालवितो. सुजाउद्दवला ह्यास इंग्लिश मदत करितात. सुजाउद्दवला मरण पावतो. ८ राघोबा दादा पेशवा ह्यास मदत करून वसई साष्टी व गुजराथेंतील कांहीं मुलूक आपणास मिळावयाचा मुंबई सरकार करार करून घेतें. तो करार कलकत्त्याच्या सरकारास न आवडून तें परभारें पुण्यास वकील पाठवितें, आणि नवा तह करून घेतें. ९ इंग्लिश आणि मराठे ह्यांची लढाई होती. इंग्लिश लष्कर पराक्रम करितें, परंतु इंग्लिशांस लढाईपासून फायदा न होतां सालपे मुकामीं फिरून तह होतो. १० कलकत्ते सरकारच्या कामदार मंडळींत दुफळी पडती. गवर्नर जनरलावर कितीएक लांचाच्या फिर्यादी पडतात. हुगळीचा माजी फौजदार नंदकुमार हा फिर्याद करणाऱ्यांपैकीं एक ह्याजवर खोटी सही केल्याचा गुन्हा सुप्रीम कोर्टामध्यें लागू होऊन तो फांशीं जातो. गवर्नर ज-

नरल साहेबाचें करणें विलायतेंत कोर्ट आफ् डिरेक्टरांस न आवडून त्याच्या कामावरून बदलीचा हुकूम होतो. ११ तो हुकूम गवर्नर जनरल मानीत नाहीं. पुढें त्याची व कौन्सलदारांची कलागत अधिक होऊन फ्रान्सिस साहेब नामें त्याचा मुख्य प्रतिपक्षी ह्याचें व त्याचें गोळीचें द्वंद्वयुद्ध होतें. फ्रान्सिस साहेब जखमी होऊन विलायतेस जातो.

---

## प्रकरण ८ पृष्ठें ४८–६१

## हेस्टिंग्स साहेबाची कारकीर्द. करनाटकांतील वर्तमान. हैदराशीं दुसरी लढाई.

### इसवी सन १७७६–सं० १७८४.

१ अर्काटचा नवाब आणि इंग्लिश हे तंजावरच्या राजाशीं युद्ध चालवितात. २ तंजावरच्या राजानें नागोरचा किल्ला डच लोकांस विकत दिला होता तो नवाब व इंग्लिश ह्यांच्या सांगण्यावरून डच लोकांस सोडणें प्राप्त होतें. ३ तंजावरच्या राजास गादीवरून काढलें हें डिरेक्टर्स ह्यांच्या विचारास न येऊन त्यास फिरून बसविण्याचा ते हुकूम पाठवितात. ४ मद्रास येथील लार्ड पिगट साहेब नामें गवर्नर व कौन्सलदार ह्यांचें वैमनस्य पडतें. शेवटीं कौन्सलदार गवर्नरास कैदेंत ठेवितात. तो कैदेंत असतां मरण पावतो. ५ लार्ड पिगट ह्याच्यानंतर रंबोल्ड साहेब गवर्नर होऊन लांचलुचपत करितो. त्याचीं कृत्यें डिरेक्टरांस न आवडून त्याची बर्तर्फी होती. ६ इंग्लिशांनीं कराराप्रमाणें आपणास मदत केली नाहीं असें मनांत आणून हैदरअली निजामाशीं व फ्रेंचांशीं स्नेह करितो. फ्रेंचांचें व इंग्लिशांचें युद्ध चालून फ्रेंचांचीं ठाणीं इंग्लिश घेतात. पांदेचरी इंग्लिशांच्या हस्तगत होती. ७ हैदर मोठी फौज मिळवून चालून जाऊन अर्काटास वेढा घालतो. त्याजवर एकीकडून मेजर मनरो साहेब व एकीकडून कर्नल बेली साहेब हे जातात. ८ बेलीसाहेबाच्या टोळीचें व टिपू आणि हैदर ह्यांच्या लष्करांचें युद्ध होऊन बेली साहेब मोठा पराक्रम करतो, शेवटीं त्याची दारू संपून तो पराभव पावतो.

९ मनरो साहेब मद्रासेस परत जातो. कलकत्याचा गवर्नर जनरल पैक्याची व फौजेची कुमक पाठवितो. गवर्नर जनरल मद्रासच्या गवर्नरास अमानत करून तेथील सर्व अधिकार सर आयर कूट साहेब ह्यास सांगतो. १० इंग्लिशांचीं फ्रेंच व हैदर ह्यांशीं कांहीं युद्धें होतात. हैदराचा मोठा पराभव होतो. ११ हैदराचा अणखी दोन वेळ पराभव होतो. मग कूट साहेब फौजेसहित परत मद्रासेस जातो. १२ मद्रास येथें गवर्नराचे कामावर लार्ड माकार्टनी साहेब येऊन इंग्लिश डच लोकांचीं ठाणीं घेतात. १३ इंग्लिशांस व फ्रेंचांस त्यांच्या त्यांच्या विलायतेहून कुमक येते. इंग्लिशांचें आरमार व फ्रेंचांचें आरमार ह्यांचें मद्रासेजवळ युद्ध होतें. १४ तंजावराजवळ कावेरीच्या कांठीं कर्नल ब्राथवेट साहेब ह्याजवर टिपू हल्ला करून त्याचा पराभव करितो. १५ इंग्लिश लोकांची एक गोरी पलटण टिपू छापा घालून कापून टाकितो. इंग्लिश सरदारांचा वेळ कज्याखालीं जातो; तरीं इंग्लिश आरमाराकडून फ्रेंच आरमाराचा पराभव होतो. कूट साहेब काम सोडतो. मद्रास येथें मोठें वादळ होतें, व दुष्काळ पडतो. १६ हैदरअल्ली मरण पावतो. टिपू बेदनुरास वेढा घालतो. अभयपत्र लिहून घेऊन माथ्यूस साहेब तो किल्ला त्याचे स्वाधीन करितो. अभयपत्र मोडून टिपू त्या साहेबास त्याच्या सर्व लोकांसुद्धां धरून बंदींत घालतो. १७ युरोपांत फ्रेंच व इंग्लिश ह्यांचा तह झाल्यामुळें फ्रेंच सरदार टिपूचा पक्ष सोडतात. फलर्टन साहेब टिपूचा एक दोन वेळ पराभव करितो. मंगळूर टिपूच्या हस्तगत होतें. १८ टिपूचा आणि इंग्लिशांचा तह होतो. १९ मद्रास येथें लार्ड माकार्टनी साहेब गवर्नर असतां अर्काटच्या नवाबाचा मुलूक कंपनीकडे येऊन त्यांपैकीं नवाबास कांहीं हिसा ठरून तो बखेडा मोडतो.

---

## प्रकरण ९ पृष्ठें ६१–६५.

## हेस्तिंग्स साहेबाच्या कारकिर्दीची समाप्ति.

### इसवी सन १७८०–सं० १७८१

१ कलकत्त्यास गवर्नर जनरल आणि सुप्रीम कोर्टाचे जड्ज ह्यांचें वितुष्ट पडतें. मुख्य जड्ज ह्याची नवी नेमणूक गवर्नर जनरल मनसी वेतनाचा

ठराव करून करितो. ह्या गोष्टीमुळें दोघांवर टपका येतो. २ वसुलाचा बंदोबस्त होतो. ३-४-५ कंपनीच्या खजीन्यांत पैसा नाहीं ह्मणून पैसा जमा करण्याकरितां काशीचा राजा चेतसिंग ह्याजवर गवर्नर जनरल निमित्त घेतो. आपल्या वारंवार केलेल्या मागण्यास तो कबूल नाहीं ह्मणून त्यास गादीवरून काढून मागील राजाचे मुलीचें पुत्रास गादीवर बसवितो, आणि त्यापासून मोठी खंडणी देण्याचा ठराव करून घेतो. ६ अयोध्येच्या नवाबास त्याच्या वृद्ध आयांकडून द्रव्य काढून घेण्याविषयीं गवर्नर जनरल मदत करितो, आणि तें द्रव्य घेऊन कंपनीच्या खजीन्यांत भरतो. ७ हेस्तिंग्स साहेब ह्याजवर लांच घेतल्याचे व जुलूम केल्याचे कोर्ट आफ् डिरेक्टर ह्याजकडून टपके येऊन तो काम सोडून विलायतेस जातो. ८ हेस्तिंग्स साहेबाच्या कारकीर्दीच्या गुणदोषांचें वर्णन. त्याच्या वर्तणुकेची चौकशी विलायतेंत पार्लमेंट सभेंत होती.

## प्रकरण १० पृष्ठें ६६–७७

## लार्ड कार्नवालिस ह्याची कारकीर्द. टिपूशीं पहिली लढाई.

## इसवी संन १७८६–सं० १७९२.

१ पार्लमेंटामध्यें कंपनीच्या कारभाराविषयीं विचार होऊन नवा बंदोबस्त होतो; व बोर्ड आफ् कंट्रोल ह्या नावाच्या मंडळीची नेमणूक होती. २ लार्ड कार्नवालिस साहेब गवर्नर जनरलाच्या कामावर येऊन अयोध्येच्या नवाबाकडील खंडणी कमी करितो. टिपू इंग्लिशांशीं युद्ध फिरून आरंभितो. व युद्धाचा आकार बराच पडतो. ४ टिपूचा मोड करण्याकरितां इंग्लिश हे निजाम व मराठे ह्यांशीं नवा तह करितात. ५ लार्ड कार्नवालिस साहेब मद्रासेस जातो, आणि फौजेची सरदारी जातीनिशीं घेऊन बंगलूर घेतो. मग श्रीरंगपट्टणावर चाल करितो. ती सिद्धीस न जातां माघारा बंगलुरास येतो. ६ इंग्लिश आणि टिपू ह्यांच्या कितीएक लढाया होतात. ७ हैदराबादेचें लष्कर येऊन पोहोंचल्यावर लार्ड कार्नवालिस पुनः श्रीरंगपट्टणावर जातो. ८-९-१० इंग्लिशांनीं श्रीरंगपट्टणास वेढा घातल्यावर टिपू तह करून आ-

...नं. १५

पले दोन मुलगे ओलीस देतो. ११ तहाचीं कलमें. टिपूकडून घेतलेल्या मुलकाची वांटणी. १२ फौजेस लूट आणि बक्षीस देऊन गवर्नर जनरल साहेब परत जातो. १३ अर्काटच्या नवाबाचा बंदोबस्त गवर्नर जनरल करितो. १४ फ्रान्स देशांत दंगा होऊन हिंदुस्थानांतील फ्रेंचांचीं सारीं ठाणीं इंग्लिश घेतात. १५ महादजी शिंदा शाह आलम ह्यास आपल्या कैदेंत ठेवितो, व आपण मोठा उत्कर्ष पावतो. १६ गवर्नर जनरल साहेब वसुलाचा बंदोबस्त करितो. १७-१८ इनसाफ करण्याकरितां जिल्हानिहाय जड्जांची नेमणूक होती, व इनसाफ करण्याचा बंदोबस्त होतो. १९ मागल्या बंदोबस्तांचें फळ.

## प्रकरण ११ पृष्ठें ७७–८३

## सरजान शोर उर्फ लार्ड टेनमौथ ह्याची कारकीर्द. निजामाची व अयोध्येच्या नवाबाची हकीकत.

### इसवी संन १७९२–सं० १७९८

१ लार्ड कार्नवालिस साहेब विलायतेस जातो. कंपनीस अणखी वीस वर्षें पर्यंत मक्ता मिळतो. टिपूचे मुलगे ओलीस राहिले होते ते सुटून आपल्या बापाकडे जातात. २ मराठे व निजाम ह्यांचें युद्ध चालून फिरून त्यांचा तह होतो. ३ पेशव्यांची हालीमाजी. ४ निजाम फ्रेंच लोकांस चाकरीस ठेवून पुनः निरोप देतो. ५ रोहिल्यांशीं व इंग्लिशांशीं लढाई. अयोध्येच्या नवाबाची हालीमाजी. ६ मद्रास येथील गवर्नराची हालीनवाली व अर्काटच्या नवाबाची हालीनवाली. ७ डच लोकांचीं हिंदुस्थानांतील व बाहेरील ठाणीं इंग्लिश घेतात. ८ मद्रास व कलकत्ता येथील गवर्नरांच्या बदल्या.

९२ ३१



## प्रकरण १२ पृष्ठें ८३-९०

### लार्ड मार्निंग्टन ऊर्फ मार्क्विस आफ् वेल्सली ह्याची कारकीर्द. टिपूशीं दुसरी लढाई, आणि टिपूच्या राज्याची समाप्ति.

इसवी संन १७९७-सं० १७९९.

१ लार्ड मार्निंग्टन साहेब गवर्नर जनरलाच्या कामावर आल्यावर लवकरच त्याच्या मनांत टिपूविषयीं संशय येऊन तो युद्धाची तयारी करितो. २ इंग्लिशांच्या लष्करावर टिपूचे एक दोन हल्ले होतात. मालवल्ली येथें टिपूचा पराभव होतो. ३-४-५-६ इंग्लिश श्रीरंगपट्टणास वेढा देऊन तें शहर घेतात. त्या युद्धांत टिपू प्राणास मुकतो. ७ टिपूचा सारा मुलूक हस्तगत होतो. कर्नल वेल्स्ली साहेब ह्याचा कीर्ति मिळविण्याचा आरंभ होतो. ८ टिपूच्या मुलकापैकीं कांहीं वांटा प्राचीन राजाच्या वारसदारास देऊन बाकीचे मुलकाची वांटणी इंग्लिश करितात. निजाम हा नवा तह करून इंग्लिशांकडील जास्ती फौज ठेवितो. ९ टिपूच्या स्वरूपाचें व गुणांचें वर्णन.

---

## प्रकरण १३ पृष्ठें ९०-९७

### मार्क्विस वेल्सली साहेब ह्याची कारकीर्द. अयोध्येच्या नवाबाचा बंदोबस्त. करनाटकचा नवाब, तंजावरचा राजा, व सुरतेचा नवाब ह्यांस नेमणुका ठरावून देऊन त्यांचा मुलूक इंग्लिशांनीं घेतला तें वर्तमान.

इसवी संन १७९९-सं०१८०२

१-२-३-४-५-६ हिंदुस्थानांत इंग्लिशांनीं राज्य मिळविल्याचा प्रकार व त्याचे गुण दोष. ७ आफगाणांचा बादशाह शाहाजमान हा हिंदुस्थानांत आल्यामुळें अयोध्येच्या नवाबास भय पडतें. तो आपल्या मुलकाच्या रक्षणार्थ इंग्लिशांशीं नवा तह करून त्यांजकडील जास्ती फौज ठेवितो. फरक्काबाद

येथील नवाबाचा देश घेऊन इंग्लिश त्यास सालीना नेमणूक देतात. ८ तंजावरच्या राजाचा बंदोबस्त. ९ अर्काटच्या नवाबाचा मुलूक कंपनी सरकारांत येतो. १०-११ सुरत येथें इंग्लिशांची सत्ता वाढती. १२ मुंबईहून मिसरदेशांत फ्रेंचांशीं लढण्याकरितां इंग्लिश फौज पाठवितात.

## प्रकरण १४ पृष्ठें ९७-१०६

### मार्किस वेल्सली ह्याची कारकीर्द. पेशवे, नागपूरकर भोंसले, व शिंदे ह्यांचें वर्तमान.

इसवी सन १८०३

१-२ बाजीराव पेशवा इंग्लिशांची फौज चाकरीस ठेवण्यास पूर्वी राजी नसतां शत्रूच्या भयानें ठेवण्यास राजी होतो. शिंदा व होळकर ह्यांच्या लढाया. ४ बाजीरावानें इंग्लिशांशीं मैत्री केली हें नागपूरकर भोंसला व दवलतराव शिंदा ह्यांस न आवडून त्यांनीं इंग्लिशांशीं विरोध चालविल्यामुळें इंग्लिश त्यांशीं लढाई करितात. ५-६ इंग्लिश कितीएक वेळ जय पावतात, व वृद्ध आणि अंध जो दिल्लीपति बादशाह शाह आलम ह्यास आश्रय देतात. ७-८ लासवारी येथें इंग्लिश शिंद्याचा पराजय करून त्याचा तोफखाना घेतात. शिंद्याचा कांहीं मुलूक इंग्लिशांच्या हस्तगत होतो. ९ असाई येथें वेल्सली साहेबाची आणि भोंसला व शिंदा ह्यांची मोठी लढाई होती. शत्रूच्या तोफा व बावटे इंग्लिशांच्या हातीं सांपडतात. १० शिंदा व भोंसला ह्यांचे आणखी किल्ले इंग्लिश घेतात. ११ इंग्लिशांचा व भोंसल्यांचा तह होतो. १२ इंग्लिश आणि शिंदा ह्यांचा तह होतो. १३ भरतपूर जोतपूर इत्यादि संस्थानांचा बंदोबस्त. १४ ह्या मागल्या लढाईपासून इंग्लिशांचा स्वार्थ होतो.

## प्रकरण १५ पृष्ठें १०६–११७

### मार्किस वेल्सली ह्याच्या कारकिर्दीची समाप्ति. मार्किस कार्नवालिस व सर जार्ज बार्लो ह्यांच्या कारकिर्दी. होळकराशीं लढाई. शिंद्याशीं तह. होळकराशीं तह.

इसवी सन १८०४–सं० १८०७

१ होळकराशीं इंग्लिश युद्ध आरंभितात. २ मान्सन साहेबाच्या लष्कराचा मोड होतो. ३ होळकर दिल्लीवर स्वारी करतो, ती सिद्धीस जात नाहीं. दिल्लीचा बादशाह शाह आलम ह्यास इंग्लिश सालीना नेमणूक ठरवितात. तो मरण पावतो व त्याचा मुलगा अकबरशाह त्याचे गादीवर बसतो. ४ कर्नेल वालस साहेब दक्षिणेंतील कांहीं होळकराचा मुलूक घेतो. कर्नल मरेसाहेब माळवा प्रांत हस्तगत करितो. गोवर्धन येथें होळकराचा पराभव होतो. दीघ हा किल्ला लेक साहेब घेतो. ५ भरतपूरचा किल्ला घेण्याविषयीं इंग्लिश कितीएक महिने प्रयत्न करितात. तेथच्या राजानें बोलणें लावल्यावर तह ठरतो. ६ शिंद्याचा व इंग्लिशांचा विरोध होतो. ७ मार्किस वेल्सली साहेबानें काम सोडल्यावर जुना गवर्नरजनरल मार्किस कार्नवालिस हा फिरून कामावर येतो. शिंदा व होळकर ह्यांशीं फिरून तह करण्याची तजवीज करितो. इतक्यांत तो मरण पावतो, आणि त्याच्या कामावर बार्लोसाहेब येतो. तो शिंद्याशीं तह ठरवितो. ८ होळकराशीं तह ठरतो. ९ जयपूर व बुंदी येथील राजे होळकरांच्या सत्तेंत जातात. हिंदुस्थानचा धनीपणा गवर्नर जनरल सोडतो. १० होळकर सरकारांतील बखेडे. यशवंत राव मरून तुळजाबाई कारभार करूं लागती. ११ शिंदा निजाम आणि पेशवा ह्यांच्या दरबारची आंतली गोष्ट. १२ मद्रास येथील फौजेमध्यें फिसाद होतो. १३ कंपनीच्या जमाखर्चाची वृद्धि. १४ हिंदुस्थानच्या राज्यापासून इंग्लिशांस लाभ.

१५

## प्रकरण १६ पृष्ठें ११७–१२२.

### लार्ड मिंटो साहेब ह्याची कारकीर्द.

इसवी संन १८०७–सं० १८१३

१ लार्ड मिंटोसाहेब गवर्नर जनरलाच्या कामावर येऊन पूर्वींप्रमाणें हिंदुस्थानचा धनीपणा राखण्याचा निश्चय करितो. २ हैदराबादेच्या सरकारांत चंदूलाल मुख्य कारभारी होऊन अव्यवस्था फार होती. ३ बाजीराव पेशवा व त्याचे दक्षिणेकडील जहागीरदार ह्यांच्यामध्यें विरोध उत्पन्न होऊन इंग्लिशांच्या मदतीनें बंदोबस्त होतो. ४ इंग्लिशांचे वकील इराणांत जातात. ५ काबूल येथेंही त्यांचा वकील जातो. ६ त्रावणकोर येथील दिवाण इंग्लिशांशीं बिघडतो व त्याचें न चालून तो आपणास मारून घेतो. ७ बुंदेलखंडाचा बंदोबस्त होतो. शिकांचा सरदार रणजितसिंग ह्याचा व इंग्लिशांचा पहिला तह होतो. ८ मद्रास येथील लष्करांत मोठें बंड होतें. ९ बुर्बों व मारिशस हीं बेटें फ्रेंचांकडून व जावाबेट डच लोकांकडून इंग्लिश घेतात. १०–११ भोंसले वगैरे ह्यांच्या राज्यांत पेंढाऱ्यांचा उपद्रव उद्भवतो. नेपाळ येथील सरकार व इंग्लिश ह्यांच्या बिघाडाचा उपक्रम. लार्ड मिंटो साहेब काम सोडून जातो त्या साहेबाचे कारकिर्दीचा गुणदोष.

---

## प्रकरण १७ पृष्ठें १२२–१३३.

### लार्ड मायरा ऊर्फ मार्किस आफ् हेस्तिंग्स ह्याची कारकीर्द. नेपाळची लढाई.

इसवी संन १८१४–सं० १८१५

१ कंपनीस नवी सनद मिळती ह्या सनदेंत हिंदुस्थानच्या व्यापाराची मोकळीक सर्वांस होती. लार्ड मायरा साहेब हिंदुस्थानच्या कामावर येतो. २ नेपाळ सरकाराशीं युद्धाचें कारण व उपक्रम लष्कराच्या टोळ्या व त्यांच्या चालण्याचा बेत. ३ जनरल गिलेस्पी साहेबाच्या टोळीचें वर्तमान.

४ जनरल वूड साहेबाच्या टोळीचें वर्तमान. ५ जनरल मार्लीसाहेब व कर्नल ब्राडशासाहेब ह्यांच्या टोळ्यांचें वर्तमान. ६ चाकरीस ठेवलेले पठाण गवर्नर जनरल कुमाऊ प्रांत घेण्याकरितां कर्नल गार्डिनर व कपतान हिर्से ह्यांच्या निसबतीस पाठवितो. कांहीं जय पराजय झाल्यावर तो प्रांत इंग्लिशांच्या स्वाधीन होतो. ७ कर्नल आक्टर्लोनी साहेबाच्या टोळीचें वर्तमान. ८ आक्टर्लोनी साहेब व गुर्ख्यांचा सरदार अमरसिंग ह्यांच्या लढाया होऊन इंग्लिशांचा जय होतो. पुढें लढाईची तहकुबी होते. ९ इंग्लिश व गुर्खे ह्यांचें तहाचें बोलणें चालतें. १० तहनाम्यावर गुर्ख्यांच्या वकिलाची सही व कलकत्यास गवर्नर जनरलाचा शिक्का झाल्यावर काठमांडू येथील दरबारांत तहनाम्याविषयीं रुकार न पडून युद्धाचा प्रसंग फिरून येतो. ११ आक्टर्लोनी साहेब निकरानें युद्ध चालवून शत्रूंचा पराभव करतो. गुर्ख्यांचें सरकार पहिल्या तहनाम्यास कबूल होऊन युद्धाची समाप्ति होते. १२ इंग्लिशांनीं गुर्ख्यांपासून मिळविलेला मुलूक गवर्नर जनरल परत देतो. नेपाळचा राजा देवीनीं मरण पावल्यावर त्याचा मुलगा त्याचे जागीं बसतो. १३ ह्या लढाईचा गुणदोष.

## प्रकरण १८ पृष्ठें १३३–१४७

### मार्किस आफ हेस्टिंग्स ह्याची कारकीर्द. पेशव्याच्या राज्याची समाप्ति.

इसवी संन १८१६–सं० १८१७.

१ बाजीराव पेशवा इंग्लिशांशीं बिघडण्याची संधि पाहतो. २ पेशवा व गाइकवाड ह्यांचा खंडणीविषयींचा तंटा. ह्यामध्यें इंग्लिशांची मध्यस्थी होती. ह्या तंट्याच्या निवाड्याकरितां गाइकवाडाचा वकील गंगाधरशास्त्री पटवर्धन इंग्लिशांच्या बाहदारीनें पुण्यास जातो. ३ अमदाबाद प्रांताचा निमे भाग पेशव्यास मिळतो. ४ गंगाधरशास्त्री ह्यास बाजीराव भुलथाप देऊन ठेवून घेतो. पुढें पंढरपुरास मारेकऱ्याच्या हातानें त्याचा खून होतो. त्या खुनाबद्दल त्रिंबकजी डेंगळा इंग्लिशांच्या कैदेंत पडल्यावर सुटून पळून

जातो. ५ बाजीराव फौजेची तयारी करितो व रेसिडेंटास भुलथापा देतो. रेसिडेंटही आपल्याकडून सैन्याची तयारी राखितो. ६ कर्नल स्मिथ साहेब पेशव्याकडील नवी फौज हांकून लावितो. व कप्तान देवीस साहेब खानदेशांत त्रिंबकजीचा भाऊ गोदाजी ह्याचा पराभव करितो. ७ त्रिंबकजीस धरण्याविषयीं पेशवा संकटानें कबूल होतो. ८ गवर्नर जनरल साहेब बाजीरावापासून नवा तह करवितो. ९ बाजीराव व इंग्लिश ह्यांच्या फौजांची युद्धांविषयीं तयारी होते. १० पेशवा व रेसिडेंट ह्यांचा उघड बिघाड होऊन पेशव्याचें लष्कर रेसिडेंटाच्या बंगल्यावर हल्ला करितें. रेसिडेंट निघून गेल्यावर त्याचा वित्तविषय पेशव्याचें लष्कर लुटून घेतें. ११ खडकीवरची लढाई. १२ आणखी कांहीं युद्ध होऊन बाजीराव निघून जातो. पुणें शहर इंग्लिशांच्या हस्तगत होतें. १३ बाजीराव पळत फिरतो. त्याच्या पाठीस इंग्लिशांचीं लष्करें लागतात. शेवटीं मालकम साहेबाच्या स्वाधीन बाजीराव होतो, आणि राज्याचा बेदावा लिहून देऊन नेमणूक घेण्याचें कबूल करून ब्रह्मावर्तास जाऊन राहतो. १४ बाजीरावाचा मुलूक व किल्ले इंग्लिशांच्या स्वाधीन होतात. त्रिंबकजी डेंगळा इंग्लिशांच्या हातीं सांपडून चुनारगड येथें कैदेंत पडतो. १५ बाजीराव पळत असतां कोरेगांव आष्टे आणि सुनी ह्या ठिकाणीं लढाया झाल्या तें वर्तमान. अष्ट्याच्या लढाईत सातारचा राजा प्रतापसिंह इंग्लिशांच्या हस्तगत होतो. १६ एल्फिन्स्तन साहेब ह्यानें राज्याचा चांगला बंदोबस्त केल्यामुळें जिकडे तिकडे स्वस्थता होते.

---

## प्रकरण १९ पृष्ठें १४७–१५३

## मार्किस आफ् हेस्तिंग्स ह्याची कारकीर्द. नागपूरकर भोंसला ह्याच्या दरबारचीं वर्तमानें.

### इसवी सन १८१६–सं१८१८

१ रघोजी भोंसला वारल्यावर त्याचा पुत्र परसाजी नागपूरच्या गादीवर बसतो. तो असतां इंग्लिशांची फौज ठेवण्याविषयीं तह होतो. परसाजी अपघातानें मरून आपासाहेब गादीवर बसतो. तो इंग्लिशांशीं वैरभाव

धरून युद्धाची तयारी चालवितो. २ भोंसल्याकडील आरब रेसिडेंटाच्या फौजेवर हल्ला करितात. नंतर ह्यांची त्यांची दोन दिवस लढाई होऊन इंग्लिशांचा जय होतो. ३ आपासाहेब पश्चात्ताप पावून रेसिडेंटाचें बोलणें कबूल करून आपण स्वतां ओलीस इंग्लिशांचे लष्करांत येतो. त्याजकडील फौज इंग्लिशांवर हल्ला करिती आणि पराभव पावती. ४ रेसिडेंट साहेब आरबांस हद्दपार करवून व राज्याच्या व्यवस्थेचा करार करून घेऊन आपासाहेबास आपल्या वाड्यांत जाऊन राहण्यास मोकळीक देतो. ५ आपासाहेबाचें कृत्रिम जाणून त्यास व त्याच्या दोन कारभाऱ्यांस रेसिडेंट कैदेंत ठेवितो. पुढें त्यांस प्रयागास पाठवितो. त्यांतून आपासाहेब वाटेनें पळून जातो. ६ आपासाहेब गोंडवणांत जातो. तेथून त्यास आदम साहेब पिटून लावतो. मग तो आशीरगडाच्या आश्रयास जातो. इंग्लिशांचें लष्कर आशीरगडास वेढा घालितें. मग किल्लेकरी किल्ला इंग्लिशांच्या स्वाधीन करितो. ७ आशीरगडांत आपासाहेब सांपडत नाहीं. पंजाबांत रणजितसिंगानें त्यास आश्रय दिला अशी बातमी समजती.

---

## प्रकरण २० पृष्ठें १५४-१६३

## मार्कीस आफ् हेस्तिंग्स ह्याची कारकीर्द. दुआबेंतील बंडें. पेंढाऱ्यांशीं लढाई व त्यांचा नाश.

### इसवी सन १८१६-सं० १८१८

१ नेपाळच्या लढाईंत प्रथम इंग्लिशांस जय मिळाला नाहीं ह्मणून हिंदुस्थानांतील कितीएक संस्थानिकांस इंग्लिशांस हांकून देण्याची उमेद येती. रोहिलखंडांत बरली येथें मुसलमान लोक बंड करितात. तें बंड मोडतें. २ दुआबेंतील मांडळीक ठाकूर दयाराम व भगवंतासिंग हे बंड करितात. तें बंड मोडतें. ३-४-५ पेंढारी कोण व त्यांची रीत कशी. ६ पेंढाऱ्यांस हिंदुस्थानांतील कितीएक संस्थानिक आश्रय देतात. ७-८ पेंढाऱ्यांचा सरदार करीमखान व छट्टू ह्यांचें वर्तमान. ९ इंग्लिशांच्या मुलकांत पेंढारी लूट करीत असतां त्यांचें पारिपत्य इंग्लिश करितात. मग त्यांचा उपद्रव

फिरून आपल्या रयतेस होऊं नये ह्मणून त्यांस नाहींसें करण्याकरितां फौजा जमवितात. १० शिंदे वगैरे हे पेंढाऱ्यांचें पारिपत्य करण्यास अनुकूल होतात. ११ पेंढाऱ्यांचा पाठलाग इंग्लिश करितात. १२ होळकराच्या लष्करांत फिसाद होऊन तुळजाबाईचा खून होतो. महिदपूर येथें होळकराच्या लष्कराची व इंग्लिशांची लढाई होऊन त्या लष्कराचा पराभव होतो. पुढें मल्हारराव होळकर इंग्लिशांशीं तहनामा ठरावून घेतो. १३ पेंढारी निराश्रित होऊन त्यांची समाप्ति होते. १४ ह्या लढाईचे गुणांचें वर्णन.

---

## प्रकरण २१ पृष्ठें १६३–१७९

### इंग्लिश सरकारानें जे संस्थानिक कायम राखिले त्यांचीं कांहीं वर्तमानें. व त्यांशीं कसकसे तह ठरविले तो प्रकार.

### इसवी संन १८१९–सं० १८२३

१–२ भोपाळच्या नवाबांची उत्पत्ति, व त्यांच्या उलटापालटी. भोपाळच्या नवाबास इंग्लिशांचा आश्रय मिळतो. ३ कोटा एथील सरकारचें वर्तमान. ४ जोतपूरच्या राजाचें वर्तमान. ५ उदेपूरच्या राण्याचें वर्तमान. ६ बुंदीच्या राजाचें वर्तमान. ७ बिकनीरच्या राजाचें वर्तमान. ८ जसलमीरच्या राजाचें वर्तमान. ९ माळव्यांतील लहान लहान संस्थान्यांचें वर्तमान. १०–११ जयपूरच्या राजाचें वर्तमान. १२ वर लिहिलेल्या संस्थानांचा बंदोबस्त कोणत्या कारणावरून व कसा झाला तें वर्तमान. १३ पेशव्यापासून घेतलेल्या राज्याचा बंदोबस्त होतो. १४ सातारच्या राजाची स्थापना व त्याच्या राज्याचा बंदोबस्त. १५ कोलापूरकर राजाचें वर्तमान. १६ वाडीच्या सांवत राजाचें वर्तमान. १७ प्रतिनिधि पंतसचिव इत्यादि संस्थान्यांचें वर्तमान. १८ हैदराबादेच्या दरबारचें वर्तमान. १९ नागपूरकर राजाचें वर्तमान. २० जबलपूरच्या भोंवतालचा प्रांत इंग्लिशांच्या इतर मुलकांत सामील होतो. २१ होळकराच्या संस्थानाचा बंदोबस्त. २२ गाइकवाडाची हकीकत. २३ शिंद्याकडील वर्तमान. २४ इंग्लिश सरकारच्या जमाखर्चाचें वर्तमान.

## प्रकरण २२ पृष्ठें १७९-१९४

## लार्ड आमहर्स्त ह्याची कारकीर्द. ब्रह्मी लोकांशीं लढाई.

### इसवी सन १८२३–सं० १८२६.

१ मार्किस आफ् हेस्टिंग्स साहेब गेल्यावर लार्ड आमहर्स्त साहेबाची गवर्नर जनरलाच्या कामावर नेमणूक होती. ब्रह्मराजाशीं लढाई करण्यांत त्यास मन घालावें लागतें. २ ब्रह्मराज्याकडील पहिली हकीकत व त्याची वृद्धि. ३-४-५ इंग्लिशांच्या व ब्रह्मराजाच्या लढायांचीं कारणें. ६-७ लढाईचा आरंभ. रंगून शहर इंग्लिशांच्या हस्तगत होतें. चिडूबा बेट त्यांच्या हस्तगत होतें. ८ इंग्लिशांच्या व ब्रह्मी लोकांच्या कितीएक लढाया होतात. ९ तेनासरिम प्रांत इंग्लिशांच्या हस्तगत होतो. इंग्लिश लष्कर आसाम घेतें. आराकान प्रांतांत बंधूला इंग्लिशांचा पराभव करितो. बाराकपूर येथील पलटणी ब्रह्मदेशावर जाण्यास नाकबूल होतात. त्यांतून कितीएक जिवास मुकल्यावर बखेडा शांत होतो. १० लढाई चालू होऊन इंग्लिशांचा कांहीं उत्कर्ष होतो. ११ इंग्लिश प्रोमनामें शहरावर जाण्याचा बेत करून निघतात. १२ वाटेनें डोनोबूनामें ठाणें त्यांच्या हस्तगत होतें. बंधूला सरदार युद्धांत पडतो. १३ ओसाड देशांतून कूच करून इंग्लिशलष्कर प्रोम शहर येथें पोहोंचतें. ब्रह्मी लष्कर लोकांस रानांत हांकून देऊन त्या शहरास आग लावितें. इंग्लिशांची भलाई पाहून लोक विश्वास धरून परत येतात. १४ हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांच्या सरहद्दीवरील कांहीं लढाया. रंगपूर, मणिपूर, व आराकान शहर, हीं इंग्लिशांच्या हस्तगत होतात. इंग्लिशांची बहुतेक फौज बंगाल्यास परत येती. १५ ब्रह्मी लोक तह करीत नाहींत ह्मणून लढाई फिरून चालू होती. प्रथम इंग्लिशांचा पराभव होतो. शेवटीं ब्रह्मी फौजेचा मोड होतो. १६ ब्रह्मी लोक तहनामा करितात, परंतु शेवटास जात नाहीं. पुनः इंग्लिशांच्या व त्यांच्या कितीएक लढाया होतात. मेलूनचा किल्ला इंग्लिशांस मिळतो. ब्रह्मी फौजेचा मोड होतो. १७ नार्वेन बारेम नामें त्यांचा शूर सरदार मोठी फौज घेऊन युद्धास येतो. त्याचा

पराजय होऊन तो परत जातो. राजा त्यास हत्तीच्या पायीं देतो. १८ इंग्लिशांचें प्राबल्य पाहून ब्रह्मी राजा तह करितो. १९ तहनाम्यांतील ठरावाचीं कलमें. २० इंग्लिशांची फौज माघारी निघून येते. २१ लढाईचें फळ.

---

## प्रकरण २३ पृष्ठें १९४–२००

## लार्ड आमहर्स्त ह्याची कारकीर्द. भरतपूरच्या किल्ल्याचा वेढा. इतर किरकोळ वर्तमानें.

### इसवी सन १८२५–सं० १८२६

१ भरतपूरचा राजा मरण पावल्यावर त्याच्या मुलास आक्टर्लोनी साहेब सरकारतर्फें वस्त्रें देतो. दुर्जनसाल किल्ला बळकावून घेतो. त्याचें बंड मोडण्यास आक्टर्लोनी साहेब उद्योग चालवितो. तो सरकारच्या विचारास न आल्यामुळें काम सोडतो. ३ दुर्जनसालास काढून वास्तवीक अधिकारी बसविण्याचा निश्चय सरकार करितें. ४ किल्ला घेण्यासाठीं इंग्लिशांची फौज जमा होऊन किल्याजवळ पोहोंचती. ५–६–७ इंग्लिश भरतपूरचा किल्ला घेऊन राजास फिरून गादीवर बसवितात. ८ कोलापूरचा राजा इंग्लिशांशीं बिघडून फिरून शरण येतो. ९ दिल्लीच्या राजाचा अलकाब बंद करून इंग्लिश सरकार आपल्या राजाच्या नावानें रुपयांवर वगैरे शिक्के करितात. १० लार्ड आम्हर्स्त साहेब विलायतेस जातो. एल्फिन्स्तन् साहेब मुंबईचा गवर्नर विलायतेस जातो. मद्रासचा गवर्नर मनरो साहेब पटकीनें वारला. त्याच्या व एल्फिन्स्तन् साहेबाच्या गुणांचें वर्णन. ११ मुंबई व मद्रास येथें नवे गवर्नर आणि कलकत्त्यास नवे गवर्नर जनरल साहेब येतात.

---

## प्रकरण २४ पृष्ठें २००-२१४

## लार्ड विलियम बेंटिक ह्याची कारकीर्द.

### इसवी संन १८२८-सं० १८३५

१ लार्ड बेंटिक साहेबाची नेमणूक. २ नवा गवर्नर जनरल खर्च कमी करण्याचा उद्योग चालवितो. ३ वर्तमानपत्राची मोकळीक गवर्नर जनरल करितो. आणि रयतेनें समक्ष मजकूर कळविण्याची सोय करितो. ४ विद्याभ्यास वाढवावा व इतर रीतींनीं इकडील लोकांचें कल्याण करावें ह्याविषयीं गवर्नर जनरल साहेब झटतो. ५ सती जाण्याची बंदी. ६ इंग्लिश कामदारांवर गवर्नर जनरलाची जरब. दिल्लीच्या रेसिडेंटाची बर्तर्फी. बुखाऱ्यापर्यंत कपतान बर्नस साहेब प्रवेश करितो. ८ गवर्नर जनरल व रणजितसिंग ह्यांची भेट होती. मग रजपूत राजे रजवाडे ह्यांच्या व गवर्नर जनरलाच्या भेटी होतात. ९ गाइकवाडाचा जप्त केलेला मुलूक मुंबईचा गवर्नर सोडतो. १० निजामाचें वर्तमान, व अयोध्येच्या नवाबाचें वर्तमान. महिसूरचा कारभार इंग्लिश सरकारांत येतो. कूर्गचा मुलूक इंग्लिश सरकारांत दाखल होतो. ११ बारासेत प्रांतांत तिटूमिराचें बंड होतें. तें मोडतें. छोटा नागपूर व रामपूर येथें कोळी व गोंड ह्यांचा बखेडा होतो तो बंद होतो. १२-१३ शिंदे सरकारांतील बाइजाबाईचें वर्तमान. तिचा व जनकोजीरावाचा तंटा. १४ मल्हारराव होळकर मेल्यावर दत्तक मार्त्तंडराव गादीवर बसतो. मग तो निघून हरीराव बसतो. १५ जोतपूरचा बंदोबस्त इंग्लिश सरकार करितें. १६ शेकावती येथें लुटारू लोकांचा बंदोबस्त होतो. १७ जयपूरच्या राजाचें वर्तमान. येथील गर्दीत रेसिडेंटास वार लागतो. दिल्लीच्या रेसिडेंटाच्या खुनामध्यें सामिल झाल्याबद्दल फिरोजपूरचा नवाब समसुद्दीन ह्यास इंग्लिश सरकार फांशीं देतें. १८ इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांच्यामध्यें वाफेचीं जाहाजें चालूं होतात. व भागीरथीवर वाफेचीं लहान गलबतें चालूं होतात. १९ लार्ड बेंटिक साहेब बहुमान पावून विलायतेस निघून जातो. २० हिंदुस्थानच्या कारभारासंबंधी नवा ठराव.

२३ सं. ३८

## प्रकरण २५ पृष्ठें २१४-२३४

### लार्ड आक्लंड ह्याची कारकीर्द. काबूल येथील लढाई.

### इसवी सन १८३५-सं० १८४१.

१ लार्ड बेंटिक साहेब गेल्यावर मेटकाफ साहेब गवर्नर जनरलाचें काम पाहतो. पुस्तकें व वर्त्तमानपत्रें छापण्याची अगदीं मोकळीक करून, व जागोजागची जकात माफ करून, तो मोठी कीर्त्ति मिळवितो. २ गवर्नर जनरलाच्या कामावर लार्ड आक्लंड ह्याची नेमणूक होते. गुमसूर येथील नवाब इंग्लिशांशीं विरोध करितो. त्यावर फौज पाठवून सरकार त्याचा बंदोबस्त करितें. ३ अयोध्येचा नवाब वारल्यावर त्याचा चुलता नासरुद्दवला ह्यास इंग्लिश सरकार गादीवर बसवितें. ह्याला बसविण्यांत मुनाजान वगैरे गर्दी करितात. ४-५-६ काबूल येथील शाहसुजा व फत्तेखान वगैरे ह्यांची हकीकत. ७ दोस्तमहंमदाचें वर्णन. ८ रणजितसिंगानें दोस्तमहंमदाच्या भावापासून पेशावर प्रांत जिंकून घेतला होता तो परत देवविण्याविषयीं इंग्लिश सरकारानें मध्यस्थी करावी ह्मणून दोस्तमहंमद गवर्नर जनरलास पत्र लिहितो. ९ उदमाप्रकरणीं दोस्तमहंमदाशीं तह करण्याकरितां इंग्लिश सरकारानें बर्नस साहेब वकील पाठविल्यावर दोस्तमहंमद रशियनांस सामिल आहे अशा समजुतीनें तो मसलत फिरून शाहसुजा ह्यास गादीवर बसवावें आणि दोस्तमहंमद व त्याचे भाऊ हे काढावे असा निश्चय होऊन युद्ध करण्याकरितां फौजेची तयारी होते. १० ह्या फौजेपैकीं मुंबईकडील फौज सर जानकीन साहेब घेऊन सिंध देशांतून जात असतां सिंधच्या अमीरांचा बंदोबस्त करितो. ११ वाटेनें बलोची लोकांपासून फौजेस उपद्रव होतो, व दाणापाणी ह्याच्या तोट्यामुळें लोकांस फार इजा होते. १२ इंग्लिश लष्कर व शाहसुजा हे कांधारास पोहोंचून शाहसुजा राज्याभिषेक करून घेतो. १३ गिजनीचा किल्ला इंग्लिश फौज हल्ला करून घेते. १४ रणजितसिंगाकडील कुमकेचें लष्कर घेऊन वेदसाहेब खैबर घाटानें आलीमसजीद येथें येऊन राहतो. १५ इंग्लिशांचें लष्कर काबुलास जाऊन पोहोंचतें. दोस्तमहंमद बुखाऱ्याकडे पळून गेला असतां शाहसुजा आपल्या जुन्या तक्तावर बसतो. १६ किलातावर जनरल विल्चेर साहेब स्वारी करून तो किल्ला घेतो. शाहसुजा

ह्याच्या रक्षणार्थ कांहीं लोक राहून बाकीचें लष्कर हिंदुस्थानांत येतें. १७ काबुलाच्या मोहिमेंत साहेब लोकांनीं पराक्रम केल्यावरून कितीएकांस विलायतेच्या सरकाराकडून व शाहसुजा ह्याजकडून किताब वगैरे मिळतात. १८ दोस्तमहंमद बुखाऱ्यास गेल्यावर तेथील खान त्यास कैदेदाखल प्रतिबंधांत ठेवितो. तेथून तो लांच देऊन सुटतो. १९ दोस्तमहंमद फौजा ठेवून लढाया करितो. त्याच्या लष्कराची फाटाफूट होती. २० दोस्तमहंमद हा माकनाटन साहेब ह्याच्या स्वाधीन आपण होऊन होतो. त्याचा मान तो साहेब करितो. दोस्तमहंमद ह्यास इंग्लिश सरकार कलकत्त्यास नेऊन ठेवितें. गवर्नर जनरल वगैरे मंडळीस आपल्या कार्यसिद्धीचा संतोष होतो. परंतु त्याचा परिणाम भयंकर होतो. हिरातेस इराणी लोक वेढा घालतात. त्या किल्ल्याचें संरक्षण करण्याविषयीं पाटिंजर साहेबाचें चातुर्य व शौर्य होतें. २४ खिवा येथें रशियन लोकांनीं स्वारी केली तिचें वर्त्तमान. २५ आदन बंदर येथें इंग्लिश ठाणें घालतात. २६ साताऱ्याच्या राजाचें विरुद्धाचरण. त्या राजाची पदच्युति होऊन त्याचा भाऊ आपासाहेब यास त्या गादीची प्राप्ति होती २७ अयोध्येच्या नवाबाची हालीमाजी. २८ हैदराबादेस बखेडा होतो. कर्नूलच्या नवाबाचें संस्थान जप्त होतें.

---

## प्रकरण २६ पृष्ठें २३५–२५२.

### लार्ड एल्लनबरो साहेब ह्याची कारकीर्द. आफगाणस्थानांत बंड व लोकांचा नाश होऊन तेथून लष्कर परत आलें तें वर्तमान. शिंद्याच्या दरबारची हकीकत. सिंध इंग्लिशांच्या स्वाधीन झाली तो प्रकार.

इसवी संन १८४१–सं० १८४४

१ बदामीचें बंड. २–३ आफगाणस्थानांत बंड होण्याचीं कारणें व बंडाची सुरुवात. ४ बंड उपस्थित होऊन बंडवाल्याच्या हातानें बर्नस साहेब व दुसरे इंग्लिश सरदार मरतात. शाहसुजा व इंग्लिश लष्कर ह्यांजवर

हल्ला करण्यास बंडवाले लष्कर जमवितात. ५ सर विलियम माकनाटन साहेब काबुल येथील रेसिडेंट हा अकबरखानाच्या हातानें मरण पावतो. ६ इंग्लिश लष्कर काबुलाहून निघून येतें. वाटेनें त्याचा संहार होतो. ७ कांधार येथील जनरल नाट साहेबाची हकीकत. जनरल सेल साहेब आपलें लष्कर घेऊन जलालाबादेच्या किल्ल्याचा आश्रय धरून त्याचें रक्षण करितो. ८ जनरल नाट साहेबाच्या व जनरल सेल साहेबाच्या कुमकेस लष्करें रवाना होतात. ९ लार्ड एलनबरो साहेब गवर्नर जनरलाच्या कामावर येऊन आफगाणस्थानाच्या बंदोबस्ताची मसलत करितो. जलालाबाद येथें जनरल सेल साहेब मोठा पराक्रम करून किल्ल्याचें संरक्षण करितो. जनरल पालक साहेबाचें सैन्य जलालाबादेस पोहोंचून तेथील शूर लोकांच्या संकटाची समाप्ति होती. १० काबूल येथें पुनः बंड होऊन शाहसुजा प्राणास मुकतो. गवर्नर जनरल साहेबानें केलेला निश्चय. ११ त्याचा जाहिरनामा. १२ इंग्लिश लष्करें काबुलास पोहोंचून मागल्या कृत्याचा सूड घेतात. आफगणांनीं कैद केलेलीं इंग्लिशांचीं माणसें मुक्त होतात. १३ इंग्लिश लष्कर हिंदुस्थानांत परत येतें. दोस्तमहंमद हा गवर्नर जनरलानें सोडल्यानंतर काबुलास जाऊन पुनः तक्तादर बसतो. १४ मागल्या लढाईचे गुणदोष. १५ शिकांच्या दरबारची हकीकत. १६ सिंधेंतील अमीरांशीं पूर्वीं तह झाला होता त्याचा तपशील. १७ तहाप्रमाणें वहिवाट करण्यांत अमीरांकडून अंतर पडल्यामुळें त्यांचा बंदोबस्त करण्यास जनरल नेपियर साहेब मुंबईहून सिंधेस जातो. तो युद्धाची तयारी करितो. १८ अमीर लोक आंतून तयारी करितात. नेपियर साहेब इमामगड पाडून टाकितो. बलोची सरदार हे मेजर उत्रम साहेब रेसिडेंट ह्याच्या बंगल्यावर हल्ला करितात. १९ मिआनी येथें मोठी लढाई होती, तिजमध्यें अमीरांचा पराभव होऊन ते शरण येतात. त्यांचें राज्य इंग्लिश घेतात. २० बलोची लोकांशीं आणखी कितीएक वेळ युद्धें होतात. त्यांत त्यांचा पराभव होऊन देशाचा बंदोबस्त होत जातो. २१ शिंद्याच्या दरबारांत बखेडा होतो. २२ दादा खासगीवाला इंग्लिशांच्या स्वाधीन होतो. २३ महाराजपूर व पन्यार येथें मोठ्या लढाया होऊन शिंद्याच्या लोकांचा पराभव होतो. त्या दरबाराशीं नवा तह होतो. २४ कितीएक संस्थानिक लोकांमध्यें फेरफार. आंग्र्याचें संस्थान

कुलाबा हें इंग्लिश सरकारांत येतें. २५ लार्ड एलनबरो ह्यास कामावरून रजा. सर हेनरी हार्डिंग साहेबाची गवर्नर जनरलाचे कामावर नेमणूक होती. २६ कोलापूर येथील बंड.

---

प्रकरण २७ पृष्ठें २५२–२५६

इंग्लिशांच्या राज्याची सांप्रतची स्थिति आणि त्यांचा उदय होण्याचीं कारणें. कलमें १–२–३–४

कायदे पृष्ठें २५६–२६३

दिवाणी कायदे पृष्ठें २६३–२६५

फौजदारी कायदे पृष्ठें २६५–२६६

पुरवणी पृष्ठें २६६–२७४

चीनची लढाई २६६–२६९

सिंव्हलद्वीप २६९–२७१

पुलोपिनांग २७१

मलका २७२

सिंगापूर २७३

मोरिशस २७३–२७४

---

मराठी ग्रंथ संग्रहालय नं० ठाणें सन १८..

# हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास.

---

## प्रकरण १.

### युरोपिअन लोक हिंदुस्थानांत प्रथम येऊं लागले ह्याविषयीं.

इ० संन १४९८ पासून संन १६१८ पर्यंत.

---

१ **पोर्तुगीस** लोकांचा राजा **इमान्युएल** राज्य करीत असतां **वास्कोडीगामा** नामें कोणी सरदार इ० संन १४९८ वांत **केपआफ् गुड्होप** ह्यास प्रदक्षिणा करून **पोर्तुगाल** देशाहून जहाजांत बसून **कालिकोटास** आला, आणि त्यानें **कोची** एथें ठाणें घातलें. त्या वेळीं **हिंदुस्थानाच्या** दक्षिणेकडचे राजे निर्बळ होते, आणि ते परस्परांशीं सर्वकाळ भांडत असत, ह्यामुळें **पोर्तुगीस** लोकांस अमल बसविण्यास फारशी अडचण पडली नाहीं. ज्यांनीं अडथळा केला त्यांस **आल्मेदा** व **आल्बुकेर्क** ह्या दोघां प्रतापी **पोर्तुगीस** सरदारांनीं जिंकून आपल्या अमलाचा बंदोबस्त केला. इ० स० १४९८

२ पुढें इ० संन १५१० ह्यांत **पोर्तुगीस** लोकांनीं **गोंवें** ही आपल्या कारभाराची मुख्य जागा केली. इ० स०

१५१८ ह्यांत पूर्वेकडील समुद्रकांठचीं **निगापट्टण** व **मालियापूर** हीं शहरें आणि **सिंहलद्वीपचीं** कांहीं बंदरें त्यांनीं घेतलीं; **दमण** व **दिव** एथेंही अमल बसविला; **मलक्का** व **कांबोज** हीं आपल्या स्वाधीन करून घेतलीं; **सुमात्रा**, **जावा**, **सिलिबीस**, व **बोर्निवो** ह्या पूर्वेकडील बेटांत, आणि **चीन** व **जापान** ह्या देशांतही त्यांनीं प्रवेश केला; **चिनई** लोकांपासून चांचे ह्यांच्या पारिपत्याबद्दल बक्षीस ह्मणून **मकाव** बेट मागून घेतलें; आणि **इराणी** अखातांत **मस्कत** व **हुर्मझ** एथें ठाणीं केलीं.

इ० स० १५३२

३ ह्याप्रमाणें **पोर्तुगीस** लोकांच्या राज्याची भरभर होत चालली; परंतु **गोंव्याच्या** सुभेदारांची बदली तीन तीन वर्षांनीं होत असे, त्यावेळेस सगळे कामदार नवे होत; कोणताही व्यापार कामदारांशिवाय दुसऱ्या कोणीं करूं नये अशी बंदी होती; इनसाफाची रीति नीट नव्हती; आणि धर्माच्या कामांत जुलूम फार असे, ह्या गोष्टींमुळें त्यांच्या राज्यास मजबुती नव्हती.

४ अशामध्यें **स्पान्यर्ड** ह्मणजे **स्पेन** देशचे लोक ह्यांचा व **पोर्तुगीस** ह्यांचा कलह होऊन **स्पान्यर्ड** ह्यांनीं **पोर्तुगीस** ह्यांचीं कितीएक संस्थानें घेतलीं, आणि **फिलिपिन** बेटांतही आपला अमल बसविला.

५ **स्पान्यर्ड** हे पूर्वेकडच्या देशांमध्यें व्यापार करूं लागले असें पाहून **हालंड** देशचे लोक जे डच ज्यांस **वलंदेजी** ह्मणतात, त्यांस त्या व्यापाराविषयीं लोभ उत्पन्न झाला. मग त्यांनीं सर्कतीनें पैका जमवून एक **कंपनी** ह्मणजे भागिदा-

रांची मंडळी केली, आणि पूर्वसमुद्रांतील व्यापार आपणाशिवाय दुसऱ्या कोणीं करूं नये, व आपणास राज्यें घेण्यास व ठाणीं घालण्यास अधिकार असावा ह्मणून इ० सं० १६०२ इ० स० १६०२
च्या मार्च महिन्याचे २९ वे तारखेस आपल्या सरकारापासून सनद करून घेतली. पुढें **अंबोयना, बांडा, टर्नेट,** व **टैडोर** हीं बेटें घेतलीं; **जापान** बेटाशीं व्यापार चालू केला; आणि इ० सं० १६१९ मध्यें **जावा** बेटांत **बटेविया** इ० स० १६१९
नामें शहर वसविलें.

६ ह्या रीतीनें **डच** लोकांनीं हिंदी सागरांतील बहुतेक बेटांमध्यें आपलीं ठाणीं घातलीं, ह्यामुळें त्यांस व्यापार व द्रव्य ह्यांचा लाभ फार झाला. **हिंदुस्थानांतील** राजांच्या तंट्यांत मन घालण्याचें कारण त्यांस पडलें नाहीं.

७ **इंग्लिश** लोकांसही **इलिजाबेथ** राणीचे कारकिर्दींत पूर्वदेशांत व्यापार करण्याची इच्छा उत्पन्न झाली, आणि त्यांनीं **कंपनी** जमवून त्या राणीपासून इ० सं० १५९९ च्या डिसेंबर महिन्याचे ३१ वे तारखेस सनद करून घेतली. **युरोपिअन** लोकांनीं ज्या ज्या जागीं ठाणीं घातलीं नसतील त्या त्या ठिकाणीं ह्या कंपनीनें व्यापार करावा, व तिच्या लोकांशिवाय दुसऱ्या कोणीं तेथें व्यापार करूं नये अशी परवानगी पुढें झाली, तेव्हां ते **बांटम, आचीम,** वगैरे ठिकाणीं व्यापार करूं लागले, आणि इ० सं० १६१२ मध्यें त्यांनीं **सुरतेस** वखार बांधिली; परंतु त्यांचा व्यापार इतर **युरोपिअन** लोकांच्या व्यापाराप्रमाणें प्रथम चालत नव्हता.

# प्रकरण २.

## युरोपिअन लोकांच्या व्यापाराची व सत्तेची वृद्धि.

इ० सं० १६१८ पासून सं० १७४० पर्यंत.

१ वर लिहिलेल्या मुदतींत डच लोकांचा व्यापार पुष्कळ वाढला; आणि तो जसजसा वाढत चालला तसतसें त्यांचें नवे जिन्नस उत्पन्न करण्याचें कसब आणि उद्योग हीं वाढलीं. त्यांच्या मुलकांत द्रव्य पाहिजे तितकें होतें, आणि युरोपामध्यें उत्तरोत्तर लोकांच्या रीति सुधरत होत्या, ह्मणून जे नवे नवे चमत्कारिक जिन्नस देशांत येत त्यांचा खप होत असे.

२ डच लोकांनीं पूर्वसमुद्राच्या कांठचीं पलिकोट व नागपट्टण हीं शहरें पोर्तुगीस लोकांपासून घेतलीं; इ० सं० १६५६ नांत त्यांनीं कालिकोट आपल्या हस्तगत केलें; आणि पुढें लवकरच कोची व काननूर हीं त्यांच्या स्वाधीन झालीं. त्यांनीं सिंहलद्वीपांतील कोलंबो, मानार, वगैरे बंदरांत ठाणीं घातलीं; चीन व जापान एथील राज्यांत व्यापाराच्या संबंधानें प्रवेश केला; आणि युरोप व हिंदुस्थान ह्यांच्या वाटेवरचें प्रसिद्ध जें केप आफ् गुडहोप, तेथें आपल्या लोकांची वसाहत केली.

३ इंग्लिश लोक व्यापाराकरितां आंबोयना एथें राहात होते, त्यांशीं डच ह्यांनीं इ० सं० १६२३ सांत कपट करून कितीएकांस मारून बाकीच्यांस मसाल्याच्या बेटांतून काढून
इ० स० १६४० दिलें. मग इंग्लिश लोकांनीं गोंवळकोंड्याच्या राजाची परवानगी घेऊन मद्रासेंत आपलें ठाणें केलें. ह्याप्रमाणें ठाणीं

घालण्यास व किल्ले बांधण्यास दुसरा **चार्लस** जो राजा ह्यानें कंपनीस सनद करून दिली, आणि आपणास **पोर्तुगीस** राजाकडून **मुंबई** बेट इ० सं० १६६१ ष्टांत आंदण मिळालें होतें तें सं०१६६८ ष्टांत कंपनीच्या स्वाधीन केलें. तेथील बंदर सोईचें आणि निर्भय ह्मणून पुढें लवकरच **सुरतेंतील** व्यापार कमी होऊन **मुंबई** वाढूं लागली. शेवटीं इ० सं० १६८७ शींत **मद्रास** आणि **मुंबई** ह्यांवर शेजारच्या मुलकांतील राजांची सत्ता नाहीं असें ठरावून **इंग्लिशांचा प्रेसिडेंट** नामें अधिकारी त्या दोहों जागीं राहूं लागला, ह्यामुळें त्यांस "**प्रेसिडेन्सी**" असें नाव पडलें. पुढें सुमारें इ० सं० १६९९ वांत **कलकत्याच्या** सभोंवता कांहीं प्रदेश **बंगालच्या** नबाबापासून विकत घेऊन कंपनी ह्यांनीं तेथें "**फोर्ट विलियम**" ह्या नामें किल्ला बांधिला, आणि ती जागा तिसरी **प्रेसिडेन्सी** झाली.

४ कंपनी ह्यांनीं **हिंदुस्थानांतून** मलमल वगैरे जिन्नस नेण्याचा आरंभ केल्यामुळें इतर **इंग्लिश** व्यापाऱ्यांनीं आपलें नुकसान होऊं लागलें असें समजून फार गवगवा केला. त्यांचें कांहीं चालूं न देतां इ० सं० १६९३ वांत कंपनी ह्यांनीं नवी सनद मिळविली; परंतु त्याच वर्षी सरकारानें इतर व्यापाऱ्यांकडून दोन कोटि रुपये कर्ज घेऊन त्यांसही **हिंदुस्थानच्या** व्यापाराविषयीं सनद करून दिली. ह्या दोन मंडळ्यांमध्यें स्पर्धा आणि कलह हीं कांहीं वर्षेपर्यंत चालून शेवटीं इ० सं० १७०२ च्या जुलै महिन्याचे २२ वे तारखेस दोनही कंपन्या मिळून एक झाली, तीस "**युनैटेड् ईस्त इंडिया कंपनी**" असें नाव पडलें. त्या लोकांचें भांडवल त्या वेळीं दोन कोटि

रुपये होतें. त्यांस पुढें कांहीं वर्षांनीं दिल्लीच्या बादशाहानें जकातीची माफी करून दिली.

५ **फ्रान्स** देशचे लोक **फ्रेंच** ह्यांनीं ही इ० सं० १६६४ ह्यांमध्यें सर्कतीनें **हिंदुस्थानचा** व्यापार आरंभिला. त्यांचे कंपनीस प्रथम पंधरा वर्षेंपर्यंत व्यापार करण्याची व मुलूक घेण्याची सनद मिळाली. त्यांनीं **सुरतेस** इ० सं० १६७५ रांत वखार बांधिली आणि पुढें चार वर्षांनीं पूर्वसमुद्रकांठावर **पोंदेशरी** एथें ठाणें घातलें. अनंतर कांहीं वर्षांनीं **ऐल् आफ फ्रान्स** आणि **बुर्बों** हीं बेटें **डच** ह्यांनीं सोडून दिलीं होतीं तीं **फ्रेंच** लोकांनीं आपल्या ताब्यांत घेतलीं. तेथें व्यापार तर नव्हता खरा, परंतु बुंद पुष्कळ पिकूं लागला, आणि तीं बेटें लढाईचे वेळेस फार उपयोगीं पडूं लागलीं.

६ **डेन्मार्क** देशांत चवथा **ख्रिस्तिअन** जो राजा तो राज्य करीत असतां इ० सं० १६१८ मध्यें **हिंदुस्थानच्या** व्यापाराकरितां एक तेथील लोकांची **कंपनी** जमा होऊन तीस सनद मिळाली. त्या लोकांनीं कांहीं व्यापार आरंभिला, आणि **तंजावरच्या** राजापासून **त्रांक्विबार** घेतलें; परंतु त्यांचा व्यापार नीट चालला नाहीं, आणि शेवटीं इ० सं० १७२९ सांत कंपनीनें तो व्यापार करण्याचें सोडून दिलें.

# प्रकरण ३.

## इंग्लिश आणि फ्रेंच ह्यांच्या करनाटकांतील लढाया ह्यांविषयीं.

इ० सं० १७४० पासून संन १७५६ पर्यंत.

१ इंग्लिश कंपनी आणि फ्रेंच कंपनी ह्या दोहोंच्या कामगारांस हिंदुस्थानांतला व्यापार करण्याची व तेथें राज्य मिळविण्याची इच्छा होती ह्मणून सहजच त्यांमध्यें वैरभाव उत्पन्न झाला. इतक्यांत युरोपांत त्या उभयतां सरकारांमध्यें लढाईचा आरंभ होऊन हिंदुस्थानांतील फ्रेंचांचीं ठाणीं घेण्यास कांहीं आरमार व फौज इंग्लिशसरकारचे तर्फेनें आली, परंतु तिचें कांहीं चाललें नाहीं. एक वेळ इ० स० १७४६ इंग्लिश आणि फ्रेंच ह्यांच्या आरमारांची गांठ पडली ते वेळीं इंग्लिशांचा मुख्य सरदार क्यापटन् पेटन हा लढाई न करितां निघून गेला. नंतर लाबर्डोनें हा शूर फ्रेंच सरदार मद्रासेजवळ येऊन तेथून दहा कोशांवर उतरला, आणि त्यानें पांच दिवसपर्यंत मद्रासच्या किल्ल्यास वेढा देऊन तो घेतला. तो किल्ला कांहीं द्रव्य घेऊन परत द्यावा असा त्यानें करार केला होता; परंतु तो करार पोंदेशरी एथील गवर्नर डुप्ली ह्याच्या मनास आला नाहीं. तथापि जे इंग्लिश लोक लाबर्डोनें ह्याच्या हातीं सांपडले होते त्यांस त्यानें फार संभाळिलें. तो उपकार मनांत ठेवून लढाई संपल्यावर इंग्लिश कंपनीनें त्यास पुष्कळ द्रव्य बक्षीस पाठवून दिल्हें. पुढें तो युरोपास परत जात असतां तो

ज्या गलबतांत होता त्यास इंग्लिश बंदरांत जावें लागलें, तेव्हां तेथील लोकांनीं **लाबडोनें** ह्यास ओळखिलें आणि कैद केलें. मग त्यास **इंग्लंडास** नेलें ते वेळीं **इंग्लंडांतील** साऱ्या लोकांनीं त्याचा फार सत्कार केला. हा सरदार स्वदेशास गेल्यावर त्यास शत्रूंच्या चहाड्यांमुळें कैद भोगावी लागली; पुढें तो निरपराधी असें ठरलें, तथापि त्या अपमानामुळें त्यास क्षयरोग होऊन तो लवकरच मरण पावला.

२ पुढें **इंग्लिशांनीं पोंदेशरीस** वेढा घातला, परंतु त्यांचें
इ० स० १७४७ कांहीं चाललें नाहीं. शेवटीं इ० सं० १७४८ सांमध्यें **युरोपांत इंग्लिश** आणि **फ्रेंच** सरकारांचा तह होऊन **मद्रास इंग्लिशांस** परत मिळाली.

३ **तंजावर** एथें **शिवाजीचा** भाऊ **व्यंकोजी** ह्याचा वंशज **राजाशाहू** राज्य करीत असतां त्यास प्रधानानें राज्य-
इ० स० १७४१ पदावरून काढून **प्रतापसिंह** नामें कोणी राखेचा पुत्र होता तो तेथील गादीवर बसविला. तो राजा ह्मणून **इंग्लिश** ह्यांनीं कांहीं वर्षेंपर्यंत त्याशीं व्यवहार चालविला. असें असतां इ० सं० १७४९ सांमध्यें **शहाजी** ह्यानें **इंग्लिशांची** कुमक मागितल्यावरून त्यांनीं **देवीकोट** हा किल्ला घेण्याकरितां काळे शिपाई ५०० व गोरे शंभर इतके बरोबर देऊन **कोप** नामें सरदार पाठविला; परंतु त्याच्यानें कांहीं झालें नाहीं. पुढें त्या कामावर **मेजर लारेन्स** ह्या सरदाराची नेमणूक झाली. त्यानें युक्तीनें **कावेरी** नदी उतरून एकाएकीं हल्लाकरून **देवीकोट** किल्ला घेतला. परंतु **शहाजी** ह्यास रयत अनुकूल नाहीं ह्मणून इंग्लिशांनीं त्याचा पक्ष

सोडून प्रतापसिंह ह्याशीं तह केला, आणि त्यानें शहाजीस पोटास देऊन आपणाजवळ प्रतिबंधांत ठेवावें असें कबूल करविलें.

४ पोंदेशरी एथील फ्रेंचांचा गवर्नर डुप्ली हा पुढें मुलकाच्या कारभारांत मन फार घालूं लागला. दक्षिणेंतील सुभ्याचें काम निजामउल्मुलुक ह्याजकडे झाल्यावर त्यानें अर्काटचा ह्मणजे करनाटकांतील सुभा सादतुल्ला नामें कोणी एक सरदार ह्याजकडे सांगितला होता. तो सरदार मेल्यावर त्याचा पुतण्या दोस्तअल्ली हा निजामाच्या परवानगीची वाट न पाहतां तेथील गादीवर बसला. त्याचा जांवई चंदासाहेब नामें होता, त्यानें त्रिचिनापल्लीचा किल्ला तेथील विधवा राणीपासून कपटानें घेतला. नंतर तो प्रांत त्याच्या सासऱ्यानें त्यास जहागीर दिला. तें मराठे ह्यांस न आवडून रघूजी भोंसल्यानें संन १७४० सांत करनाटकावर स्वारी केली. त्यावर दोस्तअल्लीनें चालकरून लढाई केली; त्या लढाईंत दोस्तअल्ली पडला, आणि त्याचा मुलगा सफदरअल्ली ह्यानें मराठ्यांशीं सख्य करून त्यांस पैका दिला, व त्यांस अडथळा करण्याचें सोडून दिलें. मग रघूजी भोंसल्यानें त्रिचिनापल्लीस वेढा घातला. चंदासाहेबानें शौर्यकरून कांहीं महिनेपर्यंत टिकाव धरिला, परंतु शेवटीं किल्ला सोडून देऊन तो रघुजी भोंसल्याच्या स्वाधीन झाला. रघुजीनें त्यास धरून साताऱ्यास पाठविलें. त्याच्या मुलांमाणसांनीं पोंदेशरीस जाऊन तेथील गवर्नराचा आश्रय धरिला; त्यानें त्यांचें रक्षण करून चंदासाहेब ह्यास

सोडविण्याकरितां द्रव्याची कुमक केली. तें द्रव्य देऊन **चंदासाहेब** संन १७४८ सांत मराठ्यांकडून सुटून आला.

५ इकडे **करनाटकांतील** नवाबगिरीकरितां **दोस्तअल्ली** ह्याच्या कुटुंबांत भांडणें व कितीएक खून होऊन शेवटीं एक
इ० स० १७४३ मुलगा गादीवर बसला. **निजामउल्मुल्क** दक्षिणेंत आल्यावर त्यानें त्या मुलाच्या रक्षणाकरितां व कारभार चालविण्याकरितां **अनवरुद्दीन** नामें सरदार नेमिला. पुढें लवकरच ह्या मुलास **पठाण** शिपायांनीं मारिलें, तेव्हां **अनवरुद्दीन** हाच गादीवर बसला. ह्यास तेथून काढून आपण तो अधिकार
इ० स० १७४८ घेण्याकरितां संन १७४८ सांत **चंदासाहेबानें** ६००० फौज मिळविली, आणि रयतही आपणास वश करून घेतली.

६ **निजाम उल्मुल्क** मेल्यावर **हैदराबादेंत** ह्याचा मुलगा **नासिरजंग** गादीवर बसला. परंतु **निजामउल्मुल्काचे** मुलीचा मुलगा **मुझफरजंग** ह्यास तें न आवडून तो ह्या अधिकाराविषयीं दावा करण्यास सिद्ध झाला. त्यास **चंदासाहेब** आणि **फ्रेंच** हे अनुकूळ झाले. इकडे **नासिरजंग** आणि **अनवरुद्दीन** ह्यांस कुमक करण्याचें **इंग्लिशांनीं** कबूल केलें. पुढें लढाईस आरंभ होऊन **अंबूर** एथें **अनवरुद्दीन** आपल्या किल्याचें रक्षण करीत असतां लढाईंत पडला, आणि त्याचा मुलगा **महंमद**
इ० स० १७४९ **अल्ली** ह्यास तेथून निघून **त्रिचिनापल्लीस** जावें लागलें. ह्याप्रमाणें **चंदासाहेब** ह्याचा कांहीं उत्कर्ष झाला, तेणेंकरून संतोष पावून त्यानें **फ्रेंच** ह्यांस **पोंदेशरीच्या** जवळचे एक्यायंशीं गांव दिले.

७ **महंमद अल्ली** ह्यास **त्रिचिनापल्लीमध्यें नासिरजंग** व

मेजर लारेन्स साहेब हे फौजेसहित येऊन मिळाले. इकडे मुझफरजंगाच्या लष्करांतील फ्रेंच सरदार कांहीं कारणामुळें बिथरून निघून गेले, ह्मणून तो मुझफरजंग आपल्या चुलत्यास शरण आला; त्यानें त्यास लागलीच बिडी घातली. इ० स० १७५०
चंदासाहेबही फौजेसहित पोंदेशरीस निघून गेला.

८ नासिरजंग हा आळशी व विलासी होता. त्याच्या मोठ्या लष्करावर ३०० फ्रेंचांनीं कोणेएके वेळीं हल्ला केला, आणि अर्धकोसपर्यंत त्याचे छावणींत शिरून आपले लोक तिहीं चोहोंपेक्षां अधिक न पडूं देतां त्याचे सुमारें हजार लोक मारिले. पुढें तो व महंमद अल्ली ह्यांनीं इंग्लिशांशीं कज्जा केला; ही संधी पाहून डुप्ली ह्यानें नासिरजंगाशीं तहाचें बोलणें लाविलें; आणि इकडे जिंजी किल्ला घेऊन व युद्धाचा उद्योग निकरानें चालवून त्याला तें ऐकणें प्राप्त केलें. त्यानें तहनाम्यवर सही केली नाहीं इतक्यांत डुप्ली याच्या सांगण्यावरून पठाणांनीं बखेडा करून त्यास ठार मारिलें; नंतर मुझफरजंग ह्यास कैदेंतून काढून गादीवर बसविलें. त्याचाही त्या तंटेबाज पठाणांनीं प्राण घेतल्यावर फ्रेंचांनीं निजामाच्या मुलांपैकीं सलाबतजंग नामें मुलगा तो अधिकारावर स्थापिला.

९ इंग्लिशांनीं कांहीं वेळपर्यंत उदासीन होऊन उद्योग केला नाहीं. त्यांनीं त्रिचिनापल्लीस कुमकेकारितां शिपाई लोकांची एक टोळी पाठविली होती, तिचा पराजय वाटेनें चंदासाहेबाचे फौजेनें केला. त्या प्रसंगीं काळे शिपाई जाग्यावरून हालले नसतां गोरे लोक प्रथम पळाले. परंतु पुढें लवकरच क्याप्टन क्लैव साहेब ह्मणून सरदार २०० गोरे इ० स० १७५१

आणि ३०० काळे शिपाई आणि तीन लहान तोफा घेऊन **अर्काटावर** गेला. तो तेथून पांच कोसांवर आलिकडे पोहों-चला त्या दिवशीं, ह्मणजे आगस्त महिन्याचे ३१ वे तार-खेस, पाऊस, वारा, वीज, गर्जना, ह्यांचें तुफान असतां **क्लैव साहेब** ह्यानें एकाएकीं **अर्काटांत** घुसून तें शहर व किल्ला घेतला. तो तेथील सुखवस्तु लोकांस कांहीं उपद्रव न देतां बंदोबस्तानें राहिला. नंतर **चंदासाहेबाचा** मुलगा **राजा-साहेब** ह्यानें ४००० फौज व १५० **फ्रेंच** ह्यांसहित येऊन शहरास वेढा दिला; त्यास जुन्या किल्लेकऱ्यांपैकींही सुमारें तीन हजार लोक येऊन मिळाले. इतकें सैन्य बाहेर असतां **क्लैवसाहेब** ह्यानें न भिऊन त्यांवर कितीएक वेळां हल्ला केला, आणि त्यांचें पंधरा दिवसपर्यंत कांहीं चालूं दिलें नाहीं.
इ० स० १७५२ शेवटीं तटास दोन वाटा पाडून त्यांनीं मोहरमाचे दिवशीं, ह्मणजे नवेंबराचे १४ वे तारखेस, किल्ला घेण्याचा उद्योग केला. त्यावेळीं **क्लैवसाहेबाजवळ** ८० गोरे आणि १२० काळे शिपाई मात्र होते, परंतु त्यानें तितक्याच फौजेनिशीं हल्ला करणाऱ्यांवर निकरानें असा भडिमार केला कीं त्याचे ४०० लोक निकामे होऊन ते माघारां फिरले, आणि त्याच रात्रीं वेढा उठवून ते निघून गेले. नंतर **क्लैवसाहेबास मद्रासेहून** व **मराठ्याकडून** कुमक पोहोंचून त्यानें **फ्रेंचांपासून कांची** घेतली.

१० ह्याप्रमाणेंच त्या शूर **क्लैवसाहेबानें** आणखी एका प्रसंगीं **फ्रेंचांचा** स्मरण राहावयाजोगा पराजय केला; आणि शेवटीं तो व **लारेन्ससाहेब** ह्या दोघांनीं **त्रिचिनापल्लीस**

वेढा घातलेलें **फ्रेंचांचें** व **चंदासाहेबाचें** लष्कर उठवून लावायाकरितां व **तंजावर** आणि **महिसूर** एथील राजांचे लष्करास कुमक करण्याकरितां तिकडे स्वारी केली. त्या उभयतांनीं त्या लष्कराची फार दाणादाण केली. मग त्यां- इ० स० १७५२
तून बहुतेक **चंदासाहेबास** सोडून गेले. पुढें तो निरुपाय होऊन **तंजावरच्या** राज्याच्या स्वाधीन झाला. तो कोणाचे कैदेंत असावा ह्याविषयीं **महिसूरच्या** व **तंजावरच्या** सरदारांमध्यें कलागत होऊन शेवटीं **तंजावरकरांनीं** त्यास ठार मारिलें.

११ **फ्रेंच** ह्यांचा लढाईमध्यें असा पराजय होत चालला होता खरा, परंतु **हैदराबादेच्या** दरबारांत त्यांचें वजन वाढत होतें. **सलाबतजंग** ह्याजवर त्यांचे उपकार मोठे होते आणि **बुशी** नामें सरदार हा त्याच्या पदरीं होता, तो त्यास वारंवार फार उपयोगीं पडत असे. ह्यामुळें **सलाबतजंग** ह्यानें त्याजकडे **मदापल्लीपासून जगन्नाथपुरी** पर्यंत तीनशे कोस लांब प्रांताच्या अमलाचें काम सांगितलें, **फ्रेंच** लोक धनी झाल्यामुळें तेथील लोकांस हुशारी आली.

१२ पुढें आणखी कांहीं वर्षेंपर्यंत लढाई चालून कितीएक वेळां उभयतांचे जयपराजय झाले. शेवटीं **इंग्लिश** कंपनी आणि **फ्रेंच** कंपनी ह्या दोघांसही लढाईचा व तिच्या खर्चाचा त्रास येऊन **लंडनामध्यें** तहाचें बोलणें ठरलें. त्यावेळीं पूर्व- इ० स० १७५४
किनाऱ्यावर नवा मिळालेला सारा मुलूक सोडून देण्याचें **फ्रेंच** ह्यांनीं कबूल केलें. **महंमदअल्ली** हा **करनाटकच्या** नवाबगिरीचा अधिकारी खरा ह्या गोष्टीसही त्यांनीं आपलें

संमत दिलें. आणि फ्रेंच गवर्नर डुप्ली हा सर्व कलहास मूळ असा निर्णय होऊन त्यास काम सोडून परत येण्याचा हुकूम झाला. (इ० स० १७५४).

## प्रकरण ४.

### बंगाल्यांत आणि करनाटकप्रांतांत इंग्लिशांचा उत्कर्ष झाला त्यांविषयीं.

संन १७५६ पासून संन १७६० पर्यंत.

इ० स० १७५६ १ **बंगाल्याचा** सुभेदार **अलीवर्दीखान** ह्यानें आपल्या पुतण्याचा मुलगा **सुराजउद्दवला** ह्यास आपल्यामागें अधिकार मिळावा असें करून ठेविलें होतें, तो **सुराजउद्दवला** स्वभावानें क्रूर, लोभी, आणि विषयी होता; त्यानें आपला कोणी अपराधी माणूस **कलकत्ता** एथें **इंग्लिशांच्या** आश्रयास आहे तो ते देत नाहींत असें निमित्त करून **कलकत्त्यावर** स्वारी केली. त्या वेळीं तेथील मुख्य अधिकारी भयानें जहाजावर पळून गेले; परंतु सुमारें एकशें शेचाळीस इंग्लिश लोक मागें राहिले ते शत्रूच्या हातीं सांपडले, त्यांवर **सुराजउद्दवला** ह्यानें कांहीं क्रूरपणा करण्याचा हुकूम केला नसतां रात्रीं पाहरेकऱ्यांनीं त्यांस एके लहान आंधारकोठडींत घालून ठेविलें, तेथें ते दुःख पावून आक्रोश करीत असतां सूर्योदयाच्या पूर्वीं त्यांतून एकशेंतीस गुदमरून मृत्यु पावले.

इ० स० १७५६ ता० २० माहे जून

२ हें वर्त्तमान घडलें त्या काळीं **क्लैवसाहेब** **इंग्लंडाहून**

मं ३ ३८

परत **मुंबईस** येऊन तेथें **आंग्र्याचें गिर्यां** एथील ठाणे घेऊन **मद्रासेस** आला होता, त्याची नेमणूक **कलकत्त्यास** जाण्याविषयीं झाली.

३ **कलकत्ता** एथील **सुराजउद्दवला** ह्याच्या किल्लेकऱ्यांवर **इंग्लिशांच्या** जहाजांतून गोळ्यांचा भडिमार होऊं लागला तो त्यांस दोन तासही सहन न होतां ते तो किल्ला सोडून गेले (ता० २ जानुआरी सन १७५७). नंतर आंतील व्यवस्था पाहतां रयत व सावकार लोक ह्यांचीं घरें शिपायांनीं बहुतेक लुटलीं होतीं, परंतु कंपनीचा माल सुभेदाराकरितां रक्षण करून ठेविला होता, तो जशाचा तसाच होता.

४ ह्याप्रमाणें **क्लैवसाहेबानें कलकत्ता** परत घेऊन मग **हुगळी** शहरावर हल्ला करून तें हस्तगत करून घेतलें. नंतर कांहीं काळानें **कलकत्ता** परत घेण्यास सुभेदार येऊन इ० स० १७५८ त्यानें त्या किल्ल्यास वेढा दिला असतां **क्लैवसाहेब** धीटपणानें त्याच्या लष्करांतून रात्रीं आपल्या सैन्यासहित निघून गेला; त्यावरून **इंग्लिशांपुढें** आपलें चालावयाचें नाहीं असें सुभेदार ह्याच्या मनांत पक्कें ठसलें. नंतर त्यानें **इंग्लिशांच्या** वखारी परत द्याव्या व त्यांचा माल सरकारजमेस आला असेल तो भरून द्यावा, आणि परराज्य घेण्याकरितां किंवा आपल्या संरक्षणाकरितां उद्योग करणें तो उभयतांनीं एक विचारें करावा असा **इंग्लिशांसीं** तह केला. पुढें **क्लैवसाहेबानें फ्रेंचांचें चंद्रनगर** नामें एक शहर होतें तेंही घेतलें. इ० स० १७५७ ता० १४ माहे मार्च

५ **क्लैवसाहेब** ज्या कामाकरितां **बंगाल्यास** गेला होता

तें सिद्ध झालें; परंतु त्यानें हुकमाप्रमाणें परत न जातां **इंग्लिशांची** सत्ता **बंगाल्यांत** कायम करण्याची तजवीज आरंभिली.

इ० स० १७५७ ६ ती तजवीज अशी कीं पूर्वींचा सुभेदार **अलीवर्दीखान** ह्याचे बहिणीचा नवरा **मीरजाफर** नामें **सुराजउद्दवला** ह्याचा सरदार होता, त्यास अधिकाराची इच्छा उत्पन्न होऊन त्यानें **इंग्लिश** सरदार व कौन्सिलाचे अधिकारी ह्यांस पुष्कळ द्रव्य देण्याचें कबूल करून लिहून पाठविलें कीं तुह्मी एकवेळ जर लढाईचा प्रसंग कराल तर मी त्याचवेळीं सुभेदाराचें लष्कर सोडून तुह्माकडे निघून येईन. ही त्याची मसलत कबूल करण्याचें ठरवून **क्लैवसाहेब** आपल्या लष्करासहित **कासिमबाजाराकडे** निघून गेला.

इ० स० १७५७ ७ त्या वेळेस नवाब आपल्या मोठ्या सैन्यासुद्धां नदी पलिकडे छावणी करून होता. त्याशीं युद्ध करावें किंवा कसें ह्याविषयीं **इंग्लिश** फौजेंतील सरदारांची कचेरी जमून लढाई करूं नये असें ठरलें असतां, **क्लैवसाहेबानें** पुनः विचारकरून ती मसलत फिरविली, आणि आपण रात्रीं नदी उतरून जून महिन्याचे २२ तारखेस **प्लासी** एथें फौजेसुद्धां राईंत जाऊन राहिला.

८ सकाळीं आठ वाजतां लढाईस आरंभ झाला; त्यावेळेस **क्लैवसाहेबाजवळ** सुमारें नऊशें गोरे लोक, दोन हजार एकशें काळे शिपाई, आठ साहारत्तली तोफा, आणि दोन जेजाला, इतकी सामग्री होती. सुभेदाराजवळ पस्तीस हजार पायदळ पंधरा हजार स्वार आणि चाळीस तोफा होत्या. परंतु

१७ नं.

तो व त्याचें लष्कर ह्यांचा विश्वास परस्परांवर नव्हता, ह्मणून उभयतां सैन्यांमध्यें दुरूनच संध्याकाळचे पांच वाजत तोंपर्यंत तोफांचा मार चालला. शेवटीं इकडून **क्लैवसाहेबानें** चाल केली, आणि तिकडून **मीरजाफर** हा लष्करासहित निघून येऊं लागला. हें पाहून सुभेदार भयभीत झाला, आणि एके सांडणीवर बसून सुमारें दोन हजार लोकांसहवर्त्तमान पळून गेला. त्याच्या छावणींतील सर्व सरंजाम **इंग्लिशांस** सांपडला. ह्या लढाईंत मेलेले व जखमी झालेले मिळून **इंग्लिशांचे** बाहत्तर लोक निकामी झाले.

९ थोड्या श्रमानें सुभेदाराचा असा पराजय झाल्यावर तो आपली सुभ्याची जागा **मुर्शिदाबाद** एथें निघून गेला. तेथें आपणास कोणी अनुकूल नाहीं असें पाहून आपला वेष बदलून होडींत बसून तो **बहारप्रांतीं** जावयास निघाला. पूर्वीं त्यानें पीडा दिलेल्या कोणी माणसानें **राजमहाल** एथें त्यास पाहून ओळखून तेथील अधिकाऱ्यास तें वर्त्तमान कळविलें; त्यानें त्यास धरून **मीरजाफराकडे** पाठविलें, व त्यानें त्यास आपल्या मुलाच्या स्वाधीन करून ठेविलें. ह्या क्रूर आणि घातकी **शहाजाद्यानें** त्यास त्याच रात्रीं मारेकऱ्यांच्या हातून ठार मारविलें.

१० **इंग्लिशांनीं मीरजाफर** ह्यास गादीवर बसण्यास मदत केली ह्याबद्दल त्यानें कंपनीस व लष्करास व आरमारच्या लोकांस मिळून सुमारें सवा दोन कोटी रुपये द्यावयास कबूल केले होते; ह्यांची उगराणी करण्याकरितां **क्लैवसाहेब** जून महिन्याचे २९ वे तारखेस **मुर्शिदाबादेस** गेला. त्या-

वेळीं खजिन्यांत पैका नव्हता ह्यामुळें पहिल्यानें अडचण पडली, परंतु शेवटीं **मीरजाफर** ह्यानें त्या देण्या पैकीं सुमारें निमे ऐवज आगस्त महिन्याचे ९ वे तारखेस दिला, व बाकीचा ऐवज तीन वर्षांत तीन हत्यांनीं द्यावा असा करार केला.

११ जरी कंपनी व्यापार करणारी होती, आणि त्यावेळीं तिच्या चाकरांस वर लिहिल्याप्रमाणें लांच घेण्यास कांहीं मनाई नव्हती, तरी **क्लैवसाहेब** आपणास व कंपनीस द्रव्य मिळण्यावर दृष्टि न ठेवितां **इंग्लिशांची** सत्ता चालू झाली इतक्यानेंच जर संतुष्ट होता, तर त्याची कीर्ति निर्दोष राहिली असती; परंतु तो मतलबी पुरूष होता ह्मणून समय पडेल त्याप्रमाणें युक्ति करीत असे. ह्या फितुराचे मसलतींत **उमीचंद** नामें सावकार होता, तो एऱ्हवींही **इंग्लिशांच्या** उपयोगीं फार पडला होता; त्यास त्यानें पस्तीस लक्ष रुपये द्यावयाचा एक खोटा करार, **मीरजाफर** ह्याशीं केलेला दाखवूंन* आंतून दुसरा करारनामा केला होता, त्यांत त्याचें नांव घातलें नव्हतें. ह्याप्रमाणें त्यास कांहीं न देतां **क्लैवसाहेबानें** फसविलें; हें त्या शूर सरदारानें आपल्या नावास मोठें लांछन लावून घेतलें; कारण त्या माणसानें अडचणीचे वेळेस अडवून करार करून घेतला, आणि तो न केल्यास विश्वास घात करण्याचें भय घातलें, ही गोष्ट जरी खरी असली तरी त्यास पुढें ठकविण्याच्या संकल्पानेंच मुळापासून करार करणें हें चांगल्या मनुष्यास योग्य नव्हे.

---

*ह्या खोट्या करारनाम्यावर वाट्सन साहेब नामें आरमाराचा सरदार होता,

१२ इकडे **करनाटकांत इंग्लिशांनीं** नव्या नवाबाकडून कराराप्रमाणें यावयाचा पैका वसूल करण्याकरितां **मधुरा, तिणवल्ली,** इत्यादि जागा मिळावयासाठीं लढाई चालविली होती, तींत **इंग्लिशांनीं फ्रेंचांच्या** ताब्यांतील एक गांव जाळावा, त्याच्या बद्दल त्यांनीं ह्यांचा एक जाळावा असें चाललें होतें; आणि मराठेही आपली चौथाई वसूल करण्याकरितां स्वाऱ्या करीत होते.

१३ इतक्यांत संन १७५७ ना मध्यें **फ्रेंच** सरकारानें **लाली** नामें सरदार फौज व आरमार देऊन **हिंदुस्थानांत** पाठविला. पहिल्यानें त्यास **पोंदेशरी** एथील अधिकाऱ्यापासून द्रव्य आणि सामान ह्यांचा पुरावा होईना ह्मणून त्याचें कांहीं फारसें चाललें नाहीं; व **इंग्लिश** आरमारानें त्याचा **कडलूर** बंदरांत एकवेळ पराजयही केला; परंतु त्यानें संन १७५८ नांत **सेंट डेविड** किल्ल्यास वेढा घालून तो जून महिन्याचे १ ले तारखेस घेतला, आणि तेथील सरदार व शिपाई ह्यांस कैदी करून ठेवून तटबंदी पाडून टाकिली.

१४ हा **फ्रेंच** सरदार शूर होता खरा, परंतु त्याच्या आंगीं युद्धकौशल्यावांचून दुसरा कांहीं गुण नव्हता. त्यास **पोंदेशरी** एथील आपले सर्व लोक लबाड व अप्रामाणिक वाटत, त्याप्रमाणें तो प्रसिद्धपणें बोलत असे; आणि त्यास मुलकांतल्या रीति ठाऊक नव्हत्या, ह्मणून वाटेनें लष्कर जात असतां जो सांपडेल त्यास विगारीस धरीत असे. **तंजावरच्या** राजावर स्वारी जात असतां **किवलूर** एथील देवळांत त्याच्या मना-

त्यानें सही घातली नाहीं, तीही बाकीच्या मंडळीनें आपणच केली.

प्रमाणें त्यास द्रव्य सांपडलें नाहीं ह्मणून त्यानें तो गांव लुटून लोकांचा बहुत नाश केला, आणि तेथील साहा ब्राह्मणांस तोफेच्या तोंडीं दिलें. अशा अविचाराच्या व क्रूरपणाच्या कामामुळें त्यास त्याचे लोक व काळे लोक हे कोणीच राजी नव्हते.

१५ **फ्रेंचांनीं तंजावरच्या** राजावर ५६००००० रूपयांचा जुना दावा काढून ही स्वारी केली होती, परंतु **इंग्लिशांनीं** तेथील किल्लेकऱ्यांस कुमक केली ह्यामुळें **फ्रेंच** तो वेढा उठवून **कार्त्तिकल** एथें निघून गेले. तेथें **इंग्लिशांचें** आरमार होतें त्यानें **फ्रेंचांचीं** जहाजें पुष्कळ असतां पूर्वीं कांहीं दिवसांवर एक तासपर्यंत युद्ध करून त्यांचा पराजय केला होता. (तीं ता० २ आगस्त संन १७५८). तो अपमान व **लाली** ह्याच्या हुकमांत राहणें **फ्रेंच** आरमाराच्या सरदारास न साहून तो **मारिशस** एथें निघून गेला.

इ० स० १७५८ १६ असा पराजय झाला तथापि **लालीसाहेबान मद्रासेस** वेढा घातला; आणि किल्ल्या बाहेरचें काळ्या लोकांचें शहर घेतलें. (ता० १४ दिसेंबर). त्या वेळीं तेथें **पिगटसाहेब** नामें गवर्नर होता, आणि **लारेन्ससाहेब** हा सरदारही किल्ल्यांत होता, तथापि **लाली** ह्यानें किल्ला घेण्याची बाहेरून तयारी चांगली चालविली होती. इतक्यांत संन १७५९ च्या आरंभीं **मुंबईहून** लष्कराची कुमक येऊन पोहोंचली; ती पाहतांच **फ्रेंच** जलदीनें आपल्या आजारी व जखमी लोकांस टाकून पळून गेले. त्या गरीब लोकांचा **इंग्लिशांनीं** फार सांभाळ केला. ह्या मोसमेंत

इ० स० १७५९

**वांदिवाश** किल्ला घेण्याविषयीं **इंग्लिशांनीं** यत्न केला, परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. **कांची** मात्र त्यांच्या हस्तगत झाली. पुढें मे महिन्याचे अखेरीस दोन्ही लष्करें आपापल्या छावणींत जाऊन राहिलीं.

१७ **फ्रेंच** लोकांस **युरोपांतून** नवी जहाजांची कुमक येऊन पोहोंचली, आणि **इंग्लिशांचींही** कांहीं जहाजें व **कूटसाहेब** नामें सरदार कांहीं सैन्य घेऊन त्यांचे विलायतेहून आला. नंतर जहाजांची एक लढाई **त्रिकोमाली** एथें दोन तासपर्यंत होऊन **फ्रेंचांचा** पराजय झाला. (ता० १० सप्टेंबर) **कूटसाहेबानें** प्रथम **वांदिवाश** ह्यावर हल्ला करून तो किल्ला घेतला. (ता० २९ नोवेंबर). तो परत घेण्यासाठीं **लाली** ह्यानें स्वारी केली, परंतु लढाईंत त्याचा पराजय झाला, आणि त्याचें बुणगें व तोफखाना हीं **इंग्लिशांच्या** हस्तगत झालीं. ह्या लढाईंत **बुसी** नामें शूर **फ्रेंच** सरदार पाडाव झाला. ह्यास **हैदराबादेच्या** दरबारांतून निघून येण्याविषयीं **लाली** ह्याचा हुकूम झाल्यावरून हा आला. त्यानें **हैदराबाद** सोडल्यामुळें त्या दरबारांत **फ्रेंचांचें** वजन कमी झालें.

इ० स० १७५९

इ० स० १७६० जानुआरी

इ० स० १७६०

१८ ह्यानंतर **अर्काट**, **जिंजी**, **देवीकोट**, आणि दुसरे नऊ किल्ले **कूटसाहेब** ह्यानें जिंकून घेतले. नंतर संन १७६० च्या मे महिन्याच्या आरंभीं त्यानें **पोंदेशरीस** वेढा घातला. तिकडे **इंग्लिशांच्या** जहाजांनीं **फ्रेंच** ह्यांस दर्यावांतही वेढिलें. हीं मोठीं जहाजें मे महिन्याचे अखेरीस अक्का जमलीं. त्या वेळीं **लाली** ह्याजवळ पैका व लोक ह्या

दोहोंचा मोठा तोटा होता, त्यामुळें तो मोठ्या संकटांत पडला. त्यानें **महिसूर** एथें नवा झालेला अधिकारी **हैदरअली** ह्याची फौज कुमकेस बोलाविली; परंतु **फ्रेंचांचा** मोडता काळ पाहून व **महिसूरास** कांहीं बंड उत्पन्न झाल्यामुळें ती फौज त्यास मदत न करितां परत गेली.

१९ तथापि **लाली** ह्यानें **इंग्लिशांस पोंदेशरी** एथून हांकून देण्याविषयीं फार शहाणपणानें मसलती केल्या; आणि किती वेळां शौर्यानें त्यांबरोबर युद्धेंही केलीं. शेवटीं तो दुखण्यास पडला, व त्याच्या आंतील मंडळींत वैमनस्याची प-
इ० स० राकाष्ठा झाली, आणि दाणा वगैरे सामान सर्व संपून दोन
१७६१ दिवसां पुरती मात्र शिलक राहिली, त्या वेळीं संन १७६१ च्या जानुआरी महिन्याचे १४ वे तारखेस त्यानें किल्ला स्वाधीन केला, आणि सर्व किल्लेकरी आणि मुलकी कामदार **इंग्लिशांच्या** कैदेंत सांपडले. तें **पोंदेशरी** बंदर **इंग्लिशांनीं** कंपनीच्या नावानें घेऊन तेथील तटबंदी मोडून टाकिली.

२० ह्याच्या पूर्वीं संन १७५९ ठांत **बंगाल्यांतून फोर्ड** नामें साहेब ह्यानें लष्करासहित **आनंदराज** ह्मणून **तेलंगणांतील** राजा ह्याचे कुमकेस येऊन **राजमहेंद्री** एथें **फ्रेंचांचा** पराजय केला; आणि त्यांचा सरदार **कानफ्लांस साहेब** हा तेथून ज्या **मचलीपट्टणच्या** किल्यावर गेला होता त्या किल्यावर रात्रीं हल्ला करून तो घेतला. नंतर **पोंदेशरी** हस्तगत झाल्यावर **फ्रेंचांची माही** वगैरे दरोबस्त ठाणीं **इंग्लिशांस** सहजच मिळून **हिंदुस्थानांतील फ्रेंचांच्या** राज्याची समाप्ति झाली.

२१ हें वर्तमान **फ्रान्स** देशांत कळतांच सर्वांस फार दुःख झालें; आणि आपल्या कामदारांमध्यें एकमत नसल्या-मुळें जी ही गोष्ट झाली तिचा सर्व दोष **फ्रेंच** कंपनीनें **लालीसाहेब** ह्यावर ठेविला. मग **लाली** परत स्वदेशास गेल्यावर त्यास सरकारानें तुरंगांत घातलें. पुढें **पारिस** एथील पार्लमेंटांत त्याची कांहीं चौकसी केल्याप्रमाणें करून त्यावर फितुराचा अपराध ठरविला; त्यास शेणाच्या गाड्या-वर बसवून शहरांत हिंडविलें; आणि तो लोकांशीं बोलला असतां त्यांस दया येईल ह्मणून त्याच्या तोंडांत बोळा घालून त्याचा त्याच दिवशीं शिरच्छेद केला. इ० स० १७६१

२२ ह्या क्रूर कर्मानंतर थोड्याच दिवसांनीं **फ्रेंच** कंपनीचें आयुष्य संपलें.

## प्रकरण ५.

### इंग्लिशांस बंगाल्यांत व करनाटकांत प्रांत मिळाला ह्याविषयीं.

इ० संन १७६१ पासून संन १७६६ पर्यंत.

१ **मीरजाफर** ह्यास संन १७५६ नांत **इंग्लिशांचे** म-दतीनें **बंगाल्याच्या** नवाबाचें पद प्राप्त झाल्यावर करार के-लेला पैका देण्याविषयीं त्यास मोठें संकट पडलें. तो पैका उत्पन्न करण्याकरितां त्यानें अनेक युक्ति केल्या; त्यांमध्यें **बहार** प्रांताचा सुभेदार **रामनारायण**, आपला दिवाण **दु-ल्लभराम**, व **मुर्शिदाबाद** एथील मोठे श्रीमंत शेट ह्यांकडून द्रव्य काढण्यासाठीं कितीएक प्रकारानें प्रयत्न केला; परंतु

हे सर्व हिंदू मुत्सद्दी **इंग्लिशांस** फार उपयोगीं पडले होते ह्मणून **क्लैवसाहेबानें** नवाबाची मर्जी केवळ न मोडतां युक्तीनें त्यांचें रक्षण केलें. पुढें त्यानें **दुल्लभराम** ह्यास **कलकत्त्यांत इंग्लिशांच्या** आश्रयास येऊन राहण्याची परवानगी दिली.

२ संन १७५८ च्या अखेरीस **दिल्लीचा** नामधारी बादशाह **आलमगीर** ह्याचा मुलगा **शाहआलम** हा **अयोध्येच्या** नवाबाची फौज मदतीस घेऊन **बहार** प्रांतावर स्वारी करण्याकरितां **कर्मनाशा** नदी उतरला. **बहार** प्रांताचा सुभेदार **रामनारायण** ह्यानें त्याचें सामर्थ्य विशेष नाहीं असें पाहून **मीरजाफर** व **इंग्लिश** ह्यांचा पक्ष धरून राहण्याचा निश्चय केला, आणि तो **पाटणा** शहराचे दरवाजे लावून बसला. त्याचे कुमकेस **क्लैवसाहेब** ह्यानें **बंगालच्या** नवाबाचा मुलगा **मीरान** ह्यासहित **शहाजाद्यावर** स्वारी केली. तिकडे शत्रूच्या लष्करांमध्यें **अलाहबादेचा** सुभेदार ह्याची आणि **अयोध्येचा** सुभेदार ह्याची कलागत होऊन **अयोध्ये**चा सुभेदार प्राणास मुकला. त्यामुळें **शहाजादा** हीनबल होऊन त्यानें **क्लैवसाहेबास** पत्र लिहिलें कीं माझी अडचण फार आहे, अशा वेळेस मला द्रव्याची कुमक केल्यास मी एथून निघून जाईन. **क्लैवसाहेबानें** तें बोलणें कबूल केलें. ह्याप्रमाणें **बहार** प्रांतांत स्वस्थता झाल्यावर तो **क्लैव साहेब** संन १७५९ च्या जून महिन्यांत **मुर्शिदाबादेस** परत आला.

३ तेथें **मीरजाफर** ह्यानें त्या **साहेबास अमीरउल्उमराव** हा किताब देऊन कंपनीकडून **कलकत्त्या** जवळच्या

प्रांताचा जो सालीना तीन लक्ष रुपये वसूल यावयाचा तो त्यास खासगत जहागीर ह्मणून दिला.

४ संन १७६० ठांमध्यें **कलकत्त्याजवळ इंग्लिश** व **डच** ह्यांची जहाजांची एक लढाई झाली. तिजमध्यें **इंग्लिशांच्या** तीन जहाजांनीं **डच** ह्यांच्या सात जहाजांचा पराजय केला, आणि त्यांतून उतरलेल्या ७०० लोकांपैकीं चवदा गोरे लोकांस मात्र **फोर्ड साहेबाचे** फौजेनें **चिनसुरा** एथील त्यांच्या ठाण्यांत जिवानिशीं जाऊं दिलें. ह्या लढाई नंतर लवकरच **क्लैवसाहेब इंग्लंडास** निघून गेला. इ० स० १७६०

५ नंतर **कलकत्त्यास वान्सिटार्ट साहेब** नामें **प्रेसिडेंट** झाला. त्यानें खजिन्यांत द्रव्य नाहीं, फौजेची बाकी चढली आहे, असें पाहून व **मीरजाफर** ह्याजकडून प्रथम कबूल केलेला हप्ता किंवा लश्कराचा पगार ह्याच्या येण्याची कांहीं आशा दिसेना, ह्मणून त्याजकडून सारा कारभार काढून त्याचा जावई **मीरकासिम** ह्यास तो द्यावा असी मसलत ठरविली, व **कौन्सिल** ह्मणजे मंत्री हे अनुकूल नसतां ती सिद्धीस नेण्याकरितां त्यानें फौज पाठविली ; तेव्हां आपला उपाय नाहीं असें पाहून **मीरजाफर** ह्यानें नवाब हा कोरडा किताब सोडून दिला, आणि तो **मुर्शिदाबादेहून** निघून **कलकत्त्यास** येऊन राहिला. इ० स० १७६०

६ **मीरकासिम** ह्यास वसूलाच्या कामांत इंग्लिश मदत करूं लागले. **शाहआलम** ह्यानें मागल्या वर्षी बहार प्रांतावर एक वेळ स्वारी करून प्रथम **रामनारयण** ह्याचा पराजय केला, त्या वेळीं त्यास इंग्लिश सरदार **कालिआर्ड** सा-

हेब व **नाक्स साहेब** ह्यांनीं पिटून लाविलें होतें. त्यानें संन १७६१ ह्यांमध्यें पुनः स्वारी केली, त्या वेळीं मेजर **कार्नाक साहेब** ह्यानें त्याचा पराजय करून त्यास **बहार** प्रांतांतून निघून जाणें अवश्यक केलें. ह्या लढाईंत **अयोध्येच्या** नवाबाचे पदरचा **फ्रेंच** सरदार **ला साहेब** हा **इंग्लिशांच्या** हातीं सांपडला, त्याचा त्यांनीं योग्य सत्कार ठेविला, तो **हिंदुस्थानच्या** लोकांस चमत्कार वाटला.

इ० स० १७६२ ७ **मीरकासिम** ह्यानें फौजेची बाकी वारून कारभाराची व्यवस्था बरीच राखिली होती; परंतु कंपनीशिवाय इतर **इंग्लिश** व्यापाऱ्यांनीं मालाची जकात द्यावी असें त्याचें ह्मणणें होतें तें **इंग्लिशांस** आवडेना. त्यांनीं संप्रदाय असा घातला होता कीं कंपनीचें दस्तक असलें ह्मणजे कोणत्याही **इंग्लिश** व्यापाऱ्यानें जकात दिल्यावांचून माल पाहिजे तिकडे न्यावा. त्यांच्या ह्या करण्यावरून त्यांचे आश्रित काळे लोकही कंपनीचें नांव सांगण्याचा हुकूम घेऊन जकात देण्यास हरकत करूं लागले. त्यामुळें इतर रयतेचा व्यापार अगदीं बुडाला, वसुलाचें नुकसान झालें, आणि वारंवार नवाबाच्या व **इंग्लिशांच्या** लोकांमध्यें तंटे होऊं लागले. शेवटीं नवाबानें साऱ्याच लोकांस जकातीची माफी केली, तें **इंग्लिशांनीं** नवें विरोधाचें कारण मानिलें.

इ० स० १७६३ ८ पुढें कांहीं लश्करी सामान **पाटणा** एथें जाण्याकरितां **मोंगीरास** आल्यामुळें **मीरकासिम** ह्यास संशय उत्पन्न झाला, आणि त्यानंतर लवकरच **पाटणा** एथील **इंग्लिशांचा** वकील **एलिस् साहेब** ह्यानें एकाएकीं रात्रीं हल्ला करून **पाटणा**

शहर घेतलें, असें ऐकिल्यावरून तो संशय खरा झाला. मग **आमियात साहेब** नामें **इंग्लिश** वकील **मोंगीराहून** परत **कलकत्त्यास** जात होता, त्यास त्याच्या लोकांसुद्धां **कासिम** ह्यानें ठार मारविलें. **पाटणा** एथील सुभेदार तेथून थोड्या अंतरावर निघून गेला होता, त्यास **मोंगीराहून** कुमक येऊन त्यानें तेथील सारे **इंग्लिश** लोक धरून कैद करून त्यांस नवाबाजवळ पाठवून दिलें. **कासिमबाजार** एथील **इंग्लिश** लोकांचीही ह्याप्रमाणेंच अवस्था झाली.

९ त्या वेळीं **प्रेसिडेंट वान्सिटार्ट साहेब** ह्याच्या मनांत **मीरकासिम** ह्याबरोबर तह करायाचें होतें; परंतु बाकीच्या कौन्सिलांतील मंडळीच्या आग्रहामुळें युद्धाची मसलत ठरून लढाई चालू झाली. **मीरकासिमाबरोबर गिरिया** एथें **इंग्लिशांनीं** चार तासपर्यंत युद्ध करून त्याचें लश्कर पळविलें, आणि त्याचा तोफखाना व बुणगें घेतलें. नंतर महिनाभर प्रयत्न करून त्याच्या लश्करास **उदवा** एथें छावणी होती तेथून हाकून दिलें; नवाबाची नवी राजधानी **मोंगीर** हिला वेढा घालून ती घेतली; आणि त्याचें दोन हजार लश्कर कैद केलें.

इ० स० १७६३

ता० २ आगस्त इ० स० १७६३

१० जसजसा पराजय होत चालला तसतसा **कासिम** ह्यानें निर्दयपणा धरून **इंग्लिशांचा** सूड घेण्याचें अधिक अधिक चालविलें. **इंग्लिशांचा** मोठा पक्षपाती **रामनारायण** हा कांहीं दिवसांपासून त्याचे कैदेंत होता त्याचा शिरच्छेद करविला; **मुर्शिदाबाद** एथील शेट ह्यांच्या कुळांतील दोन पुरुषांस ठार मारविलें; आणि शेवटीं एक वैद्य शिवाय करून आपल्या बरोबरच्या साऱ्या **इंग्लिश** लोकांस **सुमरू**

नाभें कोणीएक आपला निर्दय **जर्मन** सरदार ह्याच्या हातीं देऊन त्यांचा वध करविला. परंतु **पाटणा** शहर **इंग्लिशांस** मिळाल्यावर तो **कासिम** निराश होऊन **अयोध्येच्या** नवाबाकडे पळून गेला.

इ० स० १७६४ ११ नंतर **इंग्लिश अयोध्येचे** सरहद्दीवर छावणी करून राहिले. त्यांच्या लष्करांत फितूर होऊन तीनशे गोरे लोक **काशीच्या** राजाकडे निघून गेले. ती संधी पाहून **सुमरू** ह्यानें **पाटणे** जवळ **इंग्लिशांवर** हल्ला केला, परंतु त्याचे पुष्कळ लोक मरून त्यास मागें हटावें लागलें. नंतर लवकरच मेजर **हेक्टर मन्रो साहेब** नाभें सरदार **मुंबई**-

ता० ३ मे स० १७६४ **हून** सैन्य घेऊन आला, तेव्हांही लष्करांत फिसाद चाललीच होती. शेवटीं एक पलटण शस्त्रांसुद्धां शत्रूंकडे जाण्यास सारी निघाली; त्या लोकांस बाकीच्या लष्कराकडून धरून आणवून **मन्रो साहेबानें** त्यांतील मुख्य चौवीस फिसादवाल्यांस तोफेच्या तोंडीं दिलें. तेणेंकरून फौजेंत दहशत पडून ती सारी पूर्वीप्रमाणें हुकमांत वागूं लागली.

१२ मेजर **मन्रो** ह्यानें चहूंकडून सैन्य जमा करून शत्रूंची फौज भागीरथीच्या कांठीं **बक्सर** एथें होती तिजवर

ता० २२ आकटोबर स० १७६४ स्वारी केली. तो त्या ठिकाणीं जाऊन पोहोंचल्यावर दुसऱ्या दिवशीं सकाळीं तीन तास दिवसास लढाई चालू झाली. ती सुमारें एक प्रहरपर्यंत मोठ्या निकरानें होऊन शेवटीं शत्रू मागें हटले. हा **इंग्लिशांचा** जय झाल्यामुळें **अयोध्येचा** नवाब **सुजाउद्दवला** हा केवळ हीनबल झाला. **शाहआलम** ह्यानेंही **इंग्लिशांचें** सामर्थ्य अधिक जाणून त्या नवा-

बास सोडिलें; आणि तो **शाहआलम इंग्लिशांच्या** लष्करा-
बरोबर **काशीस** गेला. तेथें **इंग्लिशांस** त्यानें **गाजिपूर**
वगैरे कांहीं प्रांत द्यावा, व ह्यांनीं त्यास राज्य घेण्यास कुमक
करावी असें ठरलें, परंतु तें **इंग्लंडांतील** अधिकाऱ्यांच्या म-
नास न आल्यामुळें त्या ठरावाप्रमाणें **इंग्लिशांकडून** वर्त्तणूक
घडली नाहीं.

१३ **मीरकासिम** ह्याशीं लढाई चालू करण्याची मस-
लत ठरल्यावर **इंग्लिशांनीं मीरजाफरास** नवाब हा किताब
पुन्हा दिला. परंतु **गाजिपूर** वगैरे मिळून त्याच्या प्रांतां-
चा अर्धा वसूल त्यांनीं आपणाकडे लावून घेतला. **मीरजा-
फरानें** त्यांची जुनी बाकी देणें होती, ह्याशिवाय त्याच्या ज-
कातीं पैकीं त्यास कांहीं वसूल नाहीं असें करून **इंग्लिश**
व्यापाऱ्यांचें लढाईमुळें व मीठ, सोरा, वगैरे जिनसांचा मक्ता
न चालल्यामुळें जें नुकसान झालें त्याबद्दल त्रेपन्न लक्ष रुपये
द्यावे, आणि लढाई चालू असेल तोंपर्यंत फौजेच्या खर्चाबद्दल
दरमहा पांच लक्ष रुपयांचा भरणा त्यानें करावा, ह्याप्रमाणें
बोलणें ठरावून घेतलें. पुढें ऐवजाविषयीं वारंवार मागणें
होऊं लागलें, त्याची नवाबास मोठी काळजी पडली, आणि
वयपरत्वें त्याची शक्तिही अगोदर क्षीण झाली होती, तेणें-
करून तो **मुर्शिदाबाद** एथें मरण पावला. इ० स० १७६५ जानुआरी

१४ **मीरजाफराचा** वडील मुलगा **मीरान** हा त्याच्या
पूर्वींच मरण पावला होता, ह्मणून त्याचा धाकटा मुलगा **नि-
जामउद्दवला** ह्यास **इंग्लिशांनीं** आपणच गादीवर बसवून
जुना दिवाण **नंदकुमार** नामें होता त्यास काढून सर्व कार-

भार **महंमद रिझाखान** ह्यानें करावा असें ठरविलें. त्या वेळीं **इंग्लिशांनीं** आपल्या फायद्याचे कितीएक करार करून घेतले, तेणेंकरून बहुत सत्ता त्यांच्या हातीं आली.

१५ पूर्वी कांहीं वर्षें **क्लैवसाहेब** आपले विलायतेस गेला ह्मणून वर लिहिलें. त्यानें जावयाच्या पूर्वी **कोर्ट आफ् डिरेकटर्स** ह्यांस बेअदबीचें एक पत्र लिहिलें होतें, आणि विलायतेंत आपले जहागिरीकरितां कंपनीवर फिर्याद केली
इ० स० १७६५ होती, ह्मणून त्यावर त्यांची इतराजी झाली होती, असें असतांहीं त्यांनीं त्याच्या पराक्रमावर आणि शाहाणपणावर नजर देऊन त्यास **कलकत्ता** एथील गवर्नराच्या अधिकारावर नेमिलें. नंतर विलायतेच्या सरकारानें दिलेलें **लार्ड** हें पद धारण करून तो संन १७६५ ष्टांत परत **हिंदुस्थानांत** आला. त्यानें कंपनीच्या कामदारांनीं हरएक नजराणा किंवा लांच न घेण्याविषयीं त्यांजकडून करार लिहून घेतले; आणि त्यांनीं व्यापार करूं नये असा जो हुकूम होता त्याविषयीं पुढे कांहीं काळानंतर अशी तजवीज केली कीं, मीठ, सुपारी, आणि तंबाखू ह्यांचा मक्ता ठरावून त्यापासून जो फायदा होईल तो पैका कामदारांनीं यथाविभागें वांटून घ्यावा, त्याशिवाय दुसरा व्यापार करूं नये.

इ० स० १७६५ जून ता० २५ १६ हा बंदोबस्त होतांच **क्लैवसाहेबास बंगालचा** नवा नवाब **निजामउद्दवला** ह्याच्या कारभाराची व्यवस्था करण्याकरितां **मुर्शिदाबादेस** जावें लागलें. त्या वेळीं त्यानें **रिझाखाना** बरोबर कारभार करण्यास **दुल्लभराम** आणि **जगतशेट** हे दोघे त्याचे मदतीस दिले; आणि नवाबानें दर वर्षास पन्नास

लक्ष रुपये नेमणूक घेऊन स्वस्थ असावें, बाकी सारा कारभार कंपनीनें करून मुलकाचा वसूल घ्यावा असा ठराव केला.

१७ **अयोध्येचा** नवाब **सुजाउद्दवला** ह्यानें **इंग्लिशां**-बरोबर लढण्याकरितां **रोहिले** व **मराठे** ह्यांस कुमकेस आ- इ० स० १७६५
णिलें होतें, परंतु ते एकदोन वेळ **इंग्लिशांचा** युद्धप्रसंग पाहून निघून गेले. मग **सुजाउद्दवला** हा निघून **इंग्लि-शांच्या** लष्करांत शरण आला. त्याबरोबर **क्लैवसाहेबानें** तह ठरविला, त्यांत **अलाहाबाद** व **कोरा** हे प्रांत **शाहआ-लम** बादशाहास देऊन बाकीचें राज्य **सुजाउद्दवला** ह्यानें अनुभवावें; **काशीचा** राजा **बळवंतशिंग** ह्यास त्यानें उपद्रव करूं नये; **मीरकासिम** व **सुमरू** ह्यांस त्यानें आश्रय देऊं नये; व **इंग्लिश** आणि नवाब ह्या उभयतांच्या राज्यास परचक्राचा उपद्रव झाला असतां परस्परांनीं परस्परांस कुमक करावी, ह्याप्रमाणें कलमें ठरलीं. पुढें थोड्या दिवसांत **क्लैवसाहेबा-नें** **शाहआलम** ह्यास वर लिहिलेले दोन प्रांत देऊन **बंगा-** आगस्त
**ल्याच्या** वसुलापैकीं **मीरजाफराच्या** कारकीर्दीपासून त्याची बाकी सुमारें तीस लक्ष निघत होती ती सर्व माफ करून घे-तली, व बादशाहानें दरसाल सव्वीस लक्ष रुपये घेण्याचे कबूल करून **बंगाला**, **बहार**, व **ऊदिसा** ह्मणजे **ओढ्या जगन्नाथ** ह्या प्रांतांचा वसूल घेण्याचा अधिकार **इंग्लिशांस** दिला. हें दिवाणीचें फर्मान ह्मणजे वसूल घेण्याचें फर्मान सन १६६५ इसवीच्या आगस्त महिन्याचे १२ वे तारखेस **इंग्लिशांस** मिळालें, तेणेंकरून त्यांचा व्यापारीपणाचा पेशा एकीकडे राहून त्यांस राजपद प्राप्त झालें.

इ० स० १७६३ १८ **करनाटकांत पोंदेशरी इंग्लिशांनीं** घेतली होती ती संन १७६३ ष्टांमध्यें **पारिस** शहरांत तह झाला त्यांत परत द्यावी असें ठरलें, अगखी परस्परांचीं जीं ठाणीं परस्परांनीं घेतलीं असतील तीं ज्यांचीं त्यांस द्यावीं, आणि उभयपक्षांनीं **सलाबतजंग** हा दक्षिणेचा सुभेदार आणि **महंमदअल्ली** हा **करनाटकचा** नवाब कबूल करावा असा ठराव झाला. नंतर **महंमदअल्ली** ह्यास **इंग्लिशांनीं** मध्यस्थीकरून **तंजावरच्या** राजापासून जुनी खंडणीची बाकी ह्मणून बेवीस लक्ष रुपये देवविले; व **महंमदअल्लीच्या** बरोबर **मधुरा** शहरास चौदा महिनेपर्यंत वेढा घातला, शेवटीं सुमारें एक कोटी रुपये खर्च झाल्यावर व पुष्कळ लोक मेल्यावर तेथील

इ० स० १७६४ आकटोबर किल्लेदार **महंमद युसुफ** हा फितुरानें त्यांच्या हातीं सांपडून किल्ला हस्तगत झाला. ह्याप्रमाणें **महंमदअल्लीची** सत्ता कायम झाली; आणि पुढें **वलाजाह** व **अमीर उल्हिंद** असे किताब बादशाहापासून त्यास मिळाले.

इ० स० १७६६ १९ **हैदराबादेच्या** दरबारांतून **बुसी साहेब** नामें **फ्रेंच** सरदार जातांच **निजामअल्लीनें सलाबतजंगास** पदच्युत

इ० स० १७६१ केलें. आणि **इंग्लिश** व **फ्रेंच** ह्यांनीं वर लिहिलेल्या तहांत त्याचा अधिकार कबूल केला असें समजतांच त्यानें त्यास ठार मारिलें. पुढें **इंग्लिशांनीं** बादशाहाकडून **राजमहेंद्री, वेल्लूर, मुस्तफानगर, शिकाकोळ,** आणि **मूर्तिझानगर** ह्मणजे **गुंटूर** हे समुद्रकांठचे पांच प्रांत आपणास मिळण्याविषयीं फर्मान आणिलें, तें **निजामअल्लीस** न आवडून त्यानें युद्धाची तयारी केली. **इंग्लिशांनींही** त्यावर सैन्य पाठविलें. शेवटीं तह

झाला, त्यांत दरसाल वर लिहिलेल्या प्रांतांबद्दल सात लक्ष रुपये *इंग्लिशांनीं निजामास द्यावे, आणि त्यास कारण पडेल तेव्हां फौजेची कुमक त्यांनीं करावी असें ठरलें.

## प्रकरण ६.

### हैदरअल्लीचें वर्तमान, व त्याची आणि इंग्लिशांची पहिली लढाई झाली ह्यांविषयीं.

सन १७६६ पासून संन १७७२ पर्यंत.

१ मागील प्रकरणांत ज्या गोष्टी लिहिल्या तींहींकरून कंपनीस राज्य मिळाल्याचा हर्ष झाला; आणि खर्च वाढेल व मुलकाच्या रक्षणार्थ फौजा ठेवून कारभारांत मन घालावें लागेल, आणि नवीं युद्धें करण्याचे प्रसंग येतील ही काळजीही पडली. त्या वेळीं खजिन्यांत शिलक नव्हती; आणि मीठ, सुपारी, व तंबाखू ह्यांचे मक्ते कंपनीचे कामदार घेत असत, ते *लार्डक्लैव ह्यानें संन १७६६ ष्टांत इंग्लंडास परत जातेसमयीं बंद करून व्यापारचा बंदोबस्त केला होता, तथापि

---

* ह्या पांच प्रांतांस उत्तर सरकारें असें ह्मणतात. ह्यांपैकीं आरंभीं गुंटूर प्रांत इंग्लिशांच्या स्वाधीन झाला नाहीं. कारण तो बसालतजंगास जहागीर दिला होता तो त्याजवळ जन्मपर्यंत राहावा असा करार ठरला होता.

* लार्ड क्लैवसाहेब इंग्लंडास गेल्यावर त्यानें लबाडी करून द्रव्य मिळविलें असा त्यावर आरोप ठेवून त्याची चौकसी होण्याचा यत्न अगोदरपासून पार्लमेंटांतील कितीएक लोकांनीं केला तो व्यर्थ गेला, परंतु तेणेंकरून क्लैवसाहेबास लांछन झालें आणि त्यास दुखणेंही लागलें. पुढें त्यानें संन १७७४ रांत आत्महत्या केली.

नव्या राज्याच्या खर्चास पुरून कंपनीच्या भागिदारांस नफा उरे इतकें उत्पन्न होईल असें दिसत नव्हतें; व मागील लढाईच्या खर्चाकरितां अयोध्येच्या नवाबाकडून वगैरे खंडणी यावयाची ठरली होती त्या ऐवजाचा भरणा त्यांकडून होईल असें दिसत नव्हतें.

२ अशा समयीं इंग्लिशांस पुनः युद्ध करण्याचें कारण पडलें. तें असें, विजयनगर एथील गादी मोडल्यावर म्हैसूरचे मांडलिक हिंदुराजे स्वतंत्रपणानें वागूं लागले. जेव्हां करनाटकांत फ्रेंचांबरोबर इंग्लिश युद्ध करूं लागले त्यावेळीं त्या गादीवर चिक्कृष्णराय नामें राजा होता, व त्याचा सर्व कारभार देवराज व नंदराज ह्या नामाचे दोघे बंधु करीत होते.

३ नंदराज ह्याचे पदरीं हैदरनाईक ह्मणून एक सरदार होता. त्याचा बाप प्रथम फार गरीब होता, इतका गरीब कीं केव्हां केव्हां त्यास पोटाची देखील भ्रांति असे. पुढें तो लस्करांत चाकरीस राहिला. त्यास शाबास व हैदर हे दोन पुत्र झाले. त्या उभयतांचें वय दहा वर्षांचे आंत असतां त्यांचा बाप युद्धामध्यें मेला, आणि त्यांची आई कोणीएक निर्दय सरदाराच्या हातीं सांपडून त्यानें तिचें सर्वस्व हरण केलें, मुलें व आबरू इतकें मात्र अवशेष राहिलें. तिचा धाकटा मुलगा हैदर हा लहानपणीं व्रात्य आणि चंचळ होता. त्यानें लिहिण्या वाचण्याचा अभ्यास कांहीं केला नाहीं. त्याच्या भावास लश्करांत रोजगार मिळून पुढें लहानशी सरदारी झाली होती. तशी लश्करची चाकरी क-

रण्याचा हैदर ह्यास प्रथम कंटाळा होता; परंतु शेवटीं आपल्या वयाच्या २७ व्या वर्षी ती त्यानें पतकरली; आणि थोड्याच काळांत शौर्य धीटपणा इत्यादि गुण त्याजमध्यें दिसण्यांत येऊं लागले. तेव्हां नंदराजानें एक लहानसें पतक त्याच्या स्वाधीन करून तें वाढविण्याविषयीं त्यास परवानगी दिली.

४ पुढें हैदरानें लवकरच पुष्कळ लुटारू लोक जमा केले. त्यांस तैनातीचें कारण नव्हतें; परंतु ते लुटून जें जमवीत त्यांतून अर्धें हैदरास देत असत, आणि अर्धें आपण खात असत. ह्या रीतीनें १५०० स्वार व ५००० पायदळ व हत्ती उंटें वगैरे सरंजाम हैदरानें थोड्या काळांत जमविला; आणि डिंडिगल्ल एथील फौजदारीचा अधिकार त्यास प्राप्त झाला. इ० स० १७५५
त्याजवळ फौज होती ती हजिरीचे वेळेस तो अधिक करून दाखवीत असे; व निरोगी शिपायांच्या हातां पायांस हळदीच्या पट्या बांधून ते जखमी असे दाखवून त्यांबद्दल नेमणूक सरकारांतून घेई. ह्याप्रमाणें कृत्रिमेंकरून बहुत द्रव्य काढून तो आपली सत्ता वाढवीत चालला होता, आणि ह्यानें इतकी फौज बाळगून पाळेगाराचा बंदोबस्त चांगला राखिला आहे, असें समजून नंदराजाचीही त्यावर खुश मर्जी होती.

५ श्रीरंगपट्टण एथील दरबारांत राजा व नंदराज ह्यांचें वैमनस्य पडून नंदराजानें राजास कैदेंत ठेविलें होतें; व राजाच्या प्रीतींतल्या कितीएक मनुष्यांचे नाककान नंदराजानें कापल्यामुळें दरबारचे लोक त्यावर नाखुष झाले होते. इतक्यांत फौजेच्या लोकांची बाकी फार चढून ते नंदराजा- इ० स०
च्या दारापुढें धरणें देऊन बसले. तें वर्तमान हैदरास सम- १७५८

जतांच त्यानें **श्रीरंगपट्टणास** येऊन सरकारी सरंजाम वगैरे जमवून व बाकी वसूल करून फौजेचें देणें वारलें. तेणेंकरून सर्वांची प्रीति त्यावर अधिक झाली, आणि त्याच्या मनांतही मोठ्या अधिकाराची इच्छा उत्पन्न झाली. मग तो व त्याचा **खंडेराव** नामा कारकून ह्या उभयतांनीं राजा व त्याची आई ह्यांजबरोबर संधान बांधून **नंदराजास** कारभारांतून काढावयाची मसलत केली. ती अशी कीं तैनातीचे बाकीकरितां फौजेनें पुनः **नंदराजास** अडविलें तेव्हां **हैदरही** त्या लोकांबरोबर धरणें घेऊन बसला. त्यामुळें **नंदराजास** का-
इ० स० १७५६ रभार सोडणें प्राप्त झालें, आणि तो कारभार लागलाच **हैदर** व **खंडेराव** ह्यांच्या स्वाधीन झाला.

६ पुढें **नंदराजानें महिसुरास** जाऊन कांहीं फौज जमविली; परंतु **हैदरानें** त्यावर स्वारी करून **महिसूर** घेतलें, व त्यानें फौजेस निरोप देऊन नेमणूक घेऊन स्वस्थ असावें, असें त्याकडून कबूल करविलें. ह्याप्रमाणें **हैदरास** कारभार प्राप्त होऊन तो किंचित् स्वस्थ झाला, इतक्यांत **खंडेरावानें** राजाच्या पक्षास अनुकूळ होऊन **हैदर** बेसावध असतां एकाएकीं त्याच्या लस्करावर तोफांचा मार चालू केला. त्या वेळीं **हैदरास** परम संकट पडून **खंडेरावास** त्यानें मोठ्या आर्जवानें निरोप सांगून पाठविला; आणि शेवटीं आपला खजीना व बायको व आपला मुलगा **टिपू** ह्यांस टाकून थोड्या लोकांसहित रात्रीं पळून गेला.

इ० स० १७५९ ७ नंतर **आनिकल्ल** व **बंगळूर** एथील सुभेदारांचे मदतीनें **हैदरानें** थोडक्याच महिन्यांत फौज मिळवून **खंडेरावाशीं**

लढाईचा प्रसंग केला; परंतु त्याचा पराजय झाला. अशा वेळेस त्यानें एक चमत्कारिक मसलत केली; ती अशी कीं, तो रात्रीं **नंदराजाच्या** घरीं गेला, आणि त्याच्या पायां पडून पूर्वींचा आपला अपराध व कृतघ्नपणा कबूल करून पुनः कारभारावर येण्याविषयीं त्यास आग्रह करिता झाला. त्या कपटी भाषणानें **नंदराज** भुलून गेला, व त्यास पुनः कारभार करण्याचा लोभ उत्पन्न झाला. मग **नंदराजाच्या** नावाचीं फितुराचीं पत्रें लष्करी सरदारांस लिहून तीं युक्तीनें **खंडेरावाच्या** हातीं जात असें **हैदरानें** संधान केलें. तीं पत्रें पाहतांच **खंडेरावाच्या** मनांत लष्कराविषयीं संशय उत्पन्न होऊन तो **श्रीरंगपट्टणास** निघून गेला. मग **हैदरानें** लष्करावर हल्ला करून त्याची दाणादाण केली; व तोफा सरंजाम वगैरे हें सर्व हस्तगत केलें. पुढें आसपासचे सर्व किल्ले घेऊन तो **श्रीरंगपट्टणास** गेला, आणि तेथें कपटानें तह करून आपण मुख्य अधिकार पावला. त्यानें राजास दरसाल तीन लक्ष रुपयांचा प्रांत व **नंदराजास** एक लक्ष रुपयांचा प्रांत ह्याप्रमाणें देण्याचें ठरवून आपण राजाप्रमाणें वागूं लागला. इ० स० १७६१
आणि त्याचा अनुपकारी कारकून जो **खंडेराव** त्यास त्यानें जन्मवर लोखंडाच्या पिंजऱ्यांत कोंडून ठेविलें.

८ ह्याप्रमाणें **हैदरास** सत्ता प्राप्त झाल्यावर त्यानें **निजामअलीच्या** मनांत **इंग्लिशांविषयीं** विरोध उत्पन्न केला; व त्यास आणि **इंग्लिशांस** मदत करण्यास **माधवराव बल्लाळ पेशवा** आला होता त्यास पस्तीस लक्ष रुपये देऊन माघारां फिरविलें. नंतर **हैदरानें त्रिनोमाली** एथें **कर्नल स्मिथ** इ० स० १७६७

**साहेब** ह्यावर हल्ला केला. परंतु त्याचा पराजय झाला. पुढें कितीएक लढायांमध्यें **इंग्लिशांचाच** उत्कर्ष पाहून निजामानें
इ० स० १७६८ **हैदराचा** आश्रय सोडून पुनः **इंग्लिशांशीं** तह केला.

९ ह्या लढाईंत **हैदरानें** शत्रूंस दाणापाण्याचा तोटा पाडण्याकरितां लोकांनीं धान्य जमिनींत पुरून ठेवावें, विहिरींच्या पाण्यांत विष घालावें, वैरण नाहींशी करावी, व गुरें डोंगरांत पाठवावीं, असा बंदोबस्त केला होता. असें असतां **इंग्लिशांनीं** त्याचा बराच मुलूख घेतला; व **मुंबईहून** लष्कर येऊन **मंगळूर होनावर** इत्यादि घाटा खालच्या मुलखांत अमल बसविला. पुढें **इंग्लिशांस** हुशारी येऊन ते **बंगलुरावर** हल्ला करण्याची मसलत करावयास लागले.

इ० स० १७६९ १० प्रथम **हैदरानें** तहाचें बोलणें पाठविलें, परंतु **इंग्लिशांस** त्याचें सारें राज्य घेण्याची उमेद होती ह्मणून त्यांनीं तें कबूल केलें नाहीं. नंतर समोर लढाई न करितां **इंग्लिशांस** उपद्रव देण्यास **हैदरानें** आरंभ केला. पुढें लवकरच **कोईमत्तूर** वगैरे बहुतेक प्रांत दीड महिन्याचे आंत त्यानें परत घेतले. एक दोन वेळां **इंग्लिशांचा** पराजय करून त्यांचे बहुतेक लोक मारिले; व कितीएक ठिकाणीं किल्लेकऱ्यांनीं विश्वासानें किल्ले स्वाधीन केले असतां त्यांस धरून त्यांचे हालहाल केले. शेवटीं सहा हजार निवडक स्वार व दोनशें पायदळ इतके फौजेसहित मोठमोठ्या मजला करून तो एकाएकीं **मद्रासे**पासून आलिकडे तीन कोशांवर दाखल झाला. त्या वेळीं तेथील अधिकाऱ्यांनीं भिऊन त्यानें सांगितल्याप्रमाणें कबूल करून तह केला. त्यांत लढाईचा आरंभ होण्यापूर्वीं

मुलकाची सरहद्द जशी होती तशी असावी, व आपापल्या राज्याच्या रक्षणाच्या कामांत उभयतांनीं परस्परांस मदत करावी ह्याप्रमाणें ठराव झाला.

११ **प्रेसिडेंट वेरेल्स्त साहेबानें** काम सोडल्यावर **कलकत्ता** एथील कारभार दोन वर्षेंपर्यंत **कार्टियर** नामें साहेब इ० स० १७७० चालवीत होता. त्या वेळीं एक मोठा दुष्काळ पडून बंगाल्यांतील लोकांपैकीं एक तृतीयांश लोक मेले. **कार्टियर साहेबाच्या** मागून **वारन् हेस्टिंग्स** नामें साहेब ह्याची त्या कामावर नेमणूक झाली. पुढील वर्षीं कंपनीची पैक्याची इ० स० १७७२ आडचण आणि कारभाराची अव्यवस्था वगैरे गोष्टींचा विचार विलायतेंतील **पार्लमेंट** सभेंत होऊन त्यांचे व्यवस्थेविषयीं नवा कायदा ठरला. त्यांतील मुख्य कलमें येणें- इ० स० १७७३ प्रमाणें.

१ बंगाल एथील कारभार **गवर्नरजनराल** व चार **कौन्सिलर** ह्मणजे मंत्री ह्यांनीं करावा, व त्यांचा हुकूम **मुंबई** व **मद्रास** एथील गवर्नरावर चालावा. २ **कलकत्त्यांत** इनसाफाकरितां एक मोठी अदालत **सुप्रीमकोर्ट** ह्या नामें असावी, त्या अदालतींत एक मुख्य जड्ज व तीन मदतनीस जड्ज असावे. ३ पहिल्या कामदारांची नेमणूक राजानें करावी, व कंपनीचें दरोबस्त दफ्तर प्रधानांस कारण पडेल तेव्हां कंपनीनें त्यांस दाखवावें. ४ गवर्नर व जड्ज ह्यांनीं नजर घेऊं नये, व व्यापार करूं नये. ५ कंपनीचे **कोर्ट आफ् डरेक्टर्स** ह्मणजे २४ कारभारी ह्यांस पूर्वीं दरसाल नेमीत होते तें मना करून प्रतिवर्षीं त्यांपैकीं ६ मात्र नवे नेमावे. ह्याप्र-

माणें बंदोबस्त होऊन त्यांपैकीं हिंदुस्थानच्या कारभारसंबंधें जीं कलमें होतीं तीं संन १७७४ च्या आगष्ट महिन्याचे पहिले तारखेस अमलांत यावीं ह्मणून हुकूम झाला.

## प्रकरण ७.

### वारन् हेस्तिंग्स साहेबाची कारकीर्द, मुलकाचा बंदोबस्त, अयोध्येचा नवाब, व मराठे ह्यांचें वर्तमान.

संन १७७२ पासून संन १७७६ पर्यंत.

१ नवाबाचा दिवाण असें कंपनी अझून आपणास ह्मणवीत असें ह्मणून त्याच्या प्रांतांत वसूल करण्याची रीति अद्यापि पूर्वींच्या मुसलमानांच्या अमलाप्रमाणेंच होती; ह्मणजे जमिनदार वगैरे लोक योग्य दिसेल त्याप्रमाणें जमिनीची लागवड करीत असत, आणि सरकारी देण्याशिवाय आणखी बाबती वसूल करीत असत. त्या शिवायबाबती आतां माफ केल्या; रयत लोकांस नवे कौल दिले, आणि त्यांजपासून अमुक घ्यावें असें त्यांत साफ लिहिलें; वसुलाचें काम सर्व कंपनीच्या तर्फेनें
इ० स० १७७२ नायब दिवाण नामें कामदार पाहात असे तें मना करून इंग्लिश लोक कलेकटर नेमिले; आणि त्या कामाची चौकशी कौन्सिलाच्या अधिकाऱ्यांनीं खुद्द करावी असें ठरविलें.

२ ह्याप्रमाणेंच जमिनदार आपापल्या प्रांतांत मनास येईल तसा इनसाफ करीत असत, आणि श्रीमंतांकडून जुलूम झाला असतां गरिबांची दाद लागत नसे. हा संप्रदाय बंद करून दर प्रांतांत कलेकटरानें काजी, मौलवी, इत्यादिकांचें स-

ल्यानें दिवाणी व फौजदारी इनसाफ करावा असा हुकूम झाला; आणि ज्यास ह्या अदालतीचे हुकूम कबूल नसतील त्यानें **अपील** ह्मणजे वरिष्ट कामगारांकडे फिर्याद करण्यासाठीं **कलकत्त्यांत सदरनिजामत** ह्मणजे सदर फौजदारी व सदरदिवाणी अदालत ह्या नावांचीं दोन **कोर्टें** स्थापिलीं. पहिल्या **कोर्टांत** एक **जड्ज** व **काजी** व **मुफ्ती** वगैरे होते; सदर दिवाणी **कोर्टांत गवर्नरजनरल, कौन्सिलाचे** दोन अधिकारी, व **रायरायान** ह्मणजे मुलकी वसुलाच्या कामाकडील दिवाण ह्यांनीं इनसाफ करावा असें ठरविलें होतें; परंतु तें काम करण्यास **गवर्नरजनरल** ह्यास फुरसत सांपडेना ह्मणून लवकरच तें पुनः **मुर्शिदाबाद** एथील पहिल्या अधिकाऱ्याकडे दिलें.

३ ह्याप्रमाणें मुलकाचा कारभार बहुतकरून आपण स्वतां करावा असा **इंग्लिश** लोकांचा निश्चय झाल्यावर **गवर्नरजनरल** ह्यांनीं **मुर्शिदाबाद** एथील **नायब रिझाखान,** आणि **बहार** प्रांताचा **नायब शिताबराय** ह्यांस फिर्यादींची-चौकशी करण्याच्या निमित्तानें कैद करून **कलकत्त्यास** आणिलें. **मुर्शिदाबाद** एथील नव्या तरुण नवाबाच्या वाड्यांतील खासगी बंदोबस्त करणें, व त्याची नेमणूक निमे कमी करून सोळा लक्ष रुपये देण्याचें ठराविलें होतें त्याची व्यवस्था राखणें, ह्या कामांकरितां **मणिबेगम** नामें त्याच्या बापाची राख होती तिची नेमणूक केली, आणि तिच्या हाताखालीं हिशोबाच्या वगैरे कामाकरितां **नंदकुमाराचा** मुलगा **राजा गुरुदास** हा नेमिला.

इ० स० १७७१ ४ शाहआलम बादशाह ह्यानें आपणास परतून दिल्ली प्राप्त होण्याविषयीं इंग्लिश मदत करीत नाहींत असें पाहून शेवटीं महादजी शिंदा तुकोजी होळकर वगैरे मराठे सरदार ह्यांशीं स्नेह केला; आणि त्यांनीं सांगितलें तें कबूल करून संन १७७१ च्या दिसेंबर महिन्याचे २५ वे तारखेस त्यांचे मदतीनें तो दिल्लीचे गादीवर जाऊन बसला.* त्यास इंग्लिशांनीं दिलेले अलाहाबाद प्रांत व कोरा प्रांत हे त्यानें त्या चाकरीबद्दल मराठ्यांस दिले. तें गवर्नरजनरल ह्यास आवडलें नाहीं. बादशाहास सालीना सव्वीस लक्ष रुपये देण्याचा जो करार पूर्वीं केला होता तो रद्द ह्मणून त्यानें सांगून पाठविलें; आणि वर लिहिलेले प्रांत मराठ्यांच्या स्वाधीन होऊं नयेत ह्मणून आपलें लश्कर त्यांच्या रक्षणार्थ रवाना केलें. पुढें लवकरच पन्नास लक्ष रुपये घेऊन ते प्रांत त्यानें अयोध्येच्या नवाबास विकले.

इ० स० १७७३ ५ इकडे बादशाह मराठ्यांच्या स्वाधीन झाल्यावर त्यांनीं त्यास घेऊन रोहिल्यांचा सूड उगविण्यासाठीं त्यांवर स्वारी केली. तेथील मुख्य सरदार जो नजीबउद्दवला त्याचें नांव आणि हकीकत पूर्वींच्या बखरींत लिहिलीच आहे. तो बहुत दिवसपर्यंत प्रामाणिकपणानें दिल्लीचें रक्षण करून संन १७७० रांत मृत्यु पावला. त्याचा मुलगा जाबताखान ह्यावर प्रथम मराठ्यांनीं हल्ला केला. तो मोठ्या शौर्यानें त्यांबरोबर लढला, परंतु मराठ्यांची सेना फार तिजपुढें त्याचा उपाय न चालून तो सुजाउद्दवला अयोध्येचा नवाब ह्याच्या आश्रयास जा-

* मराठ्यांची बखर भाग २१ पृष्ट २४८ पहिली आवृत्ति.

ऊन राहिला. त्याचीं मुलें माणसें मराठ्यांच्या हातीं लागलीं, आणि त्याचा सर्व प्रांत त्यांनीं लुटून उद्ध्वस्त केला.

६ **अयोध्येचा** नवाब **सुजाउद्दवला** ह्यानें आपणास मदत करावी ह्मणून **रोहिल्यांच्या** सरदारांनीं त्याशीं बोलणें लाविलें. तें कबूल करावें किंवा न करावें ह्याविषयीं त्याचा प्रथम निश्चय होईना, परंतु पुढें मराठेच आपोआप परत जाणार असें त्यास वर्तमान कळल्यावरून त्यानें **इंग्लिशांच्या** अनुमतानें त्यांशीं तह केला; तो असा कीं, त्यानें **रोहिलखंडां**तून मराठ्यांस काढून दिल्यावर **रोहिल्यांनीं** त्यास दाहा लक्ष रुपये लागलेच द्यावे, व त्यांशिवाय आणखी तीस लक्ष रुपये तीन वर्षांत द्यावे; ह्याप्रमाणें करार झाल्यावर थोड्या महिन्यांनीं पर्जन्य कालाच्या अखेरीस मराठे **रोहिलखंडां**त परत आले, तेव्हां **सुजाउद्दवला** ह्याजकडून उपराळा होण्याविषयीं निराश होऊन **रोहिल्यांचा** सरदार **हाफिझ रहिमत** ह्यानें शेवटीं मराठ्यांस कांहीं द्रव्य देऊन माघारां घालविलें. परंतु ते पुनः लवकरच परत येऊन भागीरथीच्या कांठीं छावणी करून राहिले; आणि **रोहिल्यांच्या** मुलकांतून **अयोध्या** प्रांतावर जाण्यास त्यांजवळ वाट मागूं लागले. इतक्यांत **जाबताखान** त्यांस जाऊन मिळाला. त्याप्रमाणें बाकीचे सरदारही मराठ्यांस अनुकूल होतील असें भय **सुजाउद्दवला** ह्यास पडलें. तें व्यर्थ होतें, कारण कीं **रोहिले** सरासरी मराठ्यांशीं गोडी मात्र राखून शेवटीं **सुजाउद्दवला** व **इंग्लिश** ह्याच्या लश्करास येऊन मिळाले; परंतु आपणावर हला आल्यावांचून लढाई करूं नये असा हुकूम इंग्लिश सरदारांस हो-

ता० १७ जून इ० स० १७७२

ठाणे.

इ० स० १७७३ ता ह्मणून मराठे **रोहिल्यांच्या** मुलकांत शिरून संन १७७३ च्या मार्च महिन्यापर्यंत लुटीत होते, व **अयोध्या** आणि **कोरा** ह्या प्रांतांत प्रवेश करण्याचे मसलतींत होते. शेवटीं त्यांस स्वदेशीं जाण्याचें निमित्त झाल्यामुळें ते परत न येण्याच्या निश्चयानें दक्षिणेकडे निघून गेले.

७ ह्याप्रमाणें **रोहिल्यांचें** संकट तर दूर झालें, परंतु त्यांनीं ज्या मदतीकरितां **सुजाउद्दवला** ह्यास द्रव्य द्यावयाचें केलें होतें ती मदत त्यानें केली नाहीं, ह्यास्तव कबूल केल्याप्रमाणें ऐवज देण्यास **रोहिले** सरदार अनमान करूं लागले. तो ऐवज वसूल करण्याकरितां **सुजाउद्दवला** ह्यानें लढाईचा बेत केला, आणि त्याचे कुमकेस **इंग्लिश** लश्कर देण्याचें **गवर्नरजनरल** साहेबांनीं कबूल केलें. त्याचा करार असा कीं **सुजाउद्दवला** ह्यानें लश्करचा खर्च देऊन लढाई संपल्यावर **इंग्लिशांस** चाळीस लक्ष रुपये द्यावे. ह्याप्रमाणें ठरल्यावर नवाबानें **रोहिल्यांवर** स्वारी केली; आणि जरी रोहिल्यांनीं धैर्य करून युद्ध केलें, तरी **इंग्लिशांचे** मदतीनें नवाबानें त्यांचा पराजय केला. त्या युद्धांत त्यांचा सरदार **हाफिझ रहिमत** हा व त्याचा एक मुलगा आणि २००० शिपाई लोक पडले, व त्याचा दुसरा एक मुलगा पाडाव झाला. नंतर नवाबाचे फौजेनें मुलकांत फार धुमाळी केली. जिकडे तिकडे गांव जाळिले, घरें लुटलीं, व लोकांस पिटून लाविलें. ह्याप्रमाणें हजारों लोकांचा संहार झाल्यावर रोहिल्यांचा **फैझुल्लाखान** नामें सरदार शरण आला. त्यानें नवाबाचा अंकित ह्मणवून पावणे पंधरा लक्ष रुपयांचा मुलूक

(margin: इ० स० १७७४; ता० २३ एप्रिल)

घेऊन असावें; ह्याप्रमाणें करार ठरून **इंग्लिशांची** फौज परत आली. पुढें लवकरच **सुजाउद्दवला** मरण पावला, आणि त्याचा मुलगा **असफउद्दवला** त्याच्या गादीवर बसला. ह्या **रोहिल्यांचे** लढाईंत नवाबास सामील होण्यास लोभावांचून **गवर्नरजनरल** ह्यांस दुसरें कांहीं कारण नव्हतें.

८ **माधवराव बल्लाळ** पेशवा अल्प वयामध्यें असतां सन १७७२ रांत मेला, आणि त्याचा भाऊ **नारायणराव** गादीवर बसल्यावर तोही थोडक्या वेळांत मारेकऱ्यांच्या हातानें मृत्यु पावला. त्या घातकी कृत्याचा आरोप त्याचा चुलता **रघुनाथराव** ज्यास **राघोबादादा** असें ह्मणत त्यावर येऊन कारभाऱ्यांनीं त्यास **पुण्यांतून** काढून दिलें. त्या **रघुनाथरा**- इ० स० १७७५ **वास** मदत करून त्याबद्दल **मुंबई** एथील **गवर्नर** व **कौन्सिल**-**दार** ह्यांनीं **साष्टी** व **वसई** व **गुजराथेंतील** कांहीं मुलूक आप- इ० स० १७७५ णास मिळण्याचा करार करून घेतला. हा करार **कलकत्ता** एथील अधिकाऱ्यांच्या विचारास आला नाहीं, आणि **मुंबई**-**च्या** सरकारानें आपला हुकूम मोडिला ह्मणून राग येऊन त्यांनीं आपल्या तर्फेनें **पुण्यास** वकील पाठविला. त्यानें तेथील कारभाऱ्यांशीं बोलणें करून **वसई** व **गुजराथेंतील** चवथाईपैकीं पेशव्यांचा हिस्सा व **भडोचे**जवळचा तीन लक्षांचा मुलूक घेतला होता तो इतका परत देऊन **इंग्लिशांनीं साष्टी** वगैरे आपल्याकडे ठेवावें असें ठरवून तह केला. इ० स० १७७६ जून

९ पुढें लवकरच **पुण्याच्या** दरबाराविषयीं **इंग्लिश** सरकारच्या मनांत विकल्प येऊन लढाईस प्रारंभ झाला; ती लढाई चार वर्षेपर्यंत चालली. तिजमध्यें **जनरल गादर्ड**

साहेब नामें इंग्लिश सरदार ह्यानें कलकत्त्याकडून येऊन बहुत प्रसंगीं पराक्रम केला; अमदाबाद वगैरे शहरें मोठ्या युक्तीनें घेतलीं, आणि मराठ्यांस फार हैराण केलें. तिकडे उत्तर हिंदुस्थानांत यमुनेच्या कांठीं इंग्लिश आणि शिंदे ह्यांची लढाई चालली होती, तीमध्येंही इंग्लिशांकडील कपतान पाफम नामक सरदार ह्यानें फार पराक्रम केला, आणि मोठे शर्तीनें ग्वालेरचा किल्लाहीं घेतला. परंतु ह्या लढाईपासून इंग्लिशांचा कांहीं फायदा न होतां शेवटीं वसई व गुजराथेंतील बहुतेक मुलूक इंग्लिशांनीं सोडून द्यावा; व रावोबादादास आश्रय देऊं नये; आणि इंग्लिशांनीं ज्याच्या रक्षणाकरितां शिंद्यांशीं लढाई आरंभिली होती, त्या गोहदच्या राण्याचा मुलूक व इतर संस्थानिकांचीं राज्यें शिंदे घेऊं लागल्यास इंग्लिशांनीं त्यांस हरकत करूं नये, ह्याप्राणें संन १७८२ त मे महिन्याचे १७ वे तारखेस सालपें एथें तह ठरला.

१० ह्याच्या पूर्वी पांचसाहा वर्षांवर कंपनीच्या राज्याविषयीं विलायतेंत ठरलेला नवा बंदोबस्त वहिवाटींत येऊन कौन्सिलाचे तीन अधिकारी तिकडून कलकत्त्यास आले होते, त्यांस हेस्तिंग्स साहेबाचें करणें न आवडल्यामुळें कौन्सिलांत दुफळी पडून हरएक गोष्टीविषयीं बखेडा चालला होता. इतक्यांत गवर्नरजनरल साहेबांवर कितीएक लांचांच्या फिर्यादी पडल्या, त्यांची चौकशी कौन्सिलापुढें समक्ष व्हावी असा त्याचे विरुद्ध मंडळीचा आग्रह पडल्यामुळें उभयतांचें वैमनस्य अधिक वाढलें. ह्या फिर्यादींतून मुख्य

फिर्यादी पूर्वीं लिहिलेला **हुगळीचा** फौजदार **नंदकुमार** हा होता; त्यावरच कोणी पांच वर्षांपूर्वीं त्यानें खोटी सही केली होती ह्याची फिर्याद केली, तिची **कलकत्त्याच्या सुप्रीम कोर्टांत** चौकसी होऊन **इंग्लिश** लोकांचे जुरीनें त्यावर गुन्हा ठरवून त्यास **कोर्टानें** फांशीं दिलें. ह्या कारणामुळें **गवर्नरजनरल** ह्याचा विशेष दुर्लौकिक झाला, आणि कारभारांतील त्याचे सोबती ह्यांशीं वांकडेपणा वाढला. त्यांच्या अनुमताशिवाय व विलायतेच्या हुकुमाविरुद्ध त्यानें कांहीं जमाबंदीचा ठराव केला तो, व **रोहिल्यांशीं** केलेली लढाई ही **कोर्ट आफ् डरेक्टर्स** ह्यांस न आवडून त्यास **गवर्नरजनरलाच्या** कामावरून काढण्याचें विलायतेंत ठरत होतें. इतक्यांत त्याच्या कितीएक मित्रांनीं त्याचा राजीनामा आला आहे असें कानावर घातल्यावरून तो कबूल होऊन, **व्हीलर** नामें साहेब ह्याची त्या कामावर नेमणूक झाली, आणि तो येईपर्यंत **क्लावरिंग साहेब कौन्सिलाचा** अधिकारी ह्यानें काम चालवावें असा हुकूम झाला.

११ हा हुकूम **गवर्नरजनरल साहेब** कबूल करीना, आणि म्या राजिनामा पाठविलाच नाहीं असें ह्मणूं लागला. ह्याकरितां कारभार कोणी करावा हा तंटा **सुप्रीम कोर्टांत** पडून **हेस्तिंग्स साहेबाच्या** तर्फेचा फैसला झाला. नंतर **हेस्तिंग्स साहेब** मोठमोठ्या अधिकाऱ्यांची वहाली बर्तर्फी मनास येईल तशी करूं लागला. **क्लावरिंग साहेब** मेल्यामुळें **सर ऐरकूट साहेबाची** नेमणूक **कौन्सिलांत** झाली; तोही **गवर्नरजनरलाच्या** करण्यास रुकार

देऊं लागला; त्यामुळें त्याचा मुख्य प्रतिपक्षी **फ्रान्सिस साहेब** ह्याचा पक्ष फिका पडला. मग उभयतांची कलागत होऊन ते प्रसिद्धपणें एकमेकास अपशब्द बोलूं लागले; त्यापासून पुढें त्यांचें गोळीचें द्वंद्वयुद्ध झालें; आणि **फ्रान्सिस**
इ० स० १७८० **साहेबास** जखम लागून तो विलायतेस निघून गेला.

## प्रकरण ८.

### हेस्तिंग्स साहेबाची कारकीर्द—करनाटकांतील वर्तमान—हैदराशीं दुसरी लढाई.

इ० सं० १७७६ पासून सं० १७८४ पर्यंत.

१ अर्काटचा नवाब **महंमदअल्ली** ह्याची सत्ता **इंग्लिशांच्या** आश्रयानें कायम झाली. त्यास व **इंग्लिशांस तंजावर** एथील राजानें **हैदराचे** लढाईचे वेळेस मनापासून कुमक न करितां उलटा शत्रूशीं स्नेहभाव ठेविला होता, ह्म-
इ० स० १७७१ णून त्याच्या पारिपत्यास उभयतांचीं सैन्यें रवाना झालीं. त्या सैन्यांत नवाबाचा मुलगा **उमरत्‌उल्‌उमराव** हा होता; आणि **इंग्लिशांच्या** लष्कराचा मुख्य जनरल **स्मिथ साहेब** नामें होता. त्या **साहेबानें** शत्रूच्या प्रांतांतील कितीएक किल्ले घेऊन **तंजावरास** वेढा घातला; आणि तेथील तटबंदीस वाट पाडून पुढें हल्ला करणार होता; इतक्यांत **उमरत्‌उल्‌उमराव** ह्यानें राजाशीं तह केल्याचें वर्त्तमान समजल्यामुळें त्यास फार उदासीनपणा झाला. पुढें नवाबाचें मर्जीस्तव **इंग्लिशांनीं** दक्षिणेकडील सेतुपति वगैरे मारवारांतील पाळेगार

ह्यांचा बंदोबस्त केला. त्या लढाईंत फौजेनें त्या प्रांताच्या लोकांवर फार कठोरपणा केला. इतक्यांत **तंजावरच्या** राजानें तहाप्रमाणें वागण्याविषयीं अंतर केलें, असें निमित्त करून नवाब त्याशीं लढाई करण्याकरितां **इंग्लिशांस** बोलावूं लागला. नवाबाची कपटी मसलत **इंग्लिशांस** आवडली नाहीं; तथापि त्याचे मर्जीवर व आपल्या फायद्यावर लक्ष देऊन त्यांनीं त्यास कुमक करण्याची तयारी केली. मग पांच महिनेपर्यंत लढाई करून शेवटीं **तंजावरच्या** किल्ल्यास संन १७७३ ता० १६ दिसेंबर रोजीं वाट पाडली; आणि आंतील किल्लेकरी बेफाम असतां दिवसास एकाएकीं हल्ला करून तो किल्ला घेतला. आणि तेथील राजा व त्याचीं माणसें धरून **महंमदअल्लीच्या** स्वाधीन केलीं.

२ त्या राजाकडून **डच** लोकांनीं **नागोरचा** किल्ला विकत घेतला होता, तो सोडून जाण्यास **इंग्लिशांनीं** व नवाबानें त्यांस सांगितलें, आणि ते लाचार ह्मणून त्यांस तें कबूल करणें प्राप्त झालें. इ० स० १७७३

३ **तंजावरच्या** राजाकडे कांहीं अपराध नसतां त्याशीं लढाई करून त्यास गादीवरून काढिलें, हें **डरेकटर्सांच्या** विचारास न येऊन त्यांनीं त्या राजास त्याच्या पदावर फिरून स्थापण्याचा हुकूम पाठविला. त्याप्रमाणें **मद्रास** एथील गवर्नर **लार्ड पिगट साहेब** ह्यानें वहिवाट करून जाहिरनामा लाविला. इ० स० १७७५ ता० १२ एप्रिल.

४ ह्या प्रकरणीं व पुढील **तंजावर** एथील व्यवस्थेविषयीं **लार्ड पिगट साहेब** व **मद्रास** एथील **कौन्सिलाचे** दुसरे

अधिकारी ह्यांमध्यें वैमनस्य पडलें. त्यास मुख्य निमित्त असें झालें कीं **बेनफील्ड** नामें कोणी कंपनीचा चाकर **इंग्रेज** होता, तो **अर्काटच्या** नवाबावर आपले तेवीस लक्ष रुपये घेणें काढून मला **तंजावर** एथील तनके नवाबानें लावून दिले आहेत, त्यांबद्दल ह्या सालचें पीक मला देववावें, असें **इंग्लिश** सरकारास ह्मणावयास लागला. हा देण्याघेण्याचा व्यवहार केवळ खोटा, व नवाब आणि **बेनफील्ड** ह्या उभयतांनीं कंपनीं व **तंजावरचा** राजा ह्यांस बुडवायास हें तर्कट रचिलें आहे, असें ह्मणावयास कारणें होतीं; त्याप्रमाणें **लार्ड पिगट साहेबाच्याही** मनांत आलें होतें, तथापि नवाबापासून कर्ज येणें असल्यास त्यापासूनच वसूल करावें; **तंजावरच्या** राजाचा व त्या कर्जाचा कांहीं संबंध नाहीं, असा ठराव करण्याचें त्याच्या मनांत होतें, तें इतरांच्या विचारास न येऊन कलह वाढला; आणि शेवटीं त्यांनीं त्यास धरून कैदेंत ठेवून आपण कारभार चालविला. तें वर्तमान विलायतेंत समजल्यावर सर्वांस फार त्रास उत्पन्न झाला, व **लार्ड पिगट** ह्याची मोकळीक करावी असा हुकूम लागलाच तेथून रवाना झाला. परंतु तो **मद्रासेस** पोंहचण्याचे पूर्वीं **लार्ड पिगट** हा कैदेंत असतां मरण पावला. त्याच्या शत्रूंपैकीं चार आसामींची पुढें त्या कामाकरितां विलायतेंत चौकशी होऊन गैरवर्तणूकेचा गुन्हा त्यांवर लागू झाला, आणि एकेकाकडून दहादहा हजार रुपये दंड घेण्याचा ठरला.

९ **लार्ड पिगट साहेबास** कैद केल्यावर **मद्रास** एथील मुख्य अधिकार **सर टामस रंबोल्ड साहेब** ह्याजकडे आ-

ला. त्यानें जमिनदारांस नवे पट्टे दिले त्यांत कांहीं कृत्रिम केलें; **विजयनगरचा विसरामराय** ह्याचा कारभार त्याचा भाऊ **सीतारामराय** ह्यास देऊन त्याकडून लांच घेऊन दरसाल खंडणी यावयाची तिचें अर्ध घेण्याचें कबूल केलें; **निजामास पंचमहाला** बद्दल खंडणी द्यावयाची ती मना केली; हीं आणि दुसरीं त्याचीं कृत्यें **कोर्ट आफ् डरेकटर्स** ह्यांस न आवडून त्यांनीं त्यास व **कौन्सिलाच्या** दोन अधिकाऱ्यांस चाकरींतून बर्तर्फ केलें व बाकीच्या दोहोंची कामावरून बदली केली. लष्करचा मुख्य सरदार **सर हेक्टर मनरो** ह्यासही मोठा ठपका लिहून पाठविला.

६ **इंग्लिशांनीं** संन १७६९ च्या तहांत संकटसमयीं **हैदरअल्लीस** कुमक करण्याचा करार केला असतां त्यावर जेव्हां मराठ्यांनीं स्वारी केली तेव्हां त्यास कांहींच मदत केली नाहीं. उलटा **अर्काटच्या** नवाबानें मराठ्यांशीं स्नेह केला त्यास **इंग्लिशांनीं** रुकार दिला, येणेंकरून **हैदरअल्लीच्या** मनांत वांकडें आलें. मग त्यानें **निजामाशीं** व **पोंदेशरी** एथील **फ्रेंचांशीं** स्नेह केला, आणि पश्चिम समुद्रकांठचें **फ्रेंच** लोकांचें ठाणें **माही** एथून त्यास दारू गोळा वगैरे सामानाचा पुरावा होऊं लागला. इतक्यामध्यें **युरोपखंडांत** **फ्रेंच** आणि **इंग्लिश** ह्यांची लढाई चालू झाल्याचें वर्तमान आलें. तें समजतांच **इंग्लिशांनीं चंद्रनगर मछलीपटण** व **करेकल्ल** हीं **फ्रेंचांचीं** ठाणीं घेतलीं. नंतर **सर हेक्टर मनरो साहेबानें पोंदेशरीस** वेढा घालण्याकरितां स्वारी केली. त्याकडून तर त्या कामांत सुस्तीच झाली, परंतु आर- इ० स० १७७८

माराकडील सरदार सर एद्वर्ड वर्नन साहेब ह्यानें फ्रेंचांचा पराजय करून त्यांस घालवून दिलें, आणि आरमाराकडील लष्कर खालीं उतरून त्यानें किल्ल्यास वेढा दिला. पोंदेशरी एथील फ्रेंच किलेदारानें शौर्येंकरून आपलें संरक्षण केलें; पुढें तो निरुपाय होऊन त्यानें इंग्लिशांचें अभयवचन घेऊन किल्ला त्यांच्या स्वाधीन केला. त्या कराराप्रमाणें किलेकऱ्यांस इंग्लिशांनीं जाऊं दिलें, आणि एके पलटणीस
इ० स० निशाणेंही लावण्यास रुकार दिला. पुढें पोंदेशरी एथील
१७७९ तटबंदी पाडिली, आणि माही एथील ठाणें घेऊन तेथेंही तसेंच केलें.

७ अशा कारणांवरून हैदर आणि फ्रेंच ह्या उभयतांनीं इंग्लिशांशीं युद्ध करण्यास कमर बांधिली; आणि कवाईत शिकलेले वीस हजार पायदळाचे लोक, तीस हजार स्वार, आणि निजामाच्या ताब्यांतील चारशें गोरे लोक वगैरे मिळून सुमारें एक लक्ष फौज आणि गोऱ्या लोकांनीं व कवाईत शिकलेल्या काळ्या लोकांनीं चालविलेल्या शंभर तोफा इतका सरंजाम घेऊन हैदरानें आपली सरहद्द सोडून पुढें चाल
इ० स० केली. नंतर लवकरच त्यानें अर्काटास वेढा घातला.
१७८० इकडे लष्कराची सरदारी कोणी करावी ह्याविषयीं मद्रासेस
जुलै २१ बराच वाद आणि तंटा होऊन शेवटीं सहा हजार पायदळ, शंभर कवाईत शिकलेले स्वार, व कांहीं नवाबाचे मुलकी तऱ्हेचे स्वार घेऊन सर हेक्टर मनरो साहेब मद्रासेहून निघाला; आणि कर्नल बेली साहेबाच्या टोळीनें गंटुराहून

निघून आपणास कांजिउरम् (कांचीपूर) एथें येऊन मि-
ळावें, असा त्यानें हुकूम पाठविला.

८ बेली साहेबाजवळ सुमारें दोन हजार काळें पायदळ, दीडशें गोरे लोक व कांहीं तोफखाना इतकें लश्कर होतें. त्यास वाटेनें अन्नाचा फार तोटा पडला, असें असतां तो कांचीस मुख्य फौज होती तेथून सात आठ कोसांवर परांबोकम एथें येऊन पोहोंचला. त्या ठिकाणीं त्यावर हैदराचा मुलगा टिपू साहेब ह्यानें प्रथम हल्ला केला; तेव्हां कितीएक तासपर्यंत उभयतांचें मोठ्या निकरानें युद्ध होऊन टिपू मागें हटला. परंतु १० वे तारखेस बेली साहेबाचें लश्कर कांचीचें देऊळ दृष्टीस पडे इतकें जवळ आलें असतां एकाएकीं हैदराचें सर्व लश्कर आपणावर येतें असें त्यास समजलें. प्रथम बाणांचा व साठ तोफांचा भडिमार होऊं लागला, आणि स्वारांच्या टोळ्या येऊन आंगावर पडल्या; परंतु इंग्लिश फौजेपुढें त्यांचा कांहीं उपाय चालेना. जेव्हां जेव्हां शत्रु हल्ला करीत तेव्हां तेव्हां हे त्यांतून पुष्कळ लोकांस मारून शत्रूंस मागें हटवीत. ह्याप्रमाणें ते कांहीं गलबल न होऊं देतां लढत होते तेणेंकरून हैदरासही संशय उत्पन्न झाला; आणि मागें फिरण्याविषयीं फ्रेंच सरदार लाली ह्यानें त्यास मसलत सांगितली. तेव्हां ती इंग्लिशांची लहान टोळी जय पावती असें दिसूं लागलें. अशा संधीस इंग्लिशांचीं दारूचीं दोन पिपें एकाएकीं उडालीं, त्यामुळें त्यांच्या तोफा निरुपयोगी होऊन त्यांच्या फऱ्यामध्यें वाटा पडल्या; आणि दारू नाहीं ह्मणून बंदुकांचा मार कमी झाला. मग ते तरवारींनीं

सप्तेंबर

आणि बेनेटांनीं* लढूं लागले; आणि शत्रूंस पूर्वीं दहशत पडली होती ह्मणून त्यांसही एकाएकीं ह्यांवर हल्ला करावयास धीर होईना. शेवटीं हैदर आपली सारी फौज घेऊन उजवे बाजूस आला. तो स्वारांच्या टोळ्या करून इंग्लिशांवर हल्ला करी, व त्या टोळ्यांमध्यें त्याचें पायदळ होतें तें बंदुकींच्या गोळ्यांची वृष्टि करी. त्या वेळीं बेली साहेबास जखम लागली होती, तथापि त्यानें तेरा वेळ त्यांचा हल्ला मागें फिरविला. मग काळे शिपाई सारे पडले, आणि सुमारें चारशें गोरे राहिले; तरी ते जयाची उमेद बाळगून शत्रूंच्या आंगावर जाण्यास सिद्ध होते. शेवटीं मुख्य फौजेंतून आपणास कांहीं कुमक येत नाहीं, अशी बेली साहेबाची निराशा झाल्यावर राहिलेल्या लोकांच्या जिवांचें रक्षण करण्याचे इछेनें त्यानें तहाचें निशाण दाखविलें. नंतर बंदुकांचा मार बंद होऊन आपल्या जिवास धक्का पोहोंचणार नाहीं, असें समजून इंग्लिशांनीं शस्त्रें ठेविलीं. तंव लागलेच हैदराचे लोक त्यांवर पडून त्यांस मारूं लागले. त्या समयीं इंग्लिशांचे ते सर्व लोक ठार झाले असते, परंतु फ्रेंच सरदारांनीं मध्यस्थी करून सुमारें दोनशें वांचविले, आणि पुढें ते कैदेंत असतां त्यांचें दुःख कमी करण्यांत आपणाकडून करविली तितकी कुमक केली.

९ मन्रो साहेबाचें लश्कर इतकें जवळ असून त्यानें बेली साहेबाचे टोळीस कुमक केली नाहीं ह्या गोष्टीचें आश्चर्य वाटतें; परंतु त्याच्या लश्करासही दाणा वैरण वगैरे सरंजामाचा फार तोटा होता, ह्यामुळें त्यास आपलीच काळजी

*इंग्रेजी बंदुकेच्या टोंकास जी सुरी असती तिचें नाव बेनेट.

पडली होती. असें असतां त्यानें दोन प्रहरांनंतर छावणींतून कूच केलें; परंतु **बेली साहेबाचा** जय झाला अशा खोटे अवाईवर भरंवसा ठेवून चौकशी न करितां तो परत गेला. दुसरे दिवशीं त्यानें **कांचीहून** लश्करासहित कूच केलें, मग तो परत **मद्रासेस** गेला. हें वर्तमान **कलकत्त्यास** समजल्यावर तेथून कुमकेस पंधरा लक्ष रुपये व कांहीं फौज रवाना झाली; व **मद्रासच्या** गवर्नरास कामावरून अमानत करून लश्करचा वगैरे सर्व अधिकार चालविण्याकरितां **सर** इ० स०
**अयरकूट साहेब** ह्यास **गवर्नरजनरालानें मद्रासेस** पाठ- १७८०
विलें. नोंवेंबर

१० इतक्यांत **अर्काटचा** किल्ला **हैदरानें** दीड महिना वेढा घालून कपटानें घेतला; परंतु **वेळूर**, **वांदिवाश** इत्यादि किल्ल्यांस **हैदराचे** वेढे होते ते **इंग्लिशांची** फौज तेथें जातांच उठले. **कूट साहेबानें पोंदेशरीकडे** जाऊन **करंगोवी** एथें **फ्रेंच** लोक नवी फौज ठेवीत होते ती हुसकून देऊन त्या जागीं त्यांनीं सरंजाम जमविला होता तो काढून घेतला. इ० स०
नंतर **इंग्लिशांची** फौज **कडलोराहून त्रिचिनापल्लीच्या** र- १७८१
क्षणास जात असतां वाटेनें **पोर्टोनोवो** बंदरानजीक **चिलिंग्ब्रान** एथील तटबंदीदार देवळावर **कूट साहेबानें** हल्ला केला; तो फसल्यामुळें **हैदरास** हुशारी येऊन तो लढाईस आला. जुलै ता० १
ते वेळीं दोन प्रहरपर्यंत आवेशानें युद्ध होऊन **हैदराचा** केवळ पराजय होऊन त्याचें लश्कर निघून गेलें. पूर्वी **इंग्लिशांच्या** लश्करास अन्नाचा व सामानाचा जो फार तोटा पडला होता, तो ह्यामुळें कांहींसा दूर झाला; आणि दक्षिणे-

कडील प्रांतांवरचें लक्ष्य काढून व **वांदिवाश** एथील वेढा उठवून **टिपू** हा सर्व सैन्य घेऊन **अर्कांटास** आला.

११ **अर्कांटचा** किल्ला परत घ्यावा हा **सरअयरकूट साहेबाचा** हेतु होता; परंतु त्याच्या लष्करास खाण्याच्या सामानाचा फार तोटा होता ह्मणून त्यानें **त्रिपासोर** हें वेढा घालून घेतलें; त्यांत फारसें सामान मिळालें नाहीं. नंतर पू-
आगस्त ता० २७ र्वी **बेली साहेबाचा** जेथें पराजय झाला तेथेंच **हैदरानें** युद्ध-प्रसंग केला; तो दहा घटका दिवसापासून काळोख पडेपर्यंत झाला; त्यांत **इंग्लिशांचे** मेले व जखमी झाले वगैरे मिळून ५०० लोक पडले. **हैदराचे** लोक फारसे मेले नसतील; कारण, जेव्हां **इंग्लिश** त्यांजवर चाल करीत तेव्हां ते टेंकडांच्या आश्रयास जाऊन राहत, अशी त्यानें सोईची जागा धरिली होती. तथापि **इंग्लिश** त्या रात्रीं व दुसऱ्या दिवसीं सकाळपर्यंत आपल्या जाग्यावर राहून जयाच्या तोफा मारून निघून गेले; असें असतां ते मागें हटले, असें **हैदरानें** प्रसिद्ध केलें. परंतु पुढें वेळूर एथें **हैदर** जात असतां **सोलिनगडास इंग्लिशांनीं** त्याचा पराजय केला. पुढें लवकरच **जनरल कूट साहेब** फौजेसहित परत **मद्रासेस** आले. तिचा एक तृतीयांश ह्मणजे सुमारें २५०० लोक एकंदर पडले.

१२ ह्याच्या पूर्वी **मद्रास** एथें **लार्ड माकार्टनी साहेब गवर्नराच्या** कामावर आला होता. तो आल्यावर प्रथम **इंग्लिशांनीं** डच लोकांचीं **नागपट्टण** वगैरे दक्षिण **हिंदुस्थानांतील** ठाणीं आणि **सिंहलद्वीपांतील त्रिकोमाली** हीं जिंकून घेतलीं. ह्या वर्षाचे अखेरीस **चित्तूर** हें **हैदराच्या**

हस्तगत झालें. **वेलुरा** सभोंवता **टिपूचा** वेढा होता तेथें अडचण पडली होती, परंतु **कूट साहेबानें** तीन महिन्यांचे बेगमीची सामग्री किल्लेकऱ्यांस पोहोंचविली त्यामुळें हुशारी आली.

१३ पश्चिम कांठावरचें **माही** हें **फ्रेंचांचें** ठाणें **इंग्लिशांनीं** घेतलें ह्मणून पूर्वी लिहिलें. त्यानंतर **तालचरी** एथील **इंग्लिशांच्या** किल्ल्यास **हैदराच्या** एका सरदारानें वेढा घातला; परंतु आंतील किल्लेकऱ्यांस **मुंबईहून** कुमक येऊन त्यांनीं शत्रूस तेथून घालवून दिलें, आणि **कालिकोट** घेतला. नंतर लवकरच विलायतेच्या राजाकडून **मुंबई** व **मद्रास** ह्या दोहों जागीं कुमक आली, आणि त्याच्या मागून **फ्रेंचांचा सुफ्रीं** नामें सरदार हा आरमार व तीन हजार लोक व **काफ्री** लोकांची एक पलटण इतकी फौज घेऊन आला. त्याची व **इंग्लिशांची मद्रासेच्या** वाऱ्यावर बरीच लढाई होऊन **फ्रेंचांनीं** आपली फौज व तिचा सरदार **बुशी** ह्यांस **पोर्टोनोवो** एथें उतरलें; आणि **इंग्लिश** आरमारांचा सरदार जहाजें नीट करावयाकरितां **त्रिकोमालीस** गेला. इ० स० १७८२ जानुआरी

१४ **कर्नल ब्राथवेट** नामें **इंग्लिशांचा** सरदार शंभर गोरे व पंधराशें काळे लोक आणि तीनशे स्वार इतक्या लश्करासहित **तंजावरच्या** रक्षणार्थ तेथून सुमारें वीस कोसांवर **कावेरीच्या** कांठीं होता. तो शत्रु दूर आहेत ह्मणून निश्चित होता. इतक्यांत एकाएकीं **टिपूनें** त्यावर दहा हजार पायदळ, दहा हजार स्वार, चारशें गोरे लोक, आणि वीस तोफा इतक्या फौजेसहित हल्ला केला. तेव्हां **तंजावरास** ता० १६ फेब्रुआरी

जाण्याची मसलत सिद्धीस जाणार नाहीं असें समजून **कर्नल ब्राथवेट साहेब** ह्यानें सभोंवतें पायदळ व तोफा आणि मध्यें स्वार, असें सैन्य उभें करून एक अहोरात्रपर्यंत एकसारखी लढाई केली; आणि जितके वेळ शत्रूंनीं चढाव केला, तितके वेळ त्यांवर कुलपी गोळे व बंदुकांच्या गोळ्या ह्यांचा भडिमार करून त्यांस माघारां हटविलें. शेवटीं १८ वे तारखेस बहुतेक फौज मेल्यावर **फ्रेंच** सरदार **लाली साहेब** गोरे लोकांसहित त्यांवर गेला, ते वेळीं काळ्या शिपायांनीं हिंमत सोडली, आणि **इंग्लिशांची** कत्तल होण्यास आरंभ झाला. त्या प्रसंगीं त्या उदार **फ्रेंच** सरदारानें पराकाष्ठा करून आपल्या कित्येक लोकांस ठार मारून **इंग्लिश** सरदारांच्या जिवांचें रक्षण केलें; आणि पुढें ते कैदेंत असतांही त्यांस **टिपूनें** मोठ्या दयाळूपणानें वागवून घेतलें.

एप्रिल १५ **सर अयरकूट साहेब** आपल्या किल्ल्यांच्या रक्षणार्थ निघाला, त्या स्वारीचें कांहीं फळ झालें नाहीं. उलटें असें झालें कीं **कूट साहेब मद्रासेस** परत जात असतां गोऱ्या लोकांची एक पलटण **टिपूनें** छापा घालून कापून टाकिली. पुढें **फ्रेंचांनीं नागपट्टण त्रिकोमाली** वगैरे घेण्याचा उद्योग केला. (जून) त्यांच्या रक्षणास जावयाचा वेळ **इंग्लिश** सरदारांनीं कज्जा करण्यामध्यें घालविल्यामुळें त्यांचा आरमाराकडील सरदार **ह्यूझ साहेब** हा जाण्याच्या पूर्वींच **त्रिकोमाली** हें ठाणें **फ्रेंचांच्या** स्वाधीन झालें. (सप्टेंबर) परंतु त्यानें समुद्रामध्यें एकवेळ **फ्रेंचांचा** पराजय करून सूड मात्र उगविला. नंतर तो जहाजांसुद्धां **मुंबईस** गेला; आणि **कूट**

साहेबानें काम सोडल्यामुळें जनरल स्त्यूर्ट साहेब लश्कराचा मुख्य सरदार झाला. ह्या वर्षाचे अखेरीस मद्रास एथें वादळ होऊन जहाजांचा फार नाश झाला, दाणा बुडाला, व बंगाल्याहून नवा तांदूळ येईना. अशांत हैदराच्या भयामुळें फार लोक बाहेरून तेथें येऊन राहिले होते, ह्मणून अन्नाचा दुष्काळ पडला, आणि रोज शेंकडों माणसें मरूं लागलीं.

१६ पश्चिम कांठावर लढाई कांहीं चालू होती. परंतु टिपूची फौज इंग्लिशांपेक्षां अधिक होती ह्मणून तिकडे कांहीं त्यांचा उपाय चालेना. इतक्यांत हैदर मरण पावला दिसेंबर ता० ७
ह्मणून टिपूस कांहीं वेळपर्यंत घाटावर जावें लागलें, परंतु त्यानें तिकडच्या कारभाराकडे फार वेळ लक्ष्य दिलें नाहीं; आणि मुंबई इलाख्याचा इंग्लिश सरदार कर्नल माथ्यूस साहेब ह्यानें बेदनूर अनंतपूर वगैरे जीं ठाणीं घेतलीं होतीं तीं परत घेण्याकरितां टिपूनें स्वारी केली. त्यानें बेदनुरापुढें एकाएकीं येऊन त्यास वेढा घातला; आणि आंतील इं- इ० स०
ग्लिशांच्या लोकांस बाहेर जाण्याचा उपाय नाहीं, व दाणा- १७८३
पाणी नाहीं असें करून टाकिलें. तेव्हां जनरल माथ्यूस साहेबानें अभयपत्र लिहून घेऊन किल्ला स्वाधीन केला; प- एप्रिल
रंतु तो व त्याचे लोक आंतून बाहेर येतांच, त्यांनीं करार ता० ९
ठरल्यावर ठाण्यांतील खजीना लुटला अशी सबब लावून टिपूनें त्या सर्वांस महिसूरच्या किल्ल्यावर नेऊन बंदींत घातलें. तो जनरल कैदेंत असतां मारेकऱ्यांच्या हातून मरण पावला.

१७ पुढें फ्रेंच आणि इंग्लिश ह्यांच्या एक दोन लढाया

झाल्यावर युरोपांत उभयतांच्या राजांचा तह झाल्याचें वर्तमान ऐकून बुशी वगैरे फ्रेंच सरदार टिपूचा पक्ष सोडून गेले. दक्षिण प्रांतांत कर्नल फल्र्टन ह्यानें टिपूच्या लश्क-
इ० स० १७८४ राचा एक दोन वेळां पराजय केला; आणि त्यानें पुढें लढाई चालविलीच होती. परंतु मंगळुरास टिपूचा वेढा सुमारें एक वर्षपर्यंत होता; त्याचें रक्षण क्यांपबेल नामें साहेब ह्यानें फार शौर्यानें करून शेवटीं किल्ला स्वाधीन करण्याविषयीं बोलणें लाविलें. टिपूचेही त्या मोहिमेंत फार लोक जायां झाले होते, ह्मणून तो कंटाळला होता; त्यानें तें बोलणें कबूल करून इंग्लिशांच्या लोकांस शस्त्रें सरंजाम इ-
जानुआरी त्यादिकासुद्धां आवरूनें तालचेरीस जाऊं दिलें.

१८ ही गोष्ट घडल्यानंतर थोड्याच वेळानें टिपू आणि इंग्लिश ह्या उभयतांनीं लढाईंत घेतलेला मुलूक परस्परांस
मार्च ता० ११ परत द्यावा असें ठरून तह झाला.

१९ मद्रासचा गवर्नर लार्ड मकार्टनी साहेब शाहाणा आणि धिराचा मनुष्य होता. गवर्नरजनरल व जनरल कूट साहेब व विलायती सरकारच्या तर्फेचे सरदार हे त्याचे मसलतीनें *वागते तर इंग्लिशांची करनाटकांत इतकी अप्रतिष्ठा न होती. त्याच्या वेळीं अर्काटच्या नवाबाचा मुलूक

*गवर्नर जनरल साहेबांनीं लार्ड मकार्टनी ह्याशीं इतका विरोध आरंभिला कीं एकवेळ कंटाळून जनरल कूट साहेब परत बंगाल्यास गेला असतां, त्यानें मद्रासच्या गवर्नराचा हुकूम न मानितां लश्करचा अधिकार चालविण्याकरितां त्यास परत पाठविलें. तो शूर आणि अभिमानी जनरल मद्रासेस पोंचल्यावर तीन दिवसांनीं सन १७८४ च्या एप्रिल महिन्याचे २६ वे तारखेस मरण पावला.

सर्व कंपनीकडे लावून घेऊन त्यास त्याच्या वसुलापैकीं साहा-वा हिस्सा मात्र द्यावा असें ठरून नवाबाचा बखेडा मोडला.

## प्रकरण ९.

### हेस्तिंग्स साहेबाचे कारकिर्दीची समाप्ति.

इ० सन १७८० पासून सन १७८१ पर्यंत.

१ पार्लमेंटानें ठराविलेल्या नव्या सुप्रीम कोर्टाचा हुकूम कलकत्त्या बाहेर चालावा, असा जड्जांनीं आग्रह धरिल्या-वरून प्रथम त्यांचे व गवर्नरजनरल ह्याचें मोठें वितुष्ट पडलें. असें असतां त्यांतील मुख्य जड्ज सर इलैजा इंपी ह्यास हेस्तिंग्स साहेबानें नवें एक अपीलकोर्ट करून त्यांतील न्यायाधीशाचें काम दिलें, आणि वेतनाची नेमणूक मनस्वी ठरविली. अशा त्याच्या अविचारी करण्यानें विलायतेंतील अधिकाऱ्यांची उभयतांवर नाखुषी होऊन सर इलैजा इंपी ह्यास काम सोडून विलायतेस निघून येण्याचा व त्याची चौ-कशी करण्याचा हुकूम झाला.

२ वसुलाचा बंदोबस्त चांगला होण्याकरितां गवर्नरजन-रलांनीं कलकत्त्यांत रेविन्यूबोर्ड नामें मंडळी स्थापिली, व त्यांनीं मागील आकार पाहून मोठ्या तालुक्यांच्या जमिनदा-रांस कितीएक सालांचे मक्ते ठरावून द्यावे, आणि लहान रयत लोकांस दरवर्षीं पट्टे द्यावे, आणि ह्या कामाची वहिवाट त्यांनीं स्वतां पाहावी, अशी तजवीज केली.

३ कंपनीच्या खजिन्यांत त्या संधीस द्रव्याचा तोटा फा-

रच पडला, आणि लढाई तर **करनाटकांत** व **मराठ्यांच्या** मुलकांत चालली होती. तिच्या खर्चास द्रव्य उत्पन्न करण्याकरितां **हेस्तिंग्स साहेबानें** उपाय केले ते ह्याप्रमाणें.

४ **काशीचा चेतसिंग** हा कंपनी सरकारच्या आश्रयाखालीं होता; आणि तो कंपनीस सालीना ठरावाप्रमाणें सुमारें बेवीस लक्ष रूपये खंडणी देत असे. त्यानें त्या खंडणीशिवाय तीन पलटणांच्या खर्चाबद्दल पांच लक्ष रूपये द्यावे, असें **गवर्नरजनराल** ह्यांनीं मागणें केलें, तो ऐवज त्यानें मोठ्या संकटानें एकवेळ दिला. पुढें तोच ऐवज **इंग्लिश** दरसाल मागूं लागले, तो देण्यास आपणास सामर्थ्य नाहीं असें राजा ह्मणूं लागला. तोच त्यावर अपराध ठेवून त्यानें तो ऐवज देऊन अणखी दंड द्यावा असें ठरवून त्याच्या पारिपत्याकरितां **गवर्नरजनरल साहेब काशीस** गेला; तेथें त्यानें
इ० स० १७८१ राजास भेटीस येण्याची मनाई केली; आणि शेवटीं त्यास धरून कैद केलें. ते वेळीं **काशीचे** सर्व लोक **गवर्नरजनरलावर** उठले, आणि त्याजवळ कांहीं फौज नव्हती ह्मणून त्याच्या प्राणावर संकट येऊन पडलें. परंतु तो साहेब युक्तीनें **काशीहून चुनारगडास** निघून गेला.

५ इकडे राजाही कैदेंतून सुटून एके दिंडीचे वाटेनें गंगेवर जाऊन पलिकडे **रामनगरास** जाऊन पोहोंचला. तेथून त्यानें शरण जाण्याची पराकाष्ठा केली, परंतु **गवर्नरजनरल साहेबांनीं** त्याचें कांहीं बोलणें ऐकिलें नाहीं. पुढें कांहीं लढाई होऊन त्याचा पराजय झाला; त्याच्या लोकांची फाटाफूट झाली, आणि तो आपलीं बायकामुलें **विजयगडास** ठेवून

**बुंदेलखंडांत** निघून गेला. नंतर **विजयगड** हा किल्ला **इंग्लिशांनीं** घेतला. तेथें फारसें द्रव्य सांपडलें नाहीं. पुढें लवकरच **चेतसिंगास** राज्याचा संबंध नाहीं असें ठरवून मागील राजा **बळवंत सिंग** ह्याचे मुलीच्या पुत्रास गादीवर बसवून त्यानें चाळीस लक्ष रुपये खंडणी देत जावी, आणि त्याच्या संस्थानांतील रयतेचा इनसाफ कंपनीच्या कामदारांनीं पाहावा, असा ठराव **गवर्नरजनरालांनीं** केला. (इ० सन १७८१).

६ **अयोध्येच्या** नवाबानें कितीएक प्रसंगीं **इंग्लिशांस** द्रव्य देण्याचें कबूल केलें होतें, त्याचा उल्लेख वर आलाच आहे. हें देणें शेवटीं सुमारें दीड कोटी रुपये तुंबलें, तें फेडण्यास त्याजवळ पैका जमेना, कारण **इंग्लिशांची** बहुत फौज त्यास बाळगावी लागत होती, ह्मणून तिच्या खर्चाखालीं तो हैराण होऊन गेला होता. अशा संधींत आपल्या दोन्ही वृद्ध आयांजवळून द्रव्य काढावें, आणि त्यांच्या जहागिरी घ्याव्या ही त्यास बुद्धि सुचली; आणि तेणेंकरून जो पैका उत्पन्न होईल तो कंपनीस दिल्यास पुढें फौजेची नेमणूक कमी करण्यांत येईल असें **गवर्नरजनरल** ह्यानें त्यास आश्वासन देऊन त्या कामांत कुमक केली, व त्या **बेगमांची** जहागीर काढून घेतली, त्या राहात होत्या तो वाडा वेढिला, व त्यांच्या माणसांस धरून त्यांचे फार हाल केले. ह्या उपायांनीं सुमारें पन्नास लक्ष रुपये कंपनीच्या खजिन्यांत जमा झाले. हें कृत्य करण्यास सबब इतकीच लाविली कीं **चेतसिंगाच्या** बंडांत **बेगम्या** सामील होत्या. परंतु ही सबब ख- इ० स० १७८१

री ह्याचा कांहीं पुरावा नाहीं; आणि द्रव्य जमविण्यासाठीं जशीं ह्या **गवर्नरजनरलानें** इतर कितीएक अयोग्य कृत्यें केलीं, त्याप्रमाणेंच ह्या वयातीत **राण्यांस** भिकेस लावण्याच्या उद्योगांत त्यानें मन घातलें, असें ह्मणणें प्राप्त येतें.

इ० स० १७८२ ७ **हेस्तिंग्स साहेबावर** लांच घेतल्याचे आरोप आले होते, हें वर्तमान पूर्वीं लिहिलें आहे. त्याशिवाय त्यानें तशा अयोग्य प्रकारें आणखी पुष्कळ द्रव्य मिळविलें, असा बोभाट सर्वत्र झाला. वरच्या कलमांत लिहिलेल्या उपकाराकरितां **अयोध्येच्या** नवाबानें त्यास दहा लक्ष रुपये नजराणा दिला, तो त्यानें घेतला; परंतु ती गोष्ट **कोर्ट आफ् डरेकटर्स** ह्यांस जाहीर केली. त्यानें कंपनीच्या फायद्यासाठीं जे **काशीच्या** राजावर वगैरे जुलूम केले ते **कोर्ट आफ् डरेकटर्स** ह्यांस आवडले नाहींत, ह्मणून त्यांनीं त्यास ठपके लिहून त्याचीं करणीं फिरविण्याविषयीं हुकूम पाठविले. शेवटीं तो इ० संन १७८५ च्या फेब्रुआरी महिन्याचे ८ वे तारखेस काम सोडून विलायतेस जाण्याकरितां जहाजांत बसला.

८ वर **हेस्तिंग्स साहेबाची** कारकीर्द लिहिली, ती वाचतांना ध्यानांत येईल, कीं कंपनीची जमा वाढवावी ह्या गोष्टीवर लक्ष्य ठेवून त्यानें बहुत ठिकाणीं थोड्या कारणांवरून राज्यांच्या मोठमोठ्या घडामोडी केल्या, त्यांमध्यें खरें खोटें विशेष पाहिलें नाहीं; आणि त्यास मसलत सांगणारे जे होते त्यांचेंही ऐकिलें नाहीं. ह्या करण्यांत सत्यशीलता दया इत्यादि जे आपल्या लोकांचे गुण ते सोडून **हिंदुस्थानांतील** वगैरे अविचारी आणि लोभी जे राजे त्यांच्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

चालीस तो कांहींसा अनुसरला असें दिसतें. पुढें त्यावर एकवीस कलमांची फिर्याद पडून त्याचे वर्तणुकेची चौकशी **पार्लमेंटसभेंत** झाली. तेव्हां मोठमोठे वक्ते व कितीएक मुत्सद्दी ह्यांनीं त्यावर अपराध लागू करण्याचा अभिमान धरिला होता. परंतु **हेस्तिंग्स साहेब** ह्यानें कसें झालें तरीं संकटसमयीं आणि युद्धप्रसंगीं **इंग्लिशांचें** नांव राखिलें, आणि त्याच्या आंगीं समयास मसलत सुचणें, धैर्य, लोकरंजन, इत्यादि गुण होते, ह्यामुळें, आणि मोठ्या आबरूनें वागलेल्या मनुष्यास संकट प्राप्त झालेलें पाहून कोणासही दया येती, ह्यामुळें बहुत लोकांनीं त्याचा पक्ष स्वीकारिला. ती चौकशी **पार्लमेंटामध्यें** सात वर्षेंपर्यंत होऊन शेवटीं सगळे कंटाळले; आणि **लार्ड** ह्यांचे सभेंत बहुसंमतानें त्यावर गुन्हा नाहीं असें ठरलें. परंतु त्या वेळीं पंचवीस तीस मंडळी मात्र हाजीर होती; ह्यावरून पाहतां तो निरपराधी अशी **पार्लमेंटाची** खातरी झाली असें केवळ नाहीं; परंतु त्यावर गुन्ह्याची पुरी शाबिती नसतां त्यानें अपमान, चिंता इत्यादिक हीं बहुत दिवसपर्यंत अनुभविलीं, अणखी त्याच्या नावास अक्षय लांछन लागण्याविषयीं आपण कारण न व्हावें, अशा समजुतीनें **पार्लमेंटांतील** मंडळीनें अलक्ष्य करून त्यास मुक्त केलें असें दिसतें.

---

# प्रकरण १०.

## लार्ड कार्नवालिस ह्याची कारकीर्द, टिपूशीं पहिली लढाई.

इ० सन १७८६ पासून सन १७९२ पर्यंत.

१ सन १७८४ मध्यें **इंग्लंडांत पिट्ट साहेब** मुख्य प्रधान असतां कंपनीच्या कारभाराविषयीं **पार्लमेंटांत** विचार होऊन नवा बंदोबस्त झाला. त्यांत एथें लिहावयाजोगी विशेष गोष्ट हीच आहे, कीं **हिंदुस्थानांतील** व्यवस्था व कंपनीच्या कारभाऱ्यांची वर्तणूक ह्यांची चौकशी राखण्याकरितां राजाच्या तर्फेनें "**बोर्ड आफ् कंत्रोल**" नामें साहा असामींच्या मंडळीची नेमणूक झाली. त्या **बोर्डांत** प्रधानांपैकीं दोन असावे, त्यांतून एक **प्रेसिडेंट** ह्मणजे मुख्य असावा; कोणत्याही मोठ्या कारभाराविषयींचा हुकूम **बोर्डाच्या** रुकाराशिवाय **डरेकटर्स** ह्यांनीं पाठवूं नये; **बोर्डास** योग्य दिसेल तेव्हां त्यांनीं कंपनीचीं दफ्तरें पाहावयास आणवावीं; आणि त्यांनीं ठरविल्याप्रमाणें **डरेकटर्स** हुकूम न लिहितील, तर त्यांनीं त्या **डरेकटर्सांची** "**सीक्रेट कमिटी**" ह्मणजे गुप्त मसलतीची मंडळी, हिचे तर्फेनें तो लिहवून पाठवावा असें ठरलें. कंपनीनें द्वीपांतरीं घेतलेल्या मुलकाशीं राजाचा संबंध नाहीं, असा जो कंपनीनें वाद केला होता, तो रद्द होऊन ह्या वेळीं त्या गोष्टीचा निर्णय झाला. तेव्हांपासून आजपर्यंत **हिंदुस्थानचें** राज्य इंग्लिश बादशाहाच्या

अमलाखालीं असल्याप्रमाणेंच आहे; इतकें मात्र उणें कीं कंपनीनें तें मिळविलें ह्मणून बादशाही सरकार अजून कंपनीच्या हातून कारभार घेतें.

२ **हेस्तिंग्स साहेब कलकत्त्याहून** निघून गेल्यावर **मा- इ० स०**
**क्फर्सन साहेब** कांहीं दिवस **गवर्नरजनरलाचें** काम पा- १७८५
हत होता. मग त्या अधिकारावर **लार्ड कार्नवालिस**
ह्याची नेमणूक झाली. तो **कलकत्त्यास** आल्यावर त्याज- इ० स०
वळ **अयोध्येच्या** नवाबानें आपलें गाऱ्हाणें सांगितल्यावरून १७८६
त्याच्या लक्ष्यांत आलें कीं नवाबाकडून सुमारें चवऱ्यांयशीं लक्ष रुपये दर वर्षास **इंग्लिशांस** पोहोंचतात, हा ऐवज ज्यास्त आहे, असें ठरवून पुढें दर वर्षास पन्नास लक्ष रुपये व त्याच्या मुलकांत जी **इंग्लिशांकडची** फौज राहील तितके फौजेचा खर्च नवाबानें द्यावा, आणि त्याबद्दल **इंग्लिशांनीं** परचक्रापासून त्याचें रक्षण करावें; परंतु त्याच्या राज्याचा कारभार त्यानेंच पाहावा, असा **गवर्नरजनरल साहेबांनीं**
ठराव केला. पुढें **हैदराबादच्या निजामाचा** भाऊ **बसा- इ० स०**
**लतजंग** ह्याची जहागीर, **गंटूर** प्रांत, हा तो मेल्यामुळें पूर्वी- १७८८
च्या कराराप्रमाणें इंग्लिशांनीं मागितल्यावर **निजामानें** त्यांस दिला. पुढें **टिपूनें इंग्लिशांशीं** विरोध आरंभून, त्यांचा स्नेही **त्रावणकोर** एथील राजा ह्यावर हल्ला केला; परंतु
तो सिद्धीस गेला नाहीं. पुढील वर्षीं **कोइमत्तूरच्या** वा- इ० स० १७८९
जूनें जनरल **मेडोस साहेब मद्रासच्या** लश्करासहित जा-
ऊन टिपूच्या मुलकांत शिरला; आणि **मुंबईचा गवर्नर** इ० स०
**आबर्क्रांबी साहेब** ह्यानें समुद्रकांठीं लढाई चालवून दोन्ही १७९०

लश्करांच्यामध्यें वाट मोकळी केली. **टिपूनें गजलघट्टी** घाटानें खालीं उतरून **इंग्लिश** सैन्याच्या एक दोन मोठ्या टोळ्यांवर छापा घालण्याची तजवीज केली, परंतु ती न साधतां **इंग्लिश** सरदार मोठ्या लश्करास जाऊन मिळाले. ह्याप्रमाणें त्या वर्षांत युद्धाचा आकार बराच पडूनही लिहावयाजोगी मोठी लढाई झाली नाहीं.

४ **टिपूचें** सामर्थ्य उत्तरोत्तर वाढत चाललें, त्याचा मोड एकट्या आपणाकडून होत नाहीं असें पाहून **गवर्नरजनरल**
इ० स० १७९० ह्यांनीं **निजाम** व **पुण्याचें** दरबार ह्यांशीं नवा तह केला. त्यांतील अभिप्राय असा कीं त्रिवर्गांनीं झटून युद्ध करून **टिपू** हीनबल करावा; सर्वांचे सल्ल्यावांचून एकानेंच तह करूं नये; व **निजाम** आणि **मराठे** ह्यांपासून **टिपूनें** घेतलेल्या मुलकापैकीं जो हस्तगत होईल, तो लढाईचे अखेरीस ज्याचा त्यास परत देऊन बाकी जो मिळेल तो सारखा वांटून घ्यावा.

५ ह्याप्रमाणें करार ठरल्यावर **लार्ड कार्नवालिस साहेब मद्रासेस** गेले, आणि सैन्याची सरदारी आपण जातीनें
इ० स० १७९१ घेऊन एकाएकीं **बंगळूराजवळ** जाऊन छावणी घातली. दुसरे दिवशीं **मेजर फ्लॉयड** ह्याच्या व **टिपूच्या** स्वारांची एकाएकीं गांठ पडून लढाई झाली, तींत तो **मेजर** पडल्यामुळें लश्करांत कांहीं धांदल झाली, परंतु पायदळाचे लोक संरक्षणास आल्यामुळें फार नाश न होतां तें लश्कर परत गेलें. पुढें थोड्या दिवसांनीं **लार्ड कार्नवालिस साहेबांनीं**
ता० २१ माहे मार्च सन १७९१ एकाएकीं हल्ला करून **बंगळूर** घेतलें; त्यांत **टिपूच्या** लोकांनीं मर्दपणा फार केला, आणि त्या लोकांपैकीं सुमारें हजार

मरून पडले. ह्याप्रमाणें जय झाला, आणि पुढें **लार्ड कार्नवालिस साहेबांनीं श्रीरंगपट्टणावर** चाल केली; त्या वेळीं **टिपू** किल्ल्यांत जाऊन राहिला. परंतु दाणा व सामान ह्यांचा फार तोटा पडला; ओझ्याचीं जनावरें हैराण होऊन त्यांचीं केवळ हाडें राहिलीं; आणि **निजामानें** फौज पाठविली तिचा कांहीं उपयोग दिसेना; ह्या कारणांवरून **लार्ड कार्नवालिस साहेबास श्रीरंगपट्टणाहून** परत जावें लागलें. पुढें वाटेनें **पुण्याच्या** दरबाराकडून **हरीपंत फडके** येऊन दाणा वैरणीचा व जनावरांचा पुरावा झाला; परंतु पर्जन्यकाळ समीप आला असें पाहून **लार्ड कार्नवालिस साहेब बंगलुरास** जाऊन छावणी करून राहिले.

६ पर्जन्यकाळ संपला नाहीं तोंच **इंग्लिश** फौजेनें जा- इ॰स॰ १७९१
ऊन **नंदिदुर्ग** किल्ला घेतला. **स्त्युअर्ट साहेबानें** मोठा बळकट **सावनदुर्ग** नामें डोंगरी किल्ला हस्तगत केला; आणि दुसरेही **उत्तरदुर्ग** वगैरे कितीएक मजबूद पाहाडी किल्ले **इंग्लिश** फौजेनें जिंकून घेतले. ह्याच वर्षांत **निजामाचे** फौजेनें **गंजिकोट** व **कोपाळ** हे दोन्ही किल्ले जिंकून घेतले. **परशुराम भाऊ पटवर्धन** ह्यांनीं **चित्रकल्लदुर्ग** घेण्याविषयीं प्रयत्न केला तो चालला नाहीं. त्यांचे मदतीस कपतान **लिटल साहेब** पाठविला होता, त्यानें सातशें लोकांनिशीं **हुळेहोनूर** घेतलें, आणि **तुंगभद्रेच्या** कांठीं **शिवमोग्याजवळ** मोठ्या अडचणीच्या जागीं शत्रूंचे १०००० लोक पिटून लाविले. पुढें तो किल्ला सहज हस्तगत झाला. परंतु **मराठ्यांचें** लक्ष्य मुलूक लुटण्यावर फार होतें, ह्मणून **कोंकणा-**

तून **मुंबई** इलाख्याची फौज येत होती तिला **परशुराम भाऊ**कडून कुमक पोहोंचली नाहीं, ह्यामुळें ती **सदाशिवगडा**च्या घाटावर तशीच राहिली; आणि इकडे **टिपूचा** सरदार **कमरुद्दीनखान** ह्यानें **कोइमत्तूर** ह्यास वेढा दिला; व **मेजर कपेज** नामें सरदार त्या गांवास कुमक घेऊन येत होता त्यास माघारा फिरवून **कोइमत्तूर** एथें अन्नाचा तोटा पाडून तें घेतलें. तेथील किल्लेकऱ्यांस **खान** ह्यानें करारा-प्रमाणें जाऊं दिलें नाहीं, परंतु कैद करून **श्रीरंगपट्टणास** रवाना केलें.

इ० स० १७९२ जानुआरी ७ जानुआरी महिन्यांत **लार्ड कार्नवालिस साहेबाचें** लश्कर **उत्तरदुर्ग** एथें असतां **हैदराबादचें** लश्कर येऊन पोहोंचलें. मग थोडे दिवसपर्यंत लढाईची सर्व सिद्धता करून फेब्रुआरी महिन्याचे १ ले तारखेस तेथून लश्कराचें कूच फेब्रुआरी होऊन ५ वे तारखेस **श्रीरंगपट्टणाच्या** आलिकडे तीन कोसांवर तें येऊन उतरलें; तंव **टिपूनें**ही आपलें सैन्य युद्धास सिद्ध करून किल्ल्याच्या आश्रयाखालीं **कावेरीचे** आलिकडे डेरे दिले आहेत असें त्याचे दृष्टीस पडलें.

८ दुसरे दिवशीं ह्मणजे ६ वे तारखेस चांदण्याच्या रात्रीं आठ वाजतां **इंग्लिशांचें** लश्कर निघालें. ह्यांत गोरे लोकांच्या पलटणी साहा व काळ्या लोकांच्या दाहा होत्या. ह्या सैन्याच्या तीन टोळ्या केल्या होत्या. एके टोळीवर **कार्नवालिस साहेब** खुद्द सरदार होता; दुसऱ्या दोहों टोळ्यांवर **जनरल मेडोस साहेब** व **कर्नल माक्सवेल साहेब** हे होते. **टिपूच्या** लश्करांत सुमारें ५००० स्वार

[stamp]



व ५०,००० पायदळ, व किल्ल्यावरच्यांसुद्धां ४०० तोफा इतका सरंजाम होता. इंग्लिशांकडून इतका लवकर आणि रात्रीस आपणावर हल्ला होईल हें टिपूच्या ध्यानांत नव्हतें, ह्मणून त्या प्रसंगीं तो व त्याची फौज चकित झाली; आणि तोफखान्यावांचून फार थोडें सैन्य घेऊन गवर्नरजनरल आपण शत्रूंच्या किल्ल्यावर स्वतां गेला हा निजामाच्या व मराठ्यांच्या सरदारांस वेडेपणा वाटला. अकरा वाजावयावच्या सुमारें दोनही लश्करांची भेट झाली; तंव टिपू नुकता जेवून उठला होता. त्यानें इंग्लिशांची फौज नदीकडे नीट चालली असें पाहून आणि एक वेळ ते बेटांत पोहोंचले असतां ते आपलें तेथें जाणें होऊं देणार नाहींत, हें भय मानून तो मोठ्या जलदीनें आपली जागा सोडून नदी उतरून पलिकडे किल्ल्याच्या रक्षणास गेला. त्याबरोबरच इंग्लिशांच्याही कितीएक टोळ्या उतरल्या, आणि त्यांनीं टिपूचे नाक्यावरचे एक दोन बुरूज हस्तगत करून बाकीच्या लश्करास नदी उतरण्याविषयीं फार संकट पडूं दिलें नाहीं. इकडे कार्नवालिस साहेब व मेडोस साहेब हे नदीच्या आलिकडील कठीण जागा व करेघाट ह्मणून टेंकडी होती ती हस्तगत करून सूर्योदयाच्यापूर्वी फौजेसुद्धां नदी उतरले; आणि किल्ल्याच्या तटाखालीं सर्वांचा जमाव झाला. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळपर्यंत टिपूनें इंग्लिशांस बेटांतून काढण्याविषयीं कितीएक वेळ एलगार केला, परंतु चालला नाहीं. नंतर किल्ल्यावरच्या तोफा बंद झाल्या.

९ ह्या लढाईंत इंग्लिशांचे लोक मेलेले व जखमी मि-

ळून ५३५ पडले, व **टिपूचे** सुमारें ४००० रांवर पडले, आणि **कुर्ग** एथील दाहा हजार लोक **टिपूनें** जबरीनें आणिले होते ते व आणखी बहुत लोक त्या रात्रीं पळून गेले ते परत आलेच नाहींत.

१० पुढें **श्रीरंगपट्टणास** बहुतकरून वेढा पडल्याप्रमाणें होऊन आंतील किल्लेकरी **इंग्लिशांस** हटवून देण्यास नित्य थोडथोडा यत्न करीत. असें असतां एकवेळ **टिपूचे** कांहीं स्वार **इंग्लिशांच्या** लश्करांत आले ते **निजामाचे** स्वार असें समजून कोणी त्यांस मनाई न करितां ते नीट बडे साहेबाचा डेरा विचारीत चालले. परंतु तोफखान्याच्या साहेबाचे डेऱ्याजवळ येतांच त्यांनीं घोडे भरधांव टाकिले, व तरवारी उपसल्या; असें पाहून शिपाई जवळ होते त्यांनीं बंदुका झाडल्या, तेव्हां ते मागें फिरून निसटून परत गेले. ह्या गोष्टीनें उभयपक्षीं दहशत पडली, परंतु कांहीं दिवसपर्यंत मोठी लढाई झाली नाहीं. इतक्यांत **मुंबई** इलाख्याचें **आबर्क्रांबी साहेबाचें** लश्कर पश्चिमेकडून येऊन पोहोंचलें, तेणेंकरून दोन हजार लोक ज्यास्त झाले; मागाहून **परशुरामभाऊ पटवर्धनही** आपल्या सैन्यानिशीं आला; खजिन्यांत पैक्याचा भरणा चांगला होता, व दाणा वैरणीचा सुकाळ होता; ह्मणून वेढ्याचें काम हुशारीनें चाललें होतें. इतक्यांत २४ वे तारखेस **टिपूनें** तह करण्याचे कबूलातीवर सही केली, आणि

स० १७९२ मार्च ता० १९ पुढें तह ठरेल त्याप्रमाणें वर्तणुकीचे खातरीकरितां आपले दोन मुलगे ओलीस पाठवून दिले. असा युद्धाचा उद्योग बंद झाल्यावर सुमारें एका महिन्यानें तहनाम्यावर सह्या पडल्या.

११ त्यांत कुर्गचा राजा जो टिपूनें मागें बंदीस घातला होता त्यास त्याचा मुलूक परत द्यावा; त्रावणकोरचा राजा आणि दुसरे पश्चिम समुद्रकांठचे नायर राजे ह्यांस उपद्रव करूं नये; लढाईच्या खर्चाबद्दल तीनकोटि तीस लक्ष रुपये द्यावे; आणि आपल्या राज्यापैकीं निमें राज्य त्रिवर्ग सरकारांस द्यावें ह्याप्रमाणें मुख्य कलमें होतीं. टिपूकडून मुलूक मिळाला त्यापैकीं तुंगभद्रेचे उत्तरेकडील सर्व मराठ्यांस दिला; गंजकोट व कडपा हे प्रांत निजामास दिले; व बारामहाल व दिंडिगल्लु प्रांत आणि घाटाखालचे मलबार व कोंकण इतकें इंग्लिशांनीं घेतलें.

१२ फौजेला संतोष व्हावा ह्मणून गवर्नरजनरल साहेबांनीं टिपूकडून आलेल्या द्रव्यांतून सर्व लोकांस साहा महिन्यांचा भत्ता ज्यास्ती दिला; आणि लूट सांपडली तिजपैकीं ते व जनरल मेडोस ह्या उभयतांनीं आपले वांटे फौजेस दिले. ह्याप्रमाणें लढाई संपल्यानंतर निजामाचे सरदार व हरिपंत फडके आणि परशुरामभाऊ ह्यांस निरोप देऊन गवर्नरजनरल साहेब परत गेले.

१३ लार्ड कार्नवालिस साहेब ह्यांनीं अर्काटच्या नवाबाचा नवा बंदोबस्त केला. त्यांत त्यानें नऊ लक्ष वराई दरसाल खंडणी द्यावी; सावकारांच्या कर्जाबद्दल ६२१२०५ वराई द्यावे; लढाईचे वेळेस वसुलाचे चार पंचमांश द्यावे; लढाई चालू असतां साऱ्या मुलकाची वहिवाट इंग्लिशांकडे असावी; आणि खंडणी न आल्यास तितक्या वसुलाच्या प्रांताची जप्ती व्हावी असा ठराव केला.

इ० स० १७९३ १४ ह्या संधीस **फ्रान्स** देशांतील रयतेनें दंगा करून आपल्या राजास मारून त्या देशांत अंधाधुंदी केली. ती **इंग्लिशांस** न आवडल्यामुळें **फ्रेंचांबरोबर** कलह उत्पन्न झाला. ही संधी पाहून **फ्रेंचांचीं हिंदुस्थानांतील** सारीं ठाणीं **इंग्लिशांनीं** हस्तगत करून **फ्रेंचांस** हांकून लाविलें.

१५ ह्या **गवर्नरजनरल साहेबाचे** कारकिर्दीत **माहादजी शिंद्यानें प्रयागाचे** उत्तरे कडचा व पश्चिमेकडचा बहुतेक प्रांत हस्तगत केला; आणि **गुलामकादर** व **इस्मायल बेग** नामें कोणी मुसलमान सरदार ह्यांनीं **शाहाआलम** बादशाहास फार दुःख दिलें होतें, त्या उभयतांचा मोड करून बादशाह आपल्या कैदेंत ठेविला. त्यानें **फ्रेंच** लोक चाकरीस ठेवून कवाईत शिकलेलें पायदळ पुष्कळ तयार केलें; तोफा व इतर सरंजाम जमविण्याचें काम चालविलें; आणि सर्व संस्थानिकांपेक्षां आपण प्रबल झाला.

१६ **लार्ड कार्नवालिस साहेबांनीं** तालुक्यांच्या वसुलाच्या बेरजा कायम करून जमिनदार लोकांस प्रथम दहा वर्षांपर्यंत तालुके ठरावून दिले, आणि ठरावलेल्या बेरजांपेक्षां त्यांकडून सरकार कांहीं जास्त घेणार नाहीं असा करार केला. पुढें थोड्या दिवसांनंतर ही वहिवाट सतत अशीच चालेल असे जाहीरनामे लाविले, आणि नव्या शिस्तीप्रमाणें काम चालण्याकरितां कायदे प्रसिद्ध केले. त्या वर्षी ३०,२५,४,५६ रुपये वसूल आला. मिठाच्या मखल्याचा वसूल त्या वेळेस सुमारें चाळीस लक्ष रुपये होता; परंतु मिठाचें लिलांव करावें वगैरे कांहीं नवा बंदोबस्त केल्यामुळें

थोड्या वर्षांमध्यें एक कोटि पस्तीस लक्ष रुपये वसूल येऊं लागला. अफीणीचा मखता पूर्वींप्रमाणेंच कायम ठेविला; परंतु मालावर जागोजागीं कर घेण्यापासून वगैरे जें कांहीं सायर ह्या नावानें उत्पन्न होत असे तें सोडिलें.

१७ पूर्वीं वसुलाचे कामदार **कलेक्टर** ह्यांनींच इनसाफ करावा आणि मुलकी कोतवालीचा बंदोबस्त राखावा असें होतें. तो अधिकार आतां **जड्ज** ह्मणजे न्यायाधीश ह्यांजकडे देऊन सरकारानें प्रतिजिल्ह्यांत एकेक **कोर्ट** नेमिलें. त्यांत एक **जड्ज** व दफ्तर ठेवण्याकरितां एक **रेजिस्तर** नामें कामदार व त्यास मदतनीस, आणि शास्त्रार्थ सांगण्याकरितां **पंडित काजी** व **मुफती** हे नेमिले. पन्नास रुपयांच्या खालीं देण्याघेण्याच्या वगैरे फिर्यादींची चौकशी तोंडजबानीनें लवकर करण्याकरितां जिल्ह्यांत जागोजागीं काळ्या लोकांस अधिकार दिला. त्यांस सरकारांतून कांहीं पगार केला नाहीं, परंतु फिर्यादींपासून एक रुपयास एक आण्याप्रमाणें त्यांनीं दस्तुरी घ्यावी असें ठरविलें. ह्यांनीं केलेल्या फैसल्यांवर जिल्हाकोर्टांत **अपिलें** ह्मणजे वरिष्ट अधिकाऱ्यांकडे फिर्यादी व्हाव्या; त्यांच्या चौकशीचे वेळेस मालकांनीं आपला मतलब जातीनें बोलूं नये, तें काम वकिलांनीं करावें, आणि त्या वकिलांनीं वादिप्रतिवादींपासून आरंभीं सचकार व पुढें दस्तुरी अमुक घ्यावी ह्याविषयीं ठराव केला. त्या जिल्हा कोर्टांत जे ठराव होतील ते कायम; परंतु ते स्थावर मिळकतीबाबद असल्यास त्यांवर दुसरीं अपिलें चालण्याकरितां **कलकत्ता**, **ढाका**, **मुर्शिदाबाद** आणि **पाटणा**

ह्या चार ठिकाणीं अपीलकोर्टें नेमिलीं, त्या एकेक कोर्टांत तीन जड्ज व इतर कामदार नेमिले. त्यांवर अपील घेण्याकरितां गवर्नर व कौन्सिलाचे अधिकारी ह्यांस सदर दिवाणी अदालत असें नाव ठेवून त्या कोर्टास रेजिस्तर, काजी वगैरे कामदार नेमून दिले. अमुक ऐवजापेक्षां फिर्याद जास्त असल्यास अपिलें व्हावीं असा ठराव केला; आणि सदर दिवाणी अदालतीच्या फैसल्यांवर अपील करणें झाल्यास ५०,००० रुपयांपेक्षां दावा जास्त असेल तर विलायतेच्या राजाजवळ करावें असा तेथील सरकारानें कायदा केला. सर्व दिवाणी कज्यांचे फैसले ज्याच्या त्याच्या जातिधर्माप्रमाणें व्हावे असें ठरलें; परंतु कर्जदारांच्या दारीं धरणें बसणें, त्यांच्या डोक्यांवर दगड देणें वगैरे प्राचीन निर्दय संप्रदाय होते त्यांची मनाई झाली.

१८ फौजदारी प्रकरणांत जिल्ह्यांमध्यें व मोठ्या शहरांमध्यें जागोजाग दरोगा ह्या नावाचे लहान कामदार नेमिले; व अपराध्यांस चौकशी होण्याकरितां तुरुंगांत ठेवण्याचें काम माजिस्त्रेटाकडे दिलें. ह्या माजिस्त्रेटानें जे गुन्हेगार तुरुंगांत ठेविले असतील त्यांस शिक्षा करणें किंवा सोडून देणें ह्याजकरितां चार अपीलकोर्टांतून जड्जांनीं पाळीपाळीनें साऱ्या जिल्ह्यांत फिरावें; व तेथील गुन्हेगारांचा इनसाफ करून त्यांस शिक्षा करावी, असा कायदा केला. फांशीं देणें वगैरे शिक्षा करणें झाल्यास सदर निजामत अदालत ह्मणजे गवर्नर कौन्सिलाचे अधिकारी ह्यांचा रुकार आल्यावांचून तशी मोठी शिक्षा न करावी; आणि मुस-

लमानांच्या षराप्रमाणें ठेपा वगैरे द्याव्या, परंतु कोणाचे हात पाय वगैरे तोडूं नयेत, किंवा दुसऱ्या क्रूर शिक्षा करूं नयेत, असा बंदोबस्त केला.

१९ वर लिहिलेल्या जमाबंदीच्या बंदोबस्तापासून जमिनदारांस लागवडीचें अगत्य पडून ते आपल्या फायद्यावर लक्ष्य ठेवून रयतेचें कल्याण करितील अशी उमेद होती; परंतु पहिल्याप्रमाणें रयतेस तगादा करण्यास त्यांजवळ अखत्यार राहिला नाहीं, ह्मणून जसजसा सरकारचा वसूल थकूं लागला तसतशीं तालुक्यांचीं लिलांवें होऊन ते दुसऱ्यांच्या हातीं जाऊं लागले; ह्मणून ह्या बंदोबस्तानें रयतेचा फायदा नाहीं व जमिनदारांचाही नाहीं, असें झालें. इनसाफाची तजवीज केली तेणेंकरून पहिल्यापेक्षां व्यवस्था नीट झाली; परंतु इनसाफ करणारीं कोर्टें थोडीं व दूर दूर केलीं; आणि फार लोक फिर्यादी न यावे ह्याकरितां वकिलांचा खर्च, आणि छापील कागदांचा खर्च वादी प्रतिवादी ह्यांच्या आंगावर ठेविला, तेणेंकरून गरिबांची हकिकत खरी असली तरी दाद लागण्यास संकट पडूं लागलें.

## प्रकरण ११.

### सर जान शोर ऊर्फ लार्ड टेनमौथ ह्याची कारकीर्द, निजामाची व अयोध्येच्या नवाबाची हकिकत.

इ० संन १७९२ पासून संन १७९८ पर्यंत.

१ लार्ड कार्नवालिस साहेब विलायतेस गेल्यानंतर इ० स० १७९३

सर जान शोर नामें कामदार ह्यानें गवर्नरजनरलाचें काम चालवावें असें ठरलें. ह्या वर्षी कंपनीस हिंदुस्थान व चीन एथील व्यापाराचा मक्ता आणखी वीस वर्षेपर्यंत मिळाला; त्या सनदेंत इतर व्यापाऱ्यांस कंपनीनें दरवर्षी ३००० टन ह्मणजे १२०० खंडी माल हिंदुस्थानांत आणूं द्यावा व बोर्ड आफ् कंत्रोल ह्याच्या अधिकाऱ्यांस पगाराची नेमणूक असावी वगैरे विलायतेंतील बंदोबस्त कांहीं नवा ठरला. ह्याच वर्षी बंगाल्याचा नामधारी नवाब मुबारिक उद्दवला मरण पावला; त्याचे जागीं त्याचा वडील मुलगा अजीत उद्दवला अधिकारी झाला. टिपूसुलतान ह्याजकडून तहाप्रमाणें जें येणें तें सर्व आल्यावरून गवर्नरजनरल साहेबांनीं त्याचे मुलगे कलकत्त्याहून परत पाठविले; परंतु टिपू ह्यास पहिला अपमान फार वाटून जो साहेब ह्यांस घेऊन आला होता त्याची त्यानें भेट संतोषानें घेतली नाहीं.

२ नंतर मराठे व हैदराबाद एथील निजाम ह्यांचा परस्परांशीं चौथाईच्या प्रकरणीं कलह उत्पन्न झाला. पुढें लवकरच माहादजी शिंदा मरण पावला; आणि निजाम
इ० स० १७९४ व मराठे ह्या उभयतांचीं सैन्यें एकमेकांवर रवाना झालीं. त्यांची गांठ खरड्याजवळ पडून युद्ध झालें, त्यांत कोणाचा चढाव न होतां उभयतां आपापल्या जाग्यावर परत आले. परंतु रात्रीं मराठ्यांचा छापा येतो अशा खोट्या भयानें निजामाचें लश्कर आपली जागा सोडून अडचणींत जाऊन राहिलें, त्यास मराठ्यांनीं घेरा दिला. मग दौलतराव शिंद्यानें आपला तोफखाना त्यावर चालू करून दोन दिवस-

पर्यंत त्या लश्करास फार हैराण केलें. तेव्हां निजाम निरुपाय होऊन त्यानें मराठ्यांस तीन कोटि रुपये स्वारीखर्चाबद्दल द्यावे, व दवलताबादचा किल्ला वगैरे पस्तीस लक्ष रुपयांचा मुलूक द्यावा; व ह्याप्रमाणें वहिवाट होण्याचे खातरीकरितां आपला वजीर अजीमउल्उमराव हा ओलीस द्यावा ह्याप्रमाणें तह झाला.

३ खडर्याचे स्वारीचे वेळेस पेशव्यांचे गादीवर नारायणरावाचा मुलगा माधवराव नारायण ऊर्फ सवाई माधवराव हा होता; आणि थोरल्या माधवरावाच्या वेळेपासून कारभारांत वागणारा जो नानाफडनवीस तो मुख्य कारभारी होता. पुढें लवकरच सवाई माधवराव हा अपघात करून घेऊन मरण पावला; आणि रघुनाथरावाचा पुत्र आक्टोबर ता० २७ बाजीराव ह्यास एकीकडे ठेवून माधवरावाचे बायकोस दत्तक द्यावा हा आग्रह नानाफडनविसानें धरला. तें दवलतराव शिंद्यास न आवडल्यामुळें त्यानें पुण्यावर स्वारी करून बाजीरावास गादीवर बसविलें. नंतर तो व परशुरामभाऊ पटवर्धन ह्यांनीं निजामाशीं सख्य करण्याकरितां खडर्याच्या तहाप्रमाणें जें त्याजकडून येणें होतें तें सोडिलें, व अजीमउल्उमराव ह्यास परत पाठविलें. पुढें लवकरच नानाफडनवीस कारभारांतून निघाला, नंतर त्यानें निजामाशीं उलट तह ठरविला. निजामानें नानास कुमक करण्याचें कबूल केलें, परंतु त्याप्रमाणें कांहीं घडण्यांत आलें नाहीं.

४ निजाम व मराठे ह्या उभयतांशीं आपला स्नेह आहे इ० स० १७९४

सबब त्यांच्या परस्पर कलहामध्यें आपणास पडण्याचें कारण नाहीं, असा विचार करून निजामाचे चाकरीस जीं इंग्लिशांचीं दोन पलटणें होतीं, तीं खर्ड्याचे स्वारींत त्याबरोबर गेलीं नाहींत. हें त्या निजामास वाईट वाटून त्यांनीं इंग्लिश पलटणांस रजा दिली, आणि रेमोंड नामें कोणी फ्रेंच सरदार चाकरीस ठेवून त्याजकरवीं बरीच फ्रेंच फौज व तोफखाना तयार करविला. पुढें त्याचा मुलगा अलीजा ह्याचें व आगखी दुसरें एक बंड झालें; तेव्हां त्यानें इंग्लिशांचीं पलटणें परत बोलाविलीं. त्यांनीं रायचूर वगैरे घेण्यांत पराक्रम करून दाखविला. तथापि निजामाच्या दरबारांत फ्रेंच लोकांचें वर्चस्व पहिल्याप्रमाणेंच होतें; तें पुढें लवकरच रेमोंड हा मरण पावल्यामुळें कमी झालें; आणि निजामानें पहिल्या दोन पलटणींखेरीज आणखी चार इंग्लिशांच्या पलटणी चाकरीस ठेवून व त्यांच्या खर्चास दरमहा दोन लक्ष रुपये देण्याचें कबूल करून फ्रेंच फौजेस व सरदारांस रजा दिली. त्यांस कांहीं उपद्रव न करितां गवर्नरजनरल ह्यांनीं स्वदेशास रवाना केलें.

९ रोहिल्यांचा सरदार फैझुल्लाखान मरण पावला; त्याच्या जाग्यावर त्याचा वडील पुत्र महंमदअल्ली हा बसावा, परंतु धाकटा मुलगा जो गुलाममहंमद ह्यानें आपल्या भावास मारून सरदारी बळकावून घेतली; हें इंग्लिशांच्या मनास आलें नाहीं, ह्मणून रोहिल्यांशीं त्यांनीं लढाई करून त्यांचा पराजय केला. फैझुल्लाखान ह्याचें सर्व द्रव्य इंग्लिशांनीं अयोध्येच्या नवाबास दिलें, आणि महंमदअल्लीच्या

मुलास जाहागीर दिली. पुढें नवाबाच्या दवलतीची व्यवस्था करण्याकरितां **गवर्नरजनरल साहेब लखनौस** गेले. तेथें त्यांनीं नवाबाकडून स्वारांची एक गोरी व एक काळी पलटण ह्यांच्या खर्चाबद्दल साडेपांच लक्ष रुपये देण्याचें कबूल करविलें, व **जिवलाल** नामें कारभारी होता त्याचें काम काढून **तफझल हुसेन खान** ह्यास दिलें. नंतर लवकरच नवाब **असफउद्दवला** मरण पावला; आणि त्याचा मुलगा **वजीरअल्ली** हा **गवर्नरजनरल** ह्यांच्या सल्यानें गादीवर बसला, परंतु त्या करण्यानें दरबारांतील मंडळी नाखुष झाली; आणि **वजीरअल्ली** हा अस्सल मुलगा नव्हे असा बोभाट झाल्यावरून **गवर्नरजनरल साहेबांनीं लखनौस** जाऊन चौकशी केली, मग त्याला गादीवरून काढून **असफउद्दवला** ह्याचा भाऊ **सादत अल्ली** ह्यास अधिकार दिला. ह्या मदतीकरितां त्यानें कंपनी सरकारास बारा लक्ष रुपये द्यावे; आणि **वजीरअल्ली** ह्यास सालीना दीड लक्ष रुपये, व **असफउद्दवला** ह्याच्या बाकीच्यां मुलांस चरितार्था पुरत्या नेमणुका करून द्याव्या असें ठरलें. आणखी **इंग्लिशांची** दहा हजार फौज त्याचे चाकरीस असावी; ती तेरा हजारांपेक्षां कोणे वेळीं अधिक झाल्यास त्यानें खंडणी ज्यास्त द्यावी; आठ हजारांपेक्षां कमी झाल्यास खंडणींतून तितक्या हिशोबानें ऐवज मजुरां द्यावा, असा करार झाला. ह्याशिवाय पर राज्यांशीं संबंध ठेवूं नये, व **युरोपियन** लोक चाकरीस ठेवूं नयेत असें **वजीर** ह्यानें कबूल केलें.

इ० स० १७९७

इ० स० १७९८ जानुआरी ता० २१

६ टिपूचे लढाईचे वेळेस **जनरल मेडोस साहेब** म-

द्रास एथें गवर्नर होता. त्याच्या मागून दोन वर्षेपर्यंत सर चार्लस ओक्ली हा कामावर होता. संन १७९४ वांत लार्ड होबर्ट नामें सरदार त्या अधिकारावर आला. संन १७९५ च्या अक्टोबर महिन्याचे १३ वे तारखेस अर्काट-चा नवाब महंमदअल्ली वलाजाह आपल्या वयाच्या अठ्या-हत्तराव्या वर्षी मरण पावला. त्याच्या ठिकाणीं त्याचा वडील मुलगा उमरतउल्उमराव हा गादीवर बसला. त्या-वेळीं त्याच्या मुलकाची अव्यवस्था बंद होई असा कांहीं बंदो-बस्त करावा असें लार्ड होबर्ट मद्रासचा गवर्नर ह्याच्या मनांत होतें; परंतु नवाबाचे कर्जदार इंग्रेज लोक विलायत-पर्यंत फार होते, ह्यामुळें, व तो बेत गवर्नरजनरल ह्याच्या मनास आला नाहीं ह्यामुळें, कांहीं नवा बंदोबस्त करण्यांत आला नाहीं.

७ संन १७९५ वा मध्यें इंग्लिश बादशाहाचे तर्फेचा आड्मरल ह्मणजे आरमारांचा सरदार रेनी साहेब ह्यानें डच लोकांचीं कोची वगैरे हिंदुस्थानांतील ठाणीं आणि सिंहलद्वीप, मलाका, बांडा, आंबोयना वगैरे बाहेरच्या जागा सर्व घेतल्या; आणि केप आफ् गुड्होप ही त्यांची नाक्याची जागा ती त्याच वर्षी इंग्लिशांच्या हस्तगत झाली. पुढें संन १७९७ वांत फ्रेंच व स्पेनकरी लोकांचीं बेटें घेण्यास लश्कराची तयारी होत होती, इतक्यांत युरोपामध्यें ह्या सर्व सरकारांचा तह झाल्याचें वर्तमान आलें.

८ पुढें लवकरच मद्रास एथील गवर्नर व गवर्नरजनरल हे उभयतां निघून आपल्या विलायतेस गेले. मद्रा-

सच्या अधिकारावर लार्ड क्लैव आला; आणि गवर्नरजन- इ० स० १७९८
रल हें पद लार्ड मार्निंग्टन ऊर्फ मार्किस वेल्सली ह्यास प्राप्त झालें.

## प्रकरण १२.

### लार्ड मार्निंग्टन ऊर्फ मार्किस आफ् वेल्सली ह्यांची कारकीर्द, टिपूशीं दुसरी लढाई आणि टिपूच्या राज्याची समाप्ति.

इ० संन १७९७ पासून संन १७९९ पर्यंत.

१ लार्ड मार्निंग्टन साहेब कलकत्त्यास येऊन दा- इ० स० १७९९ ता० १७ मे
खल झाल्यावर लवकरच टिपूविषयीं त्यांच्या मनांत संशय उत्पन झाला. पुढें मोरिशस बेटाच्या फ्रेंच सुभेदारानें लावलेल्या एका जाहिरनाम्याची नक्कल त्यांस मिळाली. तींत मजकूर असा होता कीं, टिपूसुलतान ह्याजकडून इंग्लिशांस हिंदुस्थानांतून घालविण्याच्या कामाविषयीं बोलण्याकरितां दोन वकील बेटांत आल्यावरून सुलतान ह्याचे चाकरीस राहण्यास रयतेस परवानगी असे. हा जाहिरनामा व टिपूनें इतर राजांस लिहिलेले आणखी कांहीं कागदपत्र गवर्नरजनरल ह्यांच्या हातीं आल्यावर त्यांनीं त्याशीं युद्धाचे तयारीचा हुकूम केला. मागाहून आपणही मद्रासेस गेले. जनरल हारिस साहेब ह्यास करनाटकांतील फौजेवर सरदार नेमिलें; आणि जनरल स्तुअर्ट साहेब ह्यास मुंबईचे फौजेचा मुख्य अधिकार देऊन त्यानें श्रीरंगपट्टणाजवळ

येऊन **हारिस साहेबास** मिळावें अशी तजवीज केली. ती फक्त **करनाटकांतील** फौज व **निजामाकडून** कुमकेस आलेलें लश्कर मिळून तीस हजारांवर सैन्य जमलें. आणि
इ० स० त्या सैन्याचे तयारीवरून व सरदारांच्या कौशल्यावरून चां-
१७९९ गली उमेद वाढूं लागली.

२ मार्च महिन्याच्या आरंभीं **हारिस साहेबाचे** फौजेनें
मार्च **वेलुराचे** बाजूकडून येऊन कितीएक डोंगरी किल्ले घेतले. त्या महिन्याचे ६ वे तारखेस सकाळीं **मुंबईची** फौज **कननूराहून** येत असतां **टिपूनें** तींतील तीन काळ्या पलटणांचे टोळीवर **शिद्दापुरच्या** रानांत हल्ला केला. तिचा सरदार **मोंत्रेसोर साहेब** ह्यानें **टिपूचें** लश्कर फार असतां संध्याकाळच्या प्रहर दिवसापर्यंत त्याचा शह आपणावर लागूं होऊं दिला नाहीं. नंतर **इंग्लिश** पलटणांची दारू संपत आली, आणि भुकेमुळें लोक थकण्याचा सुमार दिसूं लागला, इतक्यांत **जनरल स्तुअर्ट साहेब** गोऱ्या लोकांची कुमक घेऊन आला; त्यास अटकाव करण्याकरितां **टिपूनें** मोठा प्रयत्न केला, परंतु चालला नाहीं. शेवटीं **टिपूचे** लोक फार मरून त्यांमध्यें पळ सुटला, आणि लढाई समाप्त झाली. **टिपू** त्या रानांत साहा दिवसपर्यंत संधी पाहत होता, परंतु पुनः लढाईस येण्यास त्याला हिंमत झाली नाहीं. ह्याच महिन्याचे २७ सावे तारखेस **टिपूनें मालवल्ली** एथें **जनरल हारिस साहेबाच्या** लश्करावर हल्ला केला; परंतु **इंग्लिश** सावध होते ह्मणून पहिल्यानें **टिपूचे** लोक जवळ येतांच त्यांपैकीं सुमारें चाळीस आसामी त्यांनीं वेनेटांनीं एकदांच मा-

रून पाडले; ह्यामुळें **टिपूचा** मोहोरा मागें फिरला. मग उजवेकडून **जनरल हारिस साहेब** व डावेकडून **कर्नल वेल्सली साहेब** ह्यांनीं शत्रूचें कांहीं चालूं न देतां त्याचा पराजय केला. त्या लढाईंत **इंग्लिशांचे** ६९ लोक पडले; **टिपूचे** एक हजारांवर जायां झाले.

३ ह्या लढाईनंतर एका आठवड्यानें **हारिस साहेबाची** एप्रिल फौज **श्रीरंगपट्टणास** जाऊन पोहोंचली; आणि पुढें लवकर ता० ५ रच **जनरल स्त्युअर्ट साहेबाचीही** फौज दाखल झाली; ता० २१ दाणा वैरणीचाही बराच भरणा होता; आणि किल्ला घेण्याची तयारी चालली. इकडे **टिपूनें** आपले सरदार मिळवून त्यांस विचारिलें कीं "गोष्ट तर शेवटचे मजलेस येऊन पोहोंचली, आतां तुमची कशी काय मर्जी?" ह्यावर त्यांनीं उत्तर केलें कीं, "आपणाबरोबर आह्मी प्राण देणार." त्या वेळेस **टिपूस** उमेद नव्हती, परंतु शेवटपर्यंत शौर्यकरून लढतां लढतां काय होईल तें होवो असा त्यानें निश्चय केला होता. तथापि जसजशी बाहेरची जागा हस्तगत करून **इंग्लिश** तटबंदीजवळ येत चालले, तसतसा त्याचा धीर कमी होत चालला; आणि त्याजकडून तहाविषयीं पत्रें येऊं लागलीं; परंतु **टिपू** अगदीं नाहींसा करण्यास ही संधी चांगली आहे असें जाणून **इंग्लिश** सरदारांनीं त्यास सांगून पाठविलें कीं एक कोटि रुपये दोन दिवसांच्या आंत देऊन पुढें तह ठरेपर्यंत आपले चार मुलगे आणि चार सरदार ओलीस द्यावे· हें बोलणें त्या अभिमानी पुरुषानें कबूल केलें नाहीं, आणि आपल्या संरक्षणाचा उद्योग चालविला.

४ किल्ल्याचे तटबंदीस तोफा लागू होऊन वाट पडल्या-
इ०स० यर मे महिन्याचे चवथे तारखेस दोन प्रहरांच्या सुमारें इंग्लि-
१७९९ शांनीं हल्ल्याची तयारी केली. तें वर्तमान आणि त्याचा सरदार सय्यद गफूर हा तटावर गोळी लागून मेला हें वर्तमान दोन्हीं टिपूस एकदांच कळलीं. दोन प्रहरांनंतर दीड वाजतां जनरल बेर्ड साहेब खंदकांतून बाहेर पडला, आणि त्यानें आपली तरवार उपसून लश्करास पुढें चाल करण्याची खूण केली. त्यानंतर तटबंदी पडली होती तेथें सुमारें पावघटकेंत इंग्लिशांचे बावटे लागले. हल्ला करणाऱ्यांच्या दोन टोळ्या जात होत्या त्यांवर आंतून भडिमार चालला होता; आणि त्या मोठ्या संकटानें एकएक तसू जागा साध्य करीत होत्या. आंतल्या तटाजवळ टिपू खुद्द पायीं लढत होता. त्यानें मोठ्या निकरानें युद्ध केलें, आणि आपण स्वतः हल्ला करणाऱ्यांवर मार चालविला. शेवटीं टिपूस दोन तीन गोळ्या लागल्या; आणि दक्षिणोत्तर बाजूंकडील इंग्लिशांच्या दोनही टोळ्या येऊन पूर्वेकडील दरवाज्याजवळ मिळाल्या, तेव्हां टिपूची फौज अस्ताव्यस्त होऊन पळूं लागली.

५ पुढें थोडक्याच वेळांत टिपूचा वाडा इंग्लिशांनीं घेतला; आणि त्याचीं मुलें माणसें त्यांच्या हातीं लागलीं. तो मात्र वाड्याकडे जात असतां वाटेंत मरण पावला. त्याचें प्रेत दुसऱ्या दिवशीं लश्करी संप्रदायाप्रमाणें मोठ्या समारंभानें हैदराचे कबरींत नेऊन पुरलें. टिपूचा वाडा इंग्लिश सरदारांच्या स्वाधीन होतांच त्यांनीं कत्तल बंद करविली; आ-

णि किल्ला घेतल्यावर शिपाई धुंदाई करीत असतात, ती मोठे शत्तीनें मेहनत करून होऊं दिली नाहीं. **जनरल बेर्ड साहेबानें** खुद्द तीन वर्षेंपर्यंत **टिपूचे** कैदेंत दुःख भोगिलें होतें, तथापि **टिपूचे** मुलगे तशा अवस्थेंत त्याचे दृष्टीस पडतांच त्याच्या डोळ्यांत अश्रु आले. त्यानें त्या मुलांबरोबर पाहारा देऊन त्यांस **इंग्लिश** लश्करांत बहुमानानें पाठवून दिलें.

६ मनुष्याच्या मनास कलहाची व दुसऱ्याचा जीव घेण्याची वासना होणें हें मोठें लांछन आहे. आपल्या संरक्षणाकरितां युद्ध करावें लागतें तेथें उपाय नाहीं, परंतु राज्याच्या लोभानें युद्ध करणें आणि सहस्रशः मनुष्यांची हत्या करणें हें पाप होय; हें बहुत राजांच्या मनांत येत नाहीं. युद्धाचा मतलब सिद्धीस गेल्यावर जो उगाच मनुष्यांस उपद्रव करितो किंवा त्यांचा संहार करितो; अथवा युद्धामध्यें शत्रु हातीं सांपडला असेल त्यास पीडा देतो, त्यास मनुष्य ह्मणूं नये, राक्षस ह्मणावें. ह्याविषयीं युरोपियन लोकांची चाल इतर राजांनीं प्रशंसा करण्याजोगी व घेण्याजोगी आहे.

७ ह्याप्रमाणें **श्रीरंगपट्टण इंग्लिशांच्या** हस्तगत झाल्यावर सुमारें चार महिन्यांच्या आंत **टिपूचा** सारा मुलूक व बाकीचे किले **जनरल हारिस साहेबानें** घेतले; आणि **धोंड्या वाघ** ह्मणून एक **टिपूचा** सरदार लूट करीत होता त्याचा बंदोबस्त केला. त्या युद्धामध्यें **गवर्नरजनरल** ह्यांचा भाऊ **कर्नल वेल्सली** ह्यानें पराक्रम करून व युद्धानंतर **श्रीरंगपट्टण** एथील लोकांचें संरक्षण करून कीर्त्ति मिळविण्यास आरंभ केला.

इ० स० १७९९ ८ **टिपूच्या** मुलकापैकीं तेरा लक्ष होनांचा प्रांत प्राचीन राजाच्या कुळांतील वारसदार मुलास देऊन त्यानें सर्व प्रकारें **इंग्लिशांचे** मर्जीप्रमाणें वागावें, असा प्रकार ठरवून त्यास **महिसूर** एथें **इंग्लिशांनीं** गादीवर बसविलें; आणि त्याचा कारभार करण्याचें काम **टिपूचा** दिवाण पूर्णया नाभें होता त्याजकडे सांगितलें. बाकीचा मुलूक राहिला त्यापैकीं पश्चिमसमुद्रकांठ व **कोइमत्तूर, वैनाड** वगैरे प्रांत व डोंगरी किल्ले **इंग्लिशांनीं** आपणांकडे ठेवून तितक्याच वसुलाचे **गुत्ती गरमकोंडे** वगैरे प्रांत **निजामास** दिले. **मराठयांनीं** युद्धांत कांहीं मदत केली नव्हती खरी, परंतु त्यांची मर्जी राखण्यास्तव **निजामास** दिला, त्याच्या निमें प्रांत **हर्पुनहल्ली, अनागुंदी** वगैरे तालूके त्यांस देण्याकरितां काढून ठेविले, परंतु ही वांटणी **दवलतराव शिंदा** ह्याच्या सांगण्यावरून **बाजीराव** ह्यानें घेतली नाहीं. इ० स० १८०० पुढें लवकरच **निजामानें इंग्लिशांशीं** नवा तह करून त्यांची ज्यास्ती फौज आपल्याजवळ ठेवण्याचा करार केला; व **इंग्लिशांचे** मसलतीशिवाय कोणाशीं तह किंवा युद्ध करणार नाहीं, अशी कबूलात करून सर्व शत्रूंचा बंदोबस्त करण्याचें काम **इंग्लिशांस** सांगितलें; आणि ज्यास्ती लश्कराच्या खर्चाबद्दल **टिपूकडून** पूर्वी व हालीं आलेला सर्व मुलूक **इंग्लिशांस** देऊन **तुंगभद्रानदी** ही सर हद्द ठरवून घेतली. (ता० १२ अक्टोबर संन १८००).

९ ह्या रीतीनें ज्याच्या राज्याची समाप्ति झाली, तो **टिपू** युद्धांत मरण पावला त्या वेळीं त्याच्या वयास पन्नासावें वर्ष

होतें. तो शरीरानें मध्यम उंच होता, त्याची मान आखूड, बाव्हळे विशाळ, आणि पोट कांहींसें दोंदील होतें, परंतु त्याचे हात पाय इत्यादि अवयव बारीक होते. त्याच्या शरीराचा वर्ण फिकट तांबूस, डोळे मोठे, भिवया लहान व कमानदार, आणि नाक उंच व लांब होतें. त्याच्या चेहेऱ्यांत जो भाव आणि तेज होतें तें त्यास पाहतांच सर्वांच्या ध्यानांत येई. त्यास आरबी भाषेचा अभ्यास बराच होता, आणि त्याची आपल्या धर्मावर निष्ठा होती. तो आपल्या राज्यास "**खुदादाद**" ह्मणजे ईश्वरदत्त ह्मणत असे; आणि आपल्या धर्माप्रमाणें हिंदू व इतर धर्मांचे लोक ह्यांस पीडा करीत असे. आपल्या धर्माचा आणि आपल्या लोकांचा पुन्हा उत्कर्ष व्हावा ह्मणून त्यानें **रूमचा सुलतान** व **अफगाणांचा बादशाह** ह्यांस **हिंदुस्थानांत** येण्याविषयीं पत्रें पाठविलीं होतीं; आणि ईश्वर आपली उपेक्षा करणार नाहीं ह्याच भरंवशावर त्यानें शेवटच्या युद्धांत तयारी करण्याविषयीं कांहींशी अनास्था केली. त्याचें प्रजापालनाकडे कांहीं लक्ष्य होतें, परंतु युद्ध करण्यामध्येंच त्याचा बहुतेक काळ गेला. तो आपल्या जवळच्या लोकांशीं ममतेनें वागे, आणि तेही त्यावर प्रीति करीत; परंतु त्याच्या आंगांत मसलत नव्हती, आणि त्यास शाहाणपणाचा फार गर्व होता, व आपल्या मर्जीचें मोडणें त्यास आवडत नसे, ह्मणून तो जवळच्यांवर केव्हां केव्हां कठोरपणा करी, आणि त्यांची मसलत ऐकत नसे. ह्या स्वभावामुळें, आणि इंग्लिश लोक आपणास खचित मोडतात असें समजून त्यानें त्यांचें लश्कर **श्रीरंगपट्टणास** येतांना

त्यास कांहीं उपद्रव केला नाहीं, ह्यामुळें तो किल्ल्यांत कोंड-
ला जाऊन फसला. त्यानें पुष्कळ द्रव्यसंग्रह केल्याचा
लौकिक होता, परंतु ६४,००,००० रुपये रोकड आणि छ-
त्तीस लक्षांचें जवाहीर इतकें त्याच्या खजिन्यांत सांपडलें.

## प्रकरण १३.

**मार्किस वेल्सली साहेब ह्याची कारकीर्द. अयोध्येच्या नवाबाचा बंदोबस्त. करनाटकचा नवाब, तंजावरचा राजा, व सुरतेचा नवाब, ह्यांस नेमणुका ठरावून देऊन त्यांचा मुलूक इंग्लिशांनीं घेतला तें वर्तमान.**

इ० सं‍न १७९९ पासून सं‍न १८०२ पर्यंत.

१ इंग्लिश लोक प्रथम हिंदुस्थानांत व्यापाराकरितां
आले, त्यांचा राज्यें घेण्याचा बेत आरंभीं नव्हता; आणि
मुळापासून कंपनी व पार्लमेंट ह्यांजकडून कामदारांस हुकूमही
वारंवार निक्षूण तसेच येत होते. परंतु व्यापाराचे सोईक-
रितां व वखारींच्या रक्षणाकरितां पहिल्यानें बंदरांच्या सभोंव-
तालीं कांहीं आपली सत्ता असावी असें त्यांस वाटलें. पुढें
त्यांस ज्यांनीं उपद्रव केला, त्यांचें पारिपत्य करून त्यांचा
कांहीं मुलूक घेतला; व ज्यांस इंग्लिशांनीं मदत केली, त्यांनीं
त्यांस संतोषानें कांहीं मुलूक दिला. त्या मुलकाच्या बचा-
वाकरितां फौजा ठेवणें प्राप्त झालें; त्यांचा खर्च निभेना ह्म-
णून मुलकांतील संस्थानिकांचें रक्षण करण्याचें कबूल करून,
व आपले फौजेपैकीं कांहीं फौज त्यांजवळ ठेवून तिच्या

चरितार्थाकरितां त्यांजकडून ते द्रव्य घेऊं लागले. तें द्रव्य ठरावलेल्या मुदतीस येईना, ह्मणून त्या संस्थानिकांचे तालुके आपणांकडे लावून घेत चालिले; त्यामुळें **इंग्लिशांची** गणना **हिंदुस्थानांतील** संस्थानिकांत झाली.

२ **इंग्लिश** आणि **फ्रेंच** ह्यांचा विरोध असतां **टिपूनें फ्रेंचांशीं** स्नेह केला, त्यामुळें **इंग्लिशांस** भय प्राप्त होऊन त्याशीं युद्धास आरंभ झाला; व त्या युद्धापासून **इंग्लिशांस** दोन कोटींवर वसुलाचें राज्य मिळालें. त्याचें रक्षण करण्यास पूर्वीपेक्षां अधिक फौजेचें कारण पडलें. **युरोपांत फ्रेंचांशीं** लढाई चालू होतीच ह्मणून **हिंदुस्थानावर फ्रेंचांनीं** स्वारी केल्यास बळकट सैन्य सिद्ध पाहिजे असें दिसून आलें. आणखी **हिंदुस्थानचे** संस्थानिक सर्व, आणि त्यांत विशेषेंकरून **मराठे**, हे **इंग्लिशांचे** सत्तेचा मत्सर करीत होते; त्या सर्वांचा एकोपा झाल्यास आपल्या राज्याचें रक्षण होणें कठीण पडेल अशी शंका उत्पन्न झाली.

३ ह्या प्रसंगीं दोन मसलती होत्या. एक ही कीं, विलायतेच्या सरकारच्या हुकमावर नजर देऊन, आणि जितकें राज्य अधिक मिळतें तितकी त्याच्या रक्षणाची काळजी अधिक वाहावी लागती, हें मनांत आणून राज्य प्राप्त झालें होतें तितक्यावर संतुष्ट राहावें. दुसरी मसलत अशी कीं, "जो जबरदस्त तो पृथ्वीचा स्वामी," ह्या न्यायाप्रमाणें जसे आजपर्यंत इतर राजे वागत आले त्याप्रमाणें आपण वागावें; आणि दिल्लीपति बादशाह ह्याच्या जाग्यावर आपणास ह्मणवून जे संस्थानिक केवळ आपले ताबेदारींत न वागतील त्यांचीं सं-

स्थानें जप्त करून आपलें राज्य व बळ वाढवावें. ह्या दोन मसलतींपैकीं पहिली जर स्वीकारावी, तर मुलकांतील राजांचें एक वेळ एक मत झालें असतां राज्य जाण्याचाच प्रसंग येईल, असें समजून **मार्किस वेल्सली गवर्नरजनरल** हे दुसरे मसलतीस अनुसरले.

४ इकडे **मुसलमान** व **हिंदू** राजे ह्यांजवळ मुलकी फौजा असत, त्या फौजा देशांत वारंवार फार धुंदाई करीत, आणि त्यांचा त्यांस कांहीं उपयोग नसतां समयीं त्यांजपासून उलटीं बंडें व फिसादी हीं मात्र होत असत. ह्याप्रमाणेंच त्यांच्या मुलकांत जमावंदीची व इनसाफाची वहिवाट जुने चालीची व अव्यवस्थेची होती. ह्या दोन कारणांमुळें ती बेशिस्त फौज दूर करून **इंग्रेजी** फौज ठेवण्याविषयीं, आणि **इंग्लिशांचे रेसिडेंट** ह्मणजे वकील ह्यांच्या सल्ल्याप्रमाणें राज्याचा बंदोबस्त राखण्याविषयीं आग्रह करण्यास, व तें बोलणें जे न ऐकत त्यांचीं राज्यें जबरदस्तीनें काढून घेण्यास, **इंग्लिशांस** संधी सांपडली. हें **गवर्नरजनरलांचें** करणें नीतीस विरुद्ध असें कितीएक नीतिवंत आणि विद्वान **इंग्लिश** ग्रंथकारांनीं सिद्ध केलें आहे; परंतु "तरवारबहादराचें राज्य," ह्या शास्त्रार्थाप्रमाणें मुळापासून वागलेले जे **हिंदू** व **मुसलमान** त्यांनीं **इंग्लिशांस** ह्या गोष्टीचा दोष लावावा हें उचित दिसत नाहीं. **इंग्लिशांनीं** वास्तविक नीति सोडून कोणतेंही राज्य घेतलेंच नाहीं असें जें कितीएक त्यांचे पक्षपाती स्थापूं लागतात, तेंही सिद्ध होत नाहीं. त्यांस राज्यें घेण्यास कितीएक प्रसंगीं योग्य कारणें झालीं असतील; परंतु बहुत

स्थळीं राज्य आणि सत्ता वाढविण्यावर लक्ष्य देऊन ते वर्त्तले असें ह्मणणें प्राप्त येतें. ह्यावर **इंग्लिशांचें** समाधान इतकेंच आहे कीं, ह्याप्रमाणेंच आजपर्यंत पृथ्वींत बहुतेक राज्यांच्या घडामोडी होत आल्या; आणि **मराठ्यांस** व **दिल्लीच्या** बादशाहाचे ठेवणाईत सुभेदार ह्यांस सत्ता करण्यास जो अधिकार तोच **इंग्लिशांस** आहे. राज्यप्रकरणीं हें समाधान करून घेतल्यावांचून निर्वाह नाहीं; कारण, कोणाचें कांहीं नाहक घेऊं नये, ह्याप्रमाणें घरगुती कामांत आचरण करणारे बहुत मनुष्य आहेत, परंतु राजे जेव्हां असे वागूं लागतील, तेव्हां कोणत्याही प्रभूवर राज्यलोभाचा दोष ठेविला असतां शोभेल. युद्धाभिमानी लोकांचें भाषण असें असतें खरें, तरी घरगुती कामांत जी नीति योग्य आहे तीच राज्य प्रकरणीं असली पाहिजे.

५ दुसरें असें मनांत आणिलें पाहिजे कीं विलायत एथील **इंग्लिशांचें** जें मूळसरकार त्यानें इतर राजांचीं राज्यें घेण्याची सख्त मनाई केली होती; असें असतां **इंग्लिशांचें** जें राज्य वाढलें तें **हिंदुस्थानच्या** राजांचे आचरण पाहिल्यामुळें, किंवा आपल्या राज्याच्या रक्षणाचे काळजीमुळें, ह्या मुलकांतील इंग्लिश कामदारांनीं वाढविलें. आणि हे कामदार स्वदेशास परत गेल्यावर त्यांस केलेल्या कर्माचा पश्चात्ताप होई असें त्यांतून कितीएकांस लांछन झालें. इतकी तरी स्तुति किती राजांस योग्य आहे ह्याचा विचार करावा.

६ **मार्किस वेल्सली साहेब** व त्याच्या मागून जे अधिकारी साहेब आले ते कोणत्या धोरणानें वागले हें समजण्या-

करितां वर लिहिलें इतकें पुष्कळ आहे. आतां पुढील वर्तमानें लिहितों.

७ **अफगाणांचा** बादशाह **शाहाजमान** हा संन १७९५ त एकवेळ **पंजाबावर** स्वारी करून गेला; आणि पुनः दोन वर्षांनीं तो **हिंदुस्थानांत** आला. त्याचा भाऊ **महंमद** ह्यानें केलेल्या बंडाच्या बंदोबस्ताकरितां जरी त्यास तसेंच परत जावें लागलें, आणि पुढें चार वर्षांनीं जरी तो अधिकारावरून निघाला, तरी त्याच्या येण्यानें **अयोध्येच्या** नवाबास असें भय पडलें कीं आपली रयत मुळींच आपणास नाराजी आहे ती कदाचित् फितुरी होईल. तशांत संन १७९९ मध्यें गादीवरून काढलेला जुना नवाब **वजीरअल्ली** ह्यानें **काशीच्या** चार साहेबांस मारून मोठें बंड केलें; त्याचा पुढें लवकरच बंदोबस्त होऊन तो **मारवाडांत** पळाला होता, त्यास तेथील एका राजानें धरून **इंग्लिशांच्या** स्वाधीन केलें, हेंही नवाब **सादतअल्ली** ह्यास भय उत्पन्न होण्यास कारण झालें. अशा संधीस मुलकांत अधिक **इंग्लिश** फौज असल्यावांचून निर्वाह होणार नाहीं असें नवाबास समजावून **इंग्लिशांनीं** त्याकडून त्या फौजेच्या खर्चाकरितां १,३५,२३,४,७४ रुपयांचा मुलूक लावून घेतला; आणि बाकीच्या राज्याचा कारभारही रेसिडेंटाच्या विचारावांचून नवाबानें करूं नये असा ठराव
इ० स० १८०१ नोवेंबर ता० १४ केला. ह्या तहनाम्यावर सही करण्यास **सादतअल्ली** ह्यानें फार अनमान केला; परंतु त्याच्या मुलकाची अव्यवस्था आणि **इंग्लिश** सरकारची बळकटी ह्यांपुढें त्याचा उपाय चालला नाहीं. पुढें लवकरच **लखनौकराच्या** पेठ्यांतील **फरका-**
इ० स० १८०२ ता० ४ जून

**बाद** एथील नवाब ह्याजकडून **भागीरथीच्या** पश्चिमकांठचा सुमारें साडे दहा लक्षांचा मुलूक घेऊन **इंग्लिशांनीं** त्यास एक लक्ष ऐशीं हजार रुपयांची नेमणूक सालीना करून दिली; आणि त्याच्या राज्यांतील जमिनदारांनीं कांहीं दिवसपर्यंत दांडगावें केलें होतें, त्याचा बंदोबस्त लवकरच करून **सासणी** व **बिजगड** हे किल्ले घेतले.

८ **तंजावरचा** राजा **तुळजाजी** ह्यानें आपलें राज्य मरणसमयीं **सरफोजी** नामें दत्त पुत्र घेऊन त्याच्या नांवेंकरून ठेविलें होतें. पुढें तो मेल्यावर त्याचा दत्तपुत्र व त्याचा भाऊ **अमरसिंग** ह्या उभयतांचा गादीविषयीं वाद पडला. मग पंडितांनीं **अमरसिंगाच्या** तर्फेचा शास्त्रार्थ सांगितल्यावरून **सरफोजी** ह्यास एकीकडे ठेवून **इंग्लिशांनीं अमरसिंग** ह्यास गादीवर बसविलें. पुढें कितीएक वर्षांनीं **सरफोजी** हा खरा वारसदार असा **इंग्लिशांचा** समज होऊन त्यांनीं हें करणें फिरवून दत्तविधान कबूल केलें. **सरफोजी** ह्यास गादीवर बसवितेवेळेस त्यानें नेमणूक घेऊन स्वस्थ राहावें, इ० स०
आणि राज्याचा सर्व कारभार आपण करावा असें **इंग्लिशां-** १७९९
**नीं** ठरावून घेतलें. (इ० संन १७९९ अकटोबर ता० २५). हें वर्तमान घडल्यानंतर माजी राजा **अमरसिंग** हा दोन वर्षांनीं मरण पावला.

९ **अर्काटचा** नवाब **उम्दतउल्‌उमराव** ह्यानें व त्याचा बाप गादीवर होता तेव्हां त्यानेंही **टिपूशीं** सख्य केलें, असा **इंग्लिशांच्या** मनांत संशय येऊन त्या गोष्टीची चौकशी झाली; तींत कांहीं दिकत येण्याजोगें दृष्टीस पडलें. इतक्यांत

इ० स० १८०१ **उमदतउल्‌उमराव** हा मरण पावला. ती संधी पाहून **गवर्नरजनरल** ह्यांच्या हुकमानें **मद्रासचा** गवर्नर **लार्ड क्लैव** साहेब ह्यानें तेथें जाऊन त्याचा मुलगा **अल्लीहुसेन** हा नेमणूक घेऊन राहाण्यास राजी झाला नाहीं सबब, आणि **अल्लीहुसेन** हा नवाबाचा खरा मुलगा नव्हे ह्मणून, नवाबाचा चुलत भाऊ **अजीम उद्दवला** ह्यास नावाचा नवाब करून त्यानें वसुलापैकीं खर्च जाऊन राहील त्यांतून एक पंचमांश घ्यावा अशी नेमणूक करून देऊन त्याचा सर्व मुलूक कंपनी सरकारांत घेतला. पुढील वर्षी **अल्लीहुसेन** मरण पावला.

१० **महंमदशाह** राज्य करीत असतां **गुजराथेंतील सुरतचा** किल्ला संन १५४३ च्या सुमारें बांधिला. तेथील नवाब हा **दिल्लीवाल्याचा** ठेवणाईत, तो कालेंकरून इतर नवाबांप्रमाणें **सुरतेच्या** प्रांतांत वंशपरंपरागत संस्थानी झाला. परंतु त्याच्या दरबारीं अव्यवस्था फार ह्यामुळें **सुरतेच्या** किल्याचें रक्षण व तंट्यांचा निवाडा हीं पूर्वीपासून **इंग्लिशांकडे** असत. अशांत संन १७९९ वांत नवा वारसदार गादीवर बसविण्याचा प्रसंग आला; ते वेळीं **इंग्लिशांनीं** त्याच्या राज्यांतील लश्कराचा व वसुलाचा व इनसाफाचा बंदोबस्त आपणाकडे ठेवून नवाब **मीरनासरुद्दीन** ह्यास सालीना एक
इ० स० १७८९ लक्ष रुपयांची नेमणूक ठरवून दिली.

११ **सुरतेच्या** नवाबाकडून जो प्रांत मिळाला, त्याबद्दल **मराठ्यांची** चवथाई द्यावयाची, तिजपैकीं **गायकवाडाची** वांटणी **इंग्लिशांचे** मैत्रीबद्दल त्यानें सोडली. परंतु ह्या गोष्टीविषयीं **पेशव्यांशीं** कलह उपस्थित झाला.

१२ **मिसर** देशांत **फ्रेंचांशीं** लढण्याकरितां **मुंबईहून** सुमारें ७००० फौज घेऊन **जनरल बेर्ड साहेब** संन १८०१ त त्या देशांत गेला, परंतु ह्या फौजेचें विशेष कारण न पडतां पुढल्या वर्षीं जून महिन्यांत ती परत आली. नंतर लवकरच **युरोपामध्यें इंग्लिश** लोकांचा आणि **फ्रेंचांचा** मुख्य **बोनापार्ट** ह्यांचा तह ठरून **पोंदेशरी इंग्लिशांनीं फ्रेंचांस** परत दिली, परंतु पुढील वर्षीं ती पुनः परत घेतली.

## प्रकरण १४.

### मार्किस वेल्सली ह्याची कारकीर्द. पेशवे, नागपूरकर भोंसले, व शिंदे ह्यांचें वर्तमान.

इसवी संन १८०३

१ **बाजीराव पेशवा** ह्याच्या मनांत प्रथम **इंग्लिशांची** फौज आपले चाकरीस ठेवावी असें नव्हतें, आणि त्या गोष्टी-विषयींचें **इंग्लिशांचें** बोलणें **टिपूच्या** लढाईचे अखेरीस एक वेळ व मागाहून एकवेळ असें दोनदां त्यानें नाक़बूल केलें होतें, परंतु पुढें त्यास ती गोष्ट स्वीकारणें योग्य वाटलें; ह्याचीं कारणें अशीं झालीं.

२ पहिल्या **बाजीरावाचे** वेळेस वाढलेला जो **होळक**-राची गादी स्थापणारा सरदार **मल्हारराव** तो इ० संन १७६६ ह्यांत मरण पावल्यावर त्याची सून **अहिल्याबाई** हिनें **तुकोजी** नामें आपल्या कुळांतील एक सरदार अधिका-री केला. त्यानें संन १७९७ पर्यंत राज्य केलें. त्याच्या

मागें काशीराव व मल्हारराव हे लग्नाच्या बायकोचे आणि विठोजी व यशवंतराव हे राखेच्या पोटचे असे त्याचे चार पुत्र होते. त्यांतून काशीराव संस्थानाचा मुख्य धनीपणा भोगूं लागला, त्यामुळें तो आणि मल्हारराव ह्या उभयतांमध्यें कलह होऊन त्याचा निवाडा करण्याचें काम पुण्याच्या दरबारांत पडलें. तेव्हां पुण्यांत बाजीरावाजवळ दवलतराव शिंदा हा राज्याचा सर्व कारभार करीत असे. त्यानें काशीरावाकडून कांहीं द्रव्य घेऊन त्याचा पक्ष धरिला, आणि मल्हाररावावर एकाएकीं गर्दी करून त्यास व त्याच्या लोकांस ठार मारिलें. त्याच्या मरणानंतर त्याचा अज्ञान बालक खंडेराव कैद करून ठेविला, व काशीराव ह्यासही आपल्या आश्रयास ठेवून घेतलें. विठोजी हा कोलापुरा । पळून गेला होता त्यास धरून त्याचा जीव घेतला; परंतु य ।वंतराव ह्यानें नागपुरास पळून जाऊन पुढें कांहीं दिवसांनीं धारेचा पंवार राजा व अमीरखान पठाण ह्यांशीं स्नेह करून साठ हजार फौज जमविली. मग सन १८०१ च्या वर्षीं अकटोबराचे १४ वे तारखेस तो व शिंदा ह्यांची इंदुराजवळ लढाई झाली; तींत होळकराचा केवळ पराजय होऊन त्याचा तोफखाना व बुणगें वगैरे शिंद्याच्या हातीं सांपडलें. पुढील वर्षीं होळकरानें पुनः फौज जमवून पुण्यावर स्वारी केली. त्याची व शिंद्याचे फौजेची लढाई पुण्याजवळ अकटोबर महिन्याचे २५ वे तारखेस होऊन होळकराचा जय झाला. आणि बाजीराव ह्यास पुणें सोडून कोंकणांत निघून जाण्याचें प्राप्त झालें. त्या वेळीं पुण्या-

च्या दरबारांत कर्नल बारी क्लोस साहेब नामें इंग्लिशांचा वकील होता, त्याजवळ बाजीरावानें करार लिहून पाठविला कीं, तुमचे चाकरीस आमचीं साहा पलटणें ठेवावीं व त्यांच्या खर्चाबद्दल गुजराथेंत किंवा करनाटकांत पंचवीस लक्षांचा मुलूक द्यावा असें जें तुमचें बोलणें तें आह्मास कबूल आहे. त्याप्रमाणें बाजीराव व इंग्लिश ह्यांचा तह वसई मुकामीं ठरला; त्यांत इंग्लिशांच्या सल्ल्यावांचून कोणाशीं युद्ध किंवा तह करूं नये, व गोरे लोक चाकरीस ठेवूं नयेत, असें बाजीरावानें कबूल केलें. आणि सुरत प्रांतामध्यें नवाबाकडून व गायकवाडाकडून जो मुलूक इंग्लिशांस मिळाला होता त्यावर पेशव्यांची चौथाई होती तबद्दल त्यानीं बाजीरावास मुलूक तोडून दिला. (तारीख ३१ दिसेंबर.) इकडे यशवंतराव ह्यानें बाजीरावाचा भाऊ अमृतराव गादीवर बसविला. तो किंवा शिंदा ह्या उभयतांतून एकाच्याही मनास वसईचा तह आला नाहीं, व ते बाजीरावास परतून पुण्याचे गादीवर बसविण्यास अनुकूल होत नाहींत, अशी इंग्लिश सरकारची खातरी झाल्यावर हैदराबादेकडून निझामाचे सरहद्दीवर तिकडील सर्व फौज बोलाविली; आणि जनरल वेल्सली ह्यानें हरिहराहून येऊन पुण्याजवळ लश्कराची छावणी केली. तो येण्याच्या पूर्वीं होळकर व अमृतराव हे निघून गेले होते. नंतर मुंबईची फौज बरोबर देऊन बाजीरावास वसईहून इंग्लिशांनीं रवाना केलें, तो निर्विघ्नपणें परत पुण्यास येऊन आपले गादीवर बसला. इ० स० १८०३

४ परंतु बाजीरावानें इंग्लिशांशीं मैत्री करून त्यांची ता० २७ एप्रिल

फौज आपणाजवळ ठेवून घेतली हें **रघूजी भोंसला नागपूरकर** व **दवलतराव शिंदा** ह्यांस सोसवेना; आणि ते **इंग्लिशांशीं** तह करीनात, व फौजा दक्षिणेंतून परत नेईनात, हें विरोधाचें लक्षण जाणून **इंग्लिशांनीं** त्यांशीं युद्ध करण्याचा निश्चय केला.

५ तें युद्ध सात महिनेपर्यंत चाललें. त्यामध्यें **इंग्लिशांचे** सरदार **जनरल लेक साहेब** व **वेल्सली साहेब** ह्यांनीं बहुत पराक्रम केला.

६ आगस्त महिन्याचे ७ वे तारखेस **जनरल लेक साहेब कानपुराहून** निघाला तो त्या महिन्याचे अखेरीस **आलेगड** नामें **शिंद्याचा** किल्ला ह्याजवळ येऊन पोहोंचला. त्यावर **पिरों** नामें **दवलतरावाचा** सरदार होता. तो किल्ला मोठे शर्तीनें एकाएकीं हल्ला करून **लेक साहेबानें** सप्तेंबर महिन्याचे चौथे तारखेस घेतला. त्या लढाईंत **शिंद्याचे** २००० लोक पडले; **इंग्लिशांचे** ५९ मेले व २१२ जखमी झाले. नंतर थोड्या दिवसांनीं **पिरों** ह्याची जहागीर दवलतरावानें जप्त केल्यामुळें त्यास राग येऊन तो **इंग्लिशांकडे** आला, आणि पुढें **लखनौस** जाऊन राहिला. ह्याच महिन्याच्या ११ व्या तारखेस **शिंद्याचा बुर्की** नामें दुसरा सरदार ह्याची व **लेक साहेबाची** लढाई दिल्लीजवळ होऊन **शिंद्याची** फौज पळाली; आणि त्याच्या ६८ तोफा, व दुसरें बहुत लढाईचें सामान व खजीना **इंग्लिशांच्या** हस्तगत झाला. ह्या लढाईंत **इंग्लिशांचे** लोक ४८५ मेले; शत्रूचे सुमारें ३००० पडले. दुसऱ्या दिवशीं **दिल्लीस** जाऊन वृद्ध व अंध

जो दिल्लीपति बादशाह **शाहआलम** ह्यास लेक साहेबानें आश्रय दिला. नंतर **दिल्लीचा** बंदोबस्त **कर्नल आक्टर्लोनी साहेब** ह्याजकडे सांगून **जनरल लेक आग्र्यास** गेला. तेथील अधिकाऱ्यांनीं कांहीं वेळपर्यंत लढून तो किल्ला अकटोबर महिन्याचे १७ वे तारखेस त्याच्या स्वाधीन केला. आंतील फौजेस कराराप्रमाणें **लेक साहेबानें** जाऊं दिलें. तेथें **शिंद्याच्या** ज्या पलटणी होत्या, त्यांतून सुमारें २५०० लोक **इंग्लिशांस** येऊन मिळाले.

७ पुढें थोडक्या दिवसांनीं **शिंद्याचीं** सत्रा पलटणें व चार हजार स्वार **आग्र्याजवळ** हिंडत होते, त्यांवर त्या शहरापासून सुमारें पन्नास कोसांवर **लासवारी** नामक खेडें ह्याजवळ **जनरल लेक साहेबानें** हल्ला केला. त्यास पावसामुळें आपला जड तोफखाना व बुणगें **फत्तेगड** एथें ठेवावें लागलें होतें; आणि पायदळ मागाहून यावयाचें होतें ह्मणून प्रथम नुसत्या स्वारांनिशीं त्यानें त्यांवर चाल केली. त्या वेळेस मोठें तुमुल युद्ध झालें; परंतु तोफखान्याच्या मारापुढें स्वारांचें चालेना. मग दीड प्रहर दिवसाच्या सुमारें पायदळांचीं पलटणें येऊन पोहोंचलीं, आणि बरोबरीनें युद्ध चाललें. शेवटीं गोऱ्या स्वारांची एक पलटण आणि पायदळ ह्यांनीं एकदांच निकरानें हल्ला केला, आणि शत्रूंच्या रांगा फोडून ते आंत शिरले. तेव्हां शत्रूंची दाणादाण होऊन ते पळाले. ह्या लढाईंत **शिंद्याचा** फार नाश झाला, व त्याच्या बाहत्तर तोफा **इंग्लिशांस** सांपडल्या, आणि सुमारें दोन हजार लोक शस्त्रें टाकून **इंग्लिशांच्या** स्वाधीन झाले. इकडे

आकटोबर ता० ३१

**इंग्लिशांच्या** लश्करांतही एक **जनरल**, दोन **कर्नल**, व दुसरे कांहीं लहान सरदार, आणि शिपाई लोक मिळून १७२ मेले, आणि ६५२ जखमी झाले. **जनरल लेक साहेबानें** ह्या दिवशीं जातीनें लढण्याची पराकाष्ठा केली; त्याच्या मांडीखालून दोन घोडे मेले तेव्हां जवळ त्याचा मुलगा होता त्यानें खालीं उतरून आपला घोडा दिला. त्यावर तो **जनरल साहेब** बसतो आहे इतक्यांत तो मुलगा गोळी लागून पडला. त्यास तसेंच टाकून **जनरल साहेबानें** घोडा पुढें चालविला.

८ ह्या रीतीनें तीन महिन्यांच्या आंत **शिंद्याची** फौज नाहींशी होऊन **महादजी शिंद्यानें** मिळविलेला **यमुनेच्या** कांठचा सर्व मुलूक **इंग्लिशांनीं** जिंकून घेतला.

९ इकडे दक्षिणेंत **जनरल वेल्सली साहेब** ह्यानें **अहंमदनगरच्या** किल्ल्यास वेढा घालून तो घेतला; तेणेंकरून सुमारें ६,३४००० रुपये वसुलाचा मुलूक मिळाला. नंतर आगस्त महिन्याचे २४ वे तारखेस हें लश्कर **गोदावरी** उतरून पलिकडे गेलें. तिकडून **भोंसला** व **शिंदा** हेही **आंजठ्याचा** घाट उतरून **निजामाच्या** मुलकांत शिरले; आणि पुढें लवकरच त्यांस **शिंद्याचीं** आणखी सोळा पलटणें येऊन मिळालीं. **निजामाचे** फौजेचा सरदार **कर्नल स्टीफन्सन साहेब** हा **जालना** घेऊन पूर्वेकडून आला; आणि **आंजठ्या**जवळ **खेळणा** नदीच्या तीरीं **आसई** खेड्याजवळ दोघांनीं
ता० २४ सप्टेंबर दोहों वाटांनीं येऊन शत्रूंवर हल्ला करावा असें ठरविलें. **वेल्सली साहेबाची** फौज ४५०० होती; शत्रूचें लश्कर तर

फार आणि स्टीफन्सन साहेब हा समयास येऊन पोहोंचला नाहीं, असें असतां जनरल वेल्सली साहेबानें आपण शत्रूंवर हल्ला केला. त्या लढाईंत जरी त्यानें फार पराक्रम केला तरी केवळ शत्रूंचा पराजय झाला असें नाहीं. तथापि ते आपले फौजेसहित तेथून निघून गेले. त्यांचे १२०० लोक पडले, व ९८ तोफा आणि सात बावटे इंग्लिशांच्या हातीं सांपडले. इंग्लिशांचेही ४२८ लोक मेले, व ११३८ जखमी झाले.

१० नंतर शिंदा व भोंसला ह्यांनीं दक्षिणेकडे चाल केली, त्यांचा पाठलाग करीत वेल्सली साहेबही औरंगाबादेचे वाटेनें परत आला. तिकडे कर्नल स्टीफन्सन साहेबानें बऱ्हाणपूर व आशीरगड हे किल्ले शिंद्यापासून घेतले. नंतर दोघेही सरदार पूर्वेकडे भोंसल्याचे किल्ले घेण्यास गेले. आरगांव एथें त्यांनीं शत्रूंस पळविलें, आणि गावलगड घेतला. बुंदेलखंडापैकीं छत्तीस लक्षांचा मुलूक वसईच्या तहामध्यें बाजीरावानें इंग्लिशांस दिला होता, तो त्यांनीं तेथील अधिकारी समशेरबाहादुर ह्याजपासून घेतला; कटकप्रांत भोंसल्याकडून मद्रास इलाख्याचे फौजेनें घेतला; आणि गुजराथेंतील सारा शिंद्याचा प्रांतही मुंबईचे फौजेनें हस्तगत केला.

११ ह्याप्रमाणें इंग्लिश सरदारांपुढें उपाय चालत नाहीं असें पाहून भोंसला प्रथम तह करण्यास कबूल होऊन तो व इंग्लिश ह्यांमध्यें देवगांवीं तह ठरला. त्या तहाचीं मुख्य कलमें येणेंप्रमाणें. इंग्लिशांचें नुकसान व लढाईचा खर्च भों- डिसेंबर ता० १७

सल्यानें भरून द्यावा, व त्यांस कटकप्रांत बलसोड किल्या-सुद्धां द्यावा; निजामास गावलगड व नर्नळा ह्या किल्यांच्या सभोंवताला तीस लक्ष रुपयांचा प्रांत, व ह्यांशिवाय इंग्लिशांचे सरहद्दीपासून पश्चिमेस वर्धानदीपर्यंत मुलूक सोडावा. ज्या राजांशीं व जमिनदारांशीं इंग्लिशांनीं तह केला आहे त्यांचे सर्व हक्क त्यानें चालवावे, व त्यांस उपद्रव करूं नये; आपले चाकरीस युरोपियन व अमेरिकन हे त्यानें ठेवूं नयेत; आणि इंग्लिश व भोंसले ह्यांचे वकील परस्परांच्या दरबारांत असावे.

ता० ३० १२ पुढें थोड्या दिवसांनीं शिंद्याचाही अंजिण गांवीं तह झाला; त्यांत ठरलें कीं भागीरथी आणि यमुना ह्यांच्या मधला मुलूक, व जयपूर, जोतपूर व गोहद ह्या संस्थानांच्या उत्तरे कडचा मुलूक, व भडोचेचा किल्ला आणि तो प्रांत इतकें शिंद्यानें इंग्लिशांस द्यावें; तसाच अहंमदनगरचा किल्ला व तो प्रांत पेशव्यास द्यावा; अजिंठ्यापासून गोदावरीनदीपर्यंत सर्व प्रांत निजामास द्यावा; दिल्लीचा बादशाह शाहआलम, व पेशवा व निजाम व आनंदराव गायकवाड ह्यांजवर जे दावे असतील ते सोडावे; भरतपूर, जोतपूर, जयपूर, माचिरी, बुंदी, व गोहद एथील संस्थान्यांस उपद्रव करूं नये; आणि इंग्लिशांचे शत्रु युरोपियन किंवा अमेरिकन ह्यांस चाकरीस ठेवूं नये. असें शिंद्यानें कबूल केलें. इंग्लिशांनीं आशीरगड, बऱ्हाणपूर, पवनगड वगैरे किल्ले जे घेतले होते ते, आणि शिंद्याचे मोकासे देशमुख्या वगैरे हक्क परत देऊन त्यानें दिलेल्या नेमणुकी वगैरे चालविण्याचें

कबूल केलें. पुढें लवकरच ६००० पायदळ व कांहीं तोफखाना इतकें लश्कर शिंद्याच्या रक्षणार्थ इंग्लिशांनीं ठेवावें आणि त्याच्या खर्चाबद्दल पूर्वीं लिहिलेल्या मुलकाशिवाय कांहीं मागूं नये असा करार होऊन मेजर मालकम साहे- इ० स० १८०४ फेब्रुआरी ता० २७
बाचे विद्यमानें तह ठरला.

१३ भरतपूर, जोतपूर, जयपूर, माचेरी, आणि बुंदी एथील राजांशीं इंग्लिश सरकारानें तह केले होते, त्यांत त्यांजकडून कांहीं खंडणी न घेतां व आंतील कारभारांत दखलगिरी न करितां त्यांचें परशत्रूंपासून रक्षण करावें; व इंग्लिशांवर समय पडला असतां त्यांनीं मदत करावी, ह्याप्रमाणें करार झाला. गोहदच्या राण्याचा मुलूक अंबाजी इंगळे ह्याजकडे शिंद्यानें वहिवाटीस दिला होता, तो सरदार लढाईचे वेळेस इंग्लिशांस येऊन मिळाला, ह्मणून त्यानें त्यापैकीं निमे आपण ठेवून बाकी राण्यास द्यावा; व राण्यानें इंग्लिशांच्या तीन पलटणी चाकरीस ठेवून त्यांच्या खर्चाबद्दल दरमाहा पाऊण लक्ष रुपये द्यावे असा त्याकडून इंग्लिशांनीं करार करून घेतला. ग्वाल्हेरचा किल्ला आणि शहर हीं इंग्लिशांनीं आपल्यापाशीं ठेविलीं.

१४ ह्या लढाईनें इंग्लिशांचा पराक्रम सर्व हिंदुस्थानांत प्रसिद्ध झाला, व त्यांस नवें राज्य बहुत मिळालें. त्याशिवाय पेशवा, निजाम, गायकवाड, गोहदचा राणा वगैरे ह्यांजकडे ठेवलेल्या २४,००० फौजेचा खर्च बाहेर पडून समय

पडेल त्यावेळीं ती फौज पुनः आपल्या उपयोगास यावी असा इंग्लिशांचा स्वार्थ झाला.*

## प्रकरण १५.

**मार्किस वेल्सली ह्याचे कारकिर्दीची समाप्ति. मार्किस कार्नवालिस व सर जार्ज बार्लो ह्यांच्या कारकिर्दी. होळकराशीं लढाई—शिंद्याशीं तह—होळकराशीं तह.**

इ० संन १८०४ पासून संन १८०७ पर्यंत.

१ **यशवंतराव होळकर** हा कंपनीचे स्नेही जे **जयपूरकर** वगैरे राजे ह्यांच्या मुलकांत जाऊन लुटूं लागला; आणि तो **गवर्नरजनरल साहेबांच्या** मर्जीप्रमाणें तहास कबूल होईना; ह्मणून त्याशीं लढाई करण्याविषयीं त्यांनीं **जनरल लेक साहेब** व **जनरल वेल्सली साहेब** ह्यांस हुकूम केले.

इ० स० १८०४ ता० १६ एप्रिल २ त्याप्रमाणें **जनरल लेक साहेब** सैन्यासहित निघून **यशवंतराव जयपुराजवळ** होता तेथें गेला. तें **होळकरास** समजतांच तो तेथून निघून पूर्वेकडेस चालला, तो **कोट्याजवळ** येऊन राहिला; परंतु तो समोर येऊन युद्ध करीना. इकडे **इंग्लिशांचे** फौजेचे एके टोळीनें **रामपूर** घेतलें. नंतर पर्जन्यकाळ समीप आल्यामुळें **जनरल लेक साहेब** बहुतेक लश्कर घेऊन **कानपूर** एथें येऊन राहिला, आणि **होळकरानें** केवळ चढाव न करावा ह्मणून **कर्नल मान्**-

ता० १६ मे

* ह्या प्रकरणांत व पुढील प्रकरणांत वर्तमानें लिहिलीं त्याविषयीं विशेष विस्तार मराठ्यांचे बखरेंत पाहावा—भाग २०. आणि २१.

**सन** नामें साहेब ह्यास त्यानें पांच पलटणें व तीन हजार स्वार, आणि कांहीं तोफखाना इतकें देऊन तो मागें ठेविला. जुलै महिन्याच्या आरंभीं **हिंगळाजगडा**जवळ तो साहेब व **होळकर** ह्यांचीं लश्करें एकमेकांचे समीप आलीं. तो किल्ला **इंग्लिशांनीं** घेतला, परंतु पुढें थोड्या दिवसांनीं **होळकर चंबळानदी** उतरून आलिकडे आला. त्यावर हल्ला करावा तर **मान्सन साहेबा**जवळ अन्न व सामान ह्यांचा पुरावा नव्हता, आणि **होळकराची** फौज फार; ह्याकरितां त्यानें तेथून निघून जाण्याची मसलत केली. त्याच्या पायदळानें कूच करितांच मागें स्वार होते त्यांवर **होळकरानें** हल्ला करून त्यांचा मोड केला, आणि त्यांचा सरदार **लेफ्टेनट लुकन** व दुसरे कितीएक साहेब ह्यांस धरून कैद केलें. इकडे पाऊस, वाटेनें चिखल, दाणा वैरणीचा तोटा, आणि अशांत वारंवार **होळकर** येऊन हल्ले करीत असे, ह्या कारणांमुळें **मान्सन साहेबाची** फार विपत्ति व लोकांचा नाश होऊन जुलै महिन्याचे अखेरीच्या सुमारें तो **रामपुरास** येऊन पोहोंचला. पुढें तो **खुशालगडा**कडे जात असतां **बनास** नदीच्या कांठीं त्यास आपलें सामान मागें टाकून पळून जावें लागलें. असा तो **मान्सन साहेब** मोठ्या संकटानें **आग्र्यास** येऊन पोहोंचला.

जुलै ता० ८

आगस्त ता० २२

३ नंतर **होळकरानें** येऊन **मथुरा** घेतली. **जनरल लेक साहेब** तेथें गेला तों तो तेथून निघून गेला, आणि त्याच्या पायदळानें जाऊन **दिल्लीस** वेढा घातला. त्या किल्ल्याची तटबंदी मजबूत नव्हती, व आंत लश्कर थोडें व

सप्तेंबर

काळ्या लोकांचें होतें; तथापि त्यांनीं कितीएक वेळां बाहेर
ता० १४ येऊन हल्ले केले. सहा दिवसपर्यंत खटपट करून तटास
वाट पाडल्यावर **होळकराचे** लोक शिड्यांवरून चढत असतां त्यांतून बहुतांस किल्लेकऱ्यांनीं मारिलें, त्यामुळें बाकीचे मागें हटून दुसऱ्या दिवशीं तेथून निघून गेले. ह्या संधीस **इंग्लिशांनीं दिल्लीचा** जुना बादशाह **शाहआलम** ह्यास ९०,००० रुपये सालीना नेमणूक ठरावून दिली; आणि त्यास संतोष वाटण्याकरितां **दिल्ली शहर** व जवळचा थोडा प्रांत ह्यांचा कारभार बादशाहाच्या नावें व्हावा आणि त्याचें उत्पन्न जसजसें अधिक होईल तसतशी त्याची नेमणूक अधिक व्हावी असें ठरविलें. त्या नंतर दोन वर्षांनीं **शाहआलम** फार वृद्ध होऊन मरण पावला, आणि त्याचे गादीवर त्याचा मुलगा **अकबरशाह** बसला; त्यास कांहीं वर्षांनीं पंधरा लक्ष रुपये नेमणूक मिळूं लागली.

४ इकडे दक्षिणेंतून **जनरल वेल्सली साहेब कलक-**
अकटोबर **त्त्यास** कांहीं मसलतीकरितां निघून गेला,* व **मद्रास** आणि **महिसूर** ह्या इलाख्यांची फौज तिकडे परत रवाना झाली. बाकी राहिलेल्या फौजेसहित **कर्नल वालस साहेबानें** जाऊन **चांदवड, गालना** वगैरे बहुतेक **होळकराचा** दक्षिणेंतील मुलूक घेतला; आणि **कर्नल मरे साहेब** ह्यानें **गुजराथेकडून**

* ह्यानंतर पुढें लवकरच वेल्सली साहेब विलायतेस गेला. तेथें मोठा कलह चालला होता, त्या युद्धांत फार पराक्रम करून तो ड्यूक आफ् वेलिंग्टन असें मोठें पद पावला; आणि तें युद्ध समाप्त झाल्यावर कितीएक वर्षेंपर्यंत मुख्य प्रधानाच्या कामावर होता. तो सांप्रत लष्करच्या मुख्य सेनापतीच्या अधिकारावर आहे.

जाऊन **माळवा** प्रांत हस्तगत केला. पुढें **दीग** किल्यापासून जवळ **गोवर्धन** एथें **होळकर** व **जनरल फ्रेझर साहेब** ह्यांची लढाई होऊन **होळकराचा** पराजय झाला. त्या लढाईंत **इंग्लिशांचे** सुमारे ३५० लोक जायां झाले, व **फ्रेझर साहेबास** जखम लागली, तेणेंकरून तो पुढें लवकरच मेला. परंतु शत्रूचा नाश ह्यापेक्षां अधिक झाला. कितीएक लोक जवळ तळें होतें त्यांत बुडाले; बाकीचे **दीग** किल्यांत जाऊन राहिले; व **होळकर** खुद्द स्वारांसहित **यमुनेकडे** पळून गेला. त्याचा पाठलाग कांहीं वेळपर्यंत **कमांडर इन्चीफ लेक साहेब** ह्यांनीं करून पुढें **दीग** हा किल्ला वेढा घालून व हल्ला करून घेतला.

ता० १२ नवेंबर ता० १३ दिसेंबर ता० २३

५ **दीग** हा किल्ला **जाटांचा** मुख्य जो **भरतपूरचा** राजा **रणजितसिंग** ह्याचा होता. त्या राजाचा व **इंग्लिशांचा** पूर्वीचा तह असतां त्यानें त्या किल्यांत **होळकराच्या** लोकांस आश्रय दिला, व लढाईंत सर्व प्रकारें **होळकरास** कुमक केली; ह्यामुळें त्याचें पारिपत्य करण्याचा निश्चय करून **जनरल लेक साहेबानें भरतपुरास** वेढा घातला. तो किल्ला घेण्याकरितां **इंग्लिशांचे** फौजेनें वाटा पाडून कितीएक वेळां हल्ले केले, परंतु उपाय चालला नाहीं; आणि दारू गोळा वगैरे सामानाचा तोटा पडल्यामुळें पुढें उद्योग न चालतां फौज तशीच तीन महिनेपर्यंत तेथें होती; तीस **होळकर** व त्याचा सरदार **अमीरखान** हे उभयतां वारंवार उपद्रव करीत असत. शेवटीं सामानाचा वगैरे पुरावा होऊन पुढें किल्ला घेण्याचा प्रयत्न पुनः चालू व्हावा, इतक्यांत रा-

इ० स० १८०५ जानुआरी

जानें तहाचें बोलणें सांगून पाठविलें. तें कबूल होऊन तह
एप्रिल ता० १० ठरला कीं, राजानें लढाईच्या खर्चाबद्दल हप्त्यांनीं वीस लक्ष रुपये द्यावे; व पूर्वी **इंग्लिशांनीं** दिलेला मुलूक परत द्यावा; आणि कबूल केल्याप्रमाणें राजा स्नेहानें वागेल ह्याची खातरी होईपर्यंत **दीग किल्ला इंग्लिशांकडे** असावा.

६ **भरतपूरचा** राजा **इंग्लिशांस** मिळाल्यावर **होळकरानें शिंद्याशीं** विशेष स्नेह केला, आणि त्या दोघांच्या फौजा एकवटून त्या **अजमीराकडे** चालल्या. **शिंद्याचा** व
जून **इंग्लिशांचा** विघाड होण्याचीं कारणें बहुत होतीं. त्यांत **गोहदच्या राण्यास** कांहीं मुलूक न द्यावा व आपणास **ग्वाल्हेरी** मिळावी ही **शिंद्याची** इच्छा होती; आणि त्यानें लढाईमध्यें मदत केली नाहीं, व उलटा **होळकराचा** पुस्तपन्हा राखिला, हा त्याजकडे **इंग्लिशांनीं** शब्द ठेविला होता. त्याचा दिवाण **सर्जेराव घाटगा** ह्यानें किंवा त्याच्या दुसऱ्या लोकांनीं **इंग्लिशांचा रेसिडेंट** ह्याचें घर लुटिलें होतें, तथापि **इंग्लिशांशीं** केवळ विघडूं नये ह्मणून तो त्यास जाण्यास निरोप देईना. शेवटीं उभयतांमध्यें युद्ध होण्याचा प्रसंग जवळ आला.

७ इतक्यांत **मार्किस वेल्सली साहेबानें गवर्नरजनरलाचें** काम सोडिलें; आणि त्या अधिकारावर **बिलायतेहून** पूर्वीचा **गवर्नरजनरल मार्किस कार्नवालिस** हा वृद्ध व
जुलै ता० ३० अशक्त सरदार ह्याची नेमणूक होऊन तो आला. त्यानें लढाईमुळें खर्च फार झाला व अधिक राज्यें घेऊन उपयोग नाहीं असा निश्चय करून **शिंदा** व **होळकर** ह्यांशीं तह करण्याविषयीं **जनरल लेक साहेबास** हुकूम केला. तो अम-

त्यांत येण्याच्या पूर्वी **गवर्नरजनरल साहेब गाजिपूर** एथें मरण पावला; आणि तो हुद्दा **कौन्सिलाचा** अधिकारी **सर जार्ज बार्लो** ह्याजकडे आला. अक्टोबर ता० ५ त्यानेंही **कार्नवालिस साहेबाप्रमाणेंच** विचार करून जलद तह करण्याविषयीं हुकूम पाठविले. त्याप्रमाणें **शिंद्याशीं मालकम साहेबाच्या** विद्यमानें तह ठरला. नवंबर ता० २३ त्याचीं कलमें अशीं कीं **ग्वाल्हेरी** व **गोहद** प्रांत **इंग्लिशांनीं शिंद्यास** परत द्यावा; **चंबळा** नदी ही **इंग्लिश** व **शिंदा** ह्या उभयतांच्या राज्यांची सीमा समजावी; **शिंद्याचा** मुलूक पूर्वीच्या तहाप्रमाणें **इंग्लिशांकडे** आला होता त्यांत त्याचे हक्क वगैरे होते ते त्यानें सोडावे, त्यांबद्दल **इंग्लिशांनीं** त्यास तीन लक्ष रूपये सालीना रोकड द्यावे, व त्याची बायको आणि मुलगी ह्या उभयतांस मिळून तीन लक्षांची जहागीर द्यावी. **माळवा, मेवाड,** व **मर्वाड** ह्या प्रांतांतील **शिंद्यास** खंडणी देणारे **उदेपूर, जोतपूर, कोटा** वगैरे जागच्या राजांशीं **इंग्लिशांनीं** तह करूं नये; व **शिंद्यानें तापी** व **चंबळा** ह्या नद्यांच्या मधला मुलूक **होळकरापासून** घेतला होता त्याविषयीं त्यांनीं कांहीं बोलूं नये.

८ **होळकराची दिल्लीवरची** मोहीम फसल्यापासून तो इ० स० १८०५ **जनरल लेक साहेबाच्या** लष्कराशीं समोर न लढतां त्यास टाळून पळत होता, व आक्टोबर महिन्यापासून तो **जनरल** त्याच्या पाठीसच लागला होता. तो जातां जातां शेवटीं **पंजाबांत** गेला. तेथें **शिकांचा** राजा **रणजितसिंग** ह्याजपासून मदत मिळण्याची निराशा झाल्यावर त्यानें तह करण्यासाठीं वकील पाठविले; आणि इकडे **लेक साहेबासही**

तह करण्याचा हुकूम झालाच होता, ह्मणून उभयपक्षीं बोलणीं ठरून बिया नदीच्या कांठीं रायपूरघाट एथें तहनाम्यावर सह्या झाल्या. त्या तहांतील मुख्य ठराव येणेंप्रमाणें.
दिसेंबर ता० २४ चंबळानदीचे उत्तरेच्या मुलकावरचा व बुंदेलखंड पुणें वगैरे विषयींचा दावा होळकरानें सोडावा; इंग्लिशांच्या सल्यावांचून आपल्या चाकरीस गोरे लोक त्यानें ठेवूं नयेत; सर्जेराव घाटगा ह्यास आश्रय देऊं नये; आणि इंग्लिशांच्या राज्यास उपद्रव केल्यावांचून ठरविलेल्या वाटेनें परत इंदुरास जावें. इकडे इंग्लिशांनीं चंबळा नदीचे दक्षिणेस होळकराच्या मुलकाविषयीं कांहीं हरकत करूं नये, व गोदावरी आणि तापी ह्यांच्या मधले जे किल्ले वगैरे होळकराकडून लढाईमध्यें जिंकून घेतले असतील ते परत द्यावे.

९ जयपूर व बुंदी एथील रजपूत राजांशीं पूर्वीं तह झाले होते, आणि त्यांचें संरक्षण करण्याविषयीं इंग्लिशांनीं वचन दिलें होतें त्याची गवर्नरजनरलास अडचण वाटून त्या राजांपासून होळकरानें खंडणी वगैरे घेऊन त्यांचें काय पाहिजे तें करण्यास होळकरास त्यानें मोकळीक दिली. पुढें चंबळा नदीचे उत्तरेकडील मुलकावरही होळकराचें स्वामित्व कबूल केलें; आणि मंचेरी व भरतपूर एथील राजांस कांहीं ज्यास्ती मुलूक देऊन त्यांचें रक्षण करण्याचे कबुलातीपासून आपली सोडवणूक करून घेण्याची मसलत केली; ती मसलत व इंग्लिशांच्या हातीं आलेला साऱ्या हिंदुस्थानाचा धनीपणा सर जार्ज बार्लो साहेब ह्यानें सोडून दिला,

ह्या गोष्टी कोणास योग्य वाटल्या नाहींत; व तेणेंकरून सर्व संस्थानिकांमध्यें **इंग्लिशांचा** दुर्लौकिक झाला.

१० इकडे **यशवंतराव होळकर परत इंदुरास** आल्यावर त्याचे फौजेचा खर्च निभेना ह्मणून सुमारें वीस हजार स्वारांस निरोप देण्याचें त्यास प्राप्त झालें. त्या वेळीं मागील तैनातींकरितां त्या स्वारांनीं अडून बसून व **मल्हाररावाचा** मुलगा **खंडेराव** ह्यास गादीवर बसविण्याची आवाई उठवून कांहीं फिसाद केली; परंतु **होळकरानें** आपल्या पायदळाच्या मदतीनें त्या बंडवाल्यांचा वंदोबस्त केला; व **जयपूरच्या** राजाकडून पैका उत्पन्न करून त्यांची बाकी फेडिली. ह्या फिसादीस साधन झालेला जो सात वर्षांचा अज्ञान बालक **खंडेराव** त्यास व त्याच्या भावास **यशवंतरावानें** मारून टाकिलें. पुढें लवकरच **यशवंतरावास** वेड लागलें तें तो संन १८११ मध्यें मरण पावला तोंपर्यंत गेलें नाहीं. तो मेल्यावर राज्याचा कारभार त्याची राख **तुळजाबाई** व त्याचा लुटारू सरदार **अमीरखान** हीं उभयतां **यशवंतरावाचा** मुलगा **मल्हारराव** ह्याच्या नावानें करूं लागलीं. त्यांत **मराठे** व **पठाण** अशा फौजेमध्यें दोन फळ्या पडून कलागती खून वगैरे कर्में होऊं लागलीं. इ० स० १८०६

११ **शिंद्यानें** आपले फौजेस तालुके लावून दिले, त्यामुळें ते मनास येईल तसा रयतेवर जुलूम करून पैका काढूं लागले. **निजामाच्या** दरबारचा दिवाण **मीरआलम** हा बरतरफ होऊन **इंग्लिशांशीं** विघाड करण्याकरितां तेथें कांहीं मसलत चालली होती, परंतु तें वर्तमान **रेसिडेंटास** सम-

जून लवकर बंदोबस्त झाल्यामुळें ती मसलत फसली. **पेशव्याच्या** दरबारांतील कारभार **सदाशिवमाणकेश्वर** पाहूं लागला, व **बापू गोखला** फौजेचा मुख्य सरदार झाला.

१२ **मद्रासेस लार्ड विलियम बेंटिक साहेब** हा गवर्नर असतां फौजेनें नवे तऱ्हेचीं पागोटीं घालावीं व दाढ्या
इ० स० १८०६ काढाव्या असा हुकूम झाला, त्यामुळें साऱ्या लोकांस **ख्रिस्ती** करणार अशी आवई उठून फौजेमध्यें फिसाद झाली; आणि **वेळूरास टिपूचे** मुलगे होते ते आंत सामील झाल्यामुळें फार बखेडा माजून ११३ **इंग्लिश** सरदार व आणखी गोरे लोक बहुत मेले. पुढें त्याच दिवशीं **अर्काटाहून** सुमारें ४०० लोक घेऊन **कर्नल गिलेस्पी साहेब** आला त्यानें त्या फिसादवाल्यांतून सुमारें ३५० लोक मारून पाडिले, तेव्हां तो अनर्थ शांत झाला. अशी फिसाद पुनः न व्हावी ह्मणून सरकारानें **टिपूचे** मुलगे **वेळुराहून** काढून **कलकत्त्यास** नेऊन ठेविले.

१३ **वेल्सली साहेबाचे** कारकिर्दीचे अखेरीस ह्मणजे इ० संन १८०४|५ ह्या वर्षी सरकारची एकंदर जमा १५, ४०,३४,०९० रूपये झाली, व एकंदर खर्च १७,६७,२०, ९७० रूपये आकारला. संन १७९२|३ पासून जमा व खर्च हीं कशीं वाढत गेलीं हें समजण्याकरितां ह्याचा तपशील खालीं लिहितों.

| वर्ष. | | जमा. | खर्च. | विलायतेंतील कर्ज. | हिंदुस्थनांत कर्ज. | एकंदर कर्ज. |
|---|---|---|---|---|---|---|
| १७९३ | ९४ | ८२७६७७०० | ७०६६९२४० | ७९९१०७८० | ७९७१६६५० | १५९६२७४३० |
| १७९७ | ९८ | ८०५९८८०० | ७४११४०१० | ७९१६४५९० | ९१४२७३३० | १७०५९१९२० |
| १८०५ | ०६ | १५४०३४०९० | १५५६१३२८० | ६०१२१९६० | २५६२६६३१० | ३१६३८८२७० |

वर जमाखर्च लिहिला त्यांत राज्य व व्यापार ह्या दोहों संबंधें रकमा आल्या; परंतु व्यापारामध्यें बहुत करून ने-

हेंही नफाच होत असे. त्यांतून कंपनीचा नफा काढून घेऊन कांहीं राज्याच्या कामास लागत असे, असें हिशोबावरून दिसतें. असें असतां कर्ज वाढलें व खर्च ज्यास्ती झाला ह्या दोहोंचें कारण कोणतं असें कोणी विचारील, तर लढाईच्या व राज्यें नवीं मिळालीं त्यांच्या खर्चास वसुलाचा पैका न पुरे ह्यामुळें दरवर्षी तोटा येऊं लागला ह्मणून कर्ज वाढलें असें समजावें.

१४ जरी वसुलाची शिलक राहूं लागली नाहीं, तरी लश्करासुद्धां तीस हजार इंग्लिश लोकांचा चरितार्थ हिंदुस्थानांत चालून त्यांचे सरदार आपल्या कुटुंबांच्या निर्वाहाकरितां बहुत द्रव्य हिंदुस्थानांतून विलायतेस पाठवूं लागले. व्यापार वाढला हाही हिंदुस्थानाच्या राज्यांपासून इंग्लिश लोकांचा मोठा फायदा झाला. वसुलांपैकीं शिलक अद्यापि राहूं लागली नाहीं. ती जर कधीं पुढें दृष्टीस पडली, तर ती विलायतेस न पाठवितां लोकांवरचे कर कमी करावे; रस्ते, तळीं, धर्मशाळा वगैरे धर्मकृत्यें करावीं; विद्याभ्यासाचें काम अधिक वाढवावें; व ह्याप्रमाणें आणखी दुसऱ्या प्रकारें लोकांचें कल्याण करावें, हेंच सरकारास योग्य आहे; आणि ह्याप्रमाणेंच सरकार करील अशी सर्वांस आशा आहे.

# प्रकरण १६.

## लार्ड मिंटो साहेब ह्याची कारकीर्द.

इ० सं० १८०७ पासून सं० १८१३ पर्यंत.

१ **लार्ड मिंटो साहेब** ह्याची **गवर्नरजनरलाच्या** अधिकारावर नेमणूक होऊन तो सं० १८०७ च्या जुलै महिन्यांत **कलकत्त्यास** येऊन पोहोंचला. तो कामावर येऊन दाखल झाल्या नंतर लवकरच त्याचे दृष्टीस आलें कीं पूर्वींचे कारकिर्दींत श्रेष्ठपणा सोडून देऊन संस्थानिकांच्या कारभारांत मन न घालण्याविषयीं ठराव केला होता त्याप्रमाणें चाललें असतां राज्यास मोठा अपाय होईल; आणि **रजपूत** संस्थानी वारंवार आपले अवस्थेची हकिकत लिहून पाठवून **दिल्लीपतीच्या** मागें इंग्लिश सरकारानें आमचा बचाव करावा, नाहींतर शेजारच्या प्रबळ राजांच्या पराक्रमाखालीं आह्मी चुरडले जाऊं असें ह्मणूं लागले; ह्यामुळें पूर्वींप्रमाणें सर्व राजांवर धनीपणा राखून वागण्याचा निश्चय नव्या **गवर्नरजनरल साहेबांनीं** केला.

२ **हैदराबादेच्या** दरबारांतील **निजामाचा** वजीर **मीरआलम** हा मरण पावल्यानंतर त्या अधिकारावर **मुनीरउल्मुल्क** ह्मणून कोणी उमराव नेमून हिशोबाचा वगैरे कारभार पाहाण्याकरितां **चंदूलाल** नामें कायस्थ ब्राह्मण सरकारानें नेमिला. तो हिशोब वगैरेच्या कामांत फार हुशार; आणि मुनीरउल्मुल्क हा गर्भश्रीमंत, मुसलमानांचे चाली- इ० स० १८०७

प्रमाणें उन्मत्त आणि आळशी होता, ह्मणून बहुतेक कारभार चंदूलाल ह्याच्या हातीं आला. त्यानें इंग्लिश सरकाराशीं स्नेह ठेवून फौजेच्या निर्वाहाकरितां तनके तोडून दिले, त्यामुळें इंग्लिश सरकारचे फौजेप्रमाणें निजामाचे फौजेचा बंदोबस्त होऊन तिची देखरेख रेसिडेंट साहेब पाहूं लागला. ह्या फौजेचें बळ चंदूलालास झालें, व परशत्रूची किंवा रयतेची धास्ती कांहीं मनांत राहिली नाहीं; ह्यामुळें मुलकी कारभारामध्यें त्यानें फार अव्यवस्था व जुलूम करण्याचा आरंभ केला. तो क्रम अद्यापि चंदूलाल मेला तरी तसाच चालला आहे.

इ० स० १८०७ ३ बाजीराव पेशवा परत गादीवर आला तेव्हांपासून तो पटवर्धन वगैरे दक्षिणेकडील जहागिरदार ह्यांशीं विरोध करून त्यांचे सरंजाम जप्त करण्याच्या उद्योगास लागला होता; आणि तो त्या कार्याकरितां इंग्लिशांची मदत मागत असे. परंतु हे जहागिरदार मोडावे ही मसलत इंग्लिशांचे विचारास न येऊन रेसिडेंट साहेबानें त्या गोष्टीविषयीं उभयतांमध्यें मध्यस्थी केली, आणि ठराव झाला कीं उभयतांनीं मागील तंटे काढूं नयेत; पेशवा ह्यानें त्यांचे सरंजाम चालवावे; त्यांनीं जो नवा मुलूक घेतला असेल तो सोडून देऊन संप्रदायाप्रमाणें कारण पडेल तेव्हां फौजेसहित युद्धास सिद्ध असावें; आणि ह्याप्रमाणें ते चालतील तंवपर्यंत त्यांच्या व त्यांच्या लोकांच्या बचावाविषयीं इंग्लिशांची बाहादारी असावी.

४ बोनापार्ट ह्यानें इराणांत वकील पाठवून तह केला हें

समजून **इंग्लिशांस** धास्ती उत्पन्न झाली. ह्मणून **गवर्नर-जनरल साहेब** ह्यांनीं पूर्वीं एकवेळ **इराणास** वकिलातीवर पाठविलेला जो **मालकमसाहेब** ह्यासच तेथें पुनः पाठविलें; इ० स० १८०८
परंतु तेथील राजा **फत्तेअल्लीशाह** ह्यानें त्यास **तेहेरानास** येण्याची परवानगी दिली नाहीं; व **शीराझ** एथें **शाहाजा-द्यासीं** काय बोलावयाचें असेल तें बोलावें, हा त्यानें आग्रह धरल्यामुळें **मालकम साहेबास** परत यावें लागलें. तथापि विलायतच्या राजाकडून त्याच संधीस **इराणांत** वकील आला होता, त्याच्या विद्यमानें **शाह** ह्याचा व **इंग्लिश** सरकारचा इ० स० १८०९
तह ठरला कीं तो **शाह** व **रशिआ** देशचा राजा ह्यांचें युद्ध चालेल तंवपर्यंत **इंग्लिशांनीं** त्यास दर वर्षास दहा लक्ष रुपयांची कुमक करावी; सोळा हजार बंदुका व चौ-वीस तोफा व **शाह** ह्याची फौज तयार करण्याकरितां कांहीं गोलंदाज आणि सरदार हे द्यावे; **फ्रेंचांनीं हिंदुस्थानावर** स्वारी केल्यास त्यांस हटविण्याकरितां **शाह** ह्यानें कुमक करावी.

५ नंतर वर लिहिलेल्या धास्तीमुळेंच **गवर्नरजनरल** ह्यानें **एल्फिन्स्तन् साहेब काबूल** एथें वकिलातीवर पाठ- इ० स० १८०९
विला; त्यानें तेथील राजा **शाहसुजा** ह्याशीं स्नेहाचा तह ठरविला. परंतु ह्यानंतर तो लवकरच पदच्युत होऊन त्यास **इंग्लिशांच्या** आश्रयास येऊन राहावें लागलें.

६ **त्रावणकोर** एथील संस्थानच्या खर्चाची व्यवस्था इ० स० १८०८
नीट राहण्याकरितां आणि खंडणी यावयाची ती वेतानें ये-ण्याकरितां **इंग्लिश** सरकारानें संस्थानची फौज वगैरे कमी

करण्याचा आग्रह धरून सला केला, ह्यामुळें तेथील दिवाणानें इंग्लिशांशीं वैर आरंभिलें; राजाच्या लोकांनीं रेसिडेंटाच्या बंगल्यावर हल्ला केला; इंग्लिशांचे कितीएक शिपाई आलपई बंदरीं चुकून उतरले त्यांच्या गळ्यांत दगड बांधून त्यांस पाण्यांत बुडविलें; आणि कोचींचा राजा आपल्या मिळणीस मिळविण्याविषयीं उद्योग चालविला. परंतु संन
इ० स० १८०९ १८०९ च्या जानुआरी महिन्याचे पंधरावे तारखेस दिवाणाचा केवळ पराजय झाला, आणि फेब्रुआरी महिन्याच्या आंत कितीएक किल्लेही इंग्लिशांनीं जिंकून घेतले, त्यामुळें तो दिवाण रानांत पळतां पळतां एका देवळांत त्यानें आपणास मारून घेतलें. नंतर राजाचा इंग्लिशांशीं तह झाला; आणि बादशाही १२ वे रेजमेंटाचे ३४ लोक दिवाणाच्या ज्या भावानें आलपई एथें बुडवून मारिले होते, त्यास राजानें त्या रेजमेंटाचे समक्ष फांशीं दिलें.

इ० स० १८०९ ७ बुंदेलखंडामध्यें राजे व जमिनदार ह्यांचे अव्यवस्थेमुळें लुटारू लोकांचा उपद्रव फार झाला होता, ह्मणून इंग्लिश सरकारानें तेथें फौज पाठवून अजगड व कालिंजर हे किल्ले घेतले. नंतर तेथील बंदोबस्त होऊन जमिनदार वगैरे इंग्लिश सरकारच्या हुकमांत वागूं लागले. शिकांचा सरदार रणजितसिंग ह्याशीं इंग्लिशांनीं प्रथम ह्या वर्षी तह
इ० स० १८०९ केला; तो असा कीं सतलज नदी ही उभयतांच्या राज्यांची सरहद्द असावी; तिच्या पश्चिमेस व उत्तरेस इंग्लिशांनीं दखलगिरी ठेवूं नये; व तिच्या डाव्या तिरास जो त्याचा मुलूक असेल त्यांत वसुलाच्या कामास लागेल त्यापेक्षां अधिक

फौज ठेवूं नये; व तेथील **शीक** सरंजाम्यांस उपद्रव देऊं नये.

८ ह्या सुमारें **मद्रासेस** लष्करामध्यें कांहीं खर्च व नेम- इ० स० १८०९
णुका तोडण्याविषयीं तेथील **गवर्नर** सर **जोर्ज बार्लो** ह्यानें हुकूम केल्यावरून मोठें बंड झालें. **गवर्नर** साहेबानें केलेल्या हुकमास आह्मी राजी असा कागद लिहून घेण्याचें गवर्नरानें चालविलें, त्यावर काळ्या पलटणींच्या सरदार साहेबलोकां पैकीं दोन तृतीयांश सह्या न घालतां रुसून बसले, आणि त्यांनीं **श्रीरंगपट्टण** घेतलें. त्या लश्कराच्या बंदोबस्तास सरकारानें गोरे लोक पाठविले, ह्यांची व त्यांची गोळागोळी झाली, आणि बंड कोठपर्यंत पोहोंचतें हें ध्यानांत येईना. अशा संधीस **गवर्नरजनरल साहेब मद्रासेस** आले; त्यांवर सर्व फौजेची प्रीति होती, व त्यांनीं बंडांतील **मोहोरकाढे** शिवाय करून सर्वांस माफी करण्याचा जाहिरनामा लाविला; ह्यामुळें लवकरच त्या बंडाची शांति झाली.

९ **फ्रेंचांकडून बुर्बों** व **मारिशस** हीं बेटें **इंग्लिशांनीं** इ० स०
जिंकून घेतलीं; आणि **डच** ह्यांचें **जावा** बेट घेण्यास अ- १८१०
रमार व सैन्य रवाना केलें. त्या सैन्यासीं **बटेविआ** एथील इ० स०
**गवर्नर** मोठ्या शौर्यानें पाऊण महिनापर्यंत लढला; शेवटीं १८११
तें सर्व बेट **इंग्लिशांनीं** हस्तगत करून पांच हजार **डच** आगस्त ता० २६
लोक कैद केले.

१० लार्ड **मिंटो साहेब** ह्याचे कारकिर्दीत **अमीरखान** ह्यानें पेंढारी जमवून **भोंसले** वगैरे ह्यांच्या राज्यांत उपद्रव करण्याचें आरंभिलें; आणि **नेपाळच्या** राजाचे कामदार

गोरखपूर व सारण एथील इंग्लिशांचे रयतेस वारंवार लुटून त्रास देऊं लागले. ह्या दोन्ही गोष्टींचा बंदोबस्त करण्याची मसलत गवर्नरजनरल ह्यानें केली, परंतु ती सिद्धीस जाण्याचे पूर्वीं तो लार्ड मिंटो साहेब काम सोडून परत विलायतेस निघून गेला, आणि पुढें लवकरच मरण पावला.

इ० स० १८१३

११ त्याच्या राज्यांत जरी मोठी लढाई झाली नाहीं तरी त्याचें चातुर्य आणि मसलत ह्यांची कीर्ति त्याचे मागें राहिली.

## प्रकरण १७.

### लार्ड माइरा ऊर्फ मार्किस आफ् हेस्तिंग्स ह्यांची कारकीर्द.

### नेपाळची लढाई.

इ० संन १८१४ पासून संन १८१५ पर्यंत.

इ० स० १८१३ जुलै ता० १३

१ विलायतेमध्यें कंपनीने आणखी वीस वर्षेंपर्यंत हिंदुस्थानच्या राज्याचा कारभार करण्याविषयीं पार्लमेंटांत विचार होऊन ह्या वर्षीं तीस नवी सनद मिळाली. त्या सनदेंत आणि मागच्या सनदांत भेद इतकाच कीं हिंदुस्थानचा व्यापार कंपनीनेच करावा अशी जी पूर्वीं बंदी होती ती रद्द होऊन पाहिजे त्या लोकांनीं हिंदुस्थानचा व्यापार करावा अशी मोकळीक झाली. पुढें कांहीं महि-

आक्टोबर

न्यांनीं लार्ड माइरा साहेब हे कलकत्त्यास गवर्नरजनरलाच्या कामावर येऊन दाखल झाले. त्यांनीं भोपाळ एथील

नवाब व सागरचा राजा ह्यांस आश्रय देण्याचें कबूल करून त्यांशीं तह केला, ह्यामुळें शिंदा व नागपूरकर रघुजी भोंसला ह्यांची त्या उभतांच्या नाशाविषयींची मसलत फसली.

२ नेपाळ ह्मणजे हिंदुस्थान आणि तातार देश ह्यांच्या मधला पाहाडी मुलूक हा पहिल्यापासून कितीएक राजांच्या स्वाधीन असे. त्यांतून बहुतेक राजांस पराजित करून पृथुनारायण शाह नामक सरदारानें संन १७६८च्या सुमारें बहुतेक प्रांत हस्तगत केले. त्यानें इंग्लिशांप्रमाणें फौजा ठेविल्या, आणि काठमांडू एथें सूर्यवंशी राजा राज्य करीत होता, त्याचे गादीवर तो आपण बसला. त्यानंतर चार पिढ्या झाल्यावर कर्मयोध विक्रमशाह नामें अल्पवयस्क राजा संन १८०५ मध्यें गादीवर आला, त्याचा कारभार भीमसिंग नामें सरदार करीत असतां इंग्लिशांचे सरहद्दीवरचे रयतेस व संस्थान्यांस नेपाळी लोकांनीं उपद्रव दिल्हा व सरहद्दीवरचे बावीस गांव घेतले; ह्यामुळें त्यांशीं कलह उपस्थित झाला. त्यांत राजाच्या कामदारांकडून आगळिकी झाल्या, व बुतवाल एथील इंग्लिशांचें ठाणें त्यांनीं मारिलें; इ० स० १८१४ त्याविषयीं गवर्नरजनरल साहेबांनीं राजास लिहून पाठविलें त्याचें उत्तर अभिमानाचें आलें, त्यामुळें युद्धाचा प्रसंग प्राप्त झाला. नंतर सुमारें २९००० कवाइतदार फौज व चवऱ्याहत्तर तोफा, व सुमारें १०,००० मुलकी फौज इतकी तयार करण्याचा बेत करून तिच्या चार टोळ्या केल्या. त्यांतून पहिले टोळीचे सरदार जनरल मार्ली साहेब व कर्नल ब्राड्शा साहेब हे होते, व ह्या फौजेनें पाटणेहून

समोरचा घाट चढून **नेपाळची** राजधानी **काठमांढू** हिजवर जावें; दुसरी टोळी **जनरल वुड साहेब** ह्याची, तिनें **काशी** व **गोरखपूर** एथून **बुतवाल** प्रांतांतून **पालप्यापर्यंत** जावें; तिसरी टोळी घेऊन **जनरल गिलेस्पी साहेब** ह्यानें **दुआबेंतील मिरथ** एथून निघून **देरादून** ही खिड हस्तगत करून पाहाडा खालचे किल्ले **गरवाळ** व **श्रीनगर** ह्यांवर आणि **यमुनेचे** पश्चिमेकडील शहर **नाहान** ह्यावर एकदांच शह द्यावा; आणि चवथी टोळी **जनरल आक्टर्लोनी** ह्याची, ह्या टोळीनें **लुधिआना** एथून निघून **सतलज** नदीचे वरचे बाजूच्या मुलकांत शिरावें. ह्याप्रमाणें एकदांच लढाईचीं चार तोंडें चालावीं असा हुकूम झाला, व **कपतान लाटर** नामें साहेब ह्याजवळ सुमारें २७०० लोक देऊन त्यानें **कुशनिदीपासून ब्रह्मपुत्रापर्यंत** इंग्लिश सरहद्दीचें रक्षण करावें अशी नेमणूक झाली.

३ **जनरल गिलेस्पी साहेबानें** साडेतीन हजार लोक
आक्टोबर व चवदा तोफा ह्यांसहित **देरादून** नामक खिडीवर आरंभीं स्वारी केली, आणि **डेराशहर** हस्तगत करून **कलंग** ह्मणजे **नलापानी** नामें जो किल्ला तो घेण्याचा उद्योग आरंभिला; परंतु तेथें **बळभद्र सिंग** नामें शूर किल्लेकरी होता त्याच्या
ता० ३० पराक्रमापुढें ह्याचें कांहीं चाललें नाहीं. **कलंगावर** पहिला हल्ला झाला, तेव्हां हुकमांत कांहीं चूक झाल्यामुळें तो हल्ला फसून **जनरल गिलेस्पीसाहेब** ह्यास लोक घेऊन आपण स्वतां जावें लागलें. त्यास **गुर्खा** सरदार ह्यानें दोनवेळ माघारां हटविलें, आणि शेवटीं तो **जनरल साहेब** दरवाज्या-

जवळ जाऊन पोहोंचला, इतक्यांत त्यास गोळी लागून तो पडल्यामुळें फौज मागें हटून पळ सुटला. पुढें तीन वारपर्यंत तो किल्ला घेण्याकरितां तोफांची वगैरे तयारी करून व तटास वाट पाडून मुख्य सरदाराच्या अधिकारावर झालेला **कर्नल मौब्रे साहेब** ह्यानें फिरून हल्ला केला, त्या वेळीं पुनः पराजय झाला. असें कितीएक वेळां झाल्यानंतर आंतील सहाशें किल्लेकऱ्यांपैकीं ७० मात्र राहिले, ते वेळीं ते किल्ला सोडून निघून गेले, आणि त्यांत मागाहून इंग्लिश शिरले. पुढें मुख्य सरदाराच्या कामावर **जनरल मार्टिंडेल्ल साहेब** आला; त्यानें **नाहन** ह्यावर स्वारी केली, तें तर शत्रूंनीं लागलेंच सोडून दिलें; परंतु तेथील किल्लेकरी **रणजोरसिंग थापा** हा २२०० लोकांसहित **जैठक** नामें उंच डोंगरी किल्ला ह्यावर जाऊन **इंग्लिशांची** वाट पाहात राहिला. त्यावर **इंग्लिशांनीं** दोन बाजूंनीं एकदांच हल्ले केले, ते दोनही फसले. हल्ला करावयास गेलेल्या लोकांतून बहुत पडून बाकीचे माघारां हटले; व एक कंपनी आणि तिचा सरदार **लेफटेनेंट थाकरी** नामें हटणाऱ्यांच्या रक्षणार्थ राहिला होता, त्याचेही लोक आणि तो पडला. त्यावेळीं रान, काळोख, आणि जयानें उन्मत्त झालेले शत्रु पाठीवर, अशा अडचणींत लश्कराचा बहुत नाश होऊन शेवटीं तें तळावर येऊन पोहोंचलें. ह्या नंतर **जनरल मार्टिंडेल्ल** ह्यानें कितीएक वेळां तो **जैठक** किल्ला घेण्याकरितां प्रयत्न केला; परंतु त्याच्यानें शत्रूंच्या वाटा बंद होईनात, व हल्ला करून तो किल्ला घेण्याची युक्ति चालेना, ह्मणून त्याचें

नोवेंबर ता० २७

दिसेंबर ता० २७

लश्कर पर्जन्यकाळापर्यंत तेथें कांहीं जय न मिळवितां तसेंच राहिलें.

४ जनरल वुड साहेबाचें लश्कर ५००० कवाइती लोक व सुमारें ९०० मुलकी लोक आणि बारा तोफा इतकें होतें, त्यास प्रथम ओझ्याचीं जनावरें मिळालीं नाहींत ह्मणून कांहीं अवकाश होऊन मागाहून अयोध्येच्या नवाबानें हत्ती व ओझें वाहणारे दिल्यावर तो कनकनंदी नावाच्या कोणी ब्राह्मणानें सांगितलेल्या वाटेनें सालजंगलांतून जात असतां एकाएकींच जीतगड नामें एक किल्ला होता त्यापुढें शत्रूंनीं
इ० स० १८१५ जानुआरी तारीख ३ त्याच्या लश्करावर गोळ्यांची वृष्टि केली, तिणेंकरून फार नाश झाला. तथापि त्याच्या लोकांनीं दोनही बाजूंनीं शत्रूंची फळी फोडीत आणली होती, इतक्यांत जनरल साहेबानें भिऊन फौजेस मागें हटण्याचा हुकूम केला. ह्याप्रमाणें पराजय झाल्यानंतर तो पश्चिमेकडे जाऊं लागला, तिकडेही शत्रूंनीं त्याची पाठ पुरविली; आणि वाटेनें गांव वगैरे जाळून त्याला अन्नाचा तोटा पाडिला. ह्या मोसमेचे अखेरीस वुड साहेबानें पुनः बुटवल प्रांतावर स्वारी केली, पण कांहीं फळ झालें नाहीं. शेवटीं पर्जन्य जवळ आल्यामुळें त्यास मागें हटून गोरखपुरास जावें लागलें. नंतर लवकर दुखण्यामुळें ह्या फौजेस आपापल्या जाग्याकडे रवाना करणें प्राप्त झालें.

५ कर्नेल ब्राड्शा व जनरल मार्ली ह्यांची टोळी ८००० लोक व २६ तोफा ह्यांची होती, ती नोवेंबर महिन्याचे अखेरीस दिनापुराहून निघून भागीरथी उतरली.

प्रथम **तिर्हूत** प्रांतांत ह्या टोळीचा कांहीं जय झाला, तिनें **परशुरामथापा** ह्मणून **गुर्ख्यांचा** सरदार होता त्याचा पराजय करून त्याच्या चारशें लोकांस पळविलें; त्या लढाईंत तो सरदारही **लेफटेनेंट बोयलो** नामें साहेब ह्याच्या हातानें मरण पावला. परंतु पुढें **जनरल मार्ली साहेब** हा तोफखाना येण्याची वाट पाहत असतां संन १८१५ च्या जानुआरी महिन्याचे पहिले तारखेस **इंग्लिशांच्या** दोन ठाण्यांवर **गुर्ख्यांनीं** एकदांच हल्ला करून त्यांतून बहुतांस मारून बाकीच्यांस तेथून काढून लाविलें. येणेंकरून पुढें **गुर्ख्यांचा** उत्साह वाढून त्यांनीं **तिर्हूत** प्रांत बहुतेक घेतला; आणि **बडागडी** एथें **इंग्लिशांचें** हजार लोकांचें ठाणें असतां त्यावर शत्रूंचा सरदार **भगतसिंग** ह्यानें एलगार चालू केले. ह्याप्रमाणें **जनरल मार्ली साहेबाच्या** लश्कराची अवस्था झाल्याचें वर्त्तमान समजल्यावर त्यास **कलकत्त्याहून** ठपक्याचे हुकूम आले. तेणेंकरून त्यास अपमान वाटून दुसरा सरदार कामावर येण्याच्या पूर्वीं तो लश्करांतून निघून हुजूर गेला. त्याच्या अधिकारावर **जनरल जार्ज वुड साहेब** आला, त्यासही पुढें लढाई चालविण्याचें अवसान न होऊन फौज तेथें निरुद्योगी राहिली.

इ० स० १८१४ नोवेंबर तारीख १५

फेब्रुआरी

६ **गवर्नरजनरल** ह्यांनीं **रोहिलखंडांतील** सुमारें चार हजार पठाण चाकरीस ठेवून **कर्नल गार्डिनर** व **कपतान हिर्से** ह्या नावांचे सरदार ह्यांस त्यांसहित **कुमाऊं** प्रांत घेण्याकरितां पाठविलें. **गार्डिनर साहेब** ह्यानें तजवीज नीट राखून शत्रूंस माघारां हटविलें व **आलमोरा** किल्ल्याच्या पुढें जा-

इ० स० १८१५

ऊन शह दिला. परंतु **कपतान हिर्से साहेब** ह्याचा **कुतुलगडापुढें** पराजय होऊन त्यास शत्रूंचा सरदार **हस्तदाल** (हस्तिदल) **ह्यानें धरून आलमोरा** एथें नेलें. बाकीची फौज पळून गेली. पुढें पलटणीचे दोन हजार लोक व कांहीं तोफखाना इतकी कुमक घेऊन **कर्नल निकोल्स साहेब** हा **आलमोरा** एथें आला, तेव्हां त्या जाग्यापैकीं
एप्रिल कांहीं भाग **इंग्लिशांच्या** हस्तगत झाले. त्या वेळीं शत्रूंचा
तारीख २५ नाश बराच झाला, व **हस्तदाल** हा लढाईंत पडला. पुढें दोन दिवसांनीं उभयतां सरदारांचा करार ठरून त्याप्रमाणें **कुमाऊं** प्रांत **इंग्लिशांच्या** स्वाधीन होऊन युद्ध तहकूब झालें.

इ० स० ७ साहा हजार शिपाई व सोळा तोफा ह्याप्रमाणें लश्क-
१८१४ राची चवथी टोळी घेऊन **कर्नल आक्टर्लोनी साहेब** आक्टोबराचे अखेरीस सतलज नदी उतरून पलिकडे गेला. त्यानें प्रथमच **नलगड** व दुसरा एक लहान किल्ला हे घेतले. पुढें शत्रूंचा सरदार **अमरसिंग रामगड** नामें पाहाडी किल्ला ह्यावर जाऊन राहिला. तो किल्ला घेण्यासाठीं एक दोन वेळां **इंग्लिशांनीं** प्रयत्न केला तो सिद्धीस गेला नाहीं. ह्याजकरितां नवी फौजेची कुमक येईपर्यंत **आक्टर्लोनी साहेबास** वाट पाहावी लागली. ही कुमक दिसेंबर महिन्याचे अखेरीस आल्यावर त्याच्या लश्करानें प्रांतांत कितीएक मजबूद ठाणीं घातलीं, आणि फेब्रुआरी महिन्याचे ११ वे तारखेस **रामगड** घेतला. **कर्नल कूपर साहेब** ह्याजवळ लश्कराची एक टोळी होती, तिनें दीड महिन्याच्या आंत आणखी मोठे मजबूद असे तीन किल्ले घेतले. मग **रामगड** एथें सामानाची को-

ठी करून पुढें शत्रूंच्या मुलकाची माहितगारी करण्याचा उद्योग **आक्टर्लोनी साहेब** ह्यानें चालविला. इतक्यांत **विलासपूर** प्रांतांतून **अमरसिंग** निघून गेल्यामुळें तेथील राजा भिऊन **इंग्लिशांस** शरण आला, आणि त्यानें तावेदारी कबूल केल्यावर **सतलज** नदीच्या डाव्या कांठचा त्याचा मुलूक **इंग्लिशांनीं** त्याजकडे चालविण्याचें कबूल केलें.

८ एप्रिल महिन्याच्या मध्याच्या सुमारास **इंग्लिशांची** फौज **देवथळ** नामें घाट चढत असतां शत्रूंनीं पूर्व दिवशीं रान व खडपे ह्यांच्या आश्रयास राहून फारच उपद्रव केला. दुसऱ्या दिवशीं (तारीख १५) सकाळीं सुमारें दोन हजार **गुर्ख्यांचा** मारा एकाएकींच **इंग्लिशांवर** येऊन पडला, आणि उभयपक्षींचे लोक जिवावर उदार होऊन दोन तासपर्यंत मोठ्या निकरानें लढले. शेवटीं **गुर्ख्यांचे** बहुत लोक मेले, त्यांचा सरदार **भगतीथापा** हाही पडला, आणि ते पराजित होऊन मागें हटले. हा **इंग्लिशांचा** जय होतांच शत्रूंच्या लोकांचा धीर सुटला; एके ओळीनें जीं ठाणीं त्यांच्या स्वाधीन होतीं तीं नाहींशीं झालीं; दाण्याचा तोटा पडला; त्यांचे बहुत लोक **इंग्लिशांस** येऊन मिळाले; आणि **अमरसिंगाला** आपली सारी फौज मागें हटवून **मालौन** एथें जमाव करणें प्राप्त झालें. तेव्हांपासून **अमरसिंगाचे** हाल अधिक होत चालले. शेवटीं त्यानें आपला मुलगा **रामदास** ह्यास पाठवून लढाई बंद करण्याचें बोलणें लाविलें. तें पर्जन्यकाळ समीप आल्यामुळें **कर्नल आक्टर्लोनी साहेबानें** कबूल केलें. त्यांत दोघां सरदारांचा ठराव झाला कीं **यमुना**

इ० स० १८१५

मे ता० ११

व **सतलज** ह्या दोन नद्यांच्यामधले सारे किल्ले **इंग्लिशां**च्या हातीं असावे; **अमरसिंग** व **जैठक** एथील **रणजोरसिंग** ह्यांनीं शस्त्रें घेऊन थोडक्या लोकांसहित निघून जावें.

दिसेंबर ता० २४ बाकीच्या लोकांतून ज्यांची मर्जी असेल त्यांनीं **इंग्लिशांचे** चाकरीस राहावें, व **गर्वाला** एथील किल्लेकऱ्यास सामान व शस्त्रें ह्यांसुद्धां **नेपाळास** जाऊं द्यावें. ह्याप्रमाणें उभयतां सरदारांचा करार ठरून लढाई तहकूब झाली.

९ पर्जन्यकाळीं तहाचें बोलणें **इंग्लिश** व **गुर्खे** ह्यांनीं चालविलें होतें. **बमशाह** ह्मणून सरदार होता, त्याच्याद्वारें ती मध्यस्थी सिद्धीस जाईना ह्मणून **कर्नल ब्राड्शा साहेबानें** गुरु **गुजराजमिश्र** ह्याच्याद्वारें तहाचा ठराव केला. तो असा कीं पूर्वीं ज्या सरहद्दीवरच्या मुलकाचा तंटा पडला होता तो सर्व मुलूक व लढाईंत **इंग्लिशांनीं** घेतलेला पाहाडी प्रांत व तुराई प्रांत हे सर्व **नेपाळच्या** राजानें **इंग्लिशांस** द्यावे; व तेथील संस्थान्यांस **इंग्लिशांनीं** सालीना दोन लक्ष रुपये नेमणूक करून द्यावी; व **नेपाळच्या** राजानें **सिकिम**च्या राजास उपद्रव करूं नये; व कांहीं तंटा पडल्यास **इंग्लिशांच्या** विद्यमानें त्याचा फैसला व्हावा; व **काली** नदीचे पश्चिमेकडील मुलकावर **नेपाळच्या** राजानें दावा करूं नये; आणि आपले चाकरीस कोणी **युरोपियन** किंवा **अमेरिकन** ठेवूं नये; आणि परस्परांचे वकील परस्परांच्या दरबारांत राहावे.

नोवेंबर ता० २८ १० ह्याप्रमाणें तहनामा झाल्यावर गुरु **गुजराजमिश्र** ह्याची सही झाली; पुढील महिन्यांत **कलकत्त्यासही** त्यावर

शिके होऊन तोफा झाल्या, परंतु तहाविषयीं **गवर्नरजनरल** ह्यांस फार उत्सुकपणा झाला आहे, व कारण पडल्यास वर लिहिलेला मुलूक सोडण्यास ते तयार आहेत, असें **गुर्खे** ह्यांस समजल्यावरून, व तहाची मसलत **अमरसिंगाच्या** व दुसऱ्या सरदारांच्या सल्यास न आल्यामुळें, तहनाम्यावर **काठमांढू** एथील दरबारचा रुकार पडला नाहीं, आणि पुनः युद्धाचा प्रसंग आला.

११ नंतर **कर्नल आक्टर्लोनी साहेबानें** पूर्वीप्रमाणें निकरानें चहूंकडून शत्रूंस हैराण करण्याचें आरंभिलें. त्याजवळ ह्या वेळीं सुमारें वीस हजार फौज जमली होती. **मक्वानपुराजवळ** त्यानें शत्रूंचा सरदार **समशेर राणा** ह्याचा पराजय केला. त्या लढाईंत **इंग्लिशांचे** ४९ लोक मेले आणि पावणे दोनशें जायां झाले; शत्रूंचे ८०० पडले. **कर्नल केली** ह्याच्या टोळीनेंही त्याच सुमारें **हरिहरपूरचा** किल्ला **रणजोरसिंग** ह्याजकडून घेतला; त्यामुळें शत्रूंस भय उत्पन्न होऊन सरदार **बखतवारसिंग** ह्याजकडून **चंद्रशेखर** उपाध्या **इंग्लिशांच्या** लश्करांत आला; त्यानें राजानें सही केलेला पूर्वीचा तहनामा आणून हाजिर केला. त्या तहनाम्यांतील कलमांशिवाय आपलें कांहीं बोलणें नाहीं असें राजाचे तर्फेनें कबूल करून घेववून **इंग्लिश** सरदारांनीं तो तहनामा कबूल केला, आणि युद्ध समाप्त झालें.

इ० स० १८१६ फेब्रुआरी ता० २८

मार्च ता० ३

१२ त्या तहनाम्याप्रमाणें वहिवाट झाली, व फौजा आपापल्या ठिकाणीं निघून गेल्या. नंतर **गवर्नरजनरल** ह्यांनीं लढाईचे पूर्वीचे आपले सरहद्दीवर दगडांचे खांब पुरून

तीं सरहद्द कायम केली; आणि तिच्या पलिकडला सारा मुलूक परत देऊन नवा तह करायाचा आपल्या मनांतील अभिप्राय राजास सांगून पाठविला. त्याप्रमाणें **इंग्लिशांचा** वकील जाऊन तह झाला. आणि **अयोध्येचा** * नवाब **ग्यासुद्दीनहैदर** ह्याजकडून युद्धांत एक कोटि रुपये कर्ज घेतलें होतें त्याबद्दल त्याचे सरहद्दीवरचा **तुराई** प्रांताचा कांहीं भाग त्यास देऊन बाकीचा सारा नवा मिळालेला मुलूक **नेपाळच्या** राजास परत दिला. पुढील वर्षी **सिकिमच्या** राजाशीं **इंग्लिश** सरकारानें नवा तह करून त्याजवळ व त्याच्या वारिसांजवळ तें राज्य नेहमी चालावें अशी बाहादारी दिली; आणि **गुर्खे** लोकांस पूर्व दक्षिण आणि पश्चिम ह्या तीन दिशांकडे नवें राज्य घेण्यास जागा नाहीं असें केलें. हा तह ठरल्यावर थोड्या महिन्यांनीं **नेपाळचा** राजा देवींनीं मरण पावून त्याच्या जागीं **इंद्रविक्रम** नामें अल्पवयी मुलगा अधिकारावर आला, आणि **भीमसिंगाचा** कारभार पहिल्याप्रमाणें पुढें चालला.

१३ ह्या लढाईपासून **इंग्लिशांस** फायदा तर झाला नाहीं खरा, परंतु सरहद्दीविषयीं घटकेघटकेस तंटे पडत होते, ते संपून **नेपाळी** व **इंग्लिश** सरकार ह्यांचा स्नेह झाला, तो अद्यापि अविच्छिन्न चालला आहे. ही लढाई करण्याचें फारसें प्रयोजन नव्हतें असें कितीएक ह्मणतात; परंतु एकवेळ इंग्लिशांचें सामर्थ्य **गुर्खे** लोकांस समजलें हें ठीक झालें, कां कीं

---

* अयोध्येचा पूर्वीचा नवाब सादत अली संन १८१४ च्या जूलै महिन्यांत मरण पावला त्याचा हा मुलगा.

येणेंकरून पुढें स्वस्थता झाली. ह्या लढाईची सिद्धता प्रथम नीट केली नव्हती, आणि सरदारांस ही युद्धाचें कौशल्य नव्हतें, ह्यामुळें प्रथम **इंग्लिशांचा** कांहींसा मोड झाला, तो सांवरण्याकरितां फितूर करविणें व मुलकांतील पिकाचा नाश करणें हे दोनही उपाय **इंग्लिश** सरदारांनीं करून पाहिले. ते न करिते तर त्यांच्या कीर्तीस बरें झालें असतें.

## प्रकरण १८.

### मार्क्विस आफ् हेस्तिंग्स ह्याची कारकीर्द. पेशव्यांच्या राज्याची समाप्ति.

इ० संन १८१६ पासून संन १८१७ पर्यंत.

१ **बाजीराव पेशवा** ह्यानें निरुपाय होऊन **वसईच्या** तहावर सही केली होती; परंतु त्या तहानें त्याचा स्वतंत्रपणा गेला; व **वाडीकर** देसाई आणि **कोलापूरकर** राजा ह्यांच्या कामांत त्यानें पडूं नये असा ठराव झाला होता. ह्या गोष्टींपासून त्यास असंतोष होता, परंतु त्याच्यामध्यें धैर्य आणि शाहणपण हे गुण कमी होते; ह्मणून तो उघड विरोध न दाखवितां अनुकूल संधी येण्याची वाट पाहत होता. आणि त्यानें लहान लहान बहुतेक जाहागिरा मोडून खजिन्यांत पांच कोटि रुपये जमविले होते; आणि फौज ठेवण्याचेंही काम हळूहळू चालविलें होतें. **शिंदा** व **नागपूरकर भोंसला** हे **इंग्लिशांच्या** नाशाविषयीं ज्या मसलती करीत होते ह्यांत आंतून त्याचें अंग होतें; आणि **नेपाळचे** लढा-

ईचा शेवट कसा होतो, हा पाहण्याविषयीं तो उत्सुक होता.

२ **पेशवा** ह्याचा **गायकवाडाशीं** खंडणीचे बाकीविषयीं तंटा पहिल्यापासून होता त्याचा निवाडा व्हावा हा आग्रह **पेशव्याचा** पडल्यामुळें त्या गोष्टीचा विचार होण्याकरितां **फत्तेसिंगराव गायकवाड** ह्याचा वकील **गंगाधर शास्त्री पटवर्धन** हा **इंग्लिशांचें** अभयवचन घेऊन संन १८१४ च्या आरंभीं **पुण्यास** आला. ह्या कामांत **इंग्लिशांस** पडण्याचीं कारणें अशीं कीं संन १८०२ मध्यें **आनंदराव गायकवाड** ह्यानें आपल्या राज्याच्या रक्षणाबद्दल **इंग्लिशांस** एकंदर दहालक्ष पस्तीस हजारांचा मुलूक **गुजराथेंत** दिला होता, व त्यानंतर आणखी दोन लक्ष नव्वद हजारांचा प्रांत **इंग्लिशांनीं** त्यापासून घेतला; आणि त्याच्या कर्जाचा फडशा व दुसऱ्या कारभाराचा बंदोबस्त **इंग्लिशांचा** रेसिडेंट पाहूं लागला. ह्मणून खंडणीबद्दल व स्वामित्वाबद्दल व वस्त्रांबद्दल सुमारें तीन कोटि रुपये आपलें जुनें देणें **पेशव्यानें** त्यावर काढिलें तें देण्यास किंवा त्याचा जाब करण्यास त्यास स्वतंत्रपणा राहिला नव्हता; व **इंग्लिशांचा पेशवा** व **गायकवाड** ह्या उभयतांशीं तह होता, त्याप्रमाणें उभयतांच्या तंट्याची मध्यस्थी करणें त्यांस प्राप्त झालें.

३ **गंगाधरशास्त्री पुण्यास** आल्यावर **बाजीरावाच्या** कपटी स्वभावामुळें कामाची चौकशी **इंग्लिशांच्या** मनाप्रमाणें चालेना. संन १८१४ च्या जून महिन्यामध्यें **बाजीरावाचा** आग्रह फार पाहून **पुणेदरबारांतील** रेसिडेंट **एलफिन्स्तन् साहेब** ह्यानें **अमदाबाद** प्रांताचा **पेशव्याचा** निमे

भाग त्याच्या स्वाधीन करण्याविषयीं रुकार दिला; त्या प्रांताचा मखता **बाजीरावानें** आपले प्रीतींतला हुजऱ्या **त्रिंबकजी डेंगळा** ह्याजला दिला.

४ संन १८१४ चे अखेरीस **एल्फिन्स्तन् साहेबाची** खातरी झाली कीं **गंगाधरशास्त्री** ह्याचा **पुण्यांत** राहण्याचा कांहीं उपयोग नाहीं. ह्याकरितां तो शास्त्री परत जाण्याच्या तजविजेस लागला असतां त्यास अनेक प्रकारच्या भुलथापी देऊन व त्यावर प्रीति दाखवून **बाजीरावानें** कितीएक महिनेपर्यंत **पुण्यांत** तो ठेवून घेतला. पुढील चातुर्मास्याच्या आरंभीं **बाजीराव नासिकची** यात्राकरून **गंगाधरशास्त्र्यास** बरोबर घेऊन **पंढरपुरीं** गेला. तेथें कृत्रिमें करून मारेकऱ्यांच्या हातांनीं त्या शास्त्र्याचा खून झाला. तें घोर पाप **त्रिंबकजीनेंच** केलें अशी बहुत सबळ कारणांवरून **इंग्लिशांची** खातरी झाल्यावरून **त्रिंबकजी** आपल्या स्वाधीन **पेशव्यानें** करावा ह्मणून **एल्फिन्स्तन् साहेबानें** नेट लावला. **बाजीराव** ती गोष्ट कबूल न करितां अनेक निमित्तें सांगूं लागला. शेवटीं **त्रिंबकजी** स्वाधीन न केला असतां **इंग्लिश** सरकाराशीं लढाईचा प्रसंग येतो असें खचीत समजल्यावर **बाजीरावानें त्रिंबकजी इंग्लिशांचे** स्वाधीन केला; त्यास त्यांनीं **साष्टी** बेटांत **ठाण्याच्या** किल्ल्यावर नेऊन बंदींत ठेविलें. तेथें तो बारा महिन्यांस थोडे दिवस कमी इतका वेळपर्यंत होता. तंवपर्यंत **इंग्लिश** व **बाजीराव** ह्यांच्या संबंधांत कांहीं विशेष न्यूनाधिक्य झालें नाहीं. शेवटीं युक्तीनें कोणी मराठा मोतादार ह्याचे मदतीनें तो बाहेर निघून घो-

इ० स० १८१५ जुलै ता० १४

सप्तेंबर ता० १९

इ० स० १८१६ सप्तेंबर ता० १२ ड्यावर बसून पळून गेला. हें काम **पेशव्याचेंच** सल्यानें झालें, आणि तो **त्रिंबकजी** कोठें आहे हेंही त्यास ठाऊक आहे असा संशय **एल्फिन्स्तन् साहेबाच्या** मनांत आला; आणि **बाजीराव** त्यास धरण्यास मनापासून मदत करीना, व त्याच्या माणसांवर लोभ करीत असे ह्मणून तो संशय दिवसानुदिवस अधिक वाढूं लागला. तथापि **बाजीराव** बाहेरून
इ० स० १८१७ **एल्फिन्स्तन् साहेबाशीं** फार स्नेहानें वागत होता. **इंग्लिशांनीं** ह्या सुमारें पेंढाऱ्यांचा बंदोबस्त करण्याविषयीं मोठा प्रयत्न आरंभिला होता, त्यांत त्यानें **इंग्लिशांस** साहित्य करण्याविषयीं आपला उत्साह दाखविला; आणि **गायकवाडा**-
जानुआरी वरचा दावा बहुतेक सोडण्याचें कबूल केलें.

८ पुढील दोन महिन्यांत **पेशव्याच्या** राज्यांत सर्वत्र फौजा जमल्याचीं वर्त्तमानें येऊं लागलीं; **महादेवाच्या** डोंगरांत **त्रिंबकजी** लोक जमवीत आहे असें कळलें; नवे लोक चाकरीस ठेवण्याचा उद्योग **माळवा** व **खानदेश** ह्या प्रांतांपासून चालला; किल्ल्यांची दागदुजी होऊन त्यांवर दाणा वैरणीचीं कोठारें भरण्याचे हुकूम झाले; **त्रिंबकजीची** व **बाजीरावाची** भेट झाल्याचीही बातमी लागली, ह्यामुळें **एल्फिन्स्तन् साहेबानें** कितीएक वेळां **बाजीरावास** स्पष्ट सांगितलें कीं तुह्मी जी युद्धाची तयारी करीत आहां ही आह्मावांचून दुसऱ्या कोणाशीं असेल असें दिसत नाहीं; त्यास हें तुमचें करणें तुमच्या व **इंग्लिश** सरकारच्या स्नेहास योग्य नाहीं; आणि तुह्मी असें कपट जर पुढें चालवाल, तर तुमची आमची लढाई होईल. असें रेसिडेंटाकडून निरोप आले त्यांचीं उत्तरें

**बाजीराव** करीत असे कीं युद्धाची तयारी आह्माकडून कांहीं नाहीं, आणि तुमचे मर्जीबाहेर आह्मास कांहीं करण्याची गरज नाहीं. अशी कांहीं दिवसपर्यंत भुलथाप दिल्यावर शेवटीं **एल्फिन्स्तन् साहेबाचा** आग्रह पाहून **बाजीरावानें त्रिंबकजीच्या** कुटुंबाचे माणसांस कैद केल्याप्रमाणें केलें. पुढें कांहीं दिवसांनीं **बाजीरावानें** आपला खजीना व बहुतेक खटलें **रायगडास** पाठवून दिलें, मग त्याचें कपट अधिक स्पष्ट दिसूं लागलें. यास्तव **हिंदुस्थानांतून** व **हैदराबादेच्या** मार्च ता० ११
मुलकांतून व **मद्रास**प्रांतांतून लश्कर जमा करण्याची तजवीज करून रेसिडेंटानें **बाजीरावास** कळविलें कीं, तुमच्या राज्यांत सर्वत्र बखेडे होत आहेत ते मोडण्याकरितां व स्वसंरक्षणाकरितां आह्मी फौजा जमवीत आहों; आणि तुह्मी **पुणें** सोडून गेल्यास तुह्मास शत्रु समजून तुह्माशीं युद्ध करणें एप्रिल
प्राप्त होईल.

६ इकडे **बाजीराव** रेसिडेंटाचें सांत्वन करीत असतां **कर्नल स्मिथ साहेब** ह्यानें **पुण्या**जवळ कितीएक ठिकाणीं नवी फौज जमत होती त्या लोकांचीं हत्यारें काढून घेऊन त्यांस हांकून लाविलें. पुढें लवकरच **हैदराबादच्या** लश्कराचा सरदार **कपतान देविस साहेब** ह्यानें **खानदेशांत** साहाशें स्वारांच्या रिसाल्यानिशीं एकाएकीं **त्रिंबकजीडिंगळ्याचा** भाऊ **गोदाजी** ह्याचे दोन हजार स्वार व तीनशें **आरब** ह्यांचा पराजय करून त्यांतून चारशें लोक त्या मैदानावर मारून पाडिले; त्याचे लोक सुमारें पाऊणशें मात्र जायां झाले.

मे ७ पुढील महिन्यामध्यें **बाजीरावाच्या** मनांतील वैरभावाविषयीं खचीत निश्चय झाल्यामुळें **त्रिंबकजीडेंगळ्यास** एक महिन्यांत धरून द्यावें; व धरून देण्याविषयीं मनांत कांहीं कपट नाहीं ह्याची खातरी होण्याकरितां **सिंहगड, रायगड,** व **पुरंदर** हे किल्ले स्वाधीन करावे; ह्याप्रमाणें **गवर्नर-जनरल साहेबांच्या** हुकमानें रेसिडेंट साहेबानें सांगून पाठविलें, तें कबूल करण्यास **बाजीराव** ह्यास मोठें संकट पडलें. शेवटीं **इंग्लिशांच्या** लश्कराचा वेढा **पुण्यास** पडतो इतका
ता० १० प्रसंग सन्निध आला हें पाहून त्यानें तें स्वीकारिलें. परंतु त्याच्या मनांतून ती गोष्ट कर्तव्य नव्हती, ह्मणून त्यानें लश्करास तैनात वगैरे देऊन युक्तीनें **पुण्यांतून** निघून जाण्याची तजवीज आरंभिली. **बाजीरावाची** बुद्धि शाश्वत नव्हती, आणि तो एकाचे मसलतीनें चालत नसे ह्मणून पुनः त्याचें मन वळलें; आणि जो कोणी **त्रिंबकजीस** धरून देईल त्यास दोन लक्ष रुपये बक्षीस व हजार रुपयांचा गांव इनाम सरकारांतून मिळेल असा जाहिरनामा लावून त्यानें त्याची नक्कल
ता० २० रेसिडेंट साहेबाकडे पाठविली. जर ह्याप्रमाणें **बाजीराव** कांहीं महिन्यांपूर्वीं निश्चय करिता तर त्याचा फार स्वार्थ झाला असता; परंतु **इंग्लिशांसारख्या** बळिष्ठ शत्रूशीं उघड विरोध करून शेवटीं तो त्यांस शरण गेला, त्यामुळें त्याचें नुकसान फार झालें.

जून ८ **त्रिंबकजीस** धरण्यास एक महिन्याची मुदत दिली
ता० ७ होती ती मुदत संपल्यावर **एल्फिनस्तन साहेबानें बाजीरावास** स्पष्ट कळविलें कीं तुह्मावरचा विश्वास आमचा उडाला,

ह्मणून तुह्मी **गवर्नरजनरल साहेबांचे** मर्जीप्रमाणें नवा तह-
नामा करून द्यावा; त्याविषयीं **बाजीरावानें** कांहीं दिवस
अनमान दाखवून शेवटीं त्या तहनाम्यावर सही केली. ह्या ता० १३
तहनाम्यांत **त्रिंबकजीस** हरएक प्रकारें आश्रय न देण्याविष-
यीं व **कोंकण, गुजराथ,** व **करनाटक** ह्या प्रांतांत मिळून
चवतीस लक्षांचा मुलूक फौजेच्या खर्चाकरितां **इंग्लिशांस**
द्यावा, व इतर संस्थानिकांशीं **इंग्लिशांचे** मध्यस्थीवांचून व्य-
वहार ठेवूं नये वगैरे गोष्टींविषयीं एकंदर अठरा कलमें होतीं;
परंतु ह्या तहनाम्याप्रमाणें वहिवाट होण्याचे पूर्वीं राज्याची
समाप्ति झाली, ह्मणून त्यांतील मजकूर विस्तारें लिहिण्याचें
कारण नाहीं. हा तह झाल्यावर **कर्नल स्मिथ साहेबाचें**
लश्कर **घोडनदीस** छावणींत जाऊन राहिलें; आणि **कर्नल
डफ्टन साहेब** सैन्यासहित **जालन्यास** गेला. **त्रिंबकजी**
सारा पावसाळा संपेपर्यंत **नर्मदेच्या** तीरीं **चोरलीमहेश्वरीं**
होता.

९ **बाजीराव पंढरपुरास** गेला तो सप्तेंबर महिन्याचे
अखेरीस परत आला. तंवपर्यंत तहाचीं कलमें बहुतेक व-
हिवाटींत आलीं होतीं; परंतु **बाजीराव पुण्यास** येतांच चो- आक्टोबर
हींकडून फौजा जमविण्यास व **इंग्लिशांच्या** लोकांस फितुरी
करण्यास त्यानें आरंभ केला. त्या फौजा **इंग्लिशांस** पेंढा-
ऱ्यांचे लढाईंत कुमक करण्याकरितां आपण जमा करितों
असें **बाजीराव एल्फिन्स्तन् साहेबास** सांगत असे; परंतु
ज्या फौजा येऊं लागल्या त्यांच्या सरदारांतून कितीएक
**इंग्लिशांचे** छावणी लगत डेरे देऊं लागले, आणि त्यांच्या

लश्करांतील लोक **इंग्लिशांच्या** लोकांशीं कलागती करूं लागले. ह्यावरून दरबारची सर्व बातमी **एल्फिन्स्तन् साहेबास** समजत असे ह्मणून त्याच्या मनांत **बाजीरावाच्या** कृत्रिमाविषयीं पुरता निश्चय झाला. नंतर त्यानें **मुंबईहून** एक गोऱ्या लोकांची पलटण पाठविण्याविषयीं लिहून पाठविलें त्याप्रमाणें ती येऊन पोहोंचली. त्या वेळीं **घोडनदीचें** बहुतेक लश्कर **खानदेशाकडे** गेलें होतें, परंतु त्याचा सरदार **जनरल स्मिथ साहेब ह्यानें पुण्यास** कांहीं युद्धप्रसंग प्राप्त होईल ह्मणून एक पलटण परत पाठविली होती. ती **एल्फिन्स्तन् साहेबानें पुण्यास** जलद बोलाविली; आणि ह्या संधीस **एल्फिन्स्तन् साहेबाचीं** पत्रें पोहोंचेनात असें पाहून **जनरल स्मिथ साहेबही** लश्करासहित **पुणतांब्याहून** परत

नोवेंबर यावयास निघाला.

१० इकडे **मुंबईहून** लश्कर आलें, व **घोडनदीहून** पलटण **पुण्यास** यावयास निघाली, हें वर्तमान **बाजीरावास** कळतांच त्याला आपला बेत सिद्धीस नेण्याविषयीं फार त्वरा झाली. मग **इंग्लिशांच्या** ज्या तीन पलटणी खडकी एथें होत्या त्यांच्या सरदारांस संगमावर जेथें रेसिडेंट साहेब राहत होता तेथील वर्तमान कांहीं न समजण्याकरितां **बापूगोखला** ह्याच्या लश्करानें जाऊन संगमाच्या आणि खडकीच्या मध्यें तळ दिला. त्याचें कारण **एल्फिन्स्तन् साहेबानें** विचारा-

ता० ५ वयास पाठविलें तंव त्यास **बाजीरावानें** निरोप पाठविला कीं तुमच्या बोलण्यावर आजपर्यंत मी फार फसलों, परंतु तुह्मी **मुंबईचें** व **घोडनदीचें** लश्कर जर परत न रवाना कराल तर

आतांच युद्धास उभें राहावें. ह्याचा परत जवाब पोंहोंचला नाहीं इतक्यांत **बाजीरावाच्या** लश्करानें संगमावर स्वारी केली. तें लश्कर येण्याच्या पूर्वीं थोडा वेळ **एल्फिन्स्तन् साहेब** मोठ्या संकटानें **मुळानदी** उतरून **गोखल्याच्या** लश्कराच्या झपाट्यांतून बचावून पुलाचे वाटेनें **खडकीस** जाऊन पोहोंचला. मागाहून **बाजीरावाच्या** लश्करानें जाऊन रेसिडेंट व त्याची मंडळी ह्यांचा सर्व वित्तविषय लुटून कागद पत्र वगैरे जाळले. तेथील शिपाईलोकांचीं वायकामुलें सांपडलीं त्यांचे नाककान कापले, आणि **पुण्याच्या** आसपास कोणी इंग्रेज वाटसरू सांपडले त्यांचे हाल करून त्यांस मारिलें.

११ **इंग्लिशांचें** लश्कर ह्या वेळेस जरी फार थोडें होतें तरी त्यांनीं हल्ला येईपर्यंत वाट पाहिली नाहीं, परंतु **खडकीच्या** छावणींत कांहीं थोडे लोक ठेवून त्यांचा सरदार **कर्नल बर साहेब** आपलें लश्कर व चार तोफा घेऊन पुढें झाला. **मेजर फोर्ड साहेब** ह्याचें लश्कर दोन पलटणी **दापूडीस** होतें तें **विंचूरकर** ह्याचा मार सहन करून युद्धाचा आरंभ झाल्यावर येऊन पोहोंचलें. **मराठ्यांचे** स्वार **इंग्लिशांच्या** लश्करास दोनही बाजूंनीं घेरा घालूं लागले. **पिंटो** ह्मणून **बाजीरावाचा पोर्टगीस** चाकर होता त्यानें पलटण तयार केली होती, तीसहित त्यानें प्रथम हल्ला केला, तो **इंग्लिशांच्या** ७ वे पलटणीचे पहिले टोळीनें माघारा हटवून त्या पलटणीचे लोक त्यांची पाठलाग करूं लागले. इतक्यांत एकीकडून **गोखल्याचे** स्वार आणि एकीकडून **मोरदीक्षित**

ह्याचे लोक हे येऊन भिडले. परंतु **कर्नल बर साहेब** हा त्या ठिकाणीं गोरी पलटण घेऊन आल्यामुळें **इंग्लिशांचे** टोळीचा बचाव झाला, आणि **मोरदीक्षित** ह्यास गोळी लागून तो पडला; तेव्हांपासून संध्याकाळपर्यंत **मराठे** पुनः आंगाशीं न येतां दुरून लढत होते. ही लढाई संध्याकाळपर्यंत

नोवेंबर ता० ५ झाली; तींत **बाजीरावाचे** लोक सुमारें पांचशें पडले; **इंग्लिशांचे** अठरा मेले व सत्तावन्न जखमी झाले. ह्या लढाईंत **इंग्लिशांचें** लश्कर सुमारें १८०० आणि **पेशव्यांकडील** लश्कर सुमारें २५००० होतें.

१२ ही लढाई झाल्यावर दुसऱ्या दिवशीं **घोडनदीची** पलटण व मुलकी स्वार येऊन पोहोंचले, आणि त्यानंतर सात दिवसांनीं **जनरल स्मिथ साहेब** हाही लश्करासहित

ता० १३ दाखल झाला. १६ वे तारखेस सकाळीं **इंग्लिशांच्या** लश्कराचा एक भाग नदी उतरून आलिकडे येऊं लागला, तेव्हां **पेशव्याची** फौज त्यास अडथळा करण्याच्या बेतानें त्यासमोर गेली आणि त्यावर तोफांचाही भडिमार चालविला, परंतु तें लश्कर नदी उतरून आलिकडे आलें; तितक्यांत साठ लोक मेले. त्या लश्कराचा सरदार **कर्नल मिलन** ह्यानें त्या रात्रीं **बाजीरावाच्या** लश्कराचे उजवे बाजूस तळ दिला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं सर्व लश्कर हल्ला करण्यास सिद्ध झालें, तों **पेशव्याचा** तळ रिकामा दृष्टीस पडला, आणि **बाजीराव** सर्व लश्करासहित रात्रीं शहर सोडून निघून गेल्याचें वर्तमान कळलें. मग त्याच दिवशीं **इंग्लिशांनीं** शहर हस्तगत केलें; आणि **बाजीरावाच्या** तोफा व कांहीं

सरंजाम **सिंहगडा**जवळ होता तो फौजेची एक टोळी पाठवून आणविला.

१३ **बाजीराव पुण्याहून** निघाला त्या वेळींच त्याच्या राज्याची समाप्ति झाली असें समजावें. त्याची मात्र राज्याविषयींची आशा केवळ सुटली नव्हती, ह्मणून तो सात महिनेपर्यंत पळत होता, परंतु तो जिकडे जाई तिकडे त्याचे पाठीवर **जनरल स्मिथ साहेब** होताच; आणि दक्षिणेकडे **प्रिट्स्लर साहेब** व **जनरल मनरो साहेब** ह्यांचीं लश्करें होतीं; पूर्वेस **नागपुराचे** बाजूस **जनरल डफ्टन साहेब** व **हिस्लाप साहेब** ह्यांचीं लश्करें होतीं; उत्तरेस **नर्मदेच्या** पलिकडे **सर जान मालकम साहेब** ह्याचें लश्कर होतें. अशीं चार लश्करें चार दिशांस होतीं, ह्यामुळें त्यास कोणीकडेच निर्भय स्थान राहिलें नाहीं. तो दोन वेळ **कृष्णा** उतरून पलिकडे गेला; दोन वेळ **पुण्या**जवळ आला; नंतर **सोलापुराकडे** जाऊन उत्तरेस **गोदावरीच्या** कांठानें कांहीं दिवस फिरत होता; पुढें **वराडामध्यें** गेला, तों तिकडे **सर टामस हिस्लाप साहेब** ह्याचें लश्कर होतेंच, ह्मणून तो **सातपुड्या** डोंगरांचे वाटेनें **हिंदुस्थानांत** जात असतां त्या घाटाजवळ **इंदुरास सर जान मालकम साहेब** ह्याचें लश्कर येऊन पोहोंचलें. त्या वेळीं पळून उपयोग नाहीं असें जाणून **बाजीरावानें मालकम साहेबास** भेटीस बोलावून **गवर्नरजनरल** ह्यांच्या मर्जीप्रमाणें वागायास मी सिद्ध आहें असा अभिप्राय कळविला; नंतर **पेशवा** ह्यानें आपले तर्फेनें व आपल्या वंशजांच्या तर्फेनें राज्याविषयींचा सर्व दावा सोडावा, आणि

इ० स० १८१८ जून ता० १

आठ लक्ष रुपये नेमणूक दरसाल घेऊन **भागीरथीच्या** कांठीं **ब्रह्मावर्त** एथें राहावें असा त्यानें करार करून देऊन तो
ता० ११ **मालकम साहेबाचे** छावणींत आला. त्या वेळेस त्याजवळ सुमारें बारा हजार लोक व कितीएक सरंजामी सरदार होते; त्यांतून बहुतेक लवकरच आपापल्या ठिकाणीं निघून गेले. परंतु तो **नर्मदेच्या** तीरीं पोहोंचण्याच्या पूर्वी बहुतेक लोक त्यास सोडून गेले, आणि बाकीचे तैनात वगैरे मागूं लागल्यामुळें त्याच्या सांगण्यावरून **मालकम साहेबानें** त्यांस घालवून दिलें. शेवटीं सरदारांपैकीं **विंचूरकर** व **गोखल्याची** बायको हीं उभयतां, व साहाशें स्वार आणि दोनशें पायदळ इतक्या सरंजामासहित **बाजीराव ब्रह्मावर्तास** जाऊन पोहोंचला. तेथें तो अद्यापि (संन १८४९) जिवंत आहे.

२४ **बाजीराव** पळत असतां **पेशव्याचे** दक्षिणेंतील व **कृष्णेचे** पलिकडील बहुतेक किल्ले फार आयासावांचून **इंग्लिशांचे** हस्तगत झाले. **जनरल स्मिथ साहेबानें सातारा** घेतला. आणि फेब्रुआरी व मार्च ह्या दोन महिन्यांत **सिंहगड, वज्रगड, पुरंदर, चंदनवंदन, नंदगड, वसंतगड, कर्नाळा, पांडवगड, वांसोटा, चाकण** हे सर्व किल्ले स्वाधीन झाले. त्याचे पूर्वीच **बाणकोटापासून** बहुतेक कोकणांतील किल्ले **मुंबईच्या** लश्करानें घेतले होते; व **कर्नल मनरो साहेबानें मलप्रभेपर्यंत** प्रांतावर अमल बसवून **बादामी** व **बागलकोट** हे किल्ले घेतले. ह्या सर्व किल्ल्यांवर रखवालीस आरब वगैरे होते, परंतु त्यांनीं फार लढाई न करितां ते किल्ले स्वाधीन केले, कारण **बाजीरावाचें** राज्य लयास गेलें, तें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

आह्मी पराकाष्ठेची मेहनत केली किंवा जीव दिला तरी कांहीं परत येत नाहीं, तेव्हां आपण **इंग्लिशांस** अनुकूळ व्हावें हें योग्य, असा त्यांनीं विचार केला. **खानदेशांत ताळनेर** किल्ला घेण्यास कांहीं प्रयास पडला; तो घेतल्यावर तेथील किल्लेदार व **आरबांचा** सरदार ह्यांनीं दगाबाजी केली ह्मणून त्यांस **सर टामस हिस्लाप साहेबांनीं** फांशीं दिलें; **ताळनेर** घेतल्यावर **चांदवड, अंकटंकी, गाळणा** वगैरे **खानदेशांतील** सर्व किल्ले स्वाधीन झाले; आणि शेवटीं **मालेगांव** वेढा घालून घेतल्यावर युद्धाची समाप्ति झाली. नंतर लवकरच **त्रिंबकजी डेंगळा** हाही सांपडला; त्यास इंग्लिशांनीं **चुनार गडास** नेऊन ठेविलें.

१५ **बाजीराव** पळत असतां त्याचीं व **इंग्लिशांचीं** किती एक युद्धें झालीं; त्यांतील एका युद्धांत **इंग्लिशांचे** तीनशें स्वार व पांचशें पायदळ व दोन तोफा इतक्या सरंजामासहित **कपतान स्तांटन साहेब** हा **घोडनदीहून पुण्यास** येत असतां (तारीख १ जानुआरी) **कोरेगांव** एथें त्यानें **बाजीरावाच्या** पंचवीस हजार लश्कराचा मारा सकाळच्या दहा घटिका दिवसापासून प्रहर रात्रपर्यंत सहन करून अन्न नाहीं, पाणी नाहीं, अशे स्थितींत शत्रूंचा एलगार आपणावर चालूं दिला नाहीं. ह्या आश्चर्यकारक लढाईंत **इंग्लिशांचे** लोक सुमारें पन्नास साठ मेले व एकशें पांच मात्र जखमी झाले. आणि दुसऱ्या दिवशीं ती शूर टोळी त्याच ठिकाणीं राहिली. नंतर **पुण्यास** जाणें होत नाहीं असें पाहून **स्तांटन साहेब** आपल्या दोनही तोफा आणि सर्व जखमी लोक घेऊन परत

**घोडनदीस** जावयास निघाला; त्याच दिवशीं मागाहून **जन-रल स्मिथसाहेब** तेथें येऊन पोहोंचला, ह्मणून **बाजीरावा-च्या** लष्कराच्यानें त्यास उपद्रव करवला नाहीं. दुसरी लढाई (ता० २० फेब्रुआरी) **पंढरपूराजवळ आष्टे** एथें झाली, तींत **पेशव्याचा** शूर सरदार **बापूगोखला** हा पराकाष्ठेचा पराक्रम करून व आपल्या हातानें कितीएक लोक मारून तरवार हातांत असतां पडला. ह्याच लढाईंत **सातारचा** राजा **प्रतापसिंह इंग्लिशांचे** हस्तगत झाला. त्यास त्यांनीं **पेशव्याच्या** मुलकापैकीं कांहीं विभाग देऊन त्याच्या वडिलाच्या सिंहासनावर त्यास फिरून बसविलें. तिसरी लढाई **सातपुड्यामध्यें चांद्याजवळ सुनी** खेड्या पाशीं झाली, (एप्रिल ता० १७), त्या वेळीं **इंग्लिशांचे** लोक पाहतांच **बाजीराव** घोड्यावर बसून पळून गेला, आणि त्याच्या लोकांची फार दुर्दशा झाली; त्या धांदलींत त्याचे कितीएक हत्ती व पालखी वगैरे सरंजाम सांपडला, आणि त्याचे हजार लोक मेले, परंतु **इंग्लिशांचे** दोन तीन मात्र जखमी झाले. त्यानंतर लवकरच **बाजीरावानें मालकम साहेबाकडे** निरोप पाठविला.

१६ ह्याप्रमाणें **इंग्लिशांशीं** शत्रुभावानें चालल्यामुळें **मराठ्यांच्या** राज्याचा मुख्य जो **बाजीराव पेशवा** त्याच्या अधिकाराची समाप्ति झाली, असें पाहून बाकीचे लहान लहान मराठे सरदार हे सर्व **इंग्लिशांस** शरण आले. ज्यांचे त्यांचे सरंजाम व जाहागिरी वगैरे चालविण्यांत येतील, आणि लोकांचे हक्क व जातिधर्म ह्यांस उपद्रव होणार नाहीं, ह्या अर्थाचा जाहिरनामा **एल्फिन्स्तन् साहेबानें** लाविल्या-

मुळें, आणि दुसरा सर्व बंदोबस्त मोठे युक्तीनें राखिल्यामुळें लोक थोड्या महिन्यांत पहिल्या प्रभूस होते त्याप्रमाणें इंग्लिशांस राजी होऊन त्यांचे आज्ञेंत वागूं लागले; आणि देशांत सर्वत्र स्वस्थता झाली.

## प्रकरण १९.

### मार्किस् आफ् हेस्तिंग्स ह्यांची कारकीर्द. नागपूरकर भोंसले ह्यांच्या दरबारचीं वर्तमानें.

इ० संन १८१६ पासून संन १८१८ पर्यंत.

१ **रघुजी भोंसला नागपूरकर** संन १८१६ मध्यें वारला. त्याचा मुलगा **पर्साजी** हा वेडगळ होता; तो गादीवर असतां **इंग्लिशांनीं नागपूर** संस्थानाच्या रक्षणार्थ पायदळांचीं साहा पलटणें व स्वारांचें एक पलटण इतकें लष्कर ठेवावें, त्याच्या खर्चाबद्दल **भोंसला** ह्यानें दरसाल साडेसात लक्ष रुपये द्यावे; शिवाय कुमकेबद्दल २००० स्वार व २००० पायदळ इतकें लश्कर **भोंसला** ह्यानें तयार ठेवावें; व कोणा संस्थानिकाशीं इंग्लिशांच्या सल्यावांचून त्यानें व्यवहार ठेवूं नये, असा तह झाला. तो **पर्साजी** संन १८१७ च्या फेब्रुआरी महिन्याच्या पहिले तारखेस अपघातानें मेला. नंतर त्याचा चुलतभाऊ **आपासाहेब** गादीवर बसला. त्या वेळीं **बाजीरावा**प्रमाणें इतर संस्थानिकांच्या मनांतही इंग्लिशांविषयीं वैरभाव उत्पन्न झाला होता, त्यामध्यें **आपासाहेब** हा

मुख्य होता. तो आणि **बाजीराव** ह्या उभयतांमध्यें कागदपत्र वगैरे व्यवहार चालूं लागला. ही गोष्ट तहास विरुद्ध ह्मणून कागद जावयाचे यावयाचे ते रेसिडेंटाच्या विद्यमानें जावे यावे असें **इंग्लिशांचें** बोलणें पडलें; तें **आपासाहेबास** आवडेना; आणि तहाप्रमाणें **इंग्लिशांचे** कुमकेस लश्कर द्यावयाचें तें युद्धाविषयीं निरूपयोगी आणि नवें ठेवणाईत असें देऊं लागला. ह्याशिवाय तो **आपासाहेब पेंढाऱ्यांच्या** बंदोबस्ताचें निमित्त करून सरहद्दीवर नवें लश्करही जमवूं लागला; आणि आंतून **इंग्लिशांच्या** नाशाविषयीं **पेंढाऱ्यांशीं** स्नेह करण्याच्या उद्योगास लागला.

इ० स० १८१७ २ हीं विरोधाचीं कारणें जमत जाऊन शेवटीं नोवेंबर महिन्याचे २६ वे तारखेस रेसिडेंट **जेंकिन्स् साहेब** आणि राजाचे दिवाण ह्यांच्यामध्यें बोलण्याची अमर्यादा होऊन उभयतां रागानें उठून गेले; आणि त्याच रात्रीं **आरबांनीं** रेसिडेंटाचे रखवालीस फौज जी होती तिजवर गोळ्यांचा मार चालू केला. **इंग्लिशांचें** लश्कर पायदळ व स्वार सर्व मिळून सरासरी पंधराशें लोक व चार तोफा इतकें होतें; त्यांचा सरदार **कर्नल स्काट साहेब** नामें होता. ते लोक **शिताबळदी** ह्मणून एक डोंगरी आहे तिचा व तिच्यामागें दुसरी एक आहे तिचा आश्रय धरून दुसऱ्या दिवशीं सकाळपर्यंत आपल्या जाग्यावरून लढत होते. परंतु आठ वाजतां **आरबांनीं** एकाएकीं हल्ला करून आपले संख्येच्या बळानें पुढील डोंगरी हस्तगत करून तिजवरून **इंग्लिशांस** काढून लाविलें; आणि शत्रूचें एकंदर दहाहजार पायदळ व दहाहजार स्वार

शहरांत होते त्यांपुढें आपलें कांहीं चालणार नाहीं ह्मणून **इंग्लिशांची** निराशा होण्याचा प्रसंग आला. अशांत **कप-तान फित्सजिराल्ड् साहेब** ह्यानें स्वारांची एक टोळी घे-ऊन **भोंसल्याच्या** स्वारांचा जेथें मोठा रगडा होता त्याच ठिकाणीं मोठ्या शौर्यानें हल्ला करून त्यांस हटविलें, आणि त्यांच्या तोफा काढून घेऊन त्यांजवरच चालू केल्या. तेणें करून **इंग्लिशांच्या** लोकांस हुशारी आली; आणि पलिक-डच्या डोंगरीवर **आरब** होते त्यांच्यामध्यें दारूच्या खजिन्यास आग लागून तो उडाला असें पाहून त्या संधीसच **इंग्लिशां-नीं आरबांवर** हल्ला केला; तेव्हां त्यांची धांदल होऊन ते पळाले, आणि तोफा **इंग्लिशांच्या** हातीं सांपडल्या. नंतर **आरब** पुनः जमत असतां त्यांतून बहुत पडले, व बाकीचे नि-रास होऊन परत गेले.

३ **आपासाहेबाचा** पहिला प्रयत्न फसल्यामुळें त्याचे डोळे किंचित् उघडले. इतक्यांत चहूंकडून **इंग्लिशांचें** सैन्य **नागपूर** एथें जमत चाललें, व **जनरल डफ्टन् साहे-बाचेंहि** लश्कर **निजामाच्या** राज्यांतून येऊन पोहोंचलें, त्या-मुळें तो नम्र झाला. नंतर डिसेंबर महिन्याचे १५ वे तार- इ० स० १८१७
खेस रेसिडेंट साहेबानें सांगून पाठविलें कीं तुह्मी कृत्रिमानें आह्मांशीं वर्त्तणूक केली सबब आमचा तुमचा करार तुटला, ह्यामुळें तुमच्या राज्याची व्यवस्था जशी पाहिजे तशी कर-ण्यास आह्मास अधिकार आहे. परंतु जर तुह्मी आमच्या सांगितल्याप्रमाणें **आरब** व इतर फौज ह्यांस फांटा देऊन त्यांस काढून देण्याचें व शहर आणि किल्ले हीं सर्व तोफखा-

त्यासुद्धां आमच्या स्वाधीन करण्याचें कबूल कराल, व हा करार पार पडण्यासाठीं ओलीस तुह्मी स्वतः चोवीस तासांच्या आंत **इंग्लिशांच्या** लष्करांत येऊन राहाल, तर कुमकेच्या लष्कराबद्दल मुलूक लावून घेऊन बाकीचें तुमचें राज्य तुह्मास परत देण्यांत येईल. ह्या बोलण्याचा विचार करून कितीएक वेळां मसलत फिरविल्यावर, व **डफ्टन् साहेबाचें** लश्कर जागा सोडन निघाल्यावर, शेवटीं **आपासाहेब** दुसऱ्या दिवशीं सकाळच्या प्रहरदिवसास आपल्या कितीएक मुत्सद्यांसहित **जेंकिन्स साहेबा**जवळ आला. नंतर दोन प्रहरीं कांहीं तोफा हस्तगत झाल्यावर **भोंसल्याचे** फौजेनें युद्धास आरंभ केला, तें युद्ध चार घटिकापर्यंत मोठ्या निकरानें चालून शेवटीं लहान मोठ्या तोफा, गर्नाळा, व जेजाला मिळून पंचेहत्तर, व चाळीस हत्ती, आणि राजाचें बहुतेक लश्करी सामान **इंग्लिशांच्या** हातीं सांपडलें. ह्या युद्धांत **इंग्लिशांचे** ३९ गोरे व १०२ काळे शिपाई जायां झाले.

४ ह्याप्रमाणें पराजय पावल्यानंतर **भोंसल्याचे आरब** व त्यांचे सरदार ह्यांनीं शहरांत जाऊन तटबंदीचे दरवाजे
इ० स० १८१५ लाविले. तें शहर घेण्यास **इंग्लिशांनीं** २४ वे तारखेस हल्ला केला, परंतु त्यांत सुमारें शंभर लोक ठार पडून व पावणे दोनशें जखमी होऊन **इंग्लिशांस** मागें फिरावें लागलें. पुढें आपणास कोणाचें पाठबळ नाहीं असें पाहून **आरबांनीं** शहर सोडण्याचें बोलणें लाविलें; तें कबूल झाल्यावर ते शस्त्रें व सामान व
तारीख ३० डिसेंबर मुलें माणसें ह्यांसहवर्त्तमान शहरांतून निघून गेले; त्यांस **इंग्लिशांनीं** लश्कर बरोबर देऊन **नागपूरचे** सरहद्दीच्या पार

केलें नंतर थोड्या दिवसांनीं लश्कराच्या खचाबद्दल *सुमारें चोवीस लक्षांचा मुलूक लावून व किल्ल्यांवर **इंग्लिश** फौजेचें रक्षण असावें, आणि **इंग्लिश** सरकार जे कारभारी नेमितील त्यांनीं मुलकाचा कारभार करावा, ह्याप्रमाणें करार करून घेऊन **आपासाहेबास** परत आपल्या वाड्यांत जाऊन राहण्यास मोकळीक दिली. ता० ९ वीं जानुआरी स० १८१८

५ ह्याप्रमाणें सर्व सत्ता जाऊन उगेंच राजा इतकें नांव मात्र राहिलें. तितक्यानें संतोष न मानून **आपासाहेबानें** **गडमंडळ** वगैरे किल्ल्यांवरच्या सरदारांस ते किल्ले तहनाम्याप्रमाणें **इंग्लिशांच्या** स्वाधीन न करण्याविषयीं आंतून हुकूम पाठविले ते **इंग्लिशांस** सांपडले. ह्याशिवाय त्याचा जो **गणपतराव** नामें सरदार **जनरल डफ्टन् साहेबासमोरून** पळून **बाजीरावाकडे** गेला, तो त्याजकडून कांहीं कुमक घेऊन परत येत आहे, व त्याच्या मागून **बाजीरावही नागपुराकडे** येणार हें वर्त्तमान समजलें; आणि **आपासाहेबाकडून** हुजरे **बाजीरावाकडे** जात होते ते सांपडले. ह्याप्रमाणें **आपासाहेबाची** मसलत **जेंकिन्स साहेबास** खचीत कळल्यावर त्यानें अवकाश नलावितां त्यांस व **नागोपंत** आणि **रामचंद्रपंत वाघ** ह्या नामांचे त्याचे दोन कारभारी होते ह्यांस कैद करून आपल्या लश्करांत आणून नजर पाहऱ्यांत ठेविलें. ता० १५ मार्च स० १८१८ पुढें **आपासाहेबास प्रयागास** पाठवून देण्याविषयीं **गवर्नरजनरल** ह्यांजकडून हुकूम आल्यावर तो व त्याचे उभयतां कारभारी ह्यांस तारीख ३ मेस समागमें कांहीं पायदळ व

---

* ह्या मुलकाचा वसूल खर्चवेच जाऊन २२,४७,२०० रूपये होता.

स्वार ह्यांचा पाहरा देऊन रवाना केलें. त्या लोकांपैकीं कांहीं दाहापांचांस फितूरकरून **जब्बलपुराजवळ रायचूरच्या** मुकामाहून त्यांसहित १२ वे तारखेस **आपासाहेब** निघून गेला.

६ पुढें थोड्याच दिवसांनीं समजलें कीं तो **आपासाहेब गोंडवणांत** आहे, व तेथील राजांतून कितीएकांचा त्यास आश्रय आहे. ह्या राजांच्या पारिपत्याकरितां **कर्नेल आदम्स साहेबाचें** लश्कर **गोंडवणांत** शिरलें. त्यानें पर्जन्यकाळ
जुलै
संपण्याच्या सुमारें तेथील राजांचें वगैरे पारिपत्य करून **आपासाहेबास** पिटून लाविलें. त्यानें आपले पूर्वींचे **आरब** जमविले होते, व **बाजीरावाची** वगैरे फौज त्यांस येऊन मिळाली होती, त्या फौजेसहित तो शेवटीं फेब्रुआरी महिन्याच्या आरंभीं (ता० ४) **इंग्लिशांच्या** लश्कराच्या हातून मोठे युक्तीनें
इ० स० १८१९
पळून जाऊन **आशीरगड** एथील **शिंद्याचा** किलेकरी **यशवंतराव लाड** ह्याच्या आश्रयास जाऊन राहिला. तें वर्त्तमान लागलेंच **सर जान मालकम साहेब** ह्यास कळलें, तेव्हां त्यानें त्या किलेदाराबराबर बोलणें लाविलें. तें तो ऐकत नाहीं, व **शिंद्याचा** हुकूमही मानीत नाहीं, अशी खातरी झाल्यावर
मार्च ता० १७
**आशीरगडास इंग्लिशांनीं** वेढा घातला. तो किल्ला फार बळकट आहे, व त्याच्या सभोंवता साठ सत्तर हातपर्यंत उंच कडा तुटलेला आहे; त्यांत तीन ठिकाणीं मात्र कांहीं प्रवेश करण्याचा इलाज चालण्याजोगी जागा आहे, त्या ठिकाणीं तट बांधून मजबुदी केली आहे. अश्या ठिकाणीं जिवावर उदार झालेले शूर किलेकरी लढत असतां इंग्लिशांकडील

काळ्या पायदळाचीं अक्रा पलटणें व गोऱ्या लोकांचीं तीन पलटणें, व स्वारांचीं साहा पलटणें इतकी फौज व एकंदर लहान मोठ्या मिळून शेचाळीस तोफा इतक्यांचें सत्रादिवसपर्यंत कांहीं चाललें नाहीं; आणि शत्रूंनीं कितीएक वेळां आंतून बाहेर येऊन इंग्लिशांचा नाश केला, ह्या गोष्टींत विशेष आश्चर्य नाहीं. परंतु एप्रिल महिन्याच्या आरंभीं किल्ल्याच्या खालीं मोरचे लागू झाले, आणि सागराहून आणखी लश्कराची कुमक व सोळा तोफा येऊन पोहोंचल्या. नंतर ३ रे तारखेपासून पांच दिवसपर्यंत किल्ल्यावर गोळ्यांचा सतत भडिमार चालला; तेव्हां यशवंतराव ह्याची दारू संपल्यामुळें तो पुढील सुमार पाहून किल्ला सोडून देऊन खालीं आला. ह्या वेढ्यामध्यें दाहा गोरे व सुमारें २७ काळे लोक मेले, व सुमारें पावणेतीनशें जखमी झाले.

७ आशीरगडांत कितीही शोधिला तरी आपासाहेब सांपडला नाहीं, व तो केव्हां निघून गेला तें कळलें नाहीं. परंतु पुढें कांहीं दिवसांनीं बातमी लागली कीं तो युक्तीनें फकिराच्या वेषानें पंजाबांत पळून गेला. तेथें रणजितसिंगानें त्यास कांहीं नेमणूक देऊन ठेविलें होतें, परंतु इंग्लिशांच्या संकोच्यामुळें त्यास तो प्रसिद्धपणें दरबारास येऊं देत नसे.

---

# प्रकरण २०.

## मार्कीस आफ् हेस्तिंग्स ह्यांची कारकीर्द; दुआबेंतील बंडें; पेंढाऱ्यांशीं लढाई व त्यांचा नाश.

इ० संन १८१६ पासून संन १८१८ पर्यंत.

१ नेपाळास लढाईचा आरंभ झाला, आणि तिजमध्यें पहिल्यावर्षी इंग्लिशांस यश मिळालें नाहीं, ह्यामुळें हिंदुस्थानांतील बहुतेक संस्थानिकांस उमेद येऊन ते इंग्लिशांस मुलकांतून हांकून देण्याची मसलत करूं लागले. त्यांपैकीं पेशवा व नागपूरकर ह्यांची अवस्था काय झाली तें वर लिहिलें. दौलतराव शिंद्यानें नेपाळच्या राजास लिहिलेलें पत्र सांपडलें, परंतु इंग्लिश सरकारानें ती गोष्ट फारशी मनावर घेतली नाहीं. रोहिलखंडांत बरळी एथील मुसलमानांवर संन १८१६ च्या वर्षी शहराचे रखवालीबद्दल सरकारानें कांहीं नवी पट्टी बसविली होती, तो त्यांस जुलूम वाटला, आणि ती पट्टी वसूल करणारा जो हिंदू कोतवाल होता त्यानें कांहीं आगळिकी केल्या, त्या मुसलमानांस आवडल्या नाहींत ह्मणून त्यांनीं बराच मोठा लोकांचा जमाव केला; आणि कोणीएक मुफती होता तो आपल्या पैगंबराचा हिरवा झेंडा लावून आपल्या लोकांसहित युद्धास उभा राहिला. त्या आततायी लोकांनीं एक इंग्रेजसाहेब ठार मारिला. आणि तें बंड कोठपर्यंत जाईल हें समजेना; परंतु तेथें कप्तान बोस्कावीन साहेब ह्यानें आपली टोळी उभी करून तोफा चालू

केल्या, तेव्हां दोन हजार बंडवाले पडल्यावर बाकीचे लोक आपापल्या जागीं निघून गेले. ता० १८ एप्रिल स० १८१६

२ हें बंड शांत झाल्यावर थोड्या महिन्यांनीं **दयाराम** व **भगवंतसिंग** ह्या नावांचे **दुआबेंतील** दोन मांडलिक ठाकूर ह्यांनीं **इंग्लिश** सरकारचा हुकूम न मानितां लोकांपासून नव्या पव्या घ्याव्या, व चोरट्या लोकांस जवळ ठेवून घेऊन रयतेस उपद्रव करावा, असें आरंभिलें. तेव्हां इतर संस्थान्यांस दहशत पडावी ह्याकरितां **दयाराम** ह्याचा परम सुदृढ किल्ला **हट्टरास** हा घेण्याची मसलत करणें **इंग्लिशांस** प्राप्त झालें. नंतर तें काम सहज सिद्धीस जाऊन **इंग्लिशांचें** सामर्थ्य सर्वांचे दृष्टीस यावें, ह्मणून **कानपूर**, **मीरत**, व **मथुरा** एथून पुष्कळ लश्कर व तोफखाना जमा करून जनरल **मार्शल साहेब** तिकडे गेला; तेव्हां प्रथमच्या निरोपाबरोबर **भगवंतसिंगानें** किल्ला पाडण्यास रुकार दिला, परंतु **दयाराम** आपला **हट्टरास** किल्ला स्वाधीन करीना, ह्मणून **इंग्लिशांनीं** त्यास वेढा देऊन साहा दिवसांत बाहेरचें शहर हस्तगत केलें, आणि आठ दिवसांच्या आंत किल्लाही हल्ला करून घेतला. ता० २३ मार्च स० १८१५ त्या वेळीं बहुतेक किल्लेकरी पडले, आणि बाकी राहिले होते ते दारूच्या पिपास आग लागून जळून मेले. **दयाराम**मात्र कितीएक स्वारांसहित पळून गेला. इकडें **इंग्लिशांच्या** लोकां पैकीं एक गोरा व पांच काळे शिपाई मात्र पडले. ह्याप्रमाणें तो मोठा किल्ला **इंग्लिशांनीं** घेतल्याचा इतर ठिकाणीं लौकिक होऊन त्यांच्या शत्रूंची हिंमत खचली.

३ **नेपाळच्या** लढाईच्या संधीस **पेंढारीही** पूर्वी पेक्षां निर्भ-

यपणें मुलकांत उपद्रव करूं लागले; आणि त्यांचा बंदोबस्त करण्यांत इंग्लिश सरकारानें कसर ठेविली नाहीं. हें वर्त्तमान आतां कांहींसें विस्तरानें लिहिलें पाहिजे.

४ पेंढाऱ्यांचें नांव हें पुस्तक वाचणाऱ्यांतून बहुतेकांस ठाऊक असेल, परंतु त्यां पैकीं अल्पवयस्क जे असतील त्यांच्या मनांत कदाचित् येईल कीं सांप्रत कितीएक प्रांतांत जसे पेंढारी शेतें करितात, भाडीं करितात, किंवा लांकडें आणून विकतात, आणि आकृतीनें मात्र भयंकर दिसतात, तसेच ते पूर्वी असतील; तर अशी गोष्ट नाहीं. ह्या पेंढाऱ्यांच्या टोळ्या घोड्यांवर बसून प्रांतोप्रांतीं स्वाऱ्या करीत; गांवांत शिरून लोकांचे अनेक प्रकारें हाल करीत; लोखंड तापवून डाग देत; राखेचे तोबरे तोंडीं देत; दगड डोक्यावर ठेवीत; घरें दारें वगैरे जाळीत असत; आंगास फडकीं बांधून आग लावून देत; व ह्या प्रमाणें अनेक प्रकार करून जितकी लूट सांपडेल तितकी घेऊन जात. पेंढारी क्रूर आणि घातकी मात्र होते; त्यांच्या आंगीं शूरपणा नव्हता. कोणी मारता त्यांच्या समोर येऊन उभा राहिला, ह्मणजे त्यानीं जलद पळून जावें, अशी त्यांची चाल होती.

५ पेंढारी ह्मणून एक जात होती असें नाहीं, कोणत्याही धर्माचे किंवा जातीचे निरुद्योगी ह्यांनीं त्यांत शिरावें. त्यांनीं स्वारी करून आल्यावर लूट वांटून घ्यावी, ती अशी कीं, सरदारांस सर्वांहून मोठा वांटा काढून ठेवावा, व घोडे हत्ती वगैरे सर्व त्यांस द्यावें. नंतर त्या स्वारींतील जो नायकवडी असेल त्याची वांटणी काढावी; बाकी राहील तें सर्वांनीं सा-

रिखें घ्यावें. ह्याप्रमाणें वांटणी झाल्यावर मग ती सर्व चीचबस्त ते विकीत असत, आणि त्यांच्या बाजारास आसपासचे लोक बहुत येत असत.

६ प्रजांपासून राजा जें द्रव्य घेतो त्याबद्दल त्यानें त्यांचें संगोपन करावें, आणि वर लिहिलेल्या सारख्या चोरट्यांचा उपद्रव त्यांस लागूं देऊं नये, हा चांगला जो राजा त्याचा धर्म होय. तो न करितां अश्या लोकांस आपणाजवळ बाळगावें, आणि त्यांच्या पापानें मिळविलेल्या द्रव्याचा आपण विभाग घ्यावा हें **हिंदुस्थानच्या** कितीएक संस्थानिकांनीं आपल्या नावास मोठें लांछन लावून घेतलें. **मल्हारराव होळकरानें** प्रथम **गर्दीखान** नामें **पेंढाऱ्यांचा** सरदार ह्यास व त्याच्या लोकांस चाकरीस ठेविलें; त्याचा भाऊ **शाहबाजखान** हा **शिंद्याजवळ** राहिला. त्याचे **हिरा** व **बरण** असे दोन मुलगे होते, ते पांच हजार लश्करासहित नागपूरच्या दरबाराच्या आश्रयास जाऊन राहिले, आणि त्यांनीं **भोपाळप्रांत** लुटून अगदीं उद्ध्वस्त केला. परंतु ते लूट घेऊन परत येतांच **रघुजी भोंसल्यानें** त्यांच्या लश्करास घेरा घालून त्यांजकडून ती सर्व काढून घेतली, व **बरण** ह्यास धरून कैदेंत ठेविलें; **हिरा** हा मात्र पळून गेला.

७ ह्या टोळींत दुसरा एक **करीमखान** नामें **पेंढाऱ्यांचा** लहानसा सरदार होता, तो **नागपूर** एथून गेल्यावर प्रथम **शिंद्याकडे** चाकरीस राहिला, आणि तेथें लढायांचे संधीस लुटीनें द्रव्य संपादन करून नंतर त्यानें कांहीं दिवस **यशवंतराव होळकराचा** आश्रय केला. परंतु त्यानें पुनः दवलत-

**रावाशीं** बोलणें लाविलें, आणि कांहीं प्रांत हस्तगत करण्यांत तो उपयोगीं पडला ह्मणून त्यास **दवलतरावानें** कांहीं जहागीर व नवाब हा किताब दिला. अश्या प्रकारें त्याचें नाव संस्थानिकांत पडलें; आणि तो आपली जहागीर हळू हळू वाढवूं लागला. त्यानें एका प्रसंगीं रुपयांची गादी करून तिजवर **दवलतरावास** बसविलें, आणि ती गादी त्यास नजर केली. तेणेंकरून **शिंदा** त्याजवर प्रसन्न झाला, आणि त्याकडे कितीएक तालुक्यांच्या मामलती सांगण्याचें त्यानें कबूल केलें. परंतु त्या अधिकाराच्या सनदा व पोषाक देण्याच्या संधीस कृत्रिमानें **करीमखानास** धरून त्यानें कैद केलें, आणि त्याच्या लोकांवर हल्ला करून त्यांचें द्रव्य बहुतेक काढून घेतलें. **करीमखान** हा चार वर्षेंपर्यंत **शिंद्याच्या** दरबारीं कैदेंत होता. इतक्यांत त्याच्या लोकांनीं **शिंद्याचे** प्रांत लुटण्याची पराकाष्ठा केली; त्यामुळें **दवलतरावानें** त्याकडून आपण साहा लक्ष रुपये व दरबारचे मंडळीकरितां एक लक्ष रुपये घेऊन त्यास सोडून दिलें. नंतर लवकरच त्यानें कितीएक प्रांतांत आपला अमल बसविला [चितू!] आणि छट्टू नामें दुसरा एक सरदार आपले मदतीस घेऊन तो **शिंद्याच्या** प्रांतांत लुटूं लागला.

इ० स० १८१८ ८ परंतु लवकरच **शिंद्यानें छट्टूस** अनुकूळ करून घेऊन **करीमखानाचे** छावणीवर हल्ला करून ती लुटली, आणि त्याच्या लोकांस पिटून लाविलें. त्या गर्दीत **करीमखान** हा पळून **इंदुरास** गेला, तेथें कारभार चालविणारी **तुळजाबाई** हिनें त्यास कैद करून ठेविलें. तो तेथें तीन वर्षेंपर्यंत राहून

शेवटीं सुटून पळाला, आणि पुनः **शिंद्याचे** ताब्यांत वागूं लागला. **छट्टू** ह्यानें **नर्मदेच्या** कांठीं आपलें मुख्य ठाणें बसविलें, आणि पुढें त्यास **शिंद्यानें** पांच तालुक्यांच्या सनदा करून दिल्या.

९ संन १८१६–१७ ह्यांमध्यें **पेंढाऱ्यांनीं इंग्लिशांच्या** मुलकांत लुटण्याचें बरेंच चालविलें, आणि **पुण्याच्या** आसमंतात् प्रांतांतील व **कोंकणांतील** लोकांवर क्रूरता केली. त्यांतील एके टोळीवर **पुण्याजवळ मेजर लशिंग्टन साहेब** ह्यानें **मद्रास** इलाख्याच्या स्वारांसहवर्त्तमान पंचवीस कोस एकाएकीं जाऊन ते जेवीत असतां त्यांस गांठलें, व ते पळतां पळतां सुमारें आठशें आसामी मारून पाडिले. ह्या प्रमाणेंच **गंजाम** प्रांतांतही त्यांची दशा झाली; आणि **हैदराबादच्या** लश्करानें बेदराजवळ एके टोळीचे घोडे व लूट हीं बहुतेक काढून घेतलीं. हा **पेंढाऱ्यांचा** उपद्रव आपल्या रयतेस पुनः होऊं नये, आणि **पेंढाऱ्यांच्या** दुःखापासून सारा देश मुक्त करावा, असा मतलब **गवर्नर जनरल साहेबांनीं** आपल्या कौन्सिलाच्या विचारें ठरावून चहूंकडून **पेंढाऱ्यांवर** एकदाच गहजब करण्याकरितां फौजेची तर्तूद केली. ती अशी कीं, **डफ्टन् साहेबानें निजामाचे** उत्तरेकडील सरहद्दीवर राहून प्रांताचें संरक्षण करावें; आणि **जनरल स्मिथ साहेबानें पेशव्यांचा** मुलूक **गंग्थडीचे** बाजूचा राखावा, व **होळकरावर** जरब ठेवावी; आणि कारण पडल्यास ह्या दोघांनींही **पेंढाऱ्यांवर** हल्ला करावा. **सर टामस हिस्लाप साहेब** व **सरजान माल्कम साहेब** ह्या उभयतांनीं **शिंद्या**-

जवळच्या पेंढाऱ्यांच्या ठाण्यावर हल्ला करावा; कर्नल आडम्स साहेब ह्यानें हुसंगाबादेजवळ नर्मदा उतरून नागपूरचे बाजूनें येऊन मिळावें; सर विलियम केर साहेब ह्यानें बडोद्याचे सरहद्दीवर लश्करांची तयारी ठेवावी; सर डेविड आक्टर्लोनी ह्यानें दिल्ली प्रांताचें रक्षण करून रजपूत राजांशीं पेंढाऱ्यांच्या नाशाविषयीं बोलून बंदोबस्त राखावा; आणि मध्यभागीं जें लश्कर जमेल त्याचे कुमकेस कानपुराहून व बुंदेलखंडांतून लश्करें यावीं.

आक्टोबर स० १८१७ १० ह्याप्रमाणें तर्तूद झाल्यावर गवर्नर जनरल साहेब खुद्द कानपूरच्या लश्करासहित यमुना उतरले; आणि पुढें थोड्याच अवकाशानें पेंढाऱ्यांच्या नाशाकरितां इंग्लिशांच्या लश्करास कुमक करण्याविषयीं व पेंढारीसरदारांचे प्रांत जप्त करण्याविषयीं दवलतराव शिंद्यानें इंग्लिशांशीं तह

नोंवेंबर स० १८१७ केला. ह्याच अभिप्रायाचे करार जोदपूर, जयपूर वगैरे ठिकाणच्या रजपूत राजांनीं केले. होळकराचा कारभारी अमीरखान पठाण ह्याचा धंदा बहुतकरून पेंढाऱ्यांप्रमाणेंच होता, तो त्यानें सोडून द्यावा, आणि कांहीं जहागीर घेऊन इंग्लिशांच्या आश्रयाखालीं स्वस्थ राहावें असा त्याजकडूनही करार करून घेतला.

११ सर जान माल्कम साहेबानें मुख्यत्वें छट्टू ह्याची पाठलाग करण्याचा उद्योग आरंभिला; कर्नल आडम्स साहेबानें करीमखानावर स्वारी केली; आणि जनरल मेटलांड साहेब ह्यानें वासिलमहम्मद नामें दुसरा एक सरदार होता त्यावर हल्ला केला, परंतु हे पेंढारी इंग्लिश

लश्करापेक्षां पळणार बाहदर होते, ह्मणून निसटून जात असत.

१२ इतक्यांत **होळकराच्या** संस्थानामध्यें कारभार करणारी व नांवाचा बाळराजा **मल्हारराव** ह्याची पोषाक आई जी **तुळजाबाई** तिनें क्रूरपणानें कितीएक मोठ्या मोठ्या मुत्सद्यांचा जीव घेतला, आणि फार दुराचरण आरंभिलें, त्यामुळें कोणी कोणाचा धनी नाहीं असें होऊन अंधाधुंदी झाली; आणि बहुतेक फौज व पठाण सरदार **बाजीराव पेशवा** पळत होता त्याजवळ जाणार असें वर्त्तमान समजलें. त्यावरून **माल्कम साहेबानें छट्टूचा** पाठलाग सोडून देऊन त्या फौजेवर स्वारी केली, आणि **सर टामस हिस्लाप** ह्याचें ही लश्कर त्यांस येऊन मिळालें. तें **होळकराची** छावणी **शिप्रा**नदीच्या काठीं **महिदपुरीं** होती तेथून पांच कोसांवर येऊन पोहोंचलें. त्याच रात्रीं **होळकराच्या** सैन्यांत बहुतेक सरदारांनीं एकोपा करून **तुळजाबाईचा** गळा कापून तिचें प्रेत नदींत टाकून दिलें. दुसऱ्या दिवशीं **शिप्रा**-नदींतच उभयतां लश्करांचें एक प्रहरपर्यंत मोठ्या सपाट्यानें युद्ध होऊन **होळकराचे** फौजेचा पराजय झाला; आणि पुढें थोड्याच दिवसांनीं बहुतेक लश्कराच्या तोफा व शस्त्रें **इंग्लिशांनीं** काढून घेऊन लोकांस हांकून लाविलें. कांहीं स्वार पळून जाऊन **बाजीरावास** मिळाले. ह्याप्रमाणें दांडगी व बेबंद अशी फौज सत्ता करीत होती तिचा उपद्रव गेला हा **मल्हारराव** व त्याचे कारभारी ह्यांस संतोष झाला, आणि त्यांनीं **मंडलेश्वर** मुकामीं इंग्लिश सरकाराशीं तह-

ता० २२ दिसेंबर सन १८१७

ता० ६ जानूआरी सन १८१९ नामा ठरावून घेतला. त्यांत **पेंढाऱ्यांस** कधीं मदत करूं नये व चाकरीस ठेवूं नये; **रजपुतांच्या** मुलकांतील सर्व दावा सोडावा; **सातपुड्याचे** दक्षिणेचा सारा आपला मुलूक **इंग्लिशांस** द्यावा; आणि **इंग्लिशांचे** सल्ल्याखेरीज कोणत्याही संस्थानिकाशीं व्यवहार ठेवूं नये, असें त्यांनीं कबूल केलें.

१३ ह्याप्रमाणें **पेंढारी** ह्यांचे यजमान जे संस्थानिक त्यांचा आश्रय त्यांस नाहींसा झाल्यावर त्यांची समाप्ति होण्यास फार काळ लागला नाहीं. जेथें जेथें **इंग्लिशांची** फौज गेली, तेथें तेथें जयच झाला. **पेंढारी** चोहोंकडून कोंडले गेले; त्यांच्या मुलांमाणसांस आश्रयस्थान नाहींसें झालें; शेंकडों लोक घरें सोडून रानांत गेले, तेथें हाल भोगून मरण पावले. बहुतांस रयत लोकांनीं धरून पूर्वींच्या त्यांच्या करण्याचा सूड उगविला. कांहीं सरदारांनीं **इंग्लिशांस** शरण जाऊन जीवदान मागून घेतलें. **छट्टू** ह्याचे टोळीनें इतरांपेक्षां फार दिवस टिकाव धरिला. शेवटीं तो **सातपुड्यांत** **आपासाहेब नागपूरकर** ह्यास जाऊन मिळाला, आणि त्याजबरोबर **आशीरगडास** आला; परंतु **यशवंतराव लाडानें** त्यास किल्ल्यांत घेतलें नाहीं. नंतर तो जंगलांतून हिंडत

इ० स० १८१८ असतां त्यास वाघानें खाल्लें. त्याचा मुलगा **महम्मद पना** हा जाऊन **सर जान माल्कम साहेबास** भेटला, त्यानें त्यास जिवाविषयीं अभय दिलें.

१४ अशी **पेंढाऱ्यांची** समाप्ति झाली. जे शेंकडों मनुष्यांस अनिर्वाच्य पीडा देणारे त्यांच्या नाशार्थ **इंग्लिश** सर-

[stamp]

कारानें इतका मोठा श्रम केला हें त्या सरकारास मोठें भूषण होय. राज्याकरितां किंवा शत्रूंच्या पारिपत्याकरितां युद्धें करण्याची चाल सर्वत्र आहे, आणि हिंदुस्थानांतील राजांनीं आपण स्वतः फौजेच्या हातून प्रजा लुटल्याच्या आणि लुटारू बाळगल्याच्या कथा वर आल्या आहेत; परंतु लुटारू आणि हत्या करणारे ह्यांपासून प्रजेस सोडविण्याकरितां इतकें द्रव्य खर्चून श्रमानें युद्ध केल्याचें उदाहरण हें पहिलेंच आहे.

## प्रकरण २१.

### इंग्लिश सरकारानें जे संस्थानिक कायम राखिले त्यांचें कांहीं वर्तमान--व त्यांशीं कसकसे तह ठरविले तो प्रकार.

इ० संन १८१९ पासून संन १८२३ पर्यंत.

१ **भोपाळच्या** नवाबांचा मूळपुरुष **दोस्तमहंमद** हा प्रथम **काबुलाकडून** आला, तो **औरंगजेबानंतरचा बाहादुरशाह** ह्याचे कारकिर्दींत पराक्रम, विश्वासघात, व क्रूरकर्मै ईहींकरून वाढला. त्यानें सभोंवतालच्या ठाकुरांपासून व जमिनदारांपासून कांहीं प्रांत मिळवून **भोपाळ** एथें ठाणें घातलें; आणि तो आपणास नवाब ह्मणवूं लागला. तो मेल्यानंतर त्याचा मुलगा **सुलतानमहंमदखान** नामें बालक गादीवर बसला. परंतु त्याचा वडील भाऊ **यारमहंमदखान** नामें राखेच्या पोटचा होता, त्यास **निजामउलमुल्क** ह्यानें कुमक केल्यावरून त्या बाळराजास अधिकारावरून काढून

तो धनीपणा करूं लागला. तरी हा अस्सल नव्हे ह्मणून पठाण सरदार हे त्यास नवाब ह्मणेनात. **यारमहंमदानंतर** त्याचा वडील मुलगा **फैझमहंमद** हा नवाबाचा अधिकार पावला; परंतु **विजयराम** दिवाण ह्यानें त्याचा पराजय करून त्यास कांहीं प्रांत तोडून दिला. पहिला **बाजीराव** ह्यानें **भोपाळचे** नवाबाच्या मुलकापैकीं अर्धा मुलूक काढून घेतला. **फैझमहंमद** हा जितेंद्रिय आणि देवभोळा असे ह्मणून त्यास मुसलमान अवलिया ह्मणत, परंतु त्यास राज्य चालविण्याचें सामर्थ्य नव्हतें. तसेंच त्याच्या मागून त्याचा भाऊ **यसीतमहंमद** अधिकारी झाला त्यास, व त्यानंतर **हियतमहंमद** नवाब झाला त्यासही राज्य चालविण्याचें सामर्थ्य नव्हतें, ह्मणून नवाबाच्या खासगी खर्चाकडे पांच लक्षांचा मुलूक ठेवून बाकी सुमारें पंधरा लक्षांच्या मुलकाची वहिवाट त्याचा दिवाण करीत असे. **हियतमहंमद** ह्याचा **फौलादखान** नामें चेला कारभार करीत असतां **गाडर्ड साहेबाचें** लश्कर **मराठ्यांशीं** युद्ध करण्याकरितां त्याच्या राज्यांतून दक्षिणेंत गेलें,
इ० स० १७७८ त्या वेळीं त्यानें फार कुमक केली हा उपकार **इंग्लिश** सरकार कधीं विसरलें नाहीं. हा **फौलादखान** आणि **यारमहंमदाची** वृद्ध विधवा स्त्री **माहादजी साहेबा** ह्या उभयतांचा विरोध पडून तो प्राणास मुकला, आणि **चट्टाखान** नामें नवाबाचा दुसरा चेला कारभार करूं लागला. त्यानें बहुत वर्षेंपर्यंत प्रजांचें पालन उत्तम रीतीनें केलें. ह्यानंतर कितीएक वेळां उलटापालटी होऊन शेवटीं **हियतमहंमद** हा जिवंत असतांच त्याच्या चुलत भावाचा मुलगा वजीर-

**महंमद** नामें सरदार सर्व कारभार करूं लागला. **हियत महंमद** हा संन १८०३ मध्यें मेल्यानंतर **शिंदा** व **नागपूरकर रघुजी भोंसला** हे उभयतां **भोपाळचें** संस्थान बुडविण्याविषयीं प्रयत्न करीत असतां **वजीरमहंमद** ह्यानें आपला पराक्रम व चातुर्य ह्यांच्या बळेंकरून त्याचें बारा वर्षें रक्षण केलें; आणि शेवटीं **इंग्लिशांचे** मदतीनें स्वस्थता होऊन त्यास राज्यसुखाचा अनुभव होणार इतक्यांत तो संन १८१६ फेब्रुआरी महिन्यांत मरण पावला.

२ त्याचा मुलगा **नजर महंमद** हाही त्याप्रमाणेंच शूर, सद्गुणी, व विपत्तींत वाढलेला होता, त्यानें **इंग्लिश** सरकाराशीं कराराप्रमाणें वागण्यांत कांहीं कसर केली नाहीं. **भोपाळच्या** संस्थानाचा वसूल हालींचे लढाईचे अखेरीस सुमारें वीस लक्ष रुपये होता, तें संस्थान नवाबानें वंशपरंपरेनें अनुभवून **इंग्लिश** सरकारच्या चाकरीकरितां साहाशें स्वार आणि चारशें पायदळ तयार ठेवावें, असा करार केला. त्याशिवाय खंडणी देण्याची होती ती **इंग्लिश** सरकारानें माफ केली, आणि **अष्टे** वगैरे **पंचमाहाल, सुजावेलपूर, इसलामनगरचा** किला वगैरे मुलूक त्यास दिला. ह्याप्रमाणें संन १८१८ च्या जानुआरी महिन्याचे २६ वे तारखेस तह ठरला. नवाबानें **इंग्लिश** सरकारचे मर्जीप्रमाणें बहुत **पेंढारी** लोकांस शेतें व जमिनी देऊन त्यांस चांगला मार्ग लावण्याविषयीं कुमक केली. तो आपले रयतेचें चांगले रीतीनें पालन करील अशी सर्वांस उमेद होती, परंतु पुढील वर्षी एकाएकीं आपले मुलीस खेळवीत असतां त्याचे कमरेंतील पिस्तूल

उडून तो मरण पावला, तेणेंकरून सर्व प्रजेस फार दुःख झालें. पुढें इंग्लिश सरकारच्या अनुमतानें त्याचा पुतण्या **मनीरमहंमद** हा गादीवर बसला. तेव्हांपासून **भोपाळच्या** संस्थानांत कांहीं उलटापालट झाली नाहीं.

३ **कोटा** एथील राजा **महाराव उमेदशिंग** नामें होता; परंतु त्या संस्थानाचा सर्व कारभार **राणा जालिमसिंग** नामें सरदार पन्नास वर्षांपासून करीत होता, तो **पेंढाऱ्यांच्या** युद्धामध्यें **इंग्लिश** सरकारास फार उपयोगीं पडला होता, ह्मणून **शिंद्याचा** कांहीं प्रांत त्याजवळ होता तो **इंग्लिश** सरकारानें त्याजकडे चालविला; आणि त्यालाच राज्य द्यावें असें **गवर्नरजनरल साहेबाच्या** मनांत होतें; परंतु **राव** ह्याच्या नांवें तह करून मला वंशपरंपरा दिवाणगिरीविषयीं मात्र वाहादारी असावी असें **जालिमसिंग** ह्यानें कळविल्यावरून इंग्लिश सरकारानें संन १८१७ च्या दिसेंबर महिन्याच्या २६ वे तारखेस ठरलेल्या तहांत त्या मजकुराचें एक कलम जास्त लिहिलें. पुढें संन १८१९ मध्यें **उमेदसिंग** मरून त्याचे मुलगे व **जालिमसिंग** ह्यांचा कलह झाला; त्यांत **इंग्लिश** सरकारानें **जालिमसिंगास** मदत केली. संन १८२१ मध्यें **इंग्लिश** सरकारची फौज आणि वडील राजपुत्र **किशोरसिंग** ह्या उभयतांचें **कोट्याजवळ** युद्ध होऊन तो राजपुत्र पराभव पावला, आणि त्याचा भाऊ **पृथुसिंग** युद्धांत पडला; मग **जालिमसिंग** व त्याचा वडील मुलगा **माधवसिंग** ह्यांनीं कारभार करावा असें ठरलें. **जालिमसिंग** हा शूर आणि वृद्ध सरदार पुढें तीन वर्षांनीं मरण पावला. को-

**त्याच्या** संस्थानाचा वसूल दरसाल ४७,००००० येण्याचा अजमास होता, व त्यांतून **शिंद्याचे** खंडणीबद्दल **राव** ह्यानें दोनलक्ष चौसष्ट हजार रुपये वर्षास **इंग्लिश** सरकारास द्यावे असें ठरविलें होतें.

४ **जोतपूरचा** वंशपरंपरेंतला राजा **मानसिंग** ह्यास पठाणांनीं फार उपद्रव केला होता, आणि तो दरसाल **सिंद्यास** खंडणी देत असे. ह्या खंडणीबद्दल एक लक्ष आठ हजार रुपये सालीना घेण्याचें ठरवून तहनामा झाला. हा राजा **मानसिंग** त्याचा मुलगा **छत्तरसिंग** जिवंत होता तंवपर्यंत आपली दाढी वाढवून योग्यासारिखा वागे, व कारभारांत मन कांहीं घालीत नसे; परंतु तो मुलगा संन १८१९ सांत मेल्यावर आपण कारभार करूं लागला, आणि तेव्हांपासून त्यानें कितीएक वेळां क्रूर कर्में व इंग्लिशांशीं कपट केल्यामुळें त्याच्या बंदोबस्ताकरितां इंग्लिशांस फौज पाठवावी लागली. तथापि त्यापासून कांहीं विशेष युद्धादिक अनर्थ झाला नाहीं. ता० ६ जानुआरी स० १८१८

५ प्राचीन आणि प्रतिष्टित कुळाचा जो **उदेपूरचा राणा** त्याचें राज्य लढाईचे घालमेलींत बहुतकरून नाहींसें झालें होतें, आणि **पठाण** व **राण्याचे** मांडलिक ठाकूर हे बहुतेक प्रांतांवर सत्ता करीत होते. **इंग्लिशांच्या** आश्रयांत आल्यामुळें ह्या दुःखांतून **राणा** मुक्त झाला; आणि **इंग्लिश** सरकारानें त्यास **कमळनेरचा** किल्ला व **शिंद्याकडून** घेतलेला कांहीं प्रांत देऊन खंडणीबद्दल वसुलापैकीं पहिल्यानें रुपयास चार आणे, आणि पांच वर्षांनंतर रुपयास साहा आणे **इंग्लिश**

सरकारास त्यानें द्यावे असा नेम करून तारीख १६ जानुआरी संन १८१८ ह्या दिवशीं तहनामा ठराविला; आणि संवत् १८२२ ह्मणजे संन १७६६ पासून ठाकुरांनीं जे कांहीं प्रांत जबरीनें घेतले असतील ते सर्व **राण्यास** परत द्यावे असा बंदोबस्त **इंग्लिश** सरकारचा एजेंट **कपतान टाड-साहेब** ह्यानें केला. ह्या रीतीनें **राण्यास** सुमारें बारालक्ष रूपये उत्पन्नाचा प्रांत मिळाला.

६ **बुंदीचा** राजा ह्यानें संन १८०४ मध्यें **कर्नेल मान्सन साहेबास** संकटसमयीं आश्रय दिला होता तो उपकार स्मरून **इंग्लिश** सरकारानें त्याकडून ऐशीं हजार रूपये खंडणी यावयाची ती त्यास माफ केली. आणि **पटणचा** किल्ला राजानें मागितल्यावरून त्यास तो देऊन **शिंद्याचे** तिजाईबद्दल त्याजकडून वर्षास चाळीस हजार रूपये घेण्याचा ठराव करून फेब्रुआरी महिन्याचे १० वे तारखेस तहनामा केला. संन १८२१ मध्यें राजा **विष्णुसिंग** हा मरण पावून त्याचा लहान पुत्र राजा **रामसिंग** हा गादीवर बसला, आणि तो मोठा होईपर्यंत त्याच्या बापाचे वेळचा कारभारी **बोहोरा शंभुराम** ह्यानें कारभार करावा असें ठरलें.

७ **मारवाड** प्रांताच्या पलिकडे जें वाळवंट आहे त्यांतील **बिकानीरचा** राजा **सुरतसिंग** ह्यानें आपल्या राज्यांत लुटण्याची बंदी करावी; जो माल त्याचे सरहद्दीच्या आंत लुटीस गेला असेल त्याची किम्मत भरून द्यावी; प्रसंग पडेल त्या वेळीं त्यानें आपल्या सामर्थ्याप्रमाणें **इंग्लिश** सरकारास लश्कराची कुमक करावी; आणि त्यास आपल्या संरक्षणाक-

रितां **इंग्लिशांच्या** लश्कराचें अगत्य लागल्यास त्याचा त्यानें खर्च द्यावा, ह्याप्रमाणें कबूलात होऊन तहनाम्यावर तारीख १३ मार्च संन १८१८ ह्या दिवशीं सह्या झाल्या. ह्या राजावर खंडणीविषयीं कोणाचा दावा नव्हता ह्मणून त्याजपाशीं **इंग्लिश** सरकारानें खंडणीचें मागणें केलें नाहीं. संन १८१९ मध्यें लुटारू लोकांचा उपद्रव ह्या संस्थानांत झाल्यामुळें **इंग्लिश** सरकारास तिकडे लश्कर पाठवून बंदोबस्त करावा लागला; परंतु **सुरतसिंग** ह्याजपासून **इंग्लिश** सरकारास मेहेनत पडण्याजोगी कांहीं वांकडी वर्तणूक झाली नाहीं.

८ **जसलमीर** हें वाळवंटांतील पश्चिम सरहद्दीवरचें संस्थान, एथील राजा **मुळराज** ह्यानें वरच्या कलमांत लिहिल्याप्रमाणेंच करार करून तहनामा ठरावून घेतला, ती तारीख १२ दिजेंबर सन १८१८. हा राजा पुढील वर्षीं मरण पावून त्याचा नातू **गुजसिंग** संस्थानाचा अधिकारी झाला.

९ संन १८१८ मध्यें वर लिहिल्याप्रमाणेंच **डोंगरपूर**, **मसवाडा**, **प्रतापगड**, **रतलामनगर**, वगैरे माळव्यांतील इतर लहान संस्थानें ह्यांच्या अधिकाऱ्यांशीं तहनामे झाले. त्यांतून कितीएक **होळकरास** व कितीएक **धारेच्या पोंवारास** व कितीएक **शिंद्यास** खंडणी देत असत, ती सर्व **इंग्लिश** सरकाराकडेस त्यांनीं द्यावी, व **इंग्लिश** सरकारानें त्या त्या सरकारचा दावा चुकवावा ह्याप्रमाणें व्यवस्था ठरली.

१० **जयपूर** हें संस्थान इतरांपेक्षां **दिल्लीस** जवळ असून एथील राजानें तहाविषयीं पहिल्यानें वकील पाठविले नाहींत;

कारण **मराठे** व **इंग्लिश** ह्यांतून कोणत्या पक्षाचा जय होतो हें संधान तो पाहात होता. शेवटीं जेव्हां **इंग्लिशांचा** चढ होण्याविषयीं कांहीं संशय राहिला नाहीं, आणि राजाचे ताब्यांतील **कृष्णगड** वगैरे जागचे संस्थानिक ह्यांबरोबर **इंग्लिश** सरकारानें वेगळे तह करण्याचा आरंभ केला: तेव्हां **जगत्‌सिंग** ह्यानें वकील पाठविले. ते आणि **इंग्लिश** सरकारचे कामदार ह्यांमध्यें बराच वादविवाद झाल्यावर शेवटीं खंडणीविषयीं असें ठरलें कीं पहिल्या वर्षी **इंग्लिशांनीं** कांहीं मागूं नये; पुढील पांच वर्षांत अनुक्रमानें चार, पांच, साहा, सात आणि आठ लक्ष रुपये राजानें **इंग्लिशांस** द्यावे; आणि पुढें दरसाल आठ लक्ष रुपये देत जावे; परंतु राज्याचा वसूल ज्यास्त झाल्यास दर रुपयास पांच आण्याप्रमाणें खंडणीची बेरीज चढावी असा उभयतांचा तहनामा एप्रिल महिन्याचे २ रे तारखेस ठरला. ते वेळीं संस्थानचा वसूल ऐशीं लक्ष रुपये येईल असा सुमार होता; परंतु राजास कारभार करण्याची हुशारी नव्हती; व तो कलावंतिणी, खोजे, व इतर हलके चाकर ह्यांच्या तंत्रानें वागत असे, ह्मणून अव्यवस्था झाली; तिच्या बंदोबस्ताकरितां **सरडेविड आक्टर्लोनी** साहेब ह्यास तेथें जावें लागलें.

११ राजा **जगत्‌सिंग** तह झाल्यावर लवकरच (संन १८१८ दिजेंबर) मरण पावला; आणि **सरडेविड आक्टर्लोनी** साहेबानें **सवाईजयसिंग** ह्मणून त्याचा लहान मुलगा गादीवर बसविला; आणि तो मोठा होईपर्यंत संस्थानचा कारभार राणीचे हुकमानें **रावळ बैरीसाल** ह्यानें करावा असें

ठरविलें. परंतु राणीनें **झोलाराम** नामें कोणी सरदार ह्याचे व दुसरे कितीएकांचे मसलतीस लागून **बैरीसाल** ह्याच्या कारभारास हरकत करण्याचें आरंभिलें; ह्याजमुळें संस्थान बेबंद होऊन **सरडेविड आक्टर्लोनी साहेबास** पुनः तेथें जाऊन बंदोबस्त करावा लागला. राणीही प्रथम इंग्लिश सरकारचें बोलणें कबूल करीना, परंतु पुराबंदोबस्त करण्याविषयीं निश्चय ठरला आहे, व त्याप्रमाणें झालें असतां आपला नाश होईल, असें तिला पक्कें समजल्यावर तिनें **झोलाराम** ह्यास कारभारांतून काढण्यास रुकार दिला.

१२ वर लिहिलेले बहुतेक तहनामे लढाईचे पूर्वीं किंवा लढाई चालत असतां झाले, आणि ते करण्याचा मतलब असा होता कीं **माळव्यांतील** संस्थानिक व **रजपूत** राजे ह्यांनीं मराठ्यांच्या पक्षास अनुकूल होऊं नये; आणि **शिंदा** वगैरे राजे ह्यांस त्यांकडून खंडणी वसूल करण्याच्या निमित्तानें किंवा दुसऱ्या कोणत्याही निमित्तानें त्यांवर लश्करें पाठविण्यास किंवा मुलकांत पुंडावकें करण्यास संधि सांपडूं नये. हा **इंग्लिश** सरकारचा अभिप्राय उत्तम रीतीनें सिद्धीस गेला, आणि ते आश्रय कबूल केलेले राजे लढाईमध्यें विश्वासानें वागून **इंग्लिशांचा** सर्व प्रकारें जय झाला; त्यांस नवें राज्य बहुत मिळालें; आणि त्यांचे शत्रु हीनबल होऊन त्यांच्या ताब्यांत आले. ह्या नव्या राज्याची व्यवस्था इंग्लिश सरकारानें कशी केली, आणि आपल्या अधीन झालेल्या संस्थानिकांशीं तें कोणत्या प्रकारें वागलें हें आतां लिहिलें पाहिजे.

१३ **बाजीराव पेशवा** ह्याचें बहुतकरून सर्व राज्य इं-

ग्लिश सरकारानें आपण घेतलें, आणि तेथें इंग्लिश कामदार ठेवून कांहीं प्राचीन संप्रदायाप्रमाणें व कांहीं इंग्लिश सरकारच्या शिरस्त्याप्रमाणें वहिवाट चालू केली. ह्या दरोबस्त मुलकाचा कारभार गवर्नरजनरल ह्यांच्या हुकमाप्रमाणें एल्फिन्स्तन्साहेब हे कमिशनर ह्या नामेंकरून करीत होते. त्यांची नेमणूक मुंबई एथील गवर्नराच्या अधिकारावर होऊन ते संन १८२० मध्यें तेथें गेल्यानंतर मद्रास इलाख्याचे चाप्लिनसाहेब ह्यांस तो हुद्दा प्राप्त झाला; आणि नवा मिळालेला सर्व मुलूक मुंबई सरकारचे ताब्यांत आला.

१४ पेशव्यापासून मिळालेल्या राज्यापैकीं सुमारें चवदालक्ष रुपयांचा मुलूक सातारचा राजा प्रतापसिंह ह्यास दिला तो निरा आणि वारणा ह्या दोन नद्यांच्या मध्यें आहे, आणि पूर्वेस त्रिकोणाकृति होऊन पंढरपूर आणि विजापूर ह्यांपर्यंत पोहोंचला आहे. ह्या राजाशीं कपतान ग्रांटसाहेब
ता० २५ सप्टेंबर स० १८१९ ह्याच्या विद्यमानें तह ठरला; त्यांतील मुख्य करार असे कीं राजानें फौज ठेवूं नये; सर्व गोष्टींविषयीं रेसिडेंटाचे मसलतीनें चालावें; आणि राजास कामाची माहितगारी होईपर्यंत इंग्लिश कामदारांनीं मुलकाची वहिवाट करावी. ह्याप्रमाणें कांहीं वर्षेपर्यंत कारभार चालल्यावर राज्याचा सर्व अधिकार राजाच्या स्वाधीन झाला.

१५ कोलापूरकर राजे ह्यांनीं बाजीराव असतांच इंग्लिशांशीं स्नेह ठेविला होता, आणि संन १८१३ मध्यें शिवाजीराजा गादीवर आला तेव्हां बाजीराव ह्यानें उमेद दिल्यावरून निपाणकर व बापूगोखला हे त्यास उपद्रव करूं

लागले, त्यांपासून त्यास मुक्त करण्याकरितां **इंग्लिश** सरकारानें कुमक केली होती, आणि त्यानें तीबद्दल त्यांस **मालवण** दिलें होतें. ह्या राजास (संन १८२४) त्याच्याच शिपायांनीं तैनातीचे बाकीकरितां मारिलें. त्यानंतर त्याचा भाऊ गादीवर बसला.

१६ **वाडीच्या** संस्थानाचा राजा **खेमसावंत** लाहान होता, ह्मणून ह्या वेळेस तेथील कारभार त्याच्या आया करीत होत्या. त्या संस्थानाच्या लगत समुद्रामध्यें जहाजांस कांहीं उपद्रव होऊं लागला, त्याच्या बंदोबस्ताकरितां **मुंबई** सरकारांतून कांहीं जाहाजें पाठवावीं लागलीं. पुढें कांहीं वर्षांनीं (संन १८२४) **खेमसावंत** प्रौढ होऊन आपला कारभार पाहूं लागला.

१७ **प्रतिनिधि, पंत सचिव, पंत अमात्य, सेनापति दाभाडे, आपादेसाई निपाणकर,** व **आंग्रे**, ह्यांनीं युद्धाच्या आरंभीं **बाजीरावाचा** पक्ष धरिला होता, परंतु ते यथाकाल **इंग्लिशांस** शरण आले ह्मणून त्यांनीं आपल्या जाहागिरी भोगून स्वस्थ असावें असें **इंग्लिशांनीं** त्यांस अभय दिलें; आणि ह्याशिवाय पूर्वींच्या सरकारचे वेळेचे **पटवर्धन** व दुसरे संस्थानी ह्यांचे सरंजाम तसेच चालविले; आणि **पेशव्यांचे** मानकरी व इतर संभावित गृहस्थ ह्यांस जाहागिरी व नेमणुका करून दिल्या. ह्या संस्थान्यांच्या एकंदर जाहागिरी मिळून लढाईच्या अंतीं सुमारें साठ सत्तर लक्षांचा मुलूक होता; परंतु ह्यांतून बहुत त्या त्या सरदारांनीं जन्मपर्यंत जा-

तीनें अनुभवाव्या असा करार होता, ह्मणून त्या उत्तरोत्तर सरकारांत येत जातील असा अजमास होता.

१८ **हैदराबादच्या** दरबारांत ह्या कारकिर्दीमध्यें मोठी घडामोड कांहीं झाली नाहीं. आरंभींच नवाबाचे मुलगे ह्यांनीं **चंदूलाल** व रेसिडेंट ह्यांशीं फार विरोध आरंभिला होता, परंतु त्यांस किल्ल्यावर नेऊन ठेवितांच त्या गोष्टीचा बंदोबस्त झाला. **हैदराबादेच्या** सरकारास कर्जी रुपये देऊन मुलकावर वराता घ्याव्या, व मामलती कराव्या अश्या हेतूनें **पाल्मर** नामें साहेब ह्यानें तेथें पेढी मांडली होती, आणि त्या कामास **गवर्नरजनरल साहेबांचें**ही अनुमत होतें. परंतु तें कायद्यास विरुद्ध ह्मणून ती पेढी तेथून काढावी व सरकारानें त्यांच्या कर्जाची फेड करण्याविषयीं मध्यस्थी करूं नये असें (संन १८२३) ठरल्यावरून त्या सावकारांचें दिवाळें निघालें, त्यामुळें बहुतांचा पैका बुडाला.

१९ **नागपूरकर भोंसला** ह्याचे गादीवर **बाजीराव भोंसला** नामें दत्तपुत्र **इंग्लिशांनीं** बसविला. नकाश्यामध्यें पाहिलें असतां ह्या संस्थानाच्या ताब्यांत मुलूक तर पुष्कळ दिसतो खरा, परंतु त्यांत जंगलें व ओसाड प्रांत बहुत ह्यामुळें त्याचें उत्पन्न पन्नास लक्ष रुपयांवर नाहीं. राजाच्या मुलकाचा कारभार राजाच्याच कामदारमंडळीनें करावा, अशी **गवर्नरजनरल साहेब** ह्यांची इच्छा होती; परंतु त्यांचा संशय येण्यास कारणें झाल्यामुळें दरोबस्त कामदार इंग्लिश सरकारानें आपल्या तर्फेनें नेमिले; आणि इंग्लिशांचे चालीप्रमाणें कवाईत शिकलेली फौज तयार करून

तिजवर इंग्रेज सरदार ठेविले. ह्याप्रमाणें वहिवाट कांहीं वर्षे-पर्यंत चालून राजा थोर झाल्यावर **इंग्लिशांनीं** मुलूक त्याच्या स्वाधीन केला (संन १८२७); परंतु रेसिडेंटाच्या मर्जीप्रमाणें वागण्याविषयीं तो व **सातारकर भोंसले** ह्यांत कांहीं भेद नाहीं.

२० **आपा साहेबाकडून** पहिल्या बिघाडाचे वेळेस **जब्बलपुराच्या** सभोंवताला **नर्मदेच्या** कांठचा जो मुलूक **इंग्लिशांनीं** घेतला होता तेथें कांहीं वेळपर्यंत मुलकी रिवाजाप्रमाणेंच कमिशनराचा अमल चालून तो प्रांत **इंग्लिशांच्या** इतर राज्यांत दाखल झाला.

२१ **होळकराच्या** संस्थाना पैकीं सुमारें सात लक्षांचा मुलूक **अमीरखान*** ह्यास व सुमारें साडेतीन लक्षांचा मुलूक

---

*पेंढाऱ्यांच्या संबंधानें अमीरखानाचें नाव वर लिहिण्यांत आलें हा अमीरखान मुरादाबाद प्रांतांतील संबळ गांवचा राहणारा;– तो लहानपणीं माळव्यामध्यें पेशव्यांचे शिवबंदींत चाकरीस होता. तेथून कांहीं दिवस भोपाळास चाकरी करून राघवगड एथील दुर्जनलाल नामें रजपूत सरदार ह्याच्या पदरीं राहिला. तेथें शिंद्याशीं युद्ध करून त्यानें पराक्रम केला, ह्मणून त्यास पांचशें लोकांची सरदारी व पालखी इतकी थोरवी प्राप्त झाली. पुढें थोड्याच दिवसांनीं त्याचें व यशवंत राव होळकराचें इष्टत्व पडून होळकरानें त्याला जवळ बाळगिलें. आपल्या पठाणी फौजेचें सर्व स्वामित्व यशवंतरावानें त्याजकडे ठेविलें असे, परंतु यशवंतराव ह्या पठाणांस दूरदूरच्या मोहिमांवर पाठवी, आणि ते आपल्या पगाराचे बाकीसाठीं केव्हां केव्हां अमीरखानास धरून बसवून त्यास ठोकीत व दुसऱ्या प्रकारें त्याची आबरू घेत. अमीरखान पुण्याचे स्वारीपासून यशवंतरावाबरोबर फिरत होता; तो यशवंत राव पंजाबांतून परत आल्यावर त्याकडून निघून जयपूरच्या राजाजवळ जाऊन चाकरीस राहिला.

**होळकराचा** कारभारी **गफूरखान** ह्यास द्यावा असें ठरून बाकी सुमारें पंचवीस लक्षांचें राज्य **होळकराकडे** राहिलें. त्याबद्दल **इंग्लिश** सरकारास कारण पडेल तेव्हां तीन हजार स्वार कुमकेस द्यावे असा करार झाला. **होळकराच्या** ताब्यांत सर्व मिळून सुमारें वीस लक्षांचे किरकोळ संस्थानी आहेत. कितीएक लुटारू सरदार व गिराशी हे मुलकांत आपले हक्क वसूल करण्याबद्दल ह्मणून सत्ता करीत होते, त्यांनीं **होळकर** व **शिंदे** ह्यांजकडून नेमणुका घ्याव्या व रयतेस उपद्रव करूं नये असा त्यांचा बंदोबस्त झाला.

२२ **गायकवाडाच्या** आणि **इंग्लिशांच्या** संबंधांत लढाईमुळें कांहीं अंतर पडलें नाहीं; परंतु **पेशव्यांची** गादी बुडाल्यामुळें **बाजीरावाच्या** जुन्या बाकीबद्दल **गायकवाडा**-

---

त्या वेळीं जोतपूरकर व जयपूरकर ह्या दोन कुळांमध्यें कलह चालला होता, आणि त्या कलहास कारण असें होतें कीं उदेपूरच्या राण्याची कन्या कृष्णकुंवर ह्मणून मोठी सुरूप आणि गुणवती होती, ती आपणास प्राप्त व्हावी ह्मणून जोतपूरचा राजा मानशिंग आणि जयपूरचा राजा जगत्‌शिंग ह्या उभयतांचा अभिप्राय होता. ह्या दोन संवस्थानांमध्यें कितीएक वर्षें युद्ध चाललें आणि उभयतांनींही आपणास जय मिळण्याकरितां कोटिशः रूपये खर्च करून लढाया केल्या, त्यांत जयपूरच्या राजास सोडून अमीरखान त्याचे शत्रूकडेस गेला; व मानसिंगाच्या सांगण्यावरून त्यानें कितीएक क्रूर कर्मैं केलीं, व नागोर वगैरे प्रांत लुटले. शेवटीं (सन१८१०) जोतपूर व जयपूर ह्यांच्यामध्यें पुरा स्नेह होण्यास उदेपूरची कृष्णकुंवर ही कशीतरी नाहींशी झाली पाहिजे, ही मसलत ठरल्यावरून अमीरखानानें युक्तीनें तिचे आतेस भर देऊन तिजकरवीं तिला विष देववून तें घातकी कर्म करविलें. तें वर्त्तमान समजतांच रजपूत लोकांमध्यें मोठा हाहाकार झाला. त्यांतून सकवारसिंग

वर दावा होता तो सर्व रद्द झाला, हा **फत्तेसिंगाचा** मोठा फायदा झाला. **फत्तेसिंग** मरण पावल्यावर **सयाजीराव** गादीवर बसला. लढाईचे अखेरीस **गायकवाडाचें** राज्य सुमारें साठ लक्ष रुपयांचें होतें, आणि कारण पडेल तेव्हां त्यानें कुमकेस तीन हजार स्वार द्यावे असें ठरलें होतें. ह्याशिवाय त्याचें कर्ज आणि कितीएक कामदारांच्या नेमणुका ह्यांस कंपनी सरकारची बाहादारी होती, त्याप्रमाणें पार पडण्याबद्दल इंग्लिश सरकारास बहुतवेळ मेहनत पडून हीं प्रकरणें उभयतां सरकारच्या तंट्यास कारणें झालीं आहेत.

२३ **दवलतराव शिंदा** ह्यानें जरी आपल्या संरक्षणार्थ **इंग्लिशांची** फौज मागितली नाहीं, तरी पेंढाऱ्यांचे लढाईंत पांच हजार फौज इंग्लिश सरदारांनीं शिकविलेली तयार झाली, ती संधी पाहून त्यानें आपल्या कितीएक **फ्रेंच** सरदारांचे सरंजाम काढून घेऊन त्यांचे फौजेस फांटा दिला ; आणि देशांत स्वस्थता झाली ह्मणून युद्धाचें कारण नाहीं असें

---

नामें एक सरदार राण्याजवळ येऊन त्याच्या पायांजवळ ढाल तरवार ठेवून बोलिला, "महाराज माझ्या वडिलांनीं आपल्या वडिलांची चाकरी तीस पिढ्यांपर्यंत केली, आणि आपणाविषयीं जी माझी भक्ति आहे ती माझ्यानें बोलून दाखवत नाहीं; परंतु आपल्या चाकरांमध्यें पुनः हें शस्त्र मी धरणार नाहीं." असें ह्मणून कृष्णकुंवरेस मारविण्याची मसलत ज्या अजितसिंग दिवाणानें दिली होती, त्यास तो बोलिला, "त्वां रजपुतांच्या नावास बट्टा लाविला, तर मुलाच्या शोकानें पिडिलेल्या बापाचा शोक तुला बाधो, आणि निपुत्रिक मर."

वरच्या वर्तमानापासून अमीरखानाचे दुर्गुण आणि अविश्वासुपणा हीं ध्यानांत येतील. ह्या सुमारें होळकराच्या संस्थानाचाही बहुतेक कारभार स्वाधीन झाल्यामुळें त्याची उत्कृष्ट बढती होऊन तूं दिल्लीपति होशील असें लहानपणीं जें त्यास कोणी भविष्य सांगितलें होतें तें खरें होण्याची तो वाट पाहूं लागला,

पाहून त्यानें तोच क्रम पुढें चालविला. युद्धाचे अखेरीस दवलतरावाचा मुलूक सुमारें एक कोटि पंचेचाळीस लक्षांचा होता ; शिवाय वर लिहिलेल्या रजपूत राजांपैकीं खंडणीचा ऐवज इंग्लिश सरकाराकडून येण्याचा तो दहा लक्ष रुपये होता. ह्यांतून सुमारें सत्रा लक्ष रुपयांच्या नेमणुका शिंद्याच्या पदरच्या लोकांस ठरावून दिल्या होत्या ; आणि वसुलासंबंधें खर्च रुपयास सुमारें चार आणे होता, ह्मणून संस्थानाचा इतमाम राखण्यास व फौज वगैरे ठेवण्यास दवलतराव ह्यास इतर राजांपेक्षां सामर्थ्य अधिक होतें; व त्याजवळ फौजही बरीच होती ; परंतु इंग्लिशांचा पराक्रम त्याच्या अनुभवास असा चांगल्या रीतीनें आला होता कीं तो पुनः कांहीं विरोध करील अशी कांहीं कल्पना नव्हती.

२४ संन १८१३ पासून संन १८२३पर्यंत दहा अकरा वर्षांत उत्पन्न वाढल्यानें किंवा जाहागिरी वगैरे सरकारांत आल्यानें जी सुमारें एक कोटि रुपये जमा वाढली ती शिवाय करून संन १८१७ १८ ह्यांत मिळालेला नवा मुलूक जो बंगाल इलाख्याकडे दाखल झाला त्याचा वसूल व खंडण्यामिळून सुमारें एककोटि रुपये, व मुंबई इलाख्याकडे जो नवा मुलूक दाखल झाला त्याचा वसूल सुमारें दोन कोटि रुपये, मिळून चार कोटि रुपये अधिक उत्पन्न झालें, ह्मणजे संन

---

परंतु एकाएकींच तें सर्व एकीकडे राहून त्यानें लहानसें संवस्थान मात्र घेऊन स्वस्थ राहावें असें ठरल्यामुळें त्याची निराशा झाली. परंतु ज्याचा शिपायापासून चाकरीस आरंभ, व ज्याचें बहुतेक आयुष्य लुटण्यांत व लोकांस पीडा करण्यांत गेलें, त्याची अवस्था इतर पेंढारी सरदारांप्रमाणें न होतां तो नवाब साहेब ह्या पदास चढून मरण पावला हें अल्प भाग्याचें लक्षण नव्हे.

१८२२ २३ ह्या वर्षी एकंदर उत्पन्न २०,१२,३२,१४४ रुपये सरकारजमेस आले; आणि त्या वर्षी १७,७१,०३, ९०७ रुपये खर्च होऊन बाकी २,४१,२८,२३७ रुपये शिलक राहिली. संन १८१४पासून पुढील सात वर्षांत लढाईबद्दल वगैरे मिळून सरकारास चार कोटि रुपये कर्ज जास्त झालें होतें; त्याची बेरीज संन १८२१ मध्यें २९,८९,०६,९४० रुपये होती; परंतु पुढें जमा वाढून खर्च कमी होऊन शिलक पडेल, व ती शिलक कर्ज वारण्याच्या कामाकडे किंवा मुलकाची सुधारणूक करण्याकडे लावायास सांपडेल अशी उमेद खचीत दिसत होती.

## प्रकरण २२.

### लार्ड आम्हर्स्त ह्यांची कारकीर्द. ब्रह्मी लोकांशीं लढाई.

इ० संन १८२३ पासून संन १८२६ पावेतों.

१ **मार्किस आफ् हेस्तिंग्स***साहेब ह्यांनीं गवर्नर जनरलाचा अधिकार सोडल्यावर त्या कामावर **लार्ड आम्हर्स्त** साहेब ह्यांची नेमणूक होऊन ते **कलकत्त्यास** येऊन दाखल झाले. नंतर थोड्याच काळानें त्यास ब्रह्मराजाशीं लढाई इ० स० १८२२ आगस्त

* हा वृद्ध आणि मान्य साहेब अधिकार सोडून गेल्यावर थोड्या वर्षांनीं मरण पावला. त्याची द्रव्याची हलाखी ऐकून त्यास वतन घेण्याकरितां तो जिवंत असतां कंपनी ह्यांनीं सहा लक्ष रुपये दिले होते, आणि तो मेल्यावर त्याच्या मुलांचें चालविण्याकरितां आणखी दोन लक्ष रुपये त्याच्या कारभाऱ्याच्या स्वाधीन केले.

करण्याचे मसलतींत मन घालावें लागलें. तें वर्त्तमान असें.

२ **ब्रह्मदेशांत** सुमारें दोनशें वर्षांचे पूर्वी लहान लहान संस्थानें होतीं; तीं इसवी सनाच्या गेल्या शेंकड्याच्या आरंभीं **आवा** एथील अधिकारी प्रबल होऊन त्याच्या अमलाखालीं एकवटलीं, आणि त्यानें **पेगूचें** संस्थान आपल्या ताब्यांत आणिलें. तें कांहीं काळानें उलट होऊन **पेगूचें** प्राबल्य अधिक झालें; परंतु पुनः इ० सन १७५३ च्या सुमारें **आलोंप्रा** नामें राजा ह्यानें **पेगूकरी** ह्यांस आपल्या शहाखालीं आणून **आवा** एथें एक मोठें राज्य स्थापिलें, आणि पुढें **सयाम** (सुह्म) च्या राज्यांतील **तेनासरिम** समुद्रकांठा व **आराकान** हें स्वतंत्र संस्थान हीं हस्तगत केलीं; व **मणिपूर** आणि **आसाम** हींही त्याच्या अमलाखालीं आलीं. **ब्रह्म**-राज्यांत बहुतकरून बौद्ध धर्म चालतो हें प्रसिद्धच आहे.

३ **आराकान** प्रांत जेव्हां **ब्रह्मी** लोकांनीं घेतला, तेव्हां तेथील रयत **चितगांव** वगैरे जागीं **इंग्लिशांच्या** राज्यांत येऊन राहिली. हे लोक **आराकान** प्रांतांतील अमलदारांवर जाऊन हल्ले करीत असत, त्यांत त्यांस **इंग्लिश** सरकार मदत करितें असा **ब्रह्मी** लोकांस संशय होता, तो त्यांचा जाण्याकरितां **इंग्लिश** सरकारानें **लार्ड मिंटो साहेबांचे** कारकिर्दींत **ब्रह्मी** राजाजवळ आपला वकील पाठविला; त्याचा अपमान होऊन तो **रंगून** शहराहूनच परत आला; आणि आमची रयत आमच्या स्वाधीन करावी असें **ब्रह्मी** लोक **इंग्लिशां**-जवळ मागणें करूं लागले. परंतु आपणास जे शरण आले

त्यांस निघून जा ह्मणावें हें **इंग्लिश** सरकारास उचित न वाटून तें बोलणें त्यांनीं मान्य केलें नाहीं.

४ येणेंकरून **ब्रह्मी** लोकांस क्रोध आला; आणि पूर्वी त्यांनीं आपले गुन्हेगार लोक धरण्याच्या मिषानें **इंग्लिशांच्या** मुलकांत फौज पाठविली होती त्या वेळीं त्या लोकांची उपेक्षा करून **इंग्लिशांनीं** त्यांस **ब्रह्मी** फौजेच्या स्वाधीन केलें होतें, त्यामुळें त्यांस आपल्या बळाविषयीं अभिमान उत्पन्न झाला होता; ह्मणून त्यांनीं **मराठ्यांच्या** लढाईचे अखेरीस **रामरीच्या** राजाच्या द्वारें **इंग्लिशांस** लिहून पाठविलें कीं **चितगांव** व **धाका** व **मुर्शिदाबाद** हीं ठिकाणें आमच्या स्वाधीन करावीं. पुढें माल भरून जाणाऱ्या जाहाजांच्या रक्षणाकरितां **शाहापुरी** ह्मणून ओसाड बेट आहे त्याजवर **इंग्लिशांनीं** तेरा लोकांचा पहारा ठेविला होता, त्यावर संन १८२३ च्या सप्तेंबर महिन्यामध्यें **रामरीच्या** राजानें हजार लोकांनिशीं येऊन त्यांतून कितीएकांस मारून बाकीच्यांस काढून दिलें. पुढें लवकरच **इंग्लिशांनीं** त्या बेटावर पुरायाजोगें लश्कर पाठविलें. इकडे ईशानीच्या बाजूस **आसामांतून** सुमारें चार हजार **ब्रह्मी** लश्कर **इंग्लिशांनीं** आश्रयाखालीं घेतलेल्या **काचार** प्रांतांत शिरलें, परंतु त्यांचा दोन ठिकाणीं पराजय झाल्यामुळें ते लोक परत **मणिपुरास** गेले.

इ० स० १८२३ सप्तेंबर

इ० स० १८२४ जानुआरी

५ **शाहापुरी** बेटाविषयीं सला करण्याचा प्रयत्न राहिल्यावर, व **ब्रह्मी** वकील परत **आराकान** एथें निघून गेल्यावर, पुढें युद्धाची तरतूद होणार, इतक्यांत त्या बेटाजवळ एक छबिन्याचें जाहाज ठेविलें होतें त्यावरील दोन इंग्रेज व एक

काळा खलाशी ह्यांस कोणी **ब्रह्मी** कामदारांनीं कांठावर जेवायास बोलावून त्यांस कपटानें धरून **आराकानास** नेलें. ह्यानंतर लवकरच **इंग्लिश** सरकारानें युद्ध करण्याची प्रतिज्ञा केली.

६ नंतर कांहीं लोक **बंगाल्याहून** जावे व कांहीं **मद्रासेहून** जावे मिळून अक्रा हजार लश्कर रवाना व्हावें असा निश्चय झाला. तें बहुतेक सैन्य आणि कितीएक लढाऊ जहाजें घेऊन **जनरल क्यांबल साहेब** मे महिन्यांत **रंगून** एथें जाऊन उतरला; त्यास **ब्रह्मी** लोकांनीं कांहीं अडथळा केला, परंतु त्या शहराचें रक्षण होणार नाहीं असें पाहून तेथील लोकांस त्यांनीं रानांत पिटून लाविलें, व तेथें कोणी युरोपियन व्यापारी व धर्मोपदेशक होते त्यांस धरून आपल्याबरोबर नेलें. असें तें शहर ओसाड पडलें, त्यावर **इंग्लिशांनीं** जाऊन आपला झेंडा लाविला. तेथें दाणावैरणीचा तोटा पडूं लागला; आणि **रंगून** शहरांत सर्वत्र चिखल, आणि सर्व घरें फळ्या आणि आंथऱ्या ह्यांचीं बांधलेलीं ह्मणून राहावयाची सोय सांपडेना. तशांत **इंग्लिशांनीं** त्यांचे कितीएक मोरचे हस्तगत करून **किमांडिन** एथें आपल्या तोफांचें बळ त्यांस दाखविलें, आणि त्यांचे सुमारें दीडशें लोक मारून

ता० २७ जून तें हस्तगत केलें. **चिडूबा** बेटांत रखवालीस साहाशें लोक होते, त्यांतून तीनशें मारून तेंही घेतलें.

८ **थाकिया वुंगी** ह्यानें जुलै महिन्याचे पहिले तारखेस सुमारें तीन हजार लश्करासहित **इंग्लिशांवर** हल्ला केला; तेव्हां उभयतांचें कांहीं वेळपर्यंत युद्ध झाल्यावर **कपतान**

**जोन्स साहेब** ह्यानें तीन कंपन्या बरोबर घेऊन शत्रूंच्या आंगावर मोठ्या शौर्यानें चाल केली, आणि बेनेटांनीं भोंसकून त्यांस रानांत पळविलें. त्यामुळें त्या **ब्रह्मी** सरदारास राजानें बरतर्फ केलें. पुढें थोड्या दिवसांनीं **जनरल साहेबानें** स्वतः कांहीं लश्कर घेऊन नदींतून **कमरून** एथें शत्रूवर स्वारी केली; आणि शत्रूनें आपल्या मोरच्यांच्या रक्षणार्थ तटबंदी केली होती ती हस्तगत केली. दुसरी एक टोळी तेच वेळीं खुशकीवरून त्या जाग्यावर गेली होती, तींतील लोक एकमेकाच्या खांद्यांवरून तटावर चढले, आणि **मेजर सेल साहेब** नामें **इंग्लिशांचा** सरदार ह्यानें शत्रूचा नवा सेनापति **संभावुंगी** ह्यास आपण तरवारीनें मारून पाडिलें. ह्याप्रमाणेंच **कैलू** एथील फौजेवर इंग्लिशांचें सैन्य गेलें होतें त्याचा जय न होतां तें परत आलें, परंतु इकडे राजाचे दोन भाऊ व त्याचें कांहीं खासगीचें सैन्य **सिरिआम** एथें आलें होतें. ह्या खासगीच्या सैन्यांतील लोकांचे केश आंखूड होते, व त्यांच्या हाता पायांवर हत्ती, वाघ, हे काढलेले असत, व ते आपलें शौर्य दाखविण्याकरितां उघड्या आंगानें युद्ध करीत असत. ह्यांस अजिंक वीर असें ह्मणत; परंतु त्यांवर **सिरिआम** एथें हल्ला करितांच ते किल्ला सोडून देवळांत पळाले, आणि त्यांच्या आठ तोफा व दुसरें लढाऊ सामान **इंग्लिशांचे** हस्तगत झालें. आणखी एका प्रसंगीं त्यांच्या जोश्यांनीं सांगितलेल्या सुमुहूर्तीं त्यांनीं इंग्लिशांवर हल्ला केला, तेव्हां कांहीं तोफांचा भडिमार चालू होतांच ते अजिंक वीर पळून गेले. आगस्त ता० ३०

९ ह्याप्रमाणें बहुतेक ठिकाणीं जय झाला. परंतु इंग्लिशांस देशाची माहितगारी नव्हती व पाऊस आणि चिखल वगैरे ह्यांची अडचण फार ह्यामुळें कितीएक ठिकाणीं हार ही आली. **तेनासरिम** प्रांत **कर्नल मैल्स** नामें सरदार ह्यानें जाऊन हस्तगत केला. असें पर्जन्यकाळांत वर्त्तमान **ब्रह्मदेशांत** होत असतां इकडे **कलकत्त्याहून** दुसरें लहान लश्कर रवाना होऊन त्यानें **आसाम** घेतलें; परंतु **आराकान** प्रांतांत **बंधुला** नामें **ब्रह्मी**सरदार ह्यानें **कप्तान नोटन साहेबाचा** अगदीं मोड करून **इंग्लिशांच्या** सैन्यांस हांकून दिलें. हें वर्त्तमान **ब्रह्मी**राजास समजल्यावर त्यानें त्या शूर सरदारास स्वदेशाच्या रक्षणाकरितां परत बोलाविलें. इकडे **हिंदुस्थानांत** ती पराजयाची बातमी आल्यावरून **कलकत्त्यांतील** लोकांमध्यें नानाप्रकरच्या खोट्या आवया उठल्या, आणि **ब्रह्मी**लोकांजवळ जादू आहे, त्यांवर लढायास जाणें ह्मणजे मरावयाची पाळी असें समजून **बाराकपूर** एथील पलटणींस तिकडे जाण्यास हुकूम झाला असतां त्या कुच करीनात, त्यांच्या सरदारांनीं आपली पराकाष्ठा करून पाहिली, परंतु शेवटीं उपाय नाहीं असें पाहून त्या शिपायांवर तोफा चालू केल्या; तेणेंकरून सुमारें दोनशें आसामी ठार होऊन पडल्यानंतर बाकीचे शुद्धीवर आले. पुढें त्यांतील नायकवड्यांस धरून ठार मारिलें, आणि एके पलटणीस फांटा दिला; तेव्हां बखेडा शांत होऊन फौज पाहिजे तिकडे जाण्यास कबूल झाली.

१० पर्जन्यकाळ गेल्यानंतर **रंगून** एथील **इंग्लिश** लश्करास नवी कुमक येऊन पोहोंचली; **चितगांव** प्रांतांतून पांचशें

खलाशी आले, त्यांनीं मचवे तयार करण्याचें काम चालविलें; आणि भाड्याच्या जनावरांचाही पुरावा होऊं लागला. इतक्यांत मोठी फौज घेऊन **बंधुला** हा **इंग्लिशांच्या** छावणीजवळ येऊन पोहोंचला. त्याचे लोक नुकता चर वगैरे खणीत दिसेंबर
आहेत तों **मेजर सेल्** ह्यानें त्यांवर जाऊन त्यांच्या चरांतून वाट फोडून त्यांपैकीं बहुत मारिले; आणि तो त्यांचीं शस्त्रें, बाहुटे, व आउतें ह्यांचे भारे बांधून घेऊन आला. शत्रूंनीं ता० १
त्या दिवशीं **किमांडिन** एथील **इंग्लिशांचे** फौजेवर कितीएक वेळां एलगार केला, आणि **इंग्लिशांच्या** जहाजांवर वेळू व कापूस ह्यांचे केलेले जळते ताफे पाठविले, परंतु त्यांपासून कांहीं झालें नाहीं. पुढें चार दिवसांनीं **जनरल क्यांबेल** ता० ५
**साहेबानें** व अरमारानें शत्रूंवर एकदांच हल्ला केला. जहाजांतील लोकांशीं शत्रु युद्ध करीत असतां इकडे **मेजर सेल** ह्यानें त्याच्या मध्यभागावर आणि **मेजर वाकर** ह्यानें डाव्या भागावर हल्ला केला; दोघांचाही जय होऊन शत्रु बहुत मेले, व बाकीच्यांची दाणादाण होऊन ते पळाले. **मेजर वाकर** हा त्या लढाईंत पडला. आणखी एकवेळ ह्या- ता० ७
प्रमाणेंच त्यांचा पराजय करून त्यांनीं जो खंदक वगैरे खोदिला होता तो सर्व **इंग्लिशांनीं** हस्तगत केला; ह्याचा सूड उगविण्याकरितां **बंधुला** ह्यानें **रंगूनास** आग घातली, तेणेंकरून अर्धा गांव जळाला. ह्याच्या दुसऱ्या दिवशीं **जनरल** ता० १४
**क्यांबेल साहेब** ह्यानें पंधराशें लोकांनिशीं **कोकिन** एथें **बंधुला** ह्याचे फौजेवर हल्ला केला, ती पंधरा हजारांवर होती, आणि **बंधुला** ह्यानें जी तटबंदी केली होती ती मोठी मजबूत होती;

परंतु अर्धघटिकेंत तीजवळ जाऊन इंग्लिशांचे लोक शिडयांनीं वर चढले, आणि ब्रह्मी लोक डोनोबू नामें ठिकाण होतें त्याच्या आश्रयास जाऊन राहिले. ह्या रीतीनें डिसेंबर महिन्याच्या पंधरा दिवसांत मिळून ब्रह्मी लोक साहा हजारांवर पडलें; इंग्लिशांचे पांचशें शिपाई आणि चाळीस सरदार इतके मात्र पडले. असें इंग्लिशांच्या जयाचें चिन्ह पाहून रंगूनचे लोक व फौजेंतील शिपाई त्या शहरांत येऊं लागले; आणि ते सामान व ओझ्याचीं जनावरें हीं विकावयास आणूं लागले.

११ ह्याप्रमाणें रंगून प्रांतांत शत्रूला हरविल्यावर जनरल साहेब ह्यानें ब्रह्मी लोकांचें दुसरे प्रतीचें जें प्रोम शहर त्यावर हल्ला करण्याची मसलत केली. त्या कामाकरितां पंधराशें गोरेलोकांचें पायदळ, हजार काळे शिपाई, व गोरे स्वारांच्या दोन टोळ्या, आणि कांहीं बाणवाले लोक, इतकें सैन्य आपणाबरोबर घेऊन आपण पायवाटेनें जाण्याचा बेत ठरावून, आठशें गोरे व काळे शिपायांचें एक पलटण, आणि पुष्कळ तोफखाना, हीं मचव्यावर चढवून देऊन जनरल काटन साहेबास त्यानें जलमार्गें रवाना केलें; आणि दोनही लश्करांची गांठ इरावती नदीच्या कांठीं पडण्याचा संकेत ठरविला. मेजर सेल साहेबासमागमें कांहीं लश्कर देऊन त्यास बसीन घेण्यास पाठविलें होतें, तो तें काम करून थोरल्या लश्करास येऊन मिळाला. इतकें सैन्य रवाना झाल्यानंतर मागें रंगून एथें तळावर चार हजार लोक राहिले, त्यांची सरदारी जनरल माक्री साहेबाकडे होती.

१२ अशी सिद्धता झाल्यावर **जनरल साहेबाचें** लश्कर **रंगून** एथून निघालें, त्यास सुमारें एक महिनापर्यंत कांहीं अडथळा झाला नाहीं, परंतु नदींतून सैन्य जात होतें त्यानें कितीएक ठिकाणच्या गढ्या व किल्ले पाडून तें **डोनोबू** एथें आलें; तेव्हां तें स्वाधीन करण्याविषयीं तेथील लोकांकडे मागणें केलें, तें नाकबूल झाल्यावर ती गढ़ी घेण्याकरितां दोन टोळ्या उतरल्या, परंतु त्यांचा प्रयत्न न चालतां ते लोक परत जहाजावर आले. हें वर्तमान समजतांच **जनरल क्यांबेल साहेब** त्यांचे कुमकेस गेला; त्यास वाटेनें प्रयास पडला, परंतु तो तेथें जाऊन पोहोंचल्यावर दुसऱ्याच दिवशीं तोफा मचव्यांतून खालीं उतरून किल्ल्यावर चालू केल्या, आणि त्या युद्धांत बंधुला ह्यास बाण लागून तो पडला. त्या रात्रीं त्याचें सर्व लश्कर पळून गेलें; आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं **इंग्लिशांनीं** तेथें जाऊन ठाणें घातलें, त्यांस कितीएक महिनेंपर्यंत पुरायाजोगा दाणा व दुसरी सामग्रीही सांपडली.

इ० स० १८२५ फेब्रुआरी ता० १३

मार्च ता० १८

ता० २५

१३ मार्गानें समोर तर शत्रु कोठें दिसेनात, परंतु जागोजाग तटबंदी त्यांनीं केलेली होती; हत्तींचीं पावलें सर्वत्र उमटलेलीं दिसत; आणि गांवांतील घरांचा विध्वंस करून लोकांनीं सर्वत्र उजाडी करून टाकिली होती. लोक सर्व रानांत पळाले होते, आणि वाघ व रानडुकर ह्यांची वस्ती अरण्याप्रमाणें मैदानांतही झाली होती. कोठें कोठें एखादा गांव आबाद आढळे, तेथें माणसांचीं घरें खांबांवर खबुतरांच्या घरट्यांप्रमाणें बांधलेलीं असत. तीं तशीं बांधण्याचें कारण असें कीं त्या देशांत पर्जन्यकाळीं पाण्याच्या पुराचें

आणि सर्वदा रानच्या जनावरांचें भय फार असतें. तश्या गांवचे गरीब लोक इंग्लिशांच्या लश्करास दाणा, कोंबडीं, टोणगे, व इतर साहित्य पुरविण्यास, व एका लश्करापासून दुसऱ्या लश्करांत कागद वगैरे नेण्यास फार उपयोगी पडले, आणि त्यांनीं कधीं विश्वासघात केला नाहीं. अश्या मुलकांतून सुमारें एक महिना नऊ दिवस चाल करून शेवटीं जनरल क्यांबेल साहेब प्रोम एथें येऊन पोहोंचला. ब्रह्मी लोकांस धैर्य असतें तर त्या शहराचें ते रक्षण करिते, कां कीं ती जागा रक्षण करण्याजोगती मजबूत होती; परंतु त्यांनीं आपले चालीप्रमाणें तेथील लोकांस रानांत घालवून देऊन शहरास आग घातली, तेणें करून त्याचा एक पुरा सारा जळला होता, तथापि इंग्लिश तेथें जाऊन पोहोंचतांच त्यांनीं लोकांस दिलासा देण्याकरितां त्यांच्या घरांची व माल मिळकतीची मोठी खबरदारी ठेवून अभयाचे जाहिरनामे लाविले. हा प्रयत्न उत्तम रीतीनें सिद्धीस गेला; लोक आपल्या मुलांमाणसांसुद्धां गाड्यांत बसून परत येऊं लागले; त्यांस मेहेनतीबद्दल आणि विकलेल्या जिनसाबद्दल आपल्या अधिकाऱ्यांपासून कोरडे खावे लागत होते, त्यांच्या ठिकाणीं वाजवी मजूरी मिळूं लागली, आणि भय नाहींसें झालें ह्मणून ते लश्कराजवळ बाजार बसवून राहिले, व मजूरी करूं लागले; आणि त्यांनीं लश्कराकरितां मचवे व ताफे पुष्कळ तयार करून दिले.

१४ ह्याप्रमाणें इंग्लिशांची मुख्य फौज प्रोम एथें पर्जन्यकाळीं छावणी करून राहिली असतां इकडे हिंदुस्थानाचे

सरहद्दीवर युद्धाचा प्रकार चालला होता, तें वर्त्तमान कांहीं लिहिलें पाहिजे. संन १८२५ च्या आरंभीं **कर्नल रिचार्ड्स** नामें सरदार सैन्यासहित **आसामावर** गेला होता, त्यास फार श्रम पडल्यावांचून फेब्रूआरी महिन्याचे पहिले तारखेस **रंगपूर** त्याचे स्वाधीन झालें; आणि तेथील रखवालदार लोकांस त्यानें उपद्रव न करितां जाऊं दिलें. **सिलहट्ट** एथून **काचार** प्रांताच्या मार्गें **मणिपुरावरही जनरल शुलदम साहेब** हा सात हजार फौजेनिशीं रवाना झाला होता, परंतु मुलकाच्या आणि हवेच्या अडचणीमुळें ओझ्याचीं जनावरें बहुत मेलीं ह्यास्तव त्याचें कांहीं चाललें नाहीं. परंतु **मणिपूरच्या** पहिल्या राजाचा मुलगा **गंभीरसिंग** हा सुमारें पांचशें लोक व **लेफटेनेंट पेंबर्टन** नामें इंग्लिश सरदार ह्यांस घेऊन जाऊन तें काम संपादून विजयी होत्साता परत आला. ह्याप्रमाणेंच **जनरल मारिसन साहेब** ह्यानें मार्च महिन्याचे अखेरीस पांच चार युद्धांमध्यें पराक्रम करून **आराकान** शहर हस्तगत केलें, व त्या प्रांतांतून **ब्रह्मी** लोकांस हांकून लाविलें. परंतु पाहाडांतून जाऊन **ब्रह्म** देशांतील मोठ्या लश्करास कुमक करण्याचा त्याचा अभिप्राय होता तो सिद्धीस गेला नाहीं; आणि ताप व अतिसार ह्या रोगांचा प्रादुर्भाव होऊन सैन्यांतील बहुत लोक मेले. ह्याकारणामुळें **रामरी** आणि **सांदोवी** एथें रखवालीस कांहीं लोक ठेवून बाकीचें लश्कर **बंगाल्यास** परत आणावें लागलें.

१५ पर्जन्यकाळ समाप्त होण्याचे संधीस तहाच्या बोलण्याचा फड पडून नोवेंबर महिन्याचे दुसरे तारखेपर्यंत लढाई

बंद असावी असा करार ठरला होता; आणि **आसाम, आराकान** वगैरे प्रांत **ब्रह्मी** लोकांनीं **इंग्लिशांच्या** स्वाधीन करावे, आणि लढाईच्या खर्चाबद्दल दोन कोटि रुपये द्यावे ह्मणजे आह्मी तह करितों असें **जनरल क्यांबेल साहेब** ह्यानें सांगून पाठविलें होतें; परंतु **ब्रह्मी** लोकांचा अभिमान तोंवर मोडला नव्हता, ह्मणून त्यांनीं सुमारें सत्तर हजार फौज जमवून इंग्लिश जनरल ह्यास शेवटचें उत्तर संक्षेपेंकरून पाठविलें. तें असें कीं, "तुह्मास सला पाहिजे असल्यास तुह्मी जावें; परंतु जर तुह्मी पैका किंवा मुलूक मागत असाल, तर तुमची व आमची मैत्री होणार नाहीं. **ब्रह्मी** लोकांचा संप्रदाय असाच आहे." ह्याप्रमाणें तहाची आशा संपल्यावर पुनः युद्धाचा आरंभ झाला, त्यांत **वाटिगांव** एथें **इंग्लिश** लश्कराच्या तीन टोळ्या गेल्या होत्या, त्या सर्वांचा पराजय झाला, त्यामुळें **ब्रह्मी** लोकांस अधिक उमेद चढली. परंतु पुढें लवकरच **ब्रह्मी** सरदार **महानेमिओ** ह्यानें **इंग्लिश** लश्करास कोंडण्याकरितां तिहींकडून फौज आणिली होती तिजवर **इंग्लिशांनीं** हल्ला केला. इकडे **इंग्लिश** अरमारांतून

इ० स० १८२१ दिसेंबर ता० १

भडिमार चालला होता, तेणेंकरून **जनरल काटन** ह्याचें लश्कर पहिल्या आवाराजवळ येऊन पोहोंचलें हें शत्रूंस समजलेंच नाहीं. मग चोहींकडून गोळ्यांची वृष्टि चालली, आणि आंतलें पायदळ व स्वार ह्यांस बाहेर जाण्यास वाट मिळेना. कितीएक बाहेर निघण्यासाठीं प्रयत्न करीत; कितीएक हातांत तरवारी घेऊन अभयाचीं वचनें व खुणा न ऐकतां जो जवळ येई त्यास मारीत असत, परंतु त्यांची आ-

णि ह्यांची शेवटीं गति एकच झाली. **महानेमिओ** ह्याचें वय पाऊणशें वर्षांचे असतां तो सोनेरी मुलामा केलेल्या पालखींत बसून पुष्कळ वेळपर्यंत आपल्या लोकांस धीर देत होता. शेवटीं तोही जखम लागून पडला. ह्या लढाईंतून जे जिवंत निघालें ते रानांतून जाऊन **नावीनदी** उतरत असतां तेथें **जनरल क्यांबेल साहेबाचें** लश्कर येऊन पोहोंचलें, त्यांतील स्वारांनीं बहुतेक तुडवून मारिले. **शान** ह्या नावाचे मोठे शूर आठ हजार लोक आपल्या बरोबर तीन जादूवाल्या स्त्रिया घेऊन आले होते, त्यांची तर दाणादाण अशी झाली कीं ते सांपडेल त्या वाटेनें आपापल्या घरांस गेले.

१६ ह्यानंतर आणखी दोन लढायांत **ब्रह्मी** सैन्य पराजय पावल्यावर त्यापैकीं बहुत लोक पळून गेले, आणि **इंग्लिश जनरल** ह्यानें **मेलून** ह्यासमोर जाऊन तळ दिला. तेव्हां **ब्रह्मी** लोकांनीं भिऊन तहाचें बोलणें पुनः चालूं केलें. त्यांत कितीएक वेळ भानगड पडून शेवटीं असें ठरलें कीं पूर्वीं **इंग्लिशांनीं** मागितलें होतें तें देऊन त्याशिवाय **यी, तावाय,** आणि **मुर्गुई** हे प्रांत **ब्रह्मी** लोकांनीं ज्यास्त द्यावे, आणि रोकडपैका दोन कोटि मागितला होता तो एक कोटि रुपये द्यावे. ह्याप्रमाणें करार ठरून तहनाम्यावर **इंग्लिश** व **ब्रह्मी** सरदार ह्यांच्या सह्या झाल्या, आणि त्यावर **ब्रह्मी** राजाचे शिक्के मोर्तब करून अठरा दिवसांत त्याच्या सरदारांनीं तो आणून द्यावा असें बोलणें ठरलें; परंतु ह्याप्रमाणें घडण्यांत आलें नाहीं, ह्मणून पुनः युद्धाचा आरंभ होऊन इं-

डिसेंबर

इ० स० १८२६ जानुआरी ता० २

ग्लिशांचे थोडे फौजेनें दाहा पंधरा हजार **ब्रह्मी** लोकांचा
ता० १९ पराजय करून **मेलूनचा** किल्ला घेतला. पुनः **पागहं** येथें
फेब्रुआरी आणखी एक युद्ध झालें. त्यांत **इंग्लिशांच्या** दोन हजार
ता० ९ लोकांनीं आठ हजार **ब्रह्मी** सैन्याचा मोड केला, आणि त्यांचा दारूगोळा व इतर सामान सर्व हिरावून घेतलें. **ब्रह्मी** लोकांनीं तटबंदीच्या आंत राहून लढण्याचा आपला संप्रदाय सोडून उघड मैदानांतल्या युद्धांत आपलें सामर्थ्य किती चालतें ह्याची परीक्षा पाहिली.

१७ त्या युद्धांत त्यांचा सरदार **नार्वनबारेम** ह्मणजे नरकाधिपति असा ज्याचा किताब असे तो ३०,००० निवडक फौज घेऊन जयाचा विडा उचलून आला होता, त्याचा जेव्हां पराजय झाला, आणि तो १३०० माणसें घेऊन परत राजधानीस गेला, तेव्हां राजाची सर्व प्रकारें जयाविषयीं निराशा झाली; आणि त्यानें क्रोधाच्या आवेशांत त्यास हत्तीच्या पायांखालीं तुडवून मारण्याचा हुकूम केला.

१८ ह्याप्रमाणें जय मिळवीत **इंग्लिशांचें** सैन्य **ब्रह्मी** लोकांची राजधानी **आवा** हीवर जात असतां **प्रैस** नामें **अमेरिकन** धर्मोपदेशक आणि **सांडफर्ड** नामें **इंग्लिश** शस्त्र-
ता० २८ वैद्य हे दोघे साहा लक्ष रुपये आणि कितीएक **इंग्लिशांकडले** बंदीवान घेऊन आले; आणि त्यांनीं जनरल **क्यांबेल** ह्यास कळविलें कीं पूर्वीं ठरलेल्या तहावर मान्यता घालण्यास राजाकडून सिद्धता आहे. हा जरी निरोप आला, तरी **इंग्लिशांचें** सैन्य पुढें जाण्याची मनाई झाली नाहीं. शेवटीं **आवा** तीन मजला पुढें राहिली इतक्यांत वर लिहिलेले दोघे

साहेब आणि राजाचे वकील पुनः आले, आणि इरावतीच्या कांठीं यांदाबू एथें पूर्वीं सांगितलेल्या तहनाम्यावर उभयपक्षांच्या मान्यता पडल्या. ता० २४

१९ ह्या तहनाम्यांतील मुख्य मतलब वर लिहिला, तो असा कीं ब्रह्मी राजानें आसाम, काचार, मिल्ना, आराकान व तेनासरिम हे प्रांत इंग्लिशांस देऊन आराकानचे डोंगर उभयपक्षांच्या राज्यांची सरहद्द व्हावी; चार हप्त्यांनीं एक कोटि रुपयांचा भरणा ब्रह्मी राजानें करावा; मणिपूरच्या गादीवर पाहिजे तो अधिकारी बसवावा; ब्रह्मी लोक कोणी युद्धांत इंग्लिशांस सामील झाले असतील, त्याबद्दल त्यांस उपद्रव करूं नये; आणि इंग्लिशांचीं जहाजें जीं व्यापाराकरितां ब्रह्मी राज्यांत येतील त्यांस मुलकांतील जहाजांप्रमाणें वागवून घ्यावें; व ह्याप्रमाणेंच सयामच्या राजाशीं वहिवाट करावी; इकडे इंग्लिशांस पंचवीस लक्ष रुपये पोहोंचले ह्मणजे त्यांनीं रंगुनास जावें; आणि आणखी तितकेच रकमेचा भरणा झाल्यावर मुलूक सोडून परत हिंदुस्थानास जावें.

२० वर लिहिलेल्या तहाप्रमाणें उभयपक्षांकडून वर्त्तणूक होण्यांत अंतर पडलें नाहीं. इंग्लिशांचे तर्फेनें दोन सरदार आवा एथें कांहीं नजराणा घेऊन गेले, आणि तेथें कांहीं दिवस बहुमानानें राहून परत आले. नंतर लश्करास पुरत इतके मचवे मिळाल्यावर इंग्लिशांची फौज परत रंगुनास आली; आणि तेथून निघून हिंदुस्थानास येऊन पोहोंचली; एक पलटण मात्र ब्रह्मी लोकांचे कांहीं हत्ती व वाटाड्ये ब- मार्च ता० ५

रीवर घेऊन **आराकान** प्रांताच्या पाहाडांतून आली. तिला वाटेनें चांगला बांधलेला रस्ता सांपडला, आणि कैइए नांवें गरीब भोळे लोक आढळले, त्यावरून निश्चय ठरला कीं, कारण पडलें असतां पायवाटेनेंही ब्रह्मराज्यावर स्वारी करतां येईल.

२१ ह्याप्रमाणें सुमारें दोन वर्षेंपर्यंत ही लढाई चालली; हीमध्यें द्रव्याचा खर्च व माणसांचा नाश फार झाला, त्याप्रमाणें जरी फार उत्पन्नाचें मोठें राज्य इंग्लिशांस मिळालें नाहीं, तरी ब्रह्मी लोकांच्या गर्वाचें हरण होऊन त्यांची सरहद्द केवळ जी **बंगाल्यास** जवळ होती ती मागें हटली; आणि तंट्याचीं कारणें वारंवार उपस्थित होत असत तीं बंद होऊन उभयतां सरकारांचा विरोध मोडला.

## प्रकरण २२.

### लार्ड आम्‌हर्स्त ह्यांची कारकीर्द. भरतपूरच्या किल्याचा वेढा. इतर किरकोळ वर्त्तमानें.

इ० सन १८२५ पासून सन १८२६ पर्यंत.

१ **भरतपूरचा** किल्ला **औरंगजेबाच्या** राज्यांत **जाट** लोकांनीं त्याचें बुणगें लुटून त्या पैक्यानें बांधिला. एथील राजानें सन १८०४ मध्यें इंग्लिशांशीं विरोध केल्यामुळें तो किल्ला घेण्यासाठीं त्यांनीं उद्योग केला होता तो शेवटास गेला नाहीं; शेवटीं राजाचा व त्यांचा तह झाला हें वर्तमान पूर्वी लिहिलें.

२ सन १८२४ च्या आगस्त महिन्यामध्यें **भरतपूरचा** राजा **बळदेवसिंग** हा आसन्नमरण झाल्यामुळें त्यानें **इंग्लिश** सरकारास पत्र पाठविलें, त्यावरून सरकारचे आज्ञेनें तेथील वकील **सर डेविड आक्टर्लोनी साहेब** ह्यानें त्याच्या लहान मुलास **इंग्लिश** सरकारच्या तर्फेनें अधिकाराचीं वस्त्रें दिलीं. परंतु पुढील वर्षीं **दुर्जनसाल** नामें त्या मुलाचा चुलत भाऊ हा मुलाच्या मामास मारून व त्याचे आईवर हल्ला करून व त्या मुलास कैद करून आपण किल्ला घेऊन बसला. त्याचें बंड मोडण्याविषयीं **सर डेविड आक्टर्लोनी साहेबानें** लागलाच झटून उद्योग आरंभिला; आणि फौजा वगैरे जमा करून **दुर्जनसाल** ह्यास तो भयप्रदर्शन करणार इतक्यामध्यें **कलकत्त्याहून** हुकूम आला कीं, सांप्रत सैन्य फार थोडें तळावर राहिलें आहे, अशा वेळेस **भरतपूरच्या** राजाचा अधिकार कायम करण्याकरितां तिकडे युद्धाचा उपक्रम करण्याचें आपणास कारण नाहीं; व **दुर्जनसाल** ह्याचें बोलणें आपल्या हक्काविषयीं काय आहे हें सरकारास समजण्याच्या पूर्वीं फौज पाठविण्याची जलदी केली हें ठीक केलें नाहीं. ह्याप्रमाणें हुकूम आला त्यांत आपलें करणें सरकारास अमान्य झालें असें पाहून **सर डेविड आक्टर्लोनी साहेब** ह्यानें काम सोडलें; आणि तो शूर आणि वृद्ध सरदार, ज्यानें पन्नास वर्षेंपर्यंत मोठे मोठे पराक्रम आणि मसलती केल्या होत्या, तो पुढें लवकरच मरण पावला.

३ वरची मसलत आपण चुकून केली अशी **कलकत्त्याच्या** सरकाराची खातरी लवकरच होऊन **दुर्जनसाल** ह्यास

काढून वास्तविक अधिकारी ह्यास गादीवर बसविण्याचा निश्चय त्यांनीं केल्यावरून त्या अभिप्रायाचा जाहिरनामा दिल्ली एथील रेसिडेंट सर चार्लस मेट्काफ साहेब ह्यानें नोवेंबर महिन्याचे १० वे तारखेस लाविला.

इ० स० १८२५

४ ह्याप्रकारें भरतपूर घेण्याचा निश्चय झाला, तो सिद्धीस नेण्याकरितां लार्ड कोंबर्मीर साहेब इंग्लिशांचे मुख्य सेनापति हे सुमारें वीस हजार फौज व शंभरांवर तोफा घेऊन तेथें स्वतां आले (डिसेंबर ता० १०); त्यांनीं किल्ल्यावर तोफांचा मार चालू करावयाच्या अगोधर आंत किल्लेकऱ्यांस सांगून पाठविलें कीं तुमची मर्जी असल्यास तुह्मी आंतील बायकामुलें बाहेर पाठवून द्यावीं, त्यांस आह्मी उपद्रव करणार नाहीं. हा त्या साहेबाचा सदय निरोप दुर्जनसाल ह्यानें अमान्य केला.

५ किल्ल्याच्या बाहेर मोरचे व मातीचे बुरूज वगैरे तयार करण्यास कितीएक दिवस लागले. तें काम चाललें असतां सुमारें दोनशें स्वारांनीं किल्ल्यांतून बाहेर जाण्याचा प्रयत्न केला, त्यांस वाटेवर गांठून त्यांतून तीस चाळिसांस इंग्लिशांनीं मारून पाडिलें, आणि सुमारें शंभरांस धरून कैद केलें. डिसेंबराच्या २८वे तारखेस किल्ल्यावर तोफा चालू झाल्या; आणि संन १८२६ च्या जानुआरी महिन्याच्या ४थे तारखेपर्यंत तटावर त्यांचा कांहीं विशेष उपाय चालला नाहीं. ६वे तारखेस रात्रौ इंग्लिशांनीं खंदकांतून सुरुंग पाडावयाचा उद्योग केला, परंतु तो पुरा होण्याचे पूर्वीं उजाडलें, ह्मणून तो उडविणें प्राप्त झालें. त्यापासून कांहीं फळ झालें नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

दुसऱ्यानें इंग्लिश सुरुंग पाडूं लागले तेव्हां आंतूनही सुरुंगाचें काम चाललेलें त्यांचे दृष्टीस पडलें; ह्याकरितां तें विवर बुजवून टाकणें प्राप्त झालें. आणि आठवे तारखेस आंतून एक गोळा येऊन दारूच्या पिंपावर पडला, त्यामुळें पुष्कळ दारूचा नाश झाला. आणखी एक दोन वेळ सुरुंगाचा उद्योग झाला, व एक दिवसपर्यंत तोफांचा मार चालला, तेणेंकरून शेवटीं तटाचे भिंतींतून दोन वाटा पडल्या. (ता० १७).

६ त्या वाटांनीं आंत शिरण्याकरितां इंग्लिशांच्या सैन्यानें १८ वे तारखेस प्रातःकालीं हल्ला केला. त्यांत प्रथम सुरुंग उडण्याची खूण लश्करास सांगून ठेविली होती; तो सुरुंग सुमारें आठ वाजतां उडून शत्रूंतून सुमारें तीनशें मेले, आणि त्या धांदलींत जनरल रेनेल साहेब आणि जनरल निकोल्स साहेब ह्या दोघांच्या दोन टोळ्या दोन वाटांनीं आंत शिरण्यास पुढें सरसावल्या. त्यांतलि लोकांवर तटावरून बंदुका आणि तोफा ह्यांचा मार होत असतां आणि तटाचा चढाव उंच कड्यासारिखा असतां इंग्लिशांचे शिपाई वर चढले. नंतर थोडक्या वेळांत जाट लोक तटावरून पळूं लागले; त्यांतून सुमारें चार हजार त्या दिवसीं पडले; आणि संध्याकाळच्या दोन तास दिवसास आंतील बालेकिल्ला तोफा, दारूगोळा, वगैरे सामानासहित इंग्लिशांच्या स्वाधीन झाला. दुर्जनसालही मुलांमाणसांसुद्धां हस्तगत झाला, व स्वार बाहेर जपणीस ठेविले होते त्यांनीं बंदोबस्त चांगला रा-

खिल्यामुळें बहुधा आंतले लोक कोणी बाहेर जाऊं पावले नाहींत.

७ ह्याप्रमाणें **भरतपूरचा** किल्ला **इंग्लिशांचे** स्वाधीन झाल्यावर त्यांतील बुरूज व तटबंदी बहुतेक त्यांनीं पाडिली; आणि बाकीचे सर्व किल्लेही घेऊन राजास परत गादीवर बसविलें.

८ संन १८२६ मध्यें **कोलापूरचा** राजा **शाहाजी** हा कंपनी सरकारच्या बाहेदारी खालच्या कांहीं जहागिरी चालवीना, ह्मणून उभयतांमध्यें कलह लागला; आणि कंपनी सरकारानें राजाकडून ती गोष्ट कबूल करविण्याकरितां तिकडे फौज पाठविली. परंतु युद्ध होण्याचा प्रसंग न येऊं देतां

इ० स० १८२७ राजानें कंपनी सरकारचें सांगणें कबूल केलें. ह्या दुराग्रहाकरितां व दुसऱ्या प्रकारच्या गैरचालीकरितां **चिकोडी** आणि **मनोळी** हे त्यास पूर्वी दिलेले दोन तालूके त्याकडून कंपनी सरकारानें परत घेतले आणि नवा तह केला. **शाहाजी** राजानें पुढल्या वर्षी फौज वगैरे जमाकरून आणखी विरोध आरंभिला, परंतु **इंग्लिशांची** फौज येऊन पोहोंचतांच **कोलापूर** वगैरे दुसरे किल्ले स्वाधीन करून तो शरण आला, ह्मणून त्याच्या संस्थानांत कांहीं अधिक उणें झालें नाहीं.

९ ह्या काळापर्यंत **इंग्लिश** सरकार **दिल्लीच्या** नामधारी मुख्यास बादशाह असें ह्मणत असत, व त्याशीं व्यवहार ठेवण्यांत आपण त्याचे आज्ञांकित असें बाहेरून दाखवीत असत. हा संप्रदाय आतां मोडून **इंग्लिश** सरकारानें **दिल्लीच्या** बादशाहाचे जे पोकळ बहुमान आणि अलकाब होते

ते सर्व बंद केले; आणि रुपये वगैरे ह्यावर आपल्या राजाचें नाव आणि चिन्हें घालण्याचा निश्चय केला. ह्या गोष्टीनें दिल्ली प्रांतांतील लोकांमध्यें कांहींसा गवगवा झाला, आणि पुढें कांहीं वर्षांनीं बादशाहानें राममोहनराय नामें कलकत्याचा कोणी संभावित गृहस्थ आपला वकील करून विलायतेस पाठविला; परंतु त्याच्या वकिलातीपासून कांहीं झालें नाहीं.

१० वर वर्तमानें लिहिलीं तीं घडल्यानंतर थोड्या दिवसांनीं लार्ड आम्हर्स्त साहेब हे गवर्नरजनरालाचें काम सोडून विलायतेस निघून गेले, आणि वर्ष संपावयाच्या पूर्वीं मुंबईचे गवर्नर एल्फिन्स्तन् साहेब ह्यानें हीं काम सोडिलें. ह्याच्यापूर्वीं एक वर्षावर मद्रासचे गवर्नर सर टामस मन्‌रो साहेब हा पटकीनें पाटकोंडें एथें मरण पावल्यामुळें तेथील रयतेस परम दुःख झालें. हे दोन्हीं कामदार संकटसमयीं मोठ्या मोठ्या मसलतींमध्यें वागले; आणि तशा प्रसंगीं धैर्यानें व चातुर्यानें काम बजावून कंपनी सरकारचा त्या उभयतांनीं फार नफा केला. आणि इंग्लिशांच्या अमलाखालीं नुकतीच आलेली जी हिंदूप्रजा तिला कोणे प्रकारें इजा होऊं नये, आणि सरकारची खराबी न होतां तीस जितकें सुख होईल तितकें व्हावें ह्याविषयीं उभयतांचें लक्ष्य फार होतें. ह्या गुणेंकरूनच मुलकाचा लवकर बंदोबस्त झाला, आणि राज्यांतर झालें हें कोणास समजलें नाहीं; आणि ह्याच गुणाकारितां अल्फिष्ठन (एल्फिन्स्तन्) आणि मन्‌रो ह्या नावांचें विस्मरण लोकांस फार दिवस होणार नाहीं.

इ० स० १८२८ मार्च

११ **मुंबई** एथील **गवर्नराच्या** अधिकारावर **सर जान मालकम साहेब** ह्याची आणि **मद्रास** एथील कामावर नामदार **लशिंग्तन साहेब** ह्याची नेमणूक होऊन ते उभयतां आपापल्या अधिकारावर येण्यास निघाले. त्याच महिन्यांत
जूलै **मद्रास** एथें पूर्वीं संन १८०६त **गवर्नराचें** काम केलेला जो **लार्ड विलियम बेंटिक साहेब** ह्यांची नेमणूक **गवर्नरजनरल** ह्यांच्या अधिकारावर झाली.

## प्रकरण २४.

### लार्ड विलियम बेंटिक ह्यांची कारकीर्द.

इ० संन १८२८ पासून संन १८३५पर्यंत.

१ **लार्ड विलियम बेंटिक साहेब** ह्यांनीं वेळूरचे फिसादीचे वेळेस हुशारीनें बंदोबस्त राखिला नाहीं, असें ध्यानांत आल्यावरून कंपनीकडील डरेक्टर्स ह्यांनीं त्यास **मद्रासच्या** कामावरून काढिलें होतें; परंतु त्याकडे कांहीं शब्द नाहीं अशी पुढें कांहीं वर्षांनीं विलायतेंतिल अधिकाऱ्यांची खातरी झाली. पुढें त्यानें **युरोपांतील स्पेन, पोर्तुगाल, सिसिली** इत्यादि बहुत जागीं मोठमोठीं कामें केलीं, आणि
इ० स० शेवटीं त्यास **हिंदुस्थानचा गवर्नरजनरल** ह्यांचा अधिकार
१८२८
जुलै ता० ४ मिळाला.

२ आलिकडे **ब्रह्मी** लढाईमुळें कंपनी सरकारास पूर्वींपेक्षां तेरा कोटि रूपये ज्यास्त कर्ज झालें होतें म्हणून लश्क-

राचा आणि इतर मुलकी कारखान्यांचा खर्च जो फार वाढला होता तो तोडण्याच्या कामाकडे नवा **गवर्नर जनरल** ह्यास चित्त द्यावें लागलें. त्यानें लश्करासंबंधीं भत्ता वगैरे खर्च बराच कमी केला; आणि इतर कारखान्यांसंबंधीं पुरती चौकशी करून त्यांतही युक्तीनें उत्तरोत्तर खर्च कमी व्हावा अशी व्यवस्था ठरावून त्याप्रमाणें करण्याविषयीं हुकूम केला. पुढील वर्षाच्या आरंभीं **लार्ड विलियम साहेब** आपण जातीनें **पिनांग** बेटांत व **मलक्का** प्रांतांत जाऊन तेथील व्यवस्था पाहून आल्यावर तेथें वेगळा **गवर्नर** नसावा, परंतु तिकडील सर्व कारभार **बंगाल** इलाख्याखालीं चालावा, ह्याप्रमाणें त्यानें विलायतेस सूचना लिहून पाठविली; ती **कोर्ट आफ् डरेक्टर्स** ह्यांनीं मान्य केली. अशा तजविजा केल्यानें खर्चाचा बंदोबस्त बराच झाला, आणि उत्तरोत्तर वसुलपैकीं शिलक पडत जाईल अशी उमेद आली.

३ ह्या कारकिर्दींत कांहीं मोठी लढाई झाली किंवा राज्य मिळालें असें कांहीं झालें नाहीं; ह्याच कारणामुळें देशाच्या बंदोबस्ताविषयीं आणि प्रजांच्या कल्याणाविषयीं युक्ति योजण्यास **गवर्नरजनरल** ह्यांस अवकाश सांपडला. त्यांत एक मोठी युक्ति त्यांनीं अशी केली कीं रयतेची स्थिति व त्यांचीं सुखदुःखें सरकारास समजण्याचीं द्वारें जीं वर्त्तमानपत्रें त्यांत लोकांच्या बऱ्याविषयीं पाहिजे तो मजकूर छापाण्यास जी पूर्वीं सरकारची धास्ती होती ती फार कमी केली; आणि जमिनदार व्यापारी वगैरे कोणास कांहीं मजकूर **गवर्नरजनरल साहेबास** जाहीर करावयाचा असेल तो

त्यानें येऊन समक्ष सांगावा, किंवा सक्रतारी ह्मणजे चिटनीस ह्याचे मारफतीनें लिहून पाठवावा असा जाहिरनामा लाविला. येणेंकरून **गवर्नरजनरल साहेबांस** सर्व वर्त्तमानें कळूं लागलीं.

४ **हिंदुस्थानचे** रहिवासी लोक ह्यांस इंग्रेजी विद्या आणि चातुर्य हीं यावीं आणि त्यांनीं प्रतिष्ठेस चढावें ही **गवर्नरजनरल साहेबांस** फार इच्छा होती; ह्मणून त्यांचे कारकिर्दींत प्रांतांमध्यें इंग्रेजी विद्येच्या शाळा अधिक झाल्या. ह्या देशच्या प्रजांचें कल्याण व्हावें आणि खर्च कमी व्हावा ह्या दोन हेतूंकरून **गवर्नरजनरलसाहेबांनीं** मुनसिफ व सदर अमीन ह्यांस ज्यास्ती फैसला करण्याचा अखत्यार देऊन त्याप्रकरणीं विलायतेस आपला अभिप्राय लिहून पाठविला, त्यांत ह्मटलें कीं ह्या देशच्या लोकांस अधिक मोठीं कामें देऊन ह्यांवर जसजसा अधिक भरंवसा ठेवावा तसतसे हे विशेष मेहनत करून उपयोगी पडतील, राज्यकारभारांत मोठमोठ्या अधिकारांस योग्य होतील, सरकारावर प्रीति करूं लागतील, आणि नीतीनें व प्रामाणिकपणानें वागतील. परंतु मोठ्या अधिकारांपासून जर ह्यांस नेहमी सरकार दूर ठेवीत चाललें, तर हे निराश होऊन हलक्या मनाचे आणि लबाड असे उत्तरोत्तर सरकारच्या अनुभवास येतील. हें **लार्ड विलियम बेंटिक साहेब** ह्यांचें ह्मणणें परदेशच्या राजांनीं आपण जिंकलेल्या प्रजांविषयीं कोणत्या रीतीनें वागावें ह्या कामांत ध्यानांत ठेवण्याजोगें आहे.

५ **इंग्लिशांच्या** राज्यांत सती जाण्याची मनाई व्हावी

[library stamp]

असा करार करून **गवर्नरजनरल** ह्यांनीं जाहिरनामा लाविला, तेणेंकरून अभिमानी **हिंदूंस** असंतोष झाला. सती जाण्याप्रमाणें हिंदू लोकांचा इतर आचारांसही पुढें सरकार प्रतिबंध करण्यास इच्छितें, अशीं वर्तमानें प्रसिद्ध झालीं; आणि ह्या प्रकरणीं **कलकत्त्याच्या** कितीएक लोकांनीं विलायतेस अर्जीही पाठविली. परंतु जे समजुतदार आणि विचारी होते त्यांनीं मनांत आणिलें कीं **प्रयागच्या गंगेंत** बुडून मरण्याचा व सती जाण्याचा संप्रदाय जरी **काठेवाड** व **माळवा** एथील मुली मारण्याच्या चालीप्रमाणें अशास्त्र नव्हे, तरी परधर्माच्या लोकांस घोर व भयंकर दिसतो, ह्मणून त्यांनीं तो बंद केला, त्यांत त्यांनीं कांहीं वाईट केलें नाहीं; कारण, जरी पूर्वींच्या काळांत मोठ्या धिराच्या बायका होत्या आणि त्या भ्रतारांच्या आवडीनें सती जात, तरी आलिकडे मतलबी मनुष्य चेतवणी करून बहुतांस सत्या घालवीत; त्यांनीं मागें न फिरावें याकरितां त्या मनुष्यांस बंदोबस्त करावा लागे; आणि इतकेंही असून चितेंतून त्या बाहेर आल्या तर जवळच्या सोयऱ्या धायऱ्यांस निर्दयपणा करावा लागे. ह्या सर्व अडचणी दूर झाल्या असें पाहून, आणि कोणी स्त्री सती न जातां नियमाप्रमाणें राहिली असतां शास्त्रामध्यें तिला कांहीं दोष नाहीं, ह्मणून ह्या इंग्लिश सरकारच्या करण्यानें आवश्यक धर्मास कांहीं अडचण झाली असें नाहीं, आणि इंग्लिश सरकार धर्मास अडचण कधीं करणार नाहीं, असा विचार करून बहुतेक हिंदू लोकांनीं

इ० स० १८२९

ह्या गोष्टीची फार काळजी वागविली नाहीं; आणि त्यांमध्यें कांहीं मोठा गवगवाही झाला नाहीं.

६ इंग्लिशकामदारांवर जरब ठेवण्यांत आणि त्यांच्या अपराधांची शिक्षा करण्यांत **लार्ड विलियम बेंटिंक साहेब** हे फार सावध होते. **दिल्लीच्या** बादशाहाचा मानमरातब **लार्ड आम्हर्स्त साहेब** ह्यांनीं कमी केला ह्मणून पूर्वी लिहिलें. त्यांत तेथें **सर एड्वर्ड कोल्ब्रूक साहेब** नामें जो रेसिडेंट होता त्यास आपल्या मोठेपणाविषयीं इतका अभिमान होता, आणि तो असा अविचारी होता, कीं तो बादशाहाचा अनेक प्रकारांनीं अपमान करूं लागला, आणि शेवटीं आपणास रस्त्यांत वांकून जो मुजरा न करील त्यास काठ्यांनीं मारण्यास त्यानें आरंभ केला. त्यामुळें तो बाहेर हिंडावयास जाई त्या वेळी रस्त्यानें कोणी फिरेनासें झालें. हें वर्त्तमान **गवर्नरजनरल साहेब दिल्लीस** गेले तेव्हां बादशाहानें
इ० स० समक्ष विदित केलें, आणि चौकशीच्या अंतीं तें खरें असें
१८३० ध्यानांत आल्यावर लागलाच त्यांनीं तो रेसिडेंट बरतर्फ केला ह्यामुळें बादशाह आणि **दिल्लीचे** लोक ह्यांस संतोष झाला.

७ **सिंधुनदींत पंजाबाच्या** नद्यांमध्यें **लाहोरपर्यंत** व्यापाऱ्यांचीं गलबतें चालावीं ह्याप्रमाणें पुढील वर्षी **सिंधचे** अमीर
इ० स० आणि **पंजाबचा** राजा **रणजित्सिंग** ह्यांशीं तह ठरले;
१८३१ आणि **रणजित्सिंगाजवळ इंग्लंडच्या** राजाचें पत्र आणि कांहीं घोडे वगैरे नजराणा घेऊन **कपतान् बर्न्स** नामें साहेब गेला होता, त्यास **काबुलाचे** वाटेनें **बुखारापर्यंत तातार** देश पाहून येण्यास **गवर्नरजनरल** ह्यांनीं परवानगी दिली.

त्या साहेबानें मोठ्या युक्तीनें तेथपर्यंत प्रवेश केला, आणि जें सर्व पाहिलें त्याचें इत्थंभूत वर्त्तमान छापून प्रसिद्ध केलें; तेणें करून पूर्वीं जें तिकडील प्रदेशाविषयीं केवळ अज्ञान होतें तें गेलें.

८ ह्या वर्षींचा सारा पर्जन्यकाळ संपेपर्यंत **गवर्नरजनरल हिमालयामध्यें शमला** एथें राहून पुढें **सतलज** नदीच्या कांठीं **रूपर** ह्मणून गांव आहे तिकडे गेले. त्या ठिकाणीं ते आणि **रणजित्सिंग** ह्या उभयतांचे भेटीचा मोठा समारंभ झाला. **रणजित्सिंगानें** रुप्याच्या खांबांच्या रेशमी राव्हत्या व किनखापी बिछायती वगैरे आपलें सर्व वैभव आणि सैन्य, तोफखाना वगैरे सरंजाम हें **इंग्लिशांस** दाखविण्याकरितां तेथें आणिलें होतें; आणि **गवर्नरजनरल** ह्यांनीं ही लश्कर वगैरे सरंजाम बहुत नेला होता. उभयतांचा मुकाम एक आठवडापर्यंत एका जागीं होता; तितक्यांत मेजवान्या व लश्कराच्या कवाइती व नजराणे ह्यांहींकरून परस्परांनीं परस्परांचा बहुमान केला. नंतर **गवर्नरजनरल** परत **आग्र्यास** येऊन **अजमीरास** गेले. तेथें बहुतेक **रजपूत** राजे रजवाडे हे भेटीस आले होते; आणि **मुंबईस सरजान माल्कम साहेब** ह्याच्या मागून **अर्लआफ्क्लेर साहेब** नामें गवर्नराच्या अधिकारावर आले होते तेही त्या ठिकाणीं गेले होते. त्या सर्वांच्या भेटी झाल्या ह्यांत उगाच रिकामा तमाशा झाला असें समजूं नये; तर **रणजित्सिंग** ह्याशीं विशेष स्नेह झाला, आणि बाकीचे जे लहान संस्थानी आहेत त्यांचें मन आपल्या सरकाराविषयीं कसें

आक्टोबर सन १८३१

आहे, व त्यांचीं बोलणीं काय आहेत हें **गवर्नरजनरल** ह्यांस समक्ष समजण्यांत आलें, तसें दुसऱ्याच्या लिहिण्यावरून आलें नसतें.

९ **अजमीराहून** परत येत असतां **लार्ड क्लेर** ह्यांनीं **गायकवाडानें** आपल्या कर्जाचा फडशा करण्याविषयींचा बंदोबस्त आपण करावा ह्याप्रमाणें खातरी करून घेऊन त्याचा कांहीं **काठेवाडांतील** मुलूक जो पूर्वीं जप्त केला होता तो सोडून दिला.

१० संन १८२८ मध्यें **हैदराबादचा निजाम शिकंदर** हा मरण पावला, आणि त्याचा मुलगा **नाजरउद्दवला** नामें गादीवर बसला. संस्थानचा सर्व कारभार **चंदूलाल** ह्याकडेसच होता, आणि मुलकामध्यें मक्त्याचे मामले असावे व खजिन्यांत शिलक नसावी इत्यादि वहिवाट जुन्या चालीप्रमाणें अव्यवस्थित होती. **अयोध्येच्या** नवाबाच्या राज्यांत अव्यवस्था फार ह्मणून तेथील सर्व कारभार **इंग्लिश** सरकारानें करावा असा प्रसंग येऊन त्याप्रमाणें विलायतेहून ही हुकूम आले होते; परंतु **गवर्नरजनरल** ह्यांनीं तसें न करितां नवाबास आणखी एकवेळ बुद्धिवाद सांगितला. **महिसुरामध्यें कृष्णराय उदयवीर** ह्याचा कारभारी **पुरणया** हा (संन १८१०) मेल्यापासून त्यानें मनस्वी खर्च वाढवून कर्ज करून घेतलें होतें, त्याबद्दल कर्जदारांचे तगादे भारी होऊन तो बोभाट **इंग्लिश** सरकारच्या कानावर जाऊन

इ० स० १८३२ आक्टोबर तहाप्रमाणें मुलकाचा सर्व कारभार सरकारांत ठेवणें प्राप्त झालें. **कुर्गचा** राजा **वेरराज** ह्यानें आपल्या रयतेवर व

कुटुंबाच्या माणसांवर भारी जुलूम करण्याचें व मनास येईल त्याचा जीव घेण्याचें आरंभिलें. त्यांतून त्याची बहीण व मेहुणा व आणखी कितीएक मनुष्यें **इंग्लिशांच्या** आश्रयास येऊन राहिलीं. त्यांची दशा पाहून ह्याप्रमाणें न करण्याविषयीं **इंग्लिश** सरकारानें राजास पत्र लिहून पाठविलें; तें जो वकील घेऊन गेला तो त्यानें कैद करून ठेविला, आणि युद्धाची तयारी आरंभिली, ह्मणून त्यावर फौज रवाना झाली. जरी **कुर्ग** हा पाहाडी किल्ला मोठा मजबूत होता, आणि तो साध्य होण्यास बराच श्रम लागला असता, तरी त्याची राजधानी **मदकेरी** ही **इंग्लिशांच्या** हस्तगत होतांच राजाचा धीर सुटला आणि तो दोन हजार शस्त्ररहित लोकांसहवर्त्तमान आपलीं बायका मुलें बरोबर घेऊन **इंग्लिशांच्या** लष्करांत आला, त्यास धरून **बेंगळूरच्या** किल्ल्यावर **इंग्लिशांनीं** पाठविलें, आणि त्याचा मुलूक **इंग्लिश** सरकारांत दाखल झाला. इ० स० १८३४

११ संन १८३१ च्या अखेरीस **कलकत्त्याचे** पूर्वेस बाराशेत प्रांतामध्यें **तिटूमीर** नामें कोणी दांडगा आणि धर्माभिमानी मुसलमान होता त्यानें पांच चारशें लोक जमवून रयतेस नानाप्रकारचे उपद्रव देण्याचें व हिंदूलोकांस त्रास येइ अशीं गोवध ब्रह्महत्या इत्यादि कर्मे करण्याचें आरंभिलें. त्याच्या बंदोबस्ताला सरकारानें फौज पाठविली होती तिनें तीटू आणि त्याचे पन्नास सोबती मारून पाडिले, आणि तीनशें धरून आणिले. दुसऱ्या वर्षाच्या आरंभीं **छोठानागपूर** व **रामपूर** ह्या प्रांतांत **कोळी** व **गोंड** ह्या लोकांनीं कांहीं लूट करण्याचें चालविलें होतें, परंतु त्यांचें पारिपत्य लवकरच स० १८३१ इ० स० १८३२

इ० स० १८३२ झालें. **मलक्का** देशांत **नानिंग** एथेंही कांहीं बखेडा झाला होता, परंतु तो शांत करण्यास कांहीं विशेष श्रम पडला नाहीं.

१२ **दवलतराव शिंदा** (ता० २१ मार्च संन १८२७) मरण पावल्यावर त्याची बायको **बायजाबाई** हिनें **जनकोजीराव** नामें मुलगा दत्तक घेतला, तो लहान असतां तिनें आपला बंधु **हिंदूराव** ह्याच्या मदतीनें अशो हुशारीनें आणि शाहाणपणानें कारभार केला कीं तेणेंकरून तिची पुरुषासारखी कीर्त्ति व्हावी. परंतु **जनकोजीनें** तिचे उपकार स्मरले नाहींत; आणि लवकरच लश्करच्या कितीएक सरदारांशीं संधान करून एके दिवसीं आपण राजा असें प्रसिद्ध केलें. **बायजाबाईस** कांहीं लश्कर अनुकूल होतें, परंतु तें थोडें ह्याजमुळें आणि बखेडा न वाढावा ह्यामुळें ती कांहीं कलह न करितां रेसिडेंट साहेब ह्याची मध्यस्थी कबूल करून **धोळपुरास** जाऊन राहिली. तेथें तिला वर्षास दाहा लक्ष रुपये मिळावे असा कंपनी सरकारच्या विद्यमानें ठराव झाला.

१३ **बायजाबाई** आणि **जनकोजीराव** ह्या उभयतांमध्यें तंटा झाला, तो **शिंद्याचा** घरगुती तंटा त्यामध्यें तहाप्रमाणें आपणास पडण्याचें कारण नाहीं, ह्याप्रमाणें **गवर्नर-जनरल** ह्यांनीं प्रथम लिहून पाठविलें. पुढें **जनकोजीराव** हा गादीवर कायम झाल्यावर उभयतांचा तंटा चालल्यास मुलकांत अव्यवस्था होईल ह्या सबबेनें **बायजाबाईनें** नेमणूक घेऊन राहावें ह्याविषयीं मध्यस्थी करण्यास रेसिडें-

टास परवानगी दिली. कारण पडलें असतें तर तिचा बंदोबस्त जबरीनेंही करण्यास इंग्लिश मदत करिते. शिंदा व त्याच्या कुटुंबांतील माणसें ह्यांच्या तंट्यांत इंग्लिशांनीं दखलगिरी ठेवूं नये असें उभयतांच्या तहामध्यें जें कलम आहे तेणेंकरून असें वागणें प्राप्त येतें; ह्मणजे कोणी बळकट असेल तो भाऊबंद ह्या सबबेनें गादी बळकावूं लागल्यास त्याचा दावा जरी खोटा असला तरी त्यास बोलतां येत नाहीं; आणि तो आपल्या सामर्थ्येंकरून एक वेळ अधिकारावर बसला ह्मणजे त्याचे जे कोणी इष्ट आप्त असतील त्यांचा पक्ष खरा असतां त्यांस बुडविण्यास तहाप्रमाणें त्यास सहाय व्हावें लागतें; ह्यामुळें समयीं इंग्लिश रेसिडेंट ह्याचा लोभ आंतून ज्यांवर असेल त्यांस सहज पद प्राप्त होतें; आणि हुजूर ठिकाणीं पक्षपातावांचून जे निवाडे होणार ते राहून त्यांचे मर्जीप्रमाणें समयीं घडतें, आणि तें इंग्लिश सरकाराच्या दुर्लौकिकास कारण होतें. सर्व ठिकाणीं न्यायानें वहिवाट चालत असतां व इंग्लिश सरकार दुसऱ्या गोष्टींविषयीं संस्थानिकांचा पाहिजे तसा बंदोबस्त राखीत असतां त्यांचे गादीविषयीं जो जबरदस्त तो धनी होऊं पाहतो, खऱ्याचें खोटें आणि खोट्याचें खरें होतें तिकडे डोळेझांक करावी लागती, आणि दिलेलें वचन समयीं मोडावें लागतें.

१४ ह्याप्रमाणेंच शिंद्याच्या एथील व्यवहार झाला असा वरच्या लिहिण्याचा आशय नाहीं, परंतु अशीं उदाहरणें बहुत ठिकाणीं घडलेलीं वाचणाऱ्यांच्या ध्यानांत येतील.

**मल्हारराव होळकर** मेल्यावर त्याच्या बायकांनीं **मार्तंडराव** नामें मुलगा दत्तक घेतला. तो गादीवर बसवून इंग्लिश सरकारानें त्यास कबूल केलें. पुढें कांहीं वेळानें फार दिवस **महेश्वर** एथें प्रतिबंधांत राहिलेला **हरीराव** नामें कोणी वारीस निघाला; त्यास फौज व कारभारी अनुकूळ झाले. त्यानें **मार्तंडराव** ह्या अर्भकास हांकून लाविलें, आणि तो आपणास मालक ह्मणवूं लागला. आतां **मार्तंडराव** ह्याच्या पक्षाच्या लोकांस जर भांडूं द्यावें तर अव्यवस्था होणार, ह्मणून त्याचा वंदोवस्त करून त्या मुलास आपल्या राज्यांत आणून ठेवून नेमणूक देवविणें इंग्लिश सरकारास प्राप्त झालें. ह्यांत **हरीरावाचा** दावा त्या दत्तक मुलापेक्षां जरी बळकट नसला तरी ह्या प्रसंगीं इंग्लिश सरकारास आपल्या वचनाचा अभिमान सोडावा लागला. हें त्या सरकारच्या लौकिकास नीट झालें नाहीं. परंतु पूर्वी संस्थानिक लोक जेव्हां आतांपेक्षां प्रबळ आणि स्वतंत्र होते, तेव्हां उपाय नाहीं ह्मणून केलेल्या तहनाम्यापासून ही अडचण प्राप्त झाली, ती पुढें फार दिवस राहणार नाहीं; आणि जसा मुलकाच्या स्वस्थतेविषयीं वंदोबस्त करण्यास इंग्लिश सरकारानें आपणाकडे अधिकार ठेविला आहे, तशीच राजांच्या वऱ्याविषयीं, आणि त्यांच्या कुटुंबांतील कलहांच्या निवाड्यांविषयीं, आणि त्यांच्या प्रजांच्या कल्याणाविषयीं व्यवस्था करविण्यास तें सरकार आपणाकडे अधिकार ठेवील अशी आशा धरण्यास कारण आहे.

१५ **जोतपूरचा** राजा **मानसिंग** हा **अजमीर** एथें गवर्नर जनरल साहेबांस भेटावयास गेला नाहीं; दोन वर्षे-

पर्यंत त्यानें खंडणीची बाकी चढूं दिली; त्यानें चोरांस आश्रय देण्याचें, आणि अशा गोष्टीविषयीं बुद्धिवादाचीं पत्रें गवर्नरजनरल ह्यांजकडून रवाना होत त्यांस उन्मत्तपणें जबाब पाठविण्याचें आरंभिलें; आणि तो उघड विरोध करून दुसऱ्या राजांस आपल्या मदतीस जमविण्याचे मसलतींत शिरला. हें वर्तमान गवर्नर जनरल ह्यांस समजल्यावर त्यांनीं त्यास नम्र करण्याचा निश्चय ठरविला; व त्याच्या राज्यावर पाठविण्याकरितां दहा हजार फौज नसराबाद एथें जमा केली. इतक्या पल्ल्यावर गोष्ट येईल, आणि फौज जमविणें इतक्या थोड्या अवकाशांत होईल, हें मानसिंग ह्याच्या ध्यानांत नव्हतें. तो एकाएकीं ती भयप्रद सिद्धता पाहून घाबरला; आणि त्यानें रेसिडेंट मेजर आल्वस साहेब ह्यांजकडे लागलेच तहाच्या बोलण्याकरितां वकील पाठविले; शेवटीं त्यानें आश्रयांत ठेवून घेतलेले असे इंग्लिश सरकारचे गुन्हेगार ह्यांस परत देऊन, आणि पूर्वींची खंडणीची बाकी आणि सैन्य तयार करण्याचा खर्च देण्याचें कबूल करून, व त्याचे खातरीबद्दल सांभर प्रांत गाहाण देऊन, त्यानें इंग्लिश सरकारची प्रसन्नता आपणावर करून घेतली. इ० स० १८३४ अकटोबर

१६ मानसिंग ह्याच्या पारिपत्याकरितां जी फौज जमली होती तींतून कांहीं लोकांस घेऊन जनरल स्टीवेन्सन साहेब शेकावती एथील लुटारू लोकांच्या बंदोबस्ताकरितां गेला. त्या कामास फार श्रम न लागतां त्या लोकांचे किल्ले व गढ्या हस्तगत झाल्या.

१७ ह्याच संधीस जयपूरचा तरणा व उमेदीचा राजा

एकाएकीं मरण पावला, त्याचें प्रेत कोणास पाहाण्यास सांपडलें नाहीं, ह्मणून त्यास कोणी तरी कपटानें मारिलें, आणि त्या घोर कर्मांत संस्थानचा दिवाण **जोथाराम** सामील आहे असा संशय येण्यास कारण झालें, ह्मणून **जोथाराम** हा अधिकारावरून बरतर्फ होऊन **माईसाहेब** व दुसरे कितीएक कारभारी ह्यांची नेमणूक झाली. ती गोष्ट दरबारांतील

इ० स० १८३५ एका पक्षास न आवडून त्यांतून कितीएकांनीं **मेजर आल्व्स साहेब** वाड्यांतून बाहेर येत असतां त्यावर गर्दी केली, तीमध्यें त्यास वार लागला. ह्या कृत्यापासून अनर्थ व्हावा, परंतु **इंग्लिश** सरकारच्या विचारीपणामुळें **जोथाराम** व त्याचे कितीएक सोबती ह्यांची चौकशी होऊन त्यांस जन्मवर कैद मात्र मिळाली. ह्याच्या पूर्वी कांहीं महिन्यांवर **दिल्ली** एथील **रेसिडेंट फ्रेजर साहेब** ह्यासही कोणी मारेकऱ्यानें मारिलें; त्यांत **फिरोझपूरचा** नवाब **शमसुद्दीन** हा सामिल आहे असें साबीत झाल्यावरून त्यास फांशीं दिलें. तेणेंकरून **दिल्लीच्या** लोकांस मोठी दहशत पडली.

१८ **लार्डविलियम बेंटिक साहेब** ह्यांच्या अमलांत **इंग्लंड** आणि **हिंदुस्थान** ह्यांच्यामध्यें वाफेचीं जहाजें प्रथम चालू होऊन तिकडून कागद व बातमी येण्यास जे चार पांच महिने लागत असत तें काम एका महिन्यामध्यें होऊं लागलें, आणि सरकाराची व व्यापाऱ्यांची फार सोय झाली. ह्याप्रमाणेंच वाफेच्या धाकट्या नावा **भागीरथीमध्यें** चालू होऊन प्रहराची वाट घटकेवर आली. ह्याप्रमाणें **बंगालच्या** लोकांच्या व त्यांत मुख्यत्वेंकरून व्यापाऱ्यांच्या कल्याणाकरितां **गवर्नर जन-**

रल साहेब झटत असतां कलकत्यामध्यें कितीएक व्यापारी अविचारानें धंदे करावयास लागल्यामुळें त्यांचीं दिवाळीं निघालीं, आणि इंग्लिश कामदारांचे लाखों रुपये बुडाले. हा जो व्यापारास धक्का बसला त्यापासून सांवरायास कितीएक वर्षें लागलीं.

१९ लार्ड विलियम बेंटिंक साहेब ह्यांस कांहीं वर्षांपासून कमांडर इनचीफ् ह्मणजे फौजेचा मुख्य सरदार ह्याचा अधिकार मिळाला होता; आणि हिंदुस्थानाच्या राज्यकारभाराविषयीं जो नवा बंदोबस्त झाला होता, त्याप्रमाणें इतर इलाख्यांच्या गवर्नरांवर हुकूम चालविण्यास त्यांस पूर्ण सत्ता मिळाली होती. ह्याप्रमाणें बहुमान आणि कलकत्यांतील सर्व प्रकारच्या लोकांपासून स्तुतिपत्रें पावून लार्ड विलियम बेंटिंक साहेब विलायतेस निघून गेले. इ० स० १८०७ मा. मे

२० वरच्या कलमांत कंपनीच्या नव्या सनदेचा उल्लेख आला, ती सनद देते वेळेस कंपनीनें व्यापार किंवा राज्यकारभार ह्या दोहोंतून कोणतें तें एक करावें असा प्रधानाचा आग्रह पडल्यावरून ती व्यापार सोडण्यास कबूल झाली. कंपनीचें भांडवल वखारी वगैरे मिळून सुमारें एकवीस कोटि रुपयांच्या किमतीची जिनगी आहे असा आकार झाला, त्या ऐवजाचें व्याज दरसाल ६३,००,००० रुपये तिनें चाळीस वर्षेंपर्यंत घ्यावें; आणि वीस वर्षेंपर्यंत कोर्ट आफ् डरेक्टर्स ह्यांच्या विद्यमानें कारभार करावा; पुढें त्यांजकडे कारभार चालविण्याचें पार्लमेंटाच्या मनास न आल्यास, व सालीना नेमणूक पोहोंचण्यास हरकत झाल्यास, किंवा मुद्दल

परत द्यावें अशी तजवीज ठरल्यास, तारण ह्मणून व्यापाराच्या ऐवजापैकीं तीन कोटि रुपये व्याजीं लाऊन ठेवावे. हिंदुस्थानच्या कारभारसंबंधीं नव्या ठरावापैकीं मुख्य ठराव येणेंप्रमाणें. १ गवर्नरजनरल ह्यांचा हुकूम इतर इलाख्यांवर पुरा चालावा. २ आग्रा एथें एक लेफ्टेनेंट गवर्नर असावा. ३ पूर्वीं संन १८१३ मध्यें कलकत्त्यास मात्र एक बिशप ह्मणजे धर्मसंबंधी मुख्य अधिकारी नेमिला होता, त्याप्रमाणें आतां मद्रास व मुंबई एथें एक एक नेमावा. ४ न्याय प्रकरणीं वगैरे कायदे करण्याकरितां एक कमिशन ह्मणजे कामदार नेमावे, त्यांनीं चौकशी व विचार करून देशांतील धर्मास व रिवाजास विरुद्ध न होतां साऱ्या राज्यांत एकसारखी वहिवाट चालू होई असे युक्तीनें कायदे करावे. ५ कोणत्याही माणसास कोणतेंही काम मिळण्यास जाति किंवा धर्म किंवा जन्मभूमि ह्या सबबेनें हरकत नसावी.

## प्रकरण २५.

### लार्ड आक्लंड ह्यांची कारकीर्द. काबूल एथील लढाई.

इ० संन १८३५ पासून संन १८४१ पर्यंत.

१ लार्ड विलियम बेंटिक साहेब हिंदुस्थानांतून गेल्यावर सुमारें पंधरा महिनेपर्यंत सर चार्लस मेटकाफ् साहेब गवर्नरजनरलाच्या कामावर होते, त्यांनीं तितक्याच अवकाशांत वर्तमानपत्रें, पुस्तकें वगैरे छापण्यास कांहीं प्रतिबंध नसावा, आणि व्यापारी लोकांपासून मार्गावर जागोजागीं ज-

काती सरकार घेत असे त्या न घ्याव्या हे दोन हुकूम करून आपली कीर्ति फार दिवस राही असें केलें. हा **मेट्काफ** इ० स० १८३६
**साहेब** हैदराबाद, इंदूर, दिल्ली, इत्यादि बहुत ठिकाणीं रेसिडें-टाच्या कामावर होता, तेथें तेथें त्याचें करणें फार चातुर्याचें आणि विचाराचें असा त्याचा लौकिक झाला होता; आणि **एल्फिन्स्तन साहेब** व **माल्कम साहेब** ह्यांचें जसें ह्या प्रांतीं बहुत लोक सन्मानपूर्वक स्मरण करितात, तसेंच उत्तर प्रांतांत **मेट्काफ साहेबाच्या** नावाचें करितात.*

२ **लार्ड आक्लंड साहेब** ह्यांची **गवर्नरजनरलाच्या** अ- जुलै ता० ४
धिकारावर नेमणूक होऊन ते आपल्या कामावर आले, त्याच्यापूर्वीं **करनाटकांतील गुमसूरच्या** नवाबानें इंग्लिश सरकाराशीं विरोध आरंभून फितूर करण्याचें आणि युद्धाची तयारी करण्याचें आरंभिलें. त्याचा मुलूक पाहाडी व जंगली होता, ह्मणून त्यावर जी फौज गेली होती, तिला त्याचा बंदोबस्त करण्यास कितीएक महिने लागले.

३ **अयोध्येचा** नवाब वृद्ध झाला होता, त्याच्या मागें त्याचा ह्मातारा चुलता **नासरुद्दवला** ह्यास गादीवर बसवावें, असा इंग्लिश सरकारानें ठराव केल्याची प्रसिद्धि पूर्वींच झाली होती. नवाबाची प्रकृति स्वस्थ नाहीं ह्मणून भेटून जाण्याविषयीं **रेसिडेंट कर्नल लो साहेब** ह्यास निरोप आला, तेव्हां तो इकडे लश्कराची सिद्धता असण्याविषयीं हुकूम करून राजवाड्यांत गेला, तंव नवाबाचा प्राण नुकताच गे-

---

* सर चार्लस मेट्काफ साहेब हिंदुस्थानांतून गेल्यावर उत्तर अमेरिका खंडांत कानडा एथें गवर्नरजनरलाच्या कामावर गेला.

ला होता. त्यासमयीं **नासरुद्दवला** ह्याजकडून **गवर्नरजनरल** ह्यांचे मर्जीप्रमाणें तह करण्याचे कबूलातीविषयीं लिहून घेऊन त्यास गादीवर बसविण्याची रेसिडेंटानें सिद्धता केली. इतक्यांत माजी बादशाहानें आपला ह्मणविलेला व बेगमेचे कृपेंतला **मुनाजान** नामें मुलगा ह्यास घेऊन २००० लोक दीन दीन करीत आले; आणि तेथें **इंग्लिशांचें** सैन्य जवळ नव्हतें ह्मणून त्यांनीं हरकत न होतां त्या मुलास गादीवर बसविलें. ते वेळीं त्याच्यामागें बेगम पालखींत बसली होती. त्या लोकांनीं रेसिडेंट व त्याचे मदतनीस ह्यांचा किंचित् बेआव करून शेवटीं त्यांस जाऊं दिलें. मग थोडक्या वेळानें फौज जमल्यावर बेगम व तिचे लोक ह्यांस रेसिडेंट ह्यानें बुद्धिवाद सांगून पाठविला; परंतु त्याची त्यांनीं अवगणना केली, असें पाहून त्यानें वाड्यावर तोफा चालू केल्या; आणि ती बाई व तिचे लोक ह्यांस धरून कैद केलें. ह्यातारा **नासरुद्दवला** गादीवर कायम झाला. **मुनाजान** व माजी नवाबानें पाळलेला दुसरा एक मुलगा हे आपला दावा सांगण्यास विलायतेस गेले, परंतु त्यांस कोणी अनुकूळ झाले नाहींत.

४ **काबूल** एथील राजा **शाहासुजा** हा गादीवरून च्युत झाला ह्मणून पूर्वीं लिहिलें. त्यास मुख्य कारण त्याचा वजीर **फत्तेखान** होता, त्यानेंच त्याच्या जागीं त्याचा वडील भाऊ **सुलतानमहंमद** ह्यास बादशाह करून राज्याचा सर्व कारभार कितीएक वर्षेंपर्यंत मुखत्यारीनें आपण चालविला; आणि ज्यांनीं त्याचा विरोध केला त्यांचा जीव घेण्यास त्यानें कांहीं अनमान केला नाहीं. ह्या दैवहीन मंडळीमध्यें बाद-

शाहाचा भाऊ **हिरात** एथें सुभेदारीच्या कामावर होता, त्यासही त्यानें मारिलें; त्यामुळें आणि तो कपटानें एखादा दगा करील ह्या भयानें बादशाहास तो आवडेनासा झाला. मग बादशाहाचा मुलगा **कामरान** ह्यानें संधि पाहून त्यास धरिलें, आणि त्याचे डोळे काढून कचेरींत आणिलें, ते वेळीं तेथील मंडळीनें बादशाहाचे आज्ञेनें त्यास तुकडे तुकडे करून मारिलें.

९ हा मारलेला वजीर **बरकजई** जातीचा होता, आणि त्यास वीस भाऊ होते. त्यांतील **महंमद अझीमखान** ह्यानें त्याच्या मृत्यूचा सूड घेण्याचा निश्चय करून लवकरच **शाह महंमद** ह्याचा पराजय केला. नंतर **शाहसुजा इंग्लिशां**-कडून नेमणूक घेऊन **लुधियाना** एथें राहिला होता, त्यास परत आंणून स्थापावें असा त्यानें उद्योग आरंभिला. परंतु गादीस अद्यापि कांहीं ठिकाण नसतां **शाहसुजा** ह्यानें आपण बादशाह अशा अभिमानावर त्याच्या वकिलाचा अपमान केला; त्यामुळें **अझीमखान** ह्यास क्रोध येऊन **शाहसुजा** ह्याचा नाद त्यानें सोडून दिला. इतक्यांत **शाहासुजा** ह्याचा भाऊ **आयूब** नामें त्याजवळ येऊन त्यास बोलला, "मला बादशाह मात्र करा, आणि माझ्या नावाचा शिक्का पाडा; राज्यांतील बाकीचा सर्व अधिकार व हुकमत तुह्मी ठेवा. मला बादशाह हा किताब व पोटभर भाकर मिळाली ह्मणजे तितक्यानें माझा संतोष होईल." असा आपले सोईचा बादशाह मिळतांच **अझीमखान** ह्यानें त्यास बाहुल्याप्रमाणें गादीवर बसविलें. बादशाहा हें त्याचें नाव संन १८२३ मध्यें **अझी**-

**मखान** मरण पावला तंवपर्यंत चाललें; पुढें वजिराच्या भा-
वांनीं त्यास लवकरच काढून दिलें. त्यास कांहीं नेमणूक
करून देऊन **रणजित्सिंगानें** आपणापाशीं ठेवून घेतलें.

६ पुढें **बरकजई** भावांनीं मुलकाची वांटणी केली. ती
अशी, **दोस्त महंमदखान** ह्यानें **काबूल** घेतलें, आणि तो
आपणास सर्वांमध्यें मुख्य ह्मणवूं लागला. **शीरदिलखान**
ह्यानें **कांधार** प्रांत घेतला; आणि **सुलतान महंमदखान**
**पेशावर** एथें सत्ता करूं लागला. **काश्मीर** आणि **बलख**
प्रांत हे **बुखारा** एथील **खान** ह्यानें आपल्या राज्यांत दाखल
केले. **हिरातामध्यें शहाजादा कामरान** ह्यानें अमल
बसविला, आणि **सिंधचे** अमीर आपणांस स्वतंत्र ह्मणवूं लागले.

७ **दोस्तमहंमद** हा क्रूर आणि अविचारी जे लोक त्यां-
च्या जातीमध्यें झालेला; आणि ज्या दरबारीं थोड्या मतल-
बासाठींही मनुष्याचा जीव घेणें हें पातक नव्हे असें वाटूं
लागलें होतें, असें कर्म करणारे लोक शाहाणे अशी ज्यांची
कीर्ति होऊन ते प्रतिष्ठेस चढत होते, आणि न करणारे तसेच
लहान पायरीवर राहून दुःख भोगून आपल्या जिवाची काळ-
जी सर्वदा वाहात होते, अशा दरबारांत आपला जो परम
कुटिल आणि मतलबी भाऊ त्याच्या हाताखालीं तो वाढला
होता. तेव्हां त्यानें प्रथम आपल्या भावाचे मर्जीस्तव आणि
मागाहून आपणास अधिकार मिळविण्यास्तव कितीएक निर्दय
कामें केलीं, आणि बहुत निरपराधी लोकांचे जीव घेतले, हा
त्याकडे दोष होता खरा, परंतु तो **काबुलाचे** गादीवर येतांच
त्यानें मद्यापिणें आणि दुसरीं अयोग्य कृत्यें ह्यांचा त्याग केला;

तो कामाकडे चित्त ठेवून व सर्वांस दाद देऊन प्रजांनीं अन्याय न करावा ह्याविषयीं सावधपणा राखूं लागला; आणि त्याचें चांगलें आचरण पाहून रयतही त्यास अनुकूल होत चालली. असें **अफगाणस्थानांत** बहुत वर्षें राहिलेल्या एका इंग्रेजानें लिहिलें आहे.

८ संन १८३४ मध्यें **शाहासुजा** ह्यानें आपलें तख्त पुनः मिळविण्याकरितां **शिकांच्या** आश्रयानें यत्न केला तो सिद्धीस गेला नाहीं. पुढें (संन १८३६) अमीर **दोस्तमहंमद** आणि त्याचे भाऊ ह्यांमध्यें कलह फार वाढला. ज्यास जिकडे सांपडेल तिकडे त्यानें लुटावें, व लोकांस झोडून खंडणी घ्यावी, असें चाललें. **दोस्तमहंमद** ह्याजवळ फौजेचा पगार देण्यास पैका नाहींसा झाला, ह्मणून त्यानें त्या लोकांस **गजनी** एथील **गिलचे** लोकांवर वराता देऊन पाठविलें. त्यांचा तिकडे पराजय झाला, तथापि त्यांनीं कांहीं द्रव्य वसूल केलें. पावसाळ्यांत **दोस्तमहंमदाचा** पुत्र **महंमद अकबरखान** ह्यानें **तघव** लोकांवर स्वारी करून तिकडूनही कांहीं खंडणी आणिली. परंतु इकडे **रणजित्सिग** ह्यानें पूर्वीं कांहीं वर्षांवर **काश्मीर** घेतलें त्यामुळें त्यास धीर आला होता; त्यानें **सिंधुनदी** उतरून **दोस्तमंहमद** ह्याच्या भावाकडून **पेशावर** प्रांत जिंकून घेतला, तो परत देण्याविषयीं **इंग्लिश** सरकारानें मध्यस्थी करावी ह्मणून **दोस्तमहंमद** ह्यानें **गवर्नरजनरल साहेबांस** पत्र लिहिलें.

९ त्यावरून **सिधुनदींतून काबूल** प्रांतांत **इंग्लिश** व्यापाऱ्यांचा उदीम चालावा, व त्यांपासून फार जकात घेऊं

नये, व त्यांवर जुलूमजास्ती होऊं नये, असा तह करण्याचें बोलणें **दोस्तमहंमद** ह्याशीं बोलावयाचा हा समय बरा आहे, असें जाणून **इंग्लिश** सरकारानें त्याकडे वकील पाठविण्याचा निश्चय केला. त्या कामावर **मुंबईचे गवर्नर सर राबर्ट ग्रांट साहेब** ह्यानें **कपतान बर्नस** ह्यास दुसरे साहेब मदतीस बरोबर देऊन रवाना केलें. तो **काबूल** एथें पोहोंचल्यावर प्रथम **दोस्तमहंमद** ह्यानें **रणजित्सिंगाकडून पेशावर** देवविण्याचा आग्रह धरिला; आणि **रणजित्सिंगाचा** तेथील सरदार **हिरासिंग** मेल्यापासून तोही तें **सुलतान महंमदखान** ह्यास परत देण्यास नाराजी होता असें नाहीं, ह्मणून ह्या गोष्टीविषयीं तोड निघण्यास फार अडचण पडली नसती. परंतु **इराणचा** नवा बादशाह **महंमदशाह** ह्यानें तिकडे **इंग्लिशांच्या** स्नेहांत अंतर करून **रसियनांशीं** विशेष सलगी केली होती; आणि **इंग्लिशांचा** वकील **माक्नील साहेब** ह्यानें सांगितलेली सल्ला न ऐकून **रशियन** वकिलाचे फुसलावणीवरून **शाहकामरान** ह्याजकडून **हिरात** घेण्याचा उद्योग आरंभिला होता; त्यास आणि **रशियनांस** आंतून **दोस्तमहंमद** सामील आहे असें **कपतान बर्नस साहेबाच्या** मनांत आलें; आणि **इराणांतील रशियन** वकिलाचा कोणी गुमास्ता **विकोविच** नामें त्याच वेळीं **काबुलास** आला होता; तेव्हां **दोस्तमहंमद** ह्याचें लक्ष्य आपणाकडे आहे ह्यापेक्षां त्याजकडे विशेष आहे असें पाहून **बर्नस साहेबाच्या** मनांत ती कल्पना दृढ झाली. ह्याप्रकारें **दोस्तमहंमद** ह्याचा **इंग्लिश** सरकाराविषयीं सरळ भाव नाहीं, असें

इ० स० १८३७ सप्टेंबर

वकिलाच्या लिहिण्यावरून **लार्ड आक्लंड साहेब** ह्यांस समजल्यावर, त्यांस दुसरें असें भय पडलें कीं, इराणी लोकांच्या द्वारें एकवेळ जर **रशियनांचा** पगडा **काबुलांत** पडला, तर **हिंदुस्थानचें** राज्य घेण्याचा जो त्यांचा अभिप्राय तो सिद्धीस नेण्यास त्यांस सुलभ पडेल. ह्यास्तव **पेशावर** परत देण्यासाठीं **रणजित्सिंगास** आग्रह न करितां त्यानें घेतलेला प्रांत त्याजकडे कायम करून त्याशीं स्नेह करावा; आणि आपल्या पदरीं जो ह्मातारा **शाहासुजा** आहे त्यास **काबूल** एथें गादीवर बसवून आपण त्याच्या मुलकाचा लश्करी बंदोबस्त सर्व राखावा; ह्मणजे आपली सरहद्द **तातारच्या** डोंगरांपर्यंत पोहोंचल्याप्रमाणें होऊन भयनिवारण होईल. ह्याप्रमाणें मसलत ठरवून आपण व **शाहासुजा** आणि **रणजित्सिंग** ह्या त्रिवर्गांमध्यें तहनामा करून **दोस्तमहंमद** व त्याचे बंधु ह्यांशीं युद्ध करून त्यांस राज्यावरून काढून टाकण्याकरितां सैन्य सिद्ध करण्यास आज्ञा केली.

१० ह्या सैन्यापैकीं कांहीं **मुंबईहून सिंधचे** वाटेनें **सरजान कीन** ह्यानें न्यावें, आणि बाकीचें **बंगाल** इलाख्यांतून **सतलजनदीच्या** डाव्या तीरानें यावें, आणि दोहों लश्करांची गांठ **शिकारपूर** ह्मणून ६००० घरांचा गांव **बोलान** घाटाच्या पायथ्याशीं आहे तेथें पडावी असा संकेत केला. त्यापैकीं **मुंबईचें** लश्कर **सिंधेंतून** जाण्यास अमिरांनीं हरकत केली, ह्मणून **कराची** बंदर हस्तगत करून **सरजान कीन साहेब** एक बळकट टोळी घेऊन **हैदराबादेवर** गेला, तेणेंकरून अमिरांस भय पडलें. मग त्यां- इ० स० १८३८

नीं लागलेच **इंग्लिश** सरकारास तीस लक्ष रुपये द्यावे; **इंग्लिश** सरकार आपले धनी असें कबूल करून राज्याच्या वसुलाच्या अर्धापेक्षां त्यांस अधिक खंडणी देत जावी; आणि ४००० इंग्रेजी लश्कर आपल्या कुमकेस ठेवून घ्यावें, ह्याप्रमाणें करार करवून **सर जान कीन साहेब** ह्यानें त्यांशीं तह केला. असा अमिरांचा बंदोबस्त होऊन दोन्हीं सैन्यें **शिकारपूर** एथें जमलीं.

११ **शिकारपुराच्या** आसमंतात्भागचे **बलोची** लोक
मार्च ह्यांनीं समोर लढायास फारसें उभें न राहतां नद्यांला बांध घालून वाटेवर पाणी फुगवावें व लश्कराच्या पिछाडीवर हल्ला करून उंटें व राव्हस्या व बुणगें हीं न्यावीं, असें आरंभिलें. ह्यांत मुख्य नायकवडी **किलातचा** सरदार **मेहेराबखान** नामें होता, त्यानें व त्याचे लोकांनीं जितका उपद्रव दिला तितका सोसून फौज पुढें जात असतां **बोलान** घाटांत तिची सामग्री कांहीं तुटत येऊन शिपायांस मोतादीनें दाणा मिळूं लागला; व जरी घाटामध्यें फार थंडी व बर्फ होतें, तरी पुढें **कांधारास** जाते वेळेस वाटेनें पाण्याचा तोटा पडूं लागला. एकदा पाणी न मिळाल्यामुळें साठ घोडे मेले, आणि सर्व लोक तान्हेनें फार व्याकुल झाले. पुढें जें पाणी मिळालें तें मचूळ होतें, तथापि जनावरें व माणसें वेड्यांप्रमाणें आंत धांवलीं; आणि कितीएक पोट फुटेपर्यंत पाणी प्यालीं.

१२ मार्गानें गाडेवाट बहुत ठिकाणीं नव्हती, आणि तेथें फार अडचण होती, परंतु **इंग्लिशांचे** एंजिनीर ह्यांचें कौशल्य इतकें कीं त्यांनीं वाटा पाडून लश्कराबरोबर तोफा चा-

लविल्या. **इंग्लिशांची** फौज व **शाहासुजा** हे **कांधारास** पोहोंचण्याच्या पूर्वींच तेथील सरदार निघून गेले होते, ह्मणून तेथें **इंग्लिशांनीं** ठाणें घातलें. तेथें **शाहासुजा** ह्यानें राज्याभिषेक करून घेतला, त्यावेळेस **सर जान कीन साहेब** ह्यानें संतोषाच्या एकशें एक तोफा सोडल्या, आणि त्यानें व **इंग्लिश** सरकारचा वकील **माक्नाटन साहेब** ह्यानें **इंग्लिश** सरकारचे तर्फेनें बादशाहास एकशेएक मोहरा नजर केल्या, व त्याचे फौजेंतील लोकांनींही आपापल्या मरातबाप्रमाणें नजरा केल्या.

१३ **कांधाराहून** फौज **गजनीस** जाण्यास निघाली, तिला वाटेच्या अडचणींमुळें तेथें पोहोंचण्यास सुमारें पंचवीस दिवस लागले. तो **गजनी** किल्ला फार मजबूद आहे, आणि तो घेण्यास सर्वांस आजपर्यंत मोठे श्रम पडले आहेत. त्याच्या सभोंवता खंदक व उंच तटबंदी आहे. त्याजला जागोजाग बुरूज आहेत, आणि आंत **बाले** किल्ला आहे. **दोस्तमहंमदाचा** शूर मुलगा जो **हैदरखान** तो बळकट सैन्य व सरंजाम ह्यांसहित त्या किल्ल्याचें रक्षण करीत होता; आणि **इंग्लिशांची** फौज जवळ येतांच त्यानें तिजवर तोफा चालू केल्या. अशी जागा वेढा देऊन घेण्या जोगा तोफखाना **सर जान कीन साहेबा**जवळ नव्हता, ह्मणून एकाएकीं हल्ला करून तो किल्ला घेण्याची मसलत ठरवून त्यानें पाहाणी करण्यांत तो दिवस घालविला. त्या रात्रीं पाहांटेस तीन वाजतां फौज सर्व तयार करून पूर्वेकडील आंगास काबूल दरवाज्यावर लागू होत अशा ठिकाणीं तोफा नेऊन ठे- जूलै ता० २२

विल्या. तंवपर्यंत आंत शत्रु बेफाम होते; आणि त्यांस भूल पडण्याकरितां समोरच्या बाजूस लटका हल्ला करण्यास लोक पाठविले होते, तेणेंकरून त्यांचें लक्ष्य तिकडे होतें. इतक्यांत **कर्नल डेनी** ह्याची आंत शिरणारी टोळी तयार होऊन **काबूल** दरवाज्यावर मार चालू झाला; आणि **कप्तान पीट साहेब** व दुसरे एंजनीर साहेब ह्यांनीं दारूचे थैले नेऊन त्या दरवाज्याच्या खालीं घालून त्यांस वत्ती दिली, तेणेंकरून तो दरवाजा एकाएकीं उडून खालीं पडला, आणि शत्रु चकित झाले. ते सावध होण्याच्यापूर्वीं **कर्नल डेनी साहेब** आपले टोळीसहित आंत शिरला. **अफगाण** लोक तरवार, पिस्तूल, बर्ची, वगैरे जें काय हातीं सांपडलें त्यानें युद्ध करूं लागले. त्यावेळीं काळोख होता तो हल्ला करणाऱ्यांस उपयोगी पडला. हरएक गल्ली मुडद्यांनीं भरून गेली; किल्ल्यांत एकंदर तीन हजार लोक होते, त्यांतून पांचशें तटाच्या आंत पडले; आणि **हैदरखान** ह्यांचा वाडा व दारूखाना व कोठार हीं राखण्यांत पन्नास मेले. सूर्योदयाच्यापूर्वीं **बालेकिल्ल्यावर इंग्लिशांचा** बाव्हटा लागला. बायकांस व शस्त्रें ठेवून शरण आलेले लोक ह्यांस अभयाचा जाहिरनामा प्रसिद्ध केला; आणि **हैदरखान** हा हस्तगत झाला त्यास **जनरल साहेबानें कपतान बर्नस** ह्याचे स्वाधीन केलें.

१४ इकडे ह्याप्रमाणें फौज दक्षिणेकडून **काबुलावर** येत असतां **शिकांचे** निसबतीचें कुमकेचें लश्कर घेऊन **कर्नल वेद साहेब पेशावराहून खैबर** घाटानें पश्चिमेकडे येत होता.

[stamp]

तो **खैबर** घाट सुमारें चवदा कोस लांब आहे. **पेशावराचे** बाजूनें आंत शिरल्यापासून **अलीमसजिद** किल्यापर्यंत साडे तीन कोस आहे. तेथून पुढें बहुतेक वाट अरुंद आणि दोनही बाजूंनीं कडे तुटलेले आहेत. बारीचे डावे उजवे बाजूस **खैबरी** लोकांचीं ठाणीं आहेत, तेथून फौजेस उपद्रव करण्यास त्यांस फार सोईचें आहे. ह्या ठाण्यांत पाहाडी लोक भरलेले होते, आणि मजलेचे मजलेस छावणीसभोंवते मोरचे करून फार रखवाली ठेवावी लागत असे. इतक्यांत **रणजितसिंग** मरण पावला, त्यामुळें **शिकांचे** फौजेंत कांहीं धांदल झाली; परंतु तिची व्यवस्था लवकरच यथापूर्व होऊन **कर्नल वेद साहेब अलीमसजिद** एथें येऊन राहिला.

१५ **गजनी** एथें विजय संपादन करून लश्कर निघालें, तें थोड्या दिवसांनीं **काबूल** एथें पोहोंचलें. त्याच्यापूर्वीं **दोस्तमहंमद** हा आपल्याबरोबर थोडे लोक घेऊन **हजारी** डोंगरांतून बुखाऱ्याकडे पळून गेला होता; ह्मणून तेथें कांहीं विघ्न न होतां **शाहासुजा** हा आपल्या जुन्या तख्तावर जाऊन बसला; ह्याप्रमाणें युद्धाचा उद्देश सिद्धीस गेला असें लोकांस वाटलें. आगस्त ता० ६

१६ नंतर **काबूल** व **गजनी** ह्यांच्यामध्यें **गिलचे** लोक दांडगावे करीत होते, त्यांचा बंदोबस्त **कर्नल उत्रम साहेबानें** जाऊन केला, आणि **जनरल विल्टशेर साहेबानें किलातावर** स्वारी केली. तो किल्ला घेतांना जी हातघाई झाली तींत **मेहेराबखान** मरण पावला. त्याचे गादीवर नोवेंबर ता० १३

**इंग्लिशांनीं** त्याचा मुलगा **नसीरखान** ह्यास बसविलें; आणि तेथील दरबारांत आपला वकील ठेविला. नंतर **शाहासुजा** ह्यानें आपले चाकरीस जी **इंग्लिशांची** फौज ठेविली होती तीशिवाय आणखी कांहीं लोक त्याच्या रक्षणार्थ ठेवून बाकीचें लश्कर **खैबर** घाटाचे वाटेनें **पेशावरास** येऊन तेथून परत **हिंदुस्थानांत** आलें.

१७ **काबुलाच्या** युद्धांत व त्यासंबंधी मसलतींत ज्या लोकांनीं वाखाणावयाजोगा पराक्रम किंवा चाकरी केली होती, त्या सर्वांस विलायतेच्या सरकारानें बहुमानार्थ किताब आणि नेमणुका करून दिल्या. **सर जान कीन साहेब** ह्यांस बारन पद मिळालें; **माक्नाटन साहेबास** बारनेट हा किताब प्राप्त झाला; आणि **कर्नल बर्नस**, **कर्नल वेद**, आणि दुसरे बहुत लश्करी सरदार, ह्यांस नैट हें पद मिळालें. **शाहासुजा** ह्यानेंही बहुमानार्थ पदकें, चांदण्या, व किताब हीं देण्याविषयीं कृपणता केली नाहीं. ह्याप्रमाणें **आफगाणस्थान** आणि **बलोचिस्थान** ह्या प्रांतांत सर्वत्र बरीच स्वस्थता झाली; खजीना व दाणा ह्यांच्या संरक्षणार्थ लुटारू लोकांशीं भांडणें, किंवा कोठें उन्मत्त किल्लेकऱ्यांचें पारिपत्य करणें, ह्यांशिवाय लश्करास फारसा उद्योग राहिला नाहीं; आणि जरी ह्या मोहिमांमुळें, आणि हवा व गरमी ह्यांमुळें, मनुष्यांचा संहार पुष्कळ होत चालला होता, तरी **शाहासुजा** ह्याचा अमल बसूं लागल्यामुळें **गवर्नर जनरल** संतोष पावले होते.

१८ **दोस्तमहंमद बुखारा** प्रांतांत गेल्यावर तेथील खानानें त्यास आपल्या दरबारांत बोलावून नेलें; मग तो आपल्या हातीं सांपडला असें खचीत झाल्यावर त्यास कैद दाखल प्रतिबंधांत ठेविलें; तेथून त्यानें रखवालदारांस लांच देऊन आपली लवकरच सुटका करून घेतली, आणि एक उझबेक वाटाड्या आणि एक आपण असे दोघे खुलुमाकडे येऊं लागले. वाटेनें एक लिहिण्या जोगी नकल घडली, ती अशी, **दोस्तमहंमदाचा** घोडा किंचित् लंगडूं लागला ह्मणून तो आपल्या सोबत्यास देऊन आपण त्याचें मजबूत लहानसर तट्टू होतें त्यावर बसून चालला. तो त्याचा सोबती आपण **दोस्तमहंमदास** पळविलें हें प्रसिद्ध झालें असतां आपणावर खानाचा राग होईल ह्मणून मनांत भय मानीत होता, आणि कोणी खानाकडील लोक भेटल्यास **दोस्तमहंमद** त्यास त्यांच्या स्वाधीन करून आपलें कार्य साधण्याविषयीं त्याच्या मनांत लोभ उत्पन्न झाला होता. इतक्यांत त्यास कोणी **दोस्तमहंमदाच्या** विरुद्धपक्षाचे स्वार भेटले, त्यांशीं त्याविषयीं व फिरंग्याविषयीं गोष्टी बोलत असतां तो त्यांस ह्मणाला; "तुह्मास बक्षीस पाहिजे असल्यास तो सरदार जातो आहे तो पाहा; तो **दोस्तमहंमद**. तो आतांच बुखाऱ्याच्या राजाचे कैदेपासून सुटून चालला आहे." हें ऐकून ते ह्मणाले, "तूं लबाड आहेस, **दोस्तमहंमद** दरिद्री तट्टावर आणि तूं त्याचा सोबती मोठ्या मातबर पाठाळावर असें कसें घडेल? तूंच **दोस्तमहंमद**. चल आमच्या बरोबर बुखाऱ्यास." हे शब्द ऐकतांच त्याचें तोंड उतरलें, हें त्या लोकांनीं भयाचें चिन्ह जाणून

त्यास धरून नेलें, आणि **दोस्तमहंमद** खुशाल **खुलुमा**कडे गेला.

१९ नंतर तो **इंग्लिशांस** व त्यांचे कृपेंतील **शाहासुजा** ह्यास **आफगाणस्थानांतून** घालवून देण्याकरितां फौजा ठेवूं लागला; आणि तो बहुतकरून डोंगरांत असे, ह्मणून त्याची
इ० स० १८४० सप्टेंबर कांहीं बातमी समजेना. एके रात्रीस तो **इंग्लिशांच्या** लष्करापासून दीड कोसावर निजला होता, तेंही वर्तमान त्यांस समजलें नाहीं. पुढें खबर लागल्यावर **कर्नल डेनी साहेब** ह्यानें आपणाजवळ एक हजारांवर लोक नसतां, व त्यांचे आठपट सैन्य **दोस्तमहंमदा**जवळ होतें, तरी त्यावर हल्ला केला. त्या वेळीं पहिल्या रगाड्याबरोबर **उझ्बेक** लोकांची दागादाग झाली; ते पळूं लागले असतां स्वारांनीं त्यांचे पाठीस लागून त्यांचा फार नाश केला; आणि **दोस्तमहंमदास** आपलें बुणगें, नगारे, निशाणें, आणि जवळ होती ती एक तोफ
सप्टेंबर ता० २ टाकून जावें लागलें. कांहीं दिवसांनीं **दोस्तमहंमद** पुनः फौज जमवून **पर्वान** एथें आहे, हें समजून **बामियान** एथून **कर्नल साल्टर साहेब** हा एक टोळी घेऊन निघाला; आणि **दोस्तमहंमद** डोंगरांतून आडवाटेनें निघून जाणार हें समजल्यावरून त्यानें स्वारांचीं दोन पतकें त्यावर पाठविलीं. त्या स्वारांची आणि शत्रूंची गांठ पडतांच शत्रूंनीं त्यांस माघारां हटविलें; तेणेंकरून दहशत खाऊन ते भरधांव घोडे टाकीत माघारां फिरले; आणि **बामियान** एथील **पोलिटिकल एजेंट डाक्टर लार्ड साहेब** व आणखी तीन सरदार निराश्रित होऊन लढाईंत पडले. दुसरे कितीएक जखमी

झाले; परंतु इतक्या लढाईमुळें **दोस्तमहंमदाच्या** सैन्याची फाटाफूट झाली, आणि तो त्या धांदलींत पळून गेला.

२० हें वर्तमान, आणि तो **कोहिस्थानांत** ह्मणजे पाहाडांत जाणार, आणि तिकडील लोक त्याचा पक्ष धरून बंड करणार, हें वर्तमान, हीं दोनही वर्तमान **काबुलास** दुसऱ्या दिवशीं सकाळीं समजलीं. तेणेंकरून सचिंत होत असतां **सर विलियम माक्नाटन साहेब** बाहेरून रपेट करून परत येत होता, तो आपल्या बंगल्याजवळ आलिकडे पन्नास पावलांवर येऊन पोहोंचला. इतक्यांत कोणी एका स्वारानें त्याच्या घोड्याजवळ येऊन त्यास विचारलें, "इंग्लिश वकील ते आपणच काय?" तो ह्मणाला, "होय, मीच वकील." ह्याजवर तो स्वार बोलला, "तर हा एथें अमीर आला आहे." "कोणता अमीर, तो आहे कोठें?" ह्मणून **माक्नाटन साहेबानें** प्रश्न केला. ह्यावर "**दोस्तमहंमद**" हें नाव त्यानें घेतलें. तेणेंकरून **माक्नाटन साहेबास** आश्चर्य होत आहे इतक्यांत **दोस्तमहंमद** पुढें आला, आणि घोड्यावरून उतरून अभय मागता झाला. त्यास पुनः घोड्यावर बसवून दरवाज्यापर्यंत गेल्यावर दोघेही खालीं उतरले. **माक्नाटन साहेबानें** त्याच्या हातांत हात घालून त्यास बागामधून बंगल्यांत नेलें, आणि विचारलें, "इंग्लिश सरकारचें इमान, उदारपणा, आणि सामर्थ्य, हीं किती आहेत हें तुह्मास ठाऊक असतां तुह्मी आजपर्यंत आह्माशीं प्रतिकूळ कां वागलां?" ह्यावर त्यानें आपल्या लोकांचे चालीप्रमाणें उत्तर दिलें, "हें माझें नशीब, त्यापुढें माझा इलाज नाहीं." नंतर ज्या वाड्यांत

बारा महिन्यापूर्वी तो सर्व पदार्थांचा स्वामी होता, त्यांतच तो पराधीन येऊन बसला; आणि त्या मन विव्हळ होण्याच्या प्रसंगींही धीर न सोडितां आपली तरवार **सर विलियम माक्नाटन** साहेबापाशीं देऊन बोलिला, ही आतां तुमच्याजवळ असूं द्या, आतां मला हिचा कांहीं उपयोग नाहीं. **माक्नाटन** साहेबानें उदार मनेंकरून ती त्याची त्यास परत दिली, आणि ही तुह्मीच ठेवा ह्मणून सांगितलें.

२१ **दोस्तमहंमद** ह्यास **पेशावर** एथें नेल्यावर त्याच्या नऊ बायका आणि कुटुंबाचीं मनुष्यें येऊन त्यास मिळालीं; त्यांसुद्धां तो **हिंदुस्थानांत** आल्यावर कांहीं दिवस **लुधियाना** एथें होता; नंतर तो **कलकत्त्यास** रवाना झाला; आणि **गजनी** एथें सांपडलेला जो त्याचा मुलगा **हैदरखान मुंबई**मध्यें होता, त्यासही तिकडे सरकारानें पाठवून दिलें; परंतु तो पुढें लवकरच पळून गेला.

२२ ह्याप्रमाणें **काबुलाचा** सर्व बंदोबस्त मनाजोगता झाला, तेणेंकरून **गवर्नरजनरल** ह्यांस व लोकांस परम संतोष झाला; आणि त्याप्रमाणें त्या मुलकाची स्थिति एक वर्षपर्यंत चालली. परंतु **लार्ड आक्लांड** हे परत विलायतेस जाण्याच्या पूर्वींच ह्या युद्धाचा परिणाम भयंकर होतो असें दिसून आल्यामुळें पूर्वींच्या आनंदाच्या जागीं दुःख आणि विरसपणा प्राप्त झाला. ह्या गोष्टीचा उद्भव जरी **लार्ड आक्लांड** असतां झाला, तरी तिची समाप्ति पुढील कारकिर्दींत झाली, ह्मणून त्याचा विस्तार पुढील प्रकरणामध्यें लिहिण्यांत येईल.

२३ **आफगाणस्थानांत** लढाईचा आरंभ झाला ते वेळीं

**हिरातेस इराणी** लोकांचा वेढा होता, आणि त्यास कुमक पाठवावी असा **गवर्नरजनरल** ह्यांचा इरादा होता; परंतु फौज **काबुलास** पोहोंचण्याच्या पूर्वींच तो वेढा सोडून इराणी लोक निघून गेले, आणि तिकडे **शाहा कामरान** हा निर्भय झाला. **हिरातेस** वेढा असतां त्या किल्ल्याचें संरक्षण करण्यांत व आंतील लोकांमध्यें फितुराचा प्रतिबंध करण्यांत **लेफ्टेनेंट पाटिंजर** नामें साहेब तेथें होता तो फार उपयोगी पडला. तो तेथून आल्यावर **काबुलाच्या** दरबारीं त्यास कांहीं अधिकार मिळाला. ह्याप्रमाणें **इराणी**लोकांशीं मुख्य विरोधाचें कारण जरी समाप्त झालें, तरी उभयतां सरकारचा केवळ स्नेह झाला नव्हता, व **कराक** बेटामध्यें **इंग्लिश** सरकारानें शह देण्याकरितां कांहीं फौज ठेविली होती.

२४ **तातार** देशांत **कास्पियन** समुद्राच्या पूर्वकांठीं मोठ्या मैदानाचे दक्षिणेस **खिवा** म्हणून मुसलमानांचें संस्थान आहे. त्यांतील **तुर्कोमान** लोकांनीं सरहद्दीवरील **रशियनांचे** रयतेस फार उपद्रव दिला होता; शेंकडों व्यापारी व इतर लोक ह्यांस नेऊन गुलाम केलें होतें; आणि नेहेमी कारवान ह्यांस लुटण्याचें चालविलें होतें; म्हणून **रशियन** सरकारानें सन १८३९ चे अखेरीस तीस हजार फौज तोफखान्यासहित रवाना केली. ती हिंवामुळें कांहीं दिवस मैदानाच्या सरहद्दीवर राहून **आरल** समुद्राच्या काठानें खालीं आली, आणि **खिवा** एथील खानाच्या लश्कराचा बहुत वेळां पराजय करून आपला अभिप्राय सिद्धीस नेऊन परत गेली. त्या लढाईचे वेळेस **कपतान् आबट्** नामें **इंग्लिशांचा** वकील

खिवा एथें होता, त्यानें कांहीं मध्यस्थी केली, परंतु रशियनांस खानाचें पारिपत्य करण्यास योग्य कारणें होतीं, आणि त्याशिवाय त्यांचा मतलब दुसरा नव्हता, ह्मणून त्या स्वारीप्रकरणीं इंग्लिशसरकारचें व त्यांचें वितुष्ट येण्यास कांहीं निमित्त झालें नाहीं.

२५ विलायतेस जहाजें जाण्यायेण्याचे वहिवाटीस आरबस्थानच्या कांठचें आडन बंदर आपणाजवळ असल्यास सोईचें पडेल, असें समजून इंग्लिशांनीं तेथें जाऊन ठाणें घातलें; आणि जरी त्यानंतर तें परत घेण्यासाठीं आरबांनीं किती एक वेळां येऊन लढाया केल्या, तरी ती जागा तेव्हांपासून इंग्लिशांकडे अविछिन्न चालली आहे.

२६ साताऱ्चा राजा प्रतापसिंह ह्यास बाजीरावाचें राज्य घेतल्यावर इंग्लिशांनीं गादीवर बसविलें. तो उपकार स्मरून त्यानें जसें वागावें तसें न वागतां कांहीं लहान बाबतीकरितां विलायतेस वकील पाठविणें, आणि इंग्लिश वकिलाचें साधन राखणें, अशा प्रकारचे उपाय आरंभिले; तें मुंबईसरकारास आवडेना. इतक्यांत त्यानें साताऱ्यास जी पायदळाची २३ वी पलटण होती, तिचे कितीएक लोक फितूर करण्याचा प्रयत्न चालविला; आणि शिंदा, व नागपूरचा आपासाहेब, व गोंव्याचा पोर्तुगीस गवर्नर, ह्यांस इंग्लिशांच्या नाशाविषयीं आपल्या मसलतींत सामील होण्याकरितां पत्रें पाठविलीं, असें वर्तमान इंग्लिशसरकारच्या समजण्यांत आलें; त्याची चौकशी सन १८३७ पासून तीन वर्षेंपर्यंत होत होती; इतक्यांत आणखी संशय येण्यास कितीएक

कारणें दृष्टीस आलीं; ह्मणून बहुत विचार होऊन शेवटीं सर राबर्ट ग्रांट साहेबाच्या मरणानंतर मुंबईस गवर्नराच्या कामावर आलेले जे सर जेम्स कर्नाक साहेब ह्यानें स्वतः साताऱ्यास जाऊन राजास शेवटचा बुद्धिवाद सांगितला, कीं जी गोष्ट कंपनीसरकारचे नजरेस आली असेल ती मला माफ असावी, अशा प्रकारचें तुह्मी लिहून दिलें असतां तुह्मी गादीवर कायम व्हाल, नाहींतर तुमचें राज्य राहणार नाहीं. इतकी तोड जरी काढली तरी राजा ती ऐकेना, ह्मणून इंग्लिशांनीं त्यास काशीस रवाना करून त्याचा भाऊ शाहाजी राजा उर्फ आपा साहेब ह्यास गादीवर बसविलें (तारीख ५ सप्टेंबर संन १८३९). सातारच्या राजाचा इनसाफ कायद्याप्रमाणें झाला नाहीं, ह्मणून त्याचे कोणी वकील अद्यापि विलायतेमध्यें अर्ज करीत आहेत, परंतु त्यांचा प्रयत्न निष्फळ, अशी विचारी पुरुषांची खातरी बहुत दिवसांपासून झाली आहे. इंग्लिशसरकारासारिख्या प्रबळ सरकारानें आपल्या आज्ञेत न वागणाऱ्या आश्रित राजास अशा प्रसंगीं जें केलें हा दयाळुपणा होय. त्यास शेवटीं क्षमा करण्याचें कबूल केलें, त्यापेक्षां कांहीं अधिक करावयाचें होतें असें कोणी ह्मणणार नाहीं; आणि त्यानें राजाच्या भावास गादीवर बसविलें, ह्या करण्यापासून स्पष्ट होतें कीं आपण पराक्रम करून मिळविलेल्या राज्यांतून कांहीं अंश राजास देण्यास ज्या उदार बुद्धीनें त्यास संन १८१८त प्रवृत्त केलें तीच बुद्धि अद्यापि त्याची दृढ आहे; आणि त्यास ह्या लहानशा प्रांताविषयीं किमपि लोभ नाहीं.

२७ संन १८३७ मध्यें **अयोध्येचा** नवाब मरण पावून तेथें थोडासा बखेडा झाला होता, तो शांत झाल्यावर **नासरुद्दीन हैदर** नामें कोणी म्हातारा पुरुष गादीवर बसला, आणि त्यानें कांहीं नवी फौज ठेवून तिच्या खर्चाबद्दल दरसाल सोळा लक्ष रुपये द्यावे असा त्याजकडून **इंग्लिश** सरकारानें तह करून घेतला. हा नवाब संन १८४२ सांत मेला, आणि त्याचा मुलगा **महंमदअमजदअल्ली** ह्यास नवाबाचें पद प्राप्त झालें.

२८ **हैदराबादेंत निजामाच्या** एका भावानें बंड केलें त्याचा बंदोबस्त होऊन त्यास **गोंवळकोंडें** एथें नेऊन सरकारानें कैदेंत ठेविलें. त्या बंडांत **कर्नूळचा** नवाब लढाईचें वगैरे सामान तयार करून **इंग्लिशांच्या** नाशाविषयीं मसलत करीत आहे हें समजल्यावरून त्याचें संस्थान जप्त झालें (आक्टोबर संन १८३९), आणि **जोतपूरचा मानसिंग** ह्यास भेडसाविण्यास आणखी एकवेळ फौज पाठवावी लागली. हीं दरबारसंबंधी किरकोळ वर्त्तमानें **लार्ड आक्लांड** ह्यांचें कारकिर्दींत घडलीं.

# प्रकरण २६.

## लार्ड एल्लन्बरो साहेब ह्यांची कारकीर्द. आफगाणस्थानांत बंड व लोकांचा नाश होऊन तेथून लष्कर परत आलें तें वर्तमान. शिंद्याच्या दरबारची हाकिकत. सिंध इंग्लिशांच्या स्वाधीन झाली तो प्रकार.

संन १८४१ पासून संन १८४४ पर्यंत

१ संन १८४१च्या पर्जन्यकाळांत **बेळगाव** जिल्ह्यामध्यें **हैदराबादेकडून आरब** वगैरे येऊन त्यांनीं **बादामीचा** किल्ला घेतला. तो मोठा बळकट आहे, आणि तो फार दिवस बंडवाल्यांच्या हातीं राहिल्यास त्यांस हुशारी येईल, ह्याकरितां मोठी जलदी करून त्यांपासून तो परत घ्यावा लागला. हें काम संपून बंडवाल्यांस शिक्षा वगैरे कामें होत आहेत, इतक्यामध्यें दिवसानुदिवस **आफगाणस्थानांतून** भयंकर वर्त्तमानें येऊं लागलीं. इ० स० १८४१

२ **मुसलमान** लोक **ख्रिस्ती** लोकांचा व सर्व इतर धर्मांच्या लोकांचा द्वेष अतिशय करितात. त्यांत **इंग्लिशांनीं** त्यांच्या देशांत जाऊन सत्ता मिळविली, ही गोष्ट धर्माभिमानावांचूनही त्यांस असह्य वाटण्याजोगी झाली. **शाहसुजा** हें बाहुलें **इंग्लिशांनीं** तख्तावर बसविलें होतें तेणेंकरून त्यांनीं समाधान मानावें, तर **शाहासुजा** पूर्वी राज्य करीत होता तेव्हांच त्यावर लोकांची प्रीति नव्हती; त्याची गादी गेली, व ती परत घेण्याकरितां त्यानें कईक वेळां यत्न केले

ते सर्व व्यर्थ गेले, त्यामुळें मर्दपणा व राजास आवश्यक असे जे दुसरे गुण हे त्यामध्यें नाहींत असें लोकांस वाटूं लागलें होतें. इंग्लिश हे मुसलमानांचे शत्रु ह्यांस तो मिळाला ह्मणून त्याविषयींचा तिरस्कार अधिक वाढला होता; आणि त्यांस लुटण्याचें व पुंडावकें करण्याचें व्यसन फार, तें आतां इंग्लिशांच्या बंदोबस्तापुढें कांहीं न चालून आपणास स्वस्थ बसावें लागेल, आणि शाहासुजा ह्याच्या परतंत्र अमलांत पूर्वींचे कारकिर्दीप्रमाणें आपला निर्वाह चालणार नाहीं. असें त्यांस भय पडून ते बहुतेक आंतून इंग्लिशांच्या नाशाविषयीं मसलत करूं लागले. दोस्तमहंमद ह्याच्या अकल्याणास सर्व प्रकारें इंग्लिश लोक कारण झाले होते, तेव्हां त्याचे मुलगे आणि आप्तविषयी हे ह्या मसलतीस गुप्तरूपें अनुकूळ होते ह्यांत आश्चर्य नाहीं; त्यांत कितीएक फिसादखोर सरदारांचें पारिपत्य इंग्लिश कामदारांनीं निर्दयपणानें करण्यास मागें-पुढें पाहिलें नाहीं; आणि जलालाबाद व काबूल ह्यांच्या मधील वाटा मोकळ्या ठेवण्याकरितां खैबर घाटांतील गिलचे लोक ह्यांस सरकारांतून नेमणुका मिळत असत त्या बंद करण्याचा बेत काबुलच्या दरबारांत ठरला, ह्यामुळें त्या लोकांनीं प्रथम त्या वाटेनें जाणाऱ्या व्यापाऱ्यांचे कारावान ह्यांस लुटून व डांकेचे प्यादे धरून हिंदुस्थान आणि काबूल ह्यांमध्यें एकीकडून दुसरीकडे वर्त्तमान न पोहोंचे असें केलें.

२ आफगाणस्थानांत दोन वर्षेंपर्यंत अमल बसला असतां एकाएकींच बखेडा कां उद्भवला ह्याच्या कारणाविषयीं

मराठी ग्रंथ संग्रहालय,

बहुतांचीं बहुत मतें आहेत, आणि त्यांत बिचारा शाहासुजा हा सामील होता असाही संशय निघाला आहे. परंतु त्यानें असा कृतघ्नपणा केला ह्याविषयीं खचीत प्रमाण नाहीं, आणि वर जीं कारणें लिहिलीं तीं खैबरी लोकांनीं प्रथम बंड करण्यास पुरत अशीं होतीं; पुढें जसजसा बंडवाल्यांचा चढाव होत चालला, तसतशी इतर लोकांनीं आपल्या देशांत पुनः मुसलमानांचें स्वतंत्र राज्य स्थापण्यास कमर बांधिली, अशी कल्पना संभवती.

४ असो; खैबरी लोकांचा बखेडा मोडण्याकरितां जनरल सेल साहेब हा त्यांच्या तिकडे लष्कर घेऊन गेला; त्यावर ते लोक रानांतून अडचणीचे जागेस येऊन हल्ले करीत; परंतु त्याचें युक्ति योजण्याचें कौशल्य, आणि त्याच्या शिपायांचें शौर्य, ईहींकरून सर्व बंदोबस्त होत आला होता. इतक्यांत तें जनरल सेल साहेबाचें लश्कर गंदमक एथें असतां काबुलांत एकाएकीं मोठें बंड होऊन सर आलेक्सांडर बर्नस आणि दुसरे तीन इंग्रेज सरदार हे शाहासुजा ह्याच्या वाड्यांतून परत येतेवेळीं बंडवाल्यांच्या हातांनीं जखमी होऊन मेले. सर्व शहर शस्त्रें घेऊन उठलें; त्यांतील संतापलेल्या लोकांनीं बाजार आणि इंग्लिश सरदारांचीं घरें लुटलीं, त्यांच्या सरंजामाचा विध्वंस केला; खजीना सर्व नेला; आणि दोस्तमहंमदाचा मुलगा अक्बरखान ह्यानें त्या बंडवाल्यांचा मुख्यपणा स्वीकारून, बालाहिसार किल्ल्यांत शाहासुजा व त्याचें कांहीं सैन्य होतें त्यावर, आणि

नोवेंबर ता० २

सभोंवता खंदक खणून छावणी करून राहिलेलें इंग्लिशांचें सैन्य होतें त्यावर, हल्ला करण्यास लष्कर जमविलें.

५ ह्याप्रमाणें दीड महिनापर्यंत **इंग्लिशांच्या** लोकांनीं दुःख भोगिलें; आणि त्यांच्या व **आफगाणांच्या** ज्या टकरा होत ,त्यांमध्यें जरी **इंग्लिशांचा** केवळ पराजय होत नसे तरी त्यांची अन्नवस्त्र वगैरे सामग्री व दारूगोळा सरत आला; आणि हजारों प्रेतें पुरल्यावांचून तशींच शहरामध्यें पडलीं होतीं, त्यांवरून वारा येऊन फार उपद्रव होऊं लागला. अशा अडचणीच्या प्रसंगीं शत्रु सांगतील तें कबूल करून जीवसंरक्षण करण्याचा सर्व लोकांनीं निश्चय केला; ह्याविषयीं बोलणें करण्यास **सर विलियम माक्नाटन साहेब अक्बरखान** ह्याजकडे गेला. त्या उभयतांचें भाषण होत असतां बोलाचालीवर येऊन **अक्बरखानानें** रागाच्या आवेशांत
डिसेंबर **माक्नाटन साहेबावर** आपल्या हातानें गोळी घालून त्यास
ता० २५ ठार मारिलें.

६ नंतर **इंग्लिशांच्या** लोकांचा मुख्यपणा **मेजर पाटिंजर साहेबाकडे** आला; आणि **गजनी** व **कांधार** सोडून द्यावें वगैरे जे करार **माक्नाटन साहेबानें** अर्धे कबूल केले होते, त्या अवघ्यांस त्यानें रुकार देऊन, **इंग्लिशांच्या** लष्करानें **काबुलाहून** निघून **जलालाबादेस** जावें, व त्यांस वाटेनें **आफगाण** लोकांनीं उपद्रव करूं नये, असें ठरवून घेतलें. जयानें उन्मत्त झालेले, बलिष्ठ, आणि कपटी जे शत्रु, आणि प्राणसंकटामध्यें पडलेले जे दुर्बल इंग्लिश लोक, ह्यांच्या मध्यें ठरलेल्या तहनाम्याप्रमाणें वागणूक होईल, किंवा तशा वेळेस

एका सरदारानें दिलेलें अभयवचन सर्व सरदार व इतर बंड-वाले लोक पाळितील, असा भरंवसा धरावयाजोगा नव्हता, खरा, तरी त्या दैवहीन **इंग्लिश** लोकांनीं धरिला हें आश्चर्य नाहीं; कारण कोणत्या तरी युक्तीनें एथून सुटावें, पुढें काय अवस्था होणें ती होवो, असें त्यांस झालें होतें. परंतु **इंग्लिशांची** फौज **काबूल** एथून निघाल्यापासून **आफगाण** लोकांनीं तीस उपद्रव देण्याचें आरंभिलें; अशा प्रसंगीं बायका आणि आजारी वगैरे लोक ह्यांस **अक्बरखानाच्या** रखवालदारांसमागमें परत **काबुलास** रवाना केल्यानें त्यांच्या जिवाचा प्रस्तुत तरी बचाव होईल, असें जाणून त्याप्रमाणें **इंग्लिशांनीं** केलें. इकडे फौज पुढें जात होती तिचा उपाय बर्फ आणि शत्रु ह्यांपुढें चालेनासा झाला; व बहुतेक सरदार पडले. नंतर शिपाई ह्यांचा धीर सुटून त्यांची फाटाफुट झाली; ते त्या निर्दय लोकांस जेथें जेथें सापडले तेथें तेथें त्यांनीं ठार मारिले; आणि त्या भयंकर संहाराचें वर्त्तमान सांगायास डाक्तर **ब्रैडन** नामें एक इंग्रेज आणि दुसरे कितीएक फुटकळ लोक मात्र आपापला जीव युक्तीनें बचावून पळून आलेले वांचले. इ० स० १८४२ जानुआरी ता० ५

७ **काबुलामध्यें** प्रथम बंड झालें तेव्हां **कांधार** एथें **जनरल नाट्ट साहेब** लश्करचा मुख्य सरदार होता त्यानें **गजनी** व **काबूल** ह्यांच्या मदतीकरितां एक टोळी रवाना केली. परंतु वाटेनें बर्फ इतकें जाड, व थंडी इतकी मोठी होती कीं तिच्यानें **गजनीस** पोहोंचणें न होतां ती परत **कांधारास** आली. नंतर **कांधारावर आफगाणांनीं** कितीएक वेळां प्रयत्न करून पाहिला, परंतु त्यांचा प्रयत्न चालला नाहीं; आणि **इंग्लिशांनीं**

मध्यें मध्यें किल्ल्यांतून बाहेर येऊन सभोंवतालच्या बंडवाल्यांची पाठलाग करण्याचेंही चालविलें. नंतर **गजनीचा** किल्ला **कर्नल पाल्मर साहेबास** बंडवाल्यांनीं अभयवचन देऊन घेतला; परंतु **काबुलास** लोक होते त्यांच्याप्रमाणें सैन्याची दुर्दशा होऊन त्याचा बहुत नाश झाला. इकडे पूर्वेचे बाजूस **जनरल सेल साहेब** ह्यानें बंडाचें वर्त्तमान ऐकतांच आपलें लश्कर थोडें जाणून तें **जलालाबादच्या** किल्ल्याच्या आश्रयास नेऊन ठेविलें; आणि **काबूलचा** मुख्य सरदार **जनरल एल्फिन्स्तन् साहेब** ह्यानें निरुपाय होऊन तो किल्ला **अफगाणांच्या** स्वाधीन करण्याविषयीं जरी त्यास हुकूम पाठविला, तरी तो न मानितां त्यानें मोठ्या युक्तीनें राखिला.

८ **जनरल नाट्ट साहेब** ह्याचे कुमकेस **सिंधेतून जनरल इंग्लंड साहेबाचें** लश्कर रवाना झालें; आणि **जनरल सेल साहबास** मदत करण्याकरितां **कर्नल वैल्ड साहेबाची** टोळी पुढें, व मागाहून **जनरल पालक साहेबाचें** लश्कर, **खैबर** घाटांतून पश्चिमेकडे जाण्यास रवाना झालें. **कर्नल वैल्ड साहेबाचा** एकवेळ पराजय झाला; आणि **जनरल पालक साहेबाचें** लश्कर मागाहून निघालें तें, थंडीमुळें जलदी करून उपयोग नाहीं ह्मणून, **पेशावराकडे** सावकाश चाललें होतें.

फेब्रुआरा ता० २८

९ असें वर्त्तमान असतां **लार्ड एलनबरो साहेब कलकत्यास** येऊन **गवर्नरजनरलाच्या** कामावर दाखल झाले; आणि **आफगाणस्थानांतला** बंदोबस्त लवकर करावा, ह्या अभिप्रायानें लागलेच **कलकत्याहून** निघून **सतलज** नदी-

च्या कांठीं गेले. त्यांस प्रथम काय करावें हें सुचेना; आफगाणस्थान ह्याचा उपयोग इंग्लिश सरकारास कांहीं नसतां, व तेथील राज्य रक्षण करणें अशक्य, असें असतां, तें राज्य एकवेळ घेऊन तेथें आपल्या कृपेंतला राजा स्थापिला, तें राज्य हातांतून जाऊन त्या राजाची अप्रतिष्ठा झाली, तेणेंकरून इंग्लिशांच्या नावाचा बेआब झाला; व ह्यांच्या लोकांचा बहुत नाश होऊन कितीएक मोठीं आबरूचीं माणसें शत्रूंच्या हातीं सांपडलीं; त्यांची सुटका केल्यावांचून व राजास पुनः स्थापल्यावांचून निर्वाह नाहीं, ह्याकरितां जलालाबाद व कांधार इकडे लश्करें चाललीं होतीं त्यांस गवर्नरजनरल ह्यांनीं कांहीं अडथळा केला नाहीं. जनरल पाल्लक साहेब पेशावरास कांहीं दिवसपर्यंत राहून खैबर घाट चढून पलिकडे गेला; त्या वेळेस जनरल सेल साहेब ह्याची निराशा होण्याचा समय असतां त्यानें जिवावर उदार होऊन बाहेर अकबरखान ह्याचें लश्कर होतें त्यावर आंतून स्वारी केली; त्याचा केवळ पराजय केला; त्याचा डेरा जाळला; आणि त्यानें काबूलच्या लश्करापासून घेतलेल्या चार तोफा सर केल्या. ह्या लढाईंत कर्नल डेनी साहेब हा शूर सरदार पडला; हें वर्त्तमान झालें त्याच्या दुसऱ्या दिवशीं जनरल पाल्लक साहेबाचें सैन्य जलालाबादेस पोहोंचून तेथील शूर लोकांच्या संकटाची समाप्ति झाली.

मार्च

एप्रील ता० ७

१० ह्यानंतर थोड्या दिवसांनीं काबुलामध्यें आणखी एक वेळ बंड होऊन शाहासुजा हा प्राणास मुकला; तेणेंकरून असें झालें कीं ज्याच्या अभिमानास पडून सैन्य व द्रव्य ह्यांचा

खर्च **इंग्लिश** सरकारानें केला तो गेला; तेव्हां **आफगाणस्थान** पुन्हा घेण्याचे खटपटीस पडण्याचें कारण राहिलें नाहीं. ह्मणून फौजांस परत येण्यास हुकूम करावा, असेंच आरंभीं **लार्ड एल्लन्बरो साहेब** ह्यांचें मत होतें; परंतु राज्य घेण्याचा अभिप्राय जरी सोडिला तरी **अक्बारखान** ह्याच्या हातीं जे बंदीवान होते त्यांची मुक्तता द्रव्यादिक देऊन सामोपचारानें करावी, आणि **आफगाणांनीं** पराजय करून जीं दुःखें दिलीं त्यांबद्दल त्यांचें पारिपत्य न करितां परत यावें, असें केलें असतां त्यांत अधिक दुर्लौकिक होऊन राज्याच्या दुसऱ्या भागांत बखेडा होण्यास कारण होईल; असें बहुत चतुर आणि मसलतीमध्यें कुशल अशा सरदारांच्या विचारास आल्यावरून त्यांनीं शेवटीं निश्चय ठरवून जाहिरनामा लाविला, तो येणेंप्रमाणें.

११ **आफगाणस्थानाशीं इंग्लिश** सरकारचा कांहीं संबंध नसतां, व तेथील अधिकाऱ्यांनीं कांहीं विरोध केला नसतां, **इंग्लिशांनीं सिंधुनदीचे** पलिकडे फौज पाठविली, आणि एक राजा गादीवरून काढून दुसरा बसविला, ही मोठी चूक केली; कारण, शत्रु येऊन **हिंदुस्थानचें** राज्य घेतील ह्या भयानें ती मोहीम आरंभिली, असें जर ह्मणावें, तर ज्या **इंग्लिशांच्या** सैन्यानें **सिंधुनदीच्या** पलिकडे जाऊन देश जिंकिला, त्या सैन्यास शत्रु स्वदेशांत आले असतां त्यांचा पराजय करण्यास कांहीं अवघड नाहीं; आणि **हिंदुकोह** पाहाडाची सरहद्द जशी राखवेल, त्याप्रमाणेंच **अटकनदीच्या** तीरीं राहून आपलें रक्षणकरितां येईल. ह्याचा विचार न

करितां उगाच युद्धाचा खटाटोप आरंभिला, त्यापासून फार नाश झाला; आणि गादीवर बसविलेला **शाहासुजा** हाही जिवानिशीं गेला. त्यामुळें आतां तो मुलूक **इंग्लिश** सरकारानें आपणापाशीं ठेवण्यास कारण राहिलें नाहीं; ह्मणून **इंग्लिश** सरकारचे जे लोक **आफगाणांचे** कैदेंत आहेत ते सुटून आले, आणि **आफगाण** ह्यांनीं जो त्यांस उपद्रव दिला आहे त्याची एकवेळ पुरी शिक्षा त्यांस पोहोंचून **इंग्लिश** सरकाराचें सामर्थ्य किती आहे हें त्यांच्या अनुभवास आलें, ह्मणजे **इंग्लिशांचे** सर्व फौजेनें निघून परत **हिंदुस्थानांत** यावें; आणि **दोस्तमहंमद** व त्याचीं माणसें जीं **इंग्लिशांच्या** कैदेंत आहेत तीं सोडावीं; मग **दोस्तमहंमद** ह्याची मर्जी असल्यास त्यानें परत स्वदेशास जाऊन आपण राजाचा अधिकार संपादन करावा. ह्याप्रमाणें **गवर्नरजनरल** ह्यांनीं जाहिरनामा लावून आपला अभिप्राय सर्वत्र जाहीर केला, आणि सर्व विचारी लोकांनीं त्याच्या शाहाणपणाची स्तुति केली.

१२ वर लिहिल्याप्रमाणें हुकूम झाल्यावर **जनरल पालक साहेब जलालाबादेहून काबुलास** गेला. तिकडे सप्तेंबर **जनरल इंग्लंड** हा **कांधारास** फौज नेत होता, तो एक दोन वेळां ठोंकर खाऊन शेवटीं **हिकलजी** व **कोजक** ह्या घाटांतून पार पडला, आणि **जनरल नाट्ट साहेबास** येऊन मे मिळाला. तो **जनरल साहेब** व **जनरल पालक साहेब** हे आपल्या सैन्यांसहित **काबूल** एथें बरोबरच येऊन पोहोंचले. त्यानंतर थोड्या दिवसांनीं **आफगाणांनीं इंग्लिशांचीं** कैद केलेलीं सर्व माणसें मुक्त करून रखवालदारांसुद्धां

पालक साहेबाच्या लश्करांत पाठवून दिलीं.* पुढील महिन्यांत इंग्लिशांच्या लश्करानें काबूलचा मोठा बाजार, मशदी, व इतर इमारती मोडल्या, आणि गजनी व इतर प्राचीन शहरें एथेंही तीच अवस्था केली. जनरल माकास्किल ह्यानें इसलातीफ एथें शत्रूंचा पराजय करून तें शहर व किल्ला ह्यांचा विध्वंस केला. हीं कृत्यें इंग्लिश लोकांच्या स्वरूपास शोभलीं नाहींत खरीं; परंतु त्यांहूनही मोठमोठीं घोर कर्मे आफगाणांनीं जीं केलीं होतीं, त्यांचे बद्दल हीं घडलीं, तेव्हां त्यांविषयीं केवळ दोष देतां येत नाहीं.

१३ हें वर्तमान घडल्यावर इंग्लिशांची फौज हिंदुस्थानांत परत आली. काबूल एथें अक्बारखान हा अधिकार करूं लागला; आणि कजलबाषी लोक त्यांशीं विरोध करीत

---

* ह्या मंडळीमध्यें जनरल एल्फिन्स्तन् साहेब होता, तो कैदेंतच मरण पावला. त्याच्या खालच्या पायरीचे मेजर पाटिंजर वगैरे सरदार आणि लेडी माकनाटन व तिची मुलगी, व लेडी सेल वगैरे बायका होत्या, त्यांतून लेडी सेल हिचें धैर्य इतकें कीं तिला जेव्हां जेव्हां संधी सांपडली तेव्हां तेव्हां ती आपला भ्रतार जनरल सेल साहेब ह्यास लिहून पाठवी कीं, मजकरितां विव्हळ होऊन तुह्मी शत्रूंशीं लढण्यांत कमती करूं नका, माझें काय होणें असेल तें होवो. माझ्या आबरूवरच जेव्हां पाळी येईल तेव्हां अगोधर मी आपला प्राण देईन. ही कैदी मंडळी सोडविण्याचे मध्यस्थींत मुनशी मोहनलाल फार उपयोगी पडला. हा मुळचा ब्राह्मण बर्नस साहेबाबरोबर काबुलास गेला होता. त्यास तेथें अकबरनविशीच्या कामावर सरकारानें ठेविलें होतें. त्यानें लढाईंत व शेवटीं कैदीं माणसें सोडविण्यांत जी चाकरी बजाविली ती जाहीर करून सरकाराजवळ कांहीं स्वास्थ्य मागण्याकरितां तो संन १८४४ त विलायतेस गेला. त्यास सरकारानें वर्षास दहा हजार रुपये नेमणूक करून दिली.

होते त्यांचा त्यानें पराजय केला. **दोस्तमहंमद** ह्यालाही **गवर्नरजनरल साहेब** ह्यांनीं आपल्या पूर्वींच्या ठरावाप्रमाणें सोडिलें; आणि तो **लाहोरचा** माहाराज ह्यापासून सत्कार पावून स्वदेशास जाऊन **काबूल** एथें तखतावर बसला. अकटोबर इ० स० १८४३

१४ **आफगाणस्थानांतल्या** लढाईची समाप्ति ह्याप्रमाणें झाली. कांहीं योग्य कारण नसतां तिचा उद्भव झाला, आणि नवें राज्य मिळणें, किंवा दुसरा कोणताही स्वार्थ होणें, ह्यावांचून तिचा शेवट झाला. त्या लढाईबद्दल **इंग्लिश** सरकारास खर्च पंचवीस कोटि रुपये झाला, आणि तीमध्यें फार कमी ह्मटला तरी एकंदर सुमारें पंधरा हजार माणसांचा संहार झाला. राजे उगीच स्फीतीकरितां अविचारानें लढाया आरंभितात त्यांचे परिणाम असे भयंकर होतात.

१५ **रणजितसिंग** संन १८३९ मध्यें मरण पावला ह्मणून पूर्वीं लिहिलें; त्याच्यामागें त्याचा मुलगा **करकसिंग** अधिकारी झाला. त्याचा मुलगा उमेदीचा, शूर, आणि शाहाणा, **नवनिहालसिंग** नामें होता, तो आंगावर तोरण पडून अपघातानें पूर्वींच मरण पावला होता, ह्मणून **करकसिंगाच्यामागें रणजितसिंगाचा** दासीपुत्र **शेरसिंग** हा कांहीं दिवस गादीवर होता, तो व त्याच्या कुटुंबाचीं माणसें, व त्याचे प्रधान **ध्यानसिंग, अजितसिंग,** वगैरे कितीएक सरदार एकाएकीं अपघातानें मरून (अक्टोबर १८४३) **दिलीपसिंग** नामें मुलगा गादीवर बसला. इ० स० १८४३

१६ **सिंध** एथील अमीर ह्यांबरोबर संन १८३९ मध्यें तह झाला ह्मणून पूर्वीं लिहिण्यांत आलें. त्या तहामध्यें मुख्य ठराव

असे होते कीं, अमिरांनीं तीन लक्ष रुपये खंडणी द्यावी, ती- बद्दल **इंग्लिशांची** ५००० फौज **सिंधेंत ठठ्ठा** ह्या ठिकाणीं, किंवा दुसऱ्या जागीं, असावी; अमीर ह्यांनीं कारण पडेल तेव्हां **इंग्लिशांचे** कुमकेस ३००० लश्कर द्यावें; त्यांनीं **इंग्लिशांच्या** संमतीवांचून दुसऱ्या कोणत्याही दरबाराशीं कागदपत्रांचा व्यवहार ठेवूं नये; आपसांत कांहीं तंटा उ- त्पन्न झाल्यास रेसिडेंटाचे मार्फतीनें त्याचा फैसला व्हावा; आणि **सिंधुनदींतून** माल येईल किंवा जाईल तो ज्या बंदरीं उतरेल त्या बंदरीं मात्र त्याची जकात घ्यावी; तीशिवाय त्यावर दुसरी बाब घेऊं नये.

१७ हा तह झाल्यानंतर खंडणी देण्यांत व इतर कलमां- प्रमाणें वहिवाट करण्यांत अमिरांकडून अंतर पडत गेलें, तें **गवर्नरजनरल** ह्यांच्या कानावर आलें होतें. नंतर **काबु- लास** अनर्थ झाला, व **आफगाणस्थानांतून** फौज परत आ- ल्याचें वर्त्तमान त्यांस समजलें, तेव्हां अर्थात् त्यांस हुशारी आली; आणि **इंग्लिशांच्या** जाचांतून सुटण्याविषयीं कुमके- करितां त्यांनीं **लाहोरचा** राजा **शेरसिंग** ह्यास पत्रें लिहिलीं; व **इंग्लिशांचें** लश्कर **करांची** वगैरे ठिकाणीं होतें तेथें लो- कांनीं बाजार वसविण्यास, व **सिंधुनदीच्या** कांठीं लाकडें तो- डण्यास, ते मनाई करूं लागले. त्यांनीं व्यापाऱ्यांस उपद्रव करण्यास आरंभ केला, व आणखी दुसऱ्याही त्यांच्या कर- ण्यांत विरोधाचीं चिन्हें दिसूं लागलीं; ह्मणून संन १८४२ च्या आगस्त महिन्यांत **गवर्नरजनरल** ह्यांच्या हुकमावरून **सर चार्लस नेपियर** नामें विख्यात झालेला वृद्ध व शूर सर-

दार हा मुंबईहून सिंधेंत रवाना झाला, आणि सर्व लश्कराच्या सरदारीचा व दरबारी वकिलातीचा अधिकार त्यानें चालवावा असा हुकुम झाला. हा सरदार चतुर व धूर्त असून उत्तम इंग्लिश लोकांप्रमाणें सरल स्वभावाचा आहे. त्यानें अमीर ह्यांशीं सरळ बोलणें करण्यास आरंभ केला; आणि इंग्लिश लश्करांच्या जाग्यांविषयीं वारंवार तंटा न पडावा ह्मणून करांची, सक्कर, शिकारपूर, वगैरे जागा इंग्लिशांस अमिरांनीं द्याव्या; भावळपूर एथील नवाबास* देण्याकरितां सबजलपूर वगैरे कांहीं प्रांतही स्वाधीन करावे; नदीमध्यें व्यापाऱ्यांस त्यांनीं उपद्रव करूं नये; आणि ह्या सर्व नुकसानांबद्दल इंग्लिश सरकारानें त्यांस खंडणी दरोबस्त माफ करावी; असा नव्या तहनाम्याचा मसुदा ठरून गवर्नरजनरल ह्यांजकडून आला होता, त्या तहनाम्यावर सही करण्याविषयीं त्यांस जनरल साहेबानें तगादा केला, आणि तहनामा मान्य न केल्यास मुलूख घेऊं असें भय घालून त्यानें युद्धाची सिद्धता करण्याचें आरंभिलें.

१८ त्याची तयारी पाहून अमीर ह्यांनीं आंतून लढाईची तर्तूद करून बलोची लोकांस जमविण्याचा उद्योग चालविला. जनरल नेपियर साहेबाकडून तह मान्य करण्याविषयीं वारंवार यादी येत; आणि अमिरांकडून कांहीं सामोपचाराचीं उत्तरें, कांहीं प्रार्थना, कांहीं रागाचे निरोप, परत येत; परंतु

---

* भावळपूर एथील नवाबानें युद्धामध्यें फार मदत केली होती, आणि त्यानें दोन तीन पिढ्यांपासून इंग्लिश सरकारासीं फार सालसपणानें वर्तणूक केली होती, ह्मणून हें त्यास गवर्नरजनरल साहेबांनीं बक्षीस दिलें.

त्यांत धरण्याजोगें कांहीं सांपडेना. शेवटीं अमिरांनीं फौजा तयार केल्या, व **नेपियर साहेबानें** त्यांचा **इमामगड** नामें कि-
फेब्रुआरी ल्ला लुटून पाडून टाकिला. नंतर तहाविषयीं अमिरांची समजूत करण्याकरितां **मेजर ऊत्रम साहेब** ह्यास कमिशनर नेमून **जनरल** ह्यानें पाठविलें. त्याशीं आणि अमिरांशी कितीएकवेळां बोलाचाली होऊन शेवटीं अमिरांनीं त्या तहनाम्या-
ता० १४ वर सह्या केल्या. परंतु त्यांच्या **बलोची** सरदारांस तें वर्त्तमान समजतांच त्यांनीं **काफर** (इंग्लिश) ह्यांचें पारिपत्य करण्याविषयीं त्याच रात्रीस कुराणावर शपथा वाहून दुसऱ्या दिवसीं **मेजर ऊत्रम साहेबाच्या** राहावयाच्या बंगल्यावर हल्ला केला. तो हल्ला आपलें कौशल्य आणि आपल्या पाहाऱ्याच्या लोकांचा मर्दपणा ह्यांच्या बळावर चार तासपर्यंत सहन करून तो साहेब **पालिन्यूरस** नामें लढाऊ जहाज नदींत होतें तेथें सुरक्षित जाऊन पोहोंचला.

१९ नंतर दोन दिवसांनीं **सर चार्लस नेपियर साहेब** लश्कर घेऊन **हैदराबादेस** आला. त्याची आणि अमिरांच्या लश्कराची मोठी लढाई **मीआनी** एथें झाली; तीमध्यें अमिरांचा अगदीं पराभव होऊन त्यां पैकीं साहा आसामी तरवारी ठेवून शरण आले.* ह्या लढाईंत **इंग्लिशांचे** सुमारें २५६ लोक जायां झाले; **बलोची** लोक पांच हजारांवर

---

* ह्यांत रूस्तमखान, नसीरखान, आणि वली महंमद हे तिघे खिरपूरचे अमीर; व नसीरखान, शाहदादखान, आणि हुसेनखान हे तिघे हैदराबादचे, मिळून साहा होते. त्यांस सासवड एथील किल्यांत कांहीं दिवस ठेवून पुढें कलकत्त्यास रवाना केलें. इंग्लंडामध्यें कित्तीएक दयाळू लोक त्या अमिरांवर जुलूम झाला ह्मणून सरकाराशीं अद्यापि बोलत आहेत.

पडले. सिंध हा सर्व मुलूक इंग्लिशांच्या हस्तगत झाला; त्यांतून खिरपूरचा नवाब अलीमुराद हा पहिल्यापासून प्रामाणिकपणानें वागला ह्मणून त्याचें राज्य लाहानसें होतें तें कायम करून बाकीचें इंग्लिशांनीं घेतलें. ह्या राज्याचा सांप्रत वसूल सुमारें चाळीस लक्ष रुपये इंग्लिश सरकारास येतो.

२० हैदराबाद घेतल्यापासून बलोची लोकांशीं कितीएक वेळां युद्ध करण्याचें कारण पडलें; परंतु जनरल नेपियर साहेबाचे युद्धकौशल्यानें त्या बलोची लोकांचा पराजय होऊन देशाचा अधिक अधिक बंदोबस्त होत चालला आहे.

२१ जनकोजीराव सिंदा फेब्रुआरी महिन्यांत मरण इ० स०
पावला; आणि त्याच्या बायकोनें जो दत्तपुत्र घेतला तो १८४३
इंग्लिश सरकारानें कायम करून मामासाहेब नामें सरदार कारभार करावयास नेमिला. परंतु लवकरच दरबारामध्यें फूट पडून व दादाखासगीवाला ह्मणून कोणीएक मुत्सद्दी ह्यास बहुतेक लश्कर अनुकूल होऊन मामासाहेब ह्याचें कांहीं चालेनासें झालें, ह्मणून तो तेथून निघून गेला. तें गवर्नरजनरल ह्यांच्या मनास आलें नाहीं; आणि लश्करामध्यें बंद न राहतां रोज कटकटी होत, व त्यांपासून इंग्लिशांचे सरहद्दीवरही कांहीं उपद्रव होऊं लागला, त्यांचा बंदोबस्त करणें प्राप्त झालें.

२२ ह्याविषयीं दरबारास इंग्लिश सरकारानें पत्रें पाठविलीं, व दादाखासगीवाला ह्यास स्वाधीन करण्याविषयीं लिहिलें; परंतु राणीसाहेबही त्या खासगीवाल्याचे बुद्धीनें चा-

लत असे, ह्मणून त्यास दूर करण्याचें घडेना; शेवटीं इंग्लिश सरकारचा फार नेट पाहून लश्करांतील एके फळीनें **दादा** ह्यास **इंग्लिशांच्या** स्वाधीन करण्याचा अभिमान धरिला. नंतर लश्करामध्यें परस्परांचें युद्ध झालें; आणि जे जय पावले त्यांनीं **दादाखासगीवाला** ह्यास धरून **इंग्लिशांच्या** स्वाधीन केलें.

२३ तथापि लश्कर फार प्रबळ झालें आणि त्याला आंवरायास दरबारामध्यें सामर्थ्य राहिलें नाहीं, ह्याचा बंदोबस्त करण्याकरितां **गवर्नरजनरल** हे स्वतः **धोळपुराकडून** फौज घेऊन गेले. त्यांच्या सैन्याची आणि **ग्वाल्हेरच्या** लश्कराची मोठी लढाई **महाराजपूर** व **पन्यार** एथें होऊन **शिंद्याच्या** लोकांचा मोड झाला; १६० पितळेच्या तोफा **इंग्लिशांच्या** हस्तगत झाल्या; आणि त्यांनीं २०,००० लश्कराच्या लोकांचीं शस्त्रें काढून घेऊन त्यांस निरोप दिला. **महादजी शिंदा** ह्यानें मोठे उमेदीनें जें लश्कर कंपू वगैरे तयार केलें होतें, त्याची अशी समाप्ति होऊन **इंग्लिशांचें** ७००० पायदळ व ३००० स्वार, इतकें कुमकेचें लश्कर मात्र असावें, ह्याबद्दल **इंग्लिशांस** मुलूक तोडून द्यावा, आणि राजा थोर होईपर्यंत कारभारी नेमणें ते रेसिडेंटानें नेमून त्यांची देखरेख ठेवावी, असा तहनामा ठरवून **शिंद्याची** गणना इतर परतंत्र संस्थानिकांमध्यें करण्याजोगती झाली.

दिसेंबर ता० २९

२४ **लार्ड एल्लन्बरो साहेब** ह्यांच्या कारकिर्दींत संस्थानिक लोकांमध्यें आणखी एक दोन फेरफार झाले. **अयोध्येचा** नवाब **नासरुद्दवला** हा (सन १८४२) मरण पावून

त्याचा मुलगा गादीवर बसला. **हरीराव होळकर** ह्याची इ० स० १८४४
प्रकृति छांदिष्टपणा आणि व्यसनें ईहींकरून बहुत वर्षांपासून
क्षीण होत चालली होती. शेवटीं त्याचा काळ त्या व्याधी-
नेंच होऊन **जनकोजीराव** नामें दत्तपुत्र ह्यास **इंदूरचा**
रेसिडेंट **हामिल्टन साहेब** ह्यानें त्या गादीवर स्थापिलें. जुलै
**मुंबईजवळ आंग्र्याचा कुलाबा** ह्या लाहान संस्थानचा
कोणी वारीस नाहीं असें होऊन तें **इंग्लिश** सरकारांत आलें.

२५ **लार्ड एल्लन्बरो** ह्यांनीं **कोर्ट आफ् डेरेकटर्स** ह्यां-
च्या हुकमाची कांहीं अमर्यादा केल्यामुळें पांच वर्षांच्या मुद-
तीचे आंतच त्यांस कामावरून रजा होऊन **गवर्नरजनरल**
ह्याच्या अधिकारावर **सर हेनरी हार्डिंग साहेब** ह्यांची
नेमणूक होऊन ते आले. तेव्हांपासून विशेष वर्तमान काय- जुलै
तें हेंच कीं, **कोलापूर** एथें **शाहाजी** राजा (संन १८३९) ता० २०
मरण पावून त्याचा मुलगा गादीवर बसला, त्याचा कारभार
करण्यासाठीं **इंग्लिश** सरकारानें **दाजीकृष्ण** पंडित नामें
कोणीएक ब्राह्मण नेमिला. त्यानें कांहीं नवा बंदोबस्त
करावयास आरंभिल्यामुळें संस्थानचे लोक नाखुष झाले; ते
**सामनगड, भद्रगड, पन्हाळा** इत्यादि किल्ले घेऊन बसले;
व त्यांचे सोबती आसपासच्या मुलकांत लुटूं लागले. तें त्यांचें
करणें पाहून **वाडीचे** कितीएक सरदार ह्यांनींही वाटा मा-
रण्यास आरंभ केला; आणि राजाचा मुलगा **अन्या साहेब**
नामें त्यांत जाऊन मिळाला. ह्या बंडाचा पुरा बंदोबस्त हो-
ण्यास पांच साहा महिने लागले. **वाडी** एथील बंडवाले
**गोंव्याच्या** सरकाराच्या आश्रयास जाऊन राहिले, ते स्वाधीन

करण्याविषयीं सांप्रत इंग्लिश व पोर्तुगीस ह्या उभयतां सरकारांमध्यें बोलणें चालत आहे.

## प्रकरण २७.

### इंग्लिशांच्या राज्याची सांप्रतची स्थिति आणि त्यांचा उदय होण्याचीं कारणें.

१ आट्लांटिक समुद्रांतील लाहानशा बेटांतून थोड्या युरोपियन लोकांनीं येऊन हिंदुस्थानच्या राहाणाऱ्यांस आपल्या तऱ्हेचें युद्धकौशल्य शिकविलें, आणि त्यांकरवीं त्यांच्या देशच्याच लोकांवर व राजांवर शस्त्रें धरविलीं, असें असतां ते विश्वासानें आणि भक्तीनें वागले; आणि बहुतेक युद्धप्रसंगीं त्यांच्यापेक्षां समोरचे लोक बहुत असतां ते जय पावले, ह्या गोष्टी आश्चर्य वाटावयाजोग्या आहेत.

२ हिंदुस्थानामध्यें प्राचीन कालीं परदेशांतील मुसलमानांचा प्रवेश न व्हावा ह्मणून रजपूत व इतर लोक ह्यांनीं मोठ्या निकरानें युद्धें केलीं, व त्या कामांत आपले प्राण दिले, अशीं वर्त्तमानें वाचण्यांत येतात खरीं; परंतु पुढें जसजशीं त्या मुसलमान लोकांचीं राज्यें जुनावत चाललीं, आणि त्यांचे संबंध ह्या देशांत अधिक होऊं लागले, तसतसा हिंदु लोकांचा त्यांविषयीं द्वेष कमी होऊं लागला. मग हे पोटाकरितां त्यांचे चाकरीस राहून आपल्या धन्यांच्या शत्रूंचें निवारण करणें हा आपला धर्म असें मानूं लागले. त्या शत्रूंमध्यें केव्हां केव्हां स्वदेशांतिल राजांवरही शस्त्र धरण्याचा प्रसंग

पडल्यास धन्याशीं अविश्वास करणें आपणास उचित नव्हे, असें समजून ते त्या कामास प्रवृत्त होऊं लागले. तो अभ्यास होतां होतां मुळचा जो देशाभिमान तो अगदीं मनांतून निघून गेला; आणि ज्याचें अन्न खावें त्यास अंतर देऊं नये इतकेंमात्र धोरण राहिलें.

३ जातिविभागाप्रमाणें शूद्र व नीच जातीचे लोक ह्यांस ब्राह्मण, रजपूत, इत्यादिकांमध्यें मान नाहीं; शेतें करणें व इतर मेहेनतीचे उद्योग करणें इहींकरून त्यांचा निर्वाह, ह्मणून त्यांस द्रव्यसंग्रह व सुख हीं थोडीं होतीं. ह्या लोकांस इंग्लिशांच्या लश्करांत चाकरीस राहणें ही प्रतिष्ठा वाटूं लागली; आणि त्यांस मोठे अधिकार व चाकरी भरल्यावर बैठ्या नेमणुकी वगैरे हीं मिळूं लागलीं, तेणेंकरून ते आपल्या मुलकांत प्रतिष्ठा पावूं लागले; आणि सर्व प्रसंगीं आपल्या धन्याची चाकरी इमानानें बजावणें ह्यांत त्यांस भूषण वाटूं लागलें.

४ इंग्लिशांच्या थोड्या फौजेनें हिंदुस्थानांतील संस्थानिकांच्या मोठ्या मोठ्या सैन्यांचा पराजय कसा केला हें समजण्यास कवाईत, ह्मणजे युद्धाची शिक्षा, हिजपासून कार्य किती होतें हें लक्ष्यांत आणिलें पाहिजे. जशी शरीरास तालीम तशी फौजेस कवाईत आहे. जसा साधारण बळकट पुरुष तालमेच्या योगानें दाहापांचांस भारी होतो, तशी शिकविलेली फौज तिजपेक्षां फार अधिक जी अशिक्षित फौज तिला हटविती. प्रसंग येईल तसतसें कोणत्या रीतीनें पुढें जावें, मागें सरावें, आणि रांगा करणें, व चतुरस्र किंवा दुसऱ्या आकृतीनें

उभें राहणें तें झपकन कसें करावें; आणि ताल धरल्याप्रमाणें बरोबर काळाच्या अंतरानें किंवा एककालींच बंदुका कशा माराव्या हें सर्व इंग्लिशांच्या शिपायांस शिकविलेलें असतें; आणि त्यांचा प्रतिदिवस अभ्यास चालत असतो. पलटणांमध्यें एकापेक्षां एक मोठा असे कामदार असतात; कोणी कसें वागावें ह्याविषयीं कायदे असतात; आणि त्याप्रमाणें चालण्यांत अंतर पडल्यास शिक्षा होती. येणेंकरून सरदारांच्या हुकमांत वागण्याचा, आणि त्यांच्या हुकमाप्रमाणें तत्क्षणी करण्याचा, अभ्यास शिपायांस होतो, हें जयाचें मोठें साधन आहे. सरदारांच्या हुकमाप्रमाणें घडण्यास सुस्ती झाली किंवा अंतर पडलें, तर उत्तम बेतही निष्फळ होतात, ह्मणून असें कधींही होऊं नये हा पलटणाच्या सर्व बंदोबस्ताचा मतलब आहे. हिंदुस्थानच्या राजांचा भरंवसा मुख्यत्वेंकरून लोकांच्या संख्येवर आणि त्यांच्या व त्यांच्या सरदारांच्या जातीच्या शौर्यावर असे. भरण्याच्या फौजेमध्यें जातीचे शूर असे माणूस थोडेच असतात, ह्मणून लश्कर सरदारांच्या हुकमांत जर न वागलें, तर संख्येचा उपयोग पडत नाहीं. समोरून निकराचा मार होऊं लागला असतां, किंवा दुसरी कांहीं अडचण प्राप्त झाली असतां, जे लोक भितरे असतात ते मागें हटतात. असें कितीएक वेळ झालें ह्मणजे शूरांचेंही कांहीं न चालून सर्व लश्कराचा मोड होतो; आणि मनाचे भीतीपुढें आंगजोराचें कांहीं चालत नाहीं. अशा प्रसंगीं एकवेळ दहशत पडली किंवा पळ सुटला, ह्मणजे हजार लोक असले किंवा दहाहजार लोक असले तरी फळ एकच. इकडे जे

थोडे लोक बहुतां पुढें धिरानें उभे राहतात, त्यांचें जसें एकेक पाऊल पुढें जातें तसतशीं त्यांस अधिक हिंमत येती; पूर्वी तशा प्रसंगीं पराजित केलेले शत्रु आणि जिंकलेल्या लढाया ह्यांच्या स्मरणानें त्यांस जयाविषयीं भरंवसा असतो; आणि त्यांस उमेद देण्यास सरदार जवळ असतात, ह्मणून जशी शत्रूंच्या मनांतील दहशत त्यांच्या नाशास कारण होती तसा ह्यांच्या मनांतील उत्साह ह्यांचे कार्यसिद्धीस उपयोगीं पडतो.

हिंदुस्थानीं शिपाई लोकांस तयार करण्याचें काम प्रथम **फ्रेंचांचा** सरदार डुप्ली ह्यानें आरंभिलें. तें सिद्धीस गेलें हें पाहून इंग्लिशांनींही संन १७४७ ह्यामध्यें तीनशें शिपाई **मुंबईस** चाकरीस ठेविले. त्यांची संख्या पुढें कारण पडत चाललें तसतशी वाढत गेली. सांप्रत गोरी फौज आणि काळी फौज मिळून एकंदर फौज येणेंप्रमाणें आहे.

### युरोपियन ह्मणजे गोरे लोक ह्याचें लश्कर.

| | बंगाल. | मद्रास. | मुंबई. | एकंदर. |
|---|---|---|---|---|
| पायदळ............... | २ पलटणें. | २ पलटणें. | २ पलटणें | ६ पलटणें. |
| घोड्यांवरचा तोफखाना. | ९ त्रूप. | ६ त्रूप. | ४ त्रूप. | १९ त्रूप. |
| पाईचा तोफखाना. ... | ५ पलटणें. | ४ पलटणें. | २ पलटणें. | ११ पलटणें. |

### नेटिव ह्मणजे काळे लोक ह्यांचे लश्कर.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| स्वार. ............... | १० पलटणें. | ८ पलटणें. | ३ पलटणें. | २१ पलटणें. |
| पायदळ.............. | ७४ पलटणें. | ५२ ,, | २९ ,, | १५५ ,, |
| घोड्यांवरचा तोफखाना. | ३ त्रूप. | ,, | ,, | ३ त्रूप. |
| पाईचा तोफखाना...... | २ पलटणें. | १ ,, | १ ,, | ४ पलटणें. |

ह्याशिवाय विलायतच्या सरकारची गोरी फौज सुमारें पन्नास हजार; व वेटरान ह्मणजे ह्यातान्या लोकांच्या पलटणी, व मुलकी शिबंदीच्या पलटणी व मुलकी स्वार मिळून सुमारें पंचवीस हजार होतील.

स्वार हे बहुतकरून मुसलमान किंवा रजपूत असतात, त्यांमध्यें मुसलमान फार. **बंगाली** पायदळांत फारकरून रजपूत व त्या प्रांतांतील इतर हिंदूजाति आहेत. **मद्रास** व **मुंबई** ह्यांतील लश्करांमध्यें सर्व धर्मांचे व सर्व जातींचे लोक आहेत. **बंगालच्या** लश्करांतील लोक मोठे उंच व देखणाऊ, परंतु इतर इलाख्यांतील लोकांपेक्षां कवाइतींत व शिपाइगिरींत कांहीं अधिक नाहींत.

---

## कायदे.

ज्या राज्यांत राज्यकारभार आणि न्याय हीं अधिकान्याच्या इच्छेवर असतात त्याची मजबुती आणि प्रजांचें कल्याण हीं अधिकान्यांचे आंगच्या गुणांवर असतात. कोणी चांगला विचारी राजा झाला ह्मणजे देशांत स्वस्थता होती, आणि रयत सुख पावती. परंतु त्याचेही कारकिर्दींत त्याचे नजरेपुढें जितके अन्याय होतात तितक्यांचा बंदोबस्त तो करितो, परंतु त्याच्या परोक्ष राज्यांतील दूरच्या भागांत ज्या गोष्टी घडतात त्यांविषयीं त्याचा उपाय चालत नाहीं; आणखी त्याच्या स्वतांच्या कारभारांतही एके व्यवहाराची व्यवस्था

समयीं एका प्रकारची होती, समयीं दुसऱ्या प्रकारची होती. चांगल्या शाहाण्या अधिकाऱ्यांची गोष्ट अशी आहे, तर त्यांच्यामागें त्यांच्या पदावर मूर्ख किंवा अविचारी पुरुष बसले ह्मणजे राज्याचा घोंटाळा आणि प्रजांचें मरण होतें. तसे पुरुष आपल्यापेक्षां शाहाण्याची मसलत घेत नाहींत आणि लोकलज्जा बाळगीत नाहींत. त्यांच्या मनाचा ज्या वेळेस जो कल असेल तोच राज्यनियम असें होतें; आणि एके वेळीं ज्या अपराधासाठीं कोणी मनुष्याचें डोकें जातें त्याचकरितां दुसऱ्या वेळीं दुसऱ्या मनुष्यास बक्षीस मिळतें.

अशी अव्यवस्था राज्यामध्यें न व्हावी ह्मणून सर्व गोष्टींविषयीं कायदे ह्मणजे नियम करून ठेविले असतां मोठा उपयोग आहे. ते सर्व अधिकाऱ्यांस किल्ल्याप्रमाणें होतात; त्यांच्या योगेंकरून चांगल्यांचे श्रम वांचतात, आणि वाईटांस त्यांची दहशत पडती, आणि कदाचित् कोणे वेळीं ते त्यांचें उल्लंघन करूं लागले असतां त्यांस प्रतिबंध करण्यास प्रजांस बळ सांपडतें.

सर्व गोष्टींविषयीं प्रसिद्ध कायदे असणें आणि त्यांप्रमाणें राजा आणि प्रजा ह्या उभयतांची चाल चालणें हें ज्ञानी आणि उदार सरकारचें लक्षण आहे; आणि तसे नियम नसणें व जसें ज्यास आवडेल किंवा फावेल त्याप्रमाणें त्याची वागणूक असणें हें मूढ आणि हलके बुद्धीच्या सरकाराचें लक्षण आहे. ह्या कायद्यांचीं मूळधोरणें अशीं आहेत कीं, कोणे मनुष्यास खुद आपणास किंवा त्याचे मिळकतीस कायद्यांशिवाय दुसऱ्या कशाचें भय किंवा हरकत नसावी; जो

धर्म आणि जो उद्योग मनास चांगला वाटेल तो आचरायास सर्वांस मोकळीक असावी; लोकांपासून राज्याच्या कामाकरितां सरकारानें जो पैका किंवा जी चाकरी घ्यावयाची ती आवश्यक आणि वाजवी असेल तितकीच घ्यावी; लोकांस सुख होण्याकडे लक्ष्य ठेवावें; लाहान लोक व मोठे लोक ह्यांवर कायद्यांची नजर सारखी असावी, ह्मणजे ह्यांस अडचणी पडाव्या आणि त्यांस सोई व्हाव्या असे नियम असूं नयेत; आणि हे कायदे प्रजांनीं मानावे अशी दहशत पडण्याजोग्या अपराध्यांस शिक्षा ठरविलेल्या असाव्या. कायद्यामध्यें दुसरी गोष्ट ही आवश्यक आहे कीं ते सर्वांचे समजुतींत येत अश्या स्पष्ट शब्दांनीं लिहिलेले असावे; व त्यांमध्यें सर्व गोष्टींविषयीं निर्बंध असावे ह्मणजे न्याय करणाऱ्यांनीं आपले बुद्धीप्रमाणें व्यवस्था करावी अशा गोष्टी कायद्यांत असूं नयेत.

**हिंदुस्थानामध्यें मुसलमान** व हिंदू ह्या लोकांचीं जरी धर्मशास्त्रें आणि नीतीचे ग्रंथ होते तरी ते बहुत दिवसांपासून एकीकडे राहून सर्व कारभार राज्यकर्त्यांचे इच्छेप्रमाणें चालत आला होता. अशा देशांत वर लिहिलेल्या धोरणाप्रमाणें कायदे करून एकदांच चालू केले असतां लोकांस नीट वाटावयाचें नाहीं, आणि त्यांपासून त्यांस सुख व्हावयाचें नाहीं. एथें लोकांची स्थिति आणि चित्तवृत्ति हीं लक्ष्यांत आणून युक्तियुक्तीनें नियम सुधरण्याचें काम चालविलें पाहिजे; आणि त्या स्थितिरीतींत ज्यापक्षीं इतका भेद आहे त्यापक्षीं सर्वत्र एकसारखी वहिवाट चालू होणें ही गोष्ट अशक्यवत् आहे. कंपनीचे नवे सनदेंत लिहिल्याप्रमाणें कायद्यांचीं

धोरणें जाणणारे आणि ह्या देशाचे माहितगार असे कितीएक इंग्रेज कामदार "ला कमिशनर" ह्या नावानें कलकत्यास हें काम करीत आहेत. सर्व हिंदुस्थान देशांत साधारण व्यवस्था आणि नियम एक प्रकारचे व्हावे असा त्यांचा हेतु आहे; परंतु एकाएकीं कोणताही मोठा फेरफार केला असतां लोकांस इजा होईल ह्याकरितां जो कायदा करावयाचा त्याचा मसुदा ते अगोधर छापून सर्वत्र प्रसिद्ध करितात, आणि त्याविषयीं तकरारी फार पडल्यास योग्य कारण पाहून तो तहकूब ठेवितात, किंवा फिरवितात. ह्यास्तव वर लिहिलेल्या धोरणाप्रमाणें सारे कायदे होऊन चालण्यास बहुतकाळ पाहिजे.

कायद्यांमध्यें प्रथम प्रजांचे अधिकार व मर्यादा अमूक आणि सरकारचे अधिकार अमूक, असा निर्णय ठरवून पुढें कोणी आपली मर्यादा उल्लंघिली असतां कोणत्या रीतीनें बंदोबस्त करावा, हें असलें पाहिजे, ह्याकरितां त्यांचे तीन विभाग करण्याचा सांप्रदाय आहे. १ दिवाणी कायदे ह्मणजे लोकांमध्यें अधिकाराविषयीं किंवा मालकपणाविषयीं वाद पडला असतां त्याचा निर्णय होण्या प्रकरणीं नियम; २ फौजदारी कायदे ह्मणजे कोणी कायदा मोडला अथवा आपली मर्यादा उल्लंघिली तर त्यास शिक्षा कोणत्या रीतीनें व्हावी, तसें पुढें न घडण्यास पूर्वी बंदोबस्त कसा असावा ह्याविषयींचे नियम; ३ वरच्या दोन प्रकारच्या नियमाप्रमाणें न्याय करण्याचा जेव्हां प्रसंग येईल तेव्हां न्याय कोणी कोणत्या प्रकारानें करावा, व त्याची रीति कशी असावी, वादीप्रतिवादी ह्यांची

हकिकत सरकारास कशी कळावी, कोणत्या प्रकारच्या साक्षीवर भरंवसा ठेवावा, इत्यादिकांविषयींचे नियम.

प्रजांचा मुख्य धर्म हा आहे कीं सरकारानें त्यांच्या बऱ्याकरितां ठरविले जे कायदे ते त्यांनीं निमूटपणें मानीत असावें; देशांत चोरावें वगैरे न व्हावें, आणि प्रजांस परचक्राचा उपद्रव लागूं नये ह्याकरितां शिबंदी व फौजा पाहिजेत त्यांच्या खर्चासाठीं प्रजांपासून नियमित कर घ्यावे लागतात ते त्यांनीं दिले पाहिजेत. सर्वांस मनमानेल तशी मोकळीक दिली असतां देशांत व्यवस्था राहणार नाहीं, ह्याकरितां अन्याय आणि दुसऱ्या कितीएक गोष्टी ह्यांविषयीं प्रतिबंध करावे लागतात, ते प्रजांनीं पाळिले पाहिजेत. जेव्हां प्रजा किंवा राजा ह्यांजकडून आपापल्या धर्माप्रमाणें चालण्यांत मोठें अंतर पडतें, तेव्हां प्रजांकडून दांडगावें, बंडें, बखेडे इत्यादिक घडतात, आणि त्यांच्या बंदोबस्ताकरितां राजानें प्रजांस शिक्षा करावी असें आवश्यक होतें.

प्रजांपासून कर घेण्यांत मुख्य धोरण इतकें आहे कीं प्रजांस जेणेंकरून जड पडणार नाहीं तशा रीतीनें तो घ्यावा. **हिंदुस्थानांत** पहिल्यापासून शेतजमिनींवर वसूल घेण्याची चाल होती, तीच **इंग्लिशांनीं** चालविली आहे. मोठ्या मोठ्या तालुक्यांच्या बेरजा ठरवून ते जमिनदारांच्या स्वाधीन करावे, अशी रीति **लार्ड कार्न्वालिस साहेब** ह्यांनीं **बंगाल्यांत** चालू केली, ती अद्यापि तिकडे चालत आहे. इतर ठिकाणीं उत्पन्नाचा आकार पाहून प्रतिवर्षी सरकार देण्याचा

ठराव करितात, ह्या शिस्तीस रयतवार किंवा कुळवार जमाबंदी असें ह्मणतात. कोठें कोठें एक एक गांवाची बेरीज ठरवून खोत किंवा जमिनदार ह्याचे तर्फेनें वसूल घेतात ह्या शिस्तीस मौजेवार ह्मणतात. हें सरकारदेणें उत्पन्नाच्या एक षष्ठांशापासून एक तृतीयांशपर्यंत आहे. त्याबद्दल कोठें कोठें उत्पन्न केलेला जिन्नसही सरकारांत घेण्याची चाल आहे. परंतु ह्याप्रमाणें दर वर्षास उत्पन्न पाहून त्यांतून कांहीं हिस्सा सरकारांत घेतला असतां रयत लोक श्रम करून आणि पैका खर्चून जितकें जितकें अधिक उत्पन्न करितात, तितकें तितकें सरकारदेणें त्यांवर अधिक बसतें, हें पाहून ते लोक जमिनीवर मेहनत करीत नाहींत, आणि दारिद्र्यांत राहतात. ह्यास्तव साऱ्या मुलकाची पाहणी करून जमिनीची प्रत व उत्पन्नाचा अजमास पाहून बिघ्यावर अमुक देणें द्यावें असे ठराव करण्याकरितां प्रांतांमध्यें पैमाषी चालल्या आहेत. त्यांपासून लोकांवरचें देणें सांप्रतच्यापेक्षां कमी होऊन त्यांस सुख होईल ह्यांत संशय नाहीं. लोकांपासून वेट, बिगार, कारसाई, वगैरे शिवाय बाबती घेण्याची पहिल्या सरकाराची चाल होती ती इंग्लिश सरकारानें बहुतेक बंद केली. त्या सरकारापेक्षां ह्याचें घेणें बहुधा हलकें आहे; आणि त्याबद्दल लोकांस इजाही फार होत नाहीं. दर जिल्ह्याचा वसूल करण्यास कलेक्टर नामें इंग्रेज कामदार असतो. त्याच्या हाताखालीं प्रतितालुक्यास एकएक मामलतदार असतो; त्यांनीं वसूल कोणत्या तऱ्हेनें घ्यावा व तो रयतेनें न दिल्यास कशी वहिवाट करावी ह्या सर्व गोष्टींविषयीं तपशीलवार कायदे आ-

हेत, आणि त्यांपासून रयतेवर जुलूम न व्हावा ह्याविषयीं सरकाराची दहशत त्यांस फार आहे.

इंग्लिश सरकारास सांप्रत दरवर्षाचें उत्पन्न सुमारें बावीस कोटि रुपये आहे. त्यांत **बंगाला** व **आग्रा** ह्यांचे सुमारें साडे चवदा कोटि रुपये, **मद्रास** इलाख्याचे पांच कोटि रुपये, आणि **मुंबई** इलाख्याचे सुमारें अडीच कोटि रुपये, इतका वसूल आहे. त्यांत जमिनीचें उत्पन्न सुमारें ६४ भाग; जकात, डाक, व छापील कागद मिळून ७ भाग; मीठ व अफीण ह्यांचे मक्ते मिळून २५ भाग; आणि खंडण्या वगैरे किरकोळ ४ भाग, मिळून शंभर भाग असा तपशील आहे. ह्यांपैकीं अफीणीच्या मक्त्याची जी जमा आहे ती पहिल्या व्यापाराच्या संबंधाची आहे, आणि ती सरकार घेऊं लागल्यापासून अफीण हा कैफाचा जिन्नस अधिक उत्पन्न होऊं लागला; त्यापासून जरी व्यापाऱ्यांचें हित झालें, तरी तें प्रजांच्या अकल्याणासच कारण झालें असें ह्मटलें पाहिजे.

संन १८३८ पासून संन १८४१ पावेतों तीन वर्षांच्या खर्चाची एकंदर सरासरी पाहिली असतां लश्कराचा सर्व कायम खर्च सुमारें आठ कोटि रुपये आणि सर्व दिवाणी कारखान्यांचा खर्च दाहा कोटि रुपये झाले, बाकी **काबूलचे** लढाईकडे व जुनें कर्ज वारण्याकडे खर्च झाली असें आढळतें. दिवाणी खर्चांत मुख्य रकम जुन्या कर्जाचें व्याज, ती १,१०,८८,३,८३ रुपये आकारली; बाकीच्या कलमांची सरासरी पाहिली असतां मुलकासंबंधें, व दरबारी पेन्शनें, नेमणुका ह्यांसंबंधें मिळून शेकडा पांच भाग; दरबारसंबंधें

हुजूर ठिकाणचा व वकिलातींचा वगैरे खर्च एकवीस भाग; अदालतीसंबंधें खर्च एकुणीस भाग; वसुलाप्रकरणीं खर्च बारा भाग; आरमारासंबंधें खर्च सुमारें पांच भाग; वाटा बांधण्याचा व इमारतींचा खर्च तीन भाग; लोकांस विद्या पढविणें व रोग्यांस औषध देणें वगैरे धर्मकृत्याकडे खर्च चार भाग; आणि टंकसाळ, डांक, जकात वगैरे बाकीच्या सर्व बाबतींसंबंधें खर्च तीस भाग, ह्याप्रमाणें तपशील लक्ष्यांत येतो.

---

## दिवाणी कायदे.

प्रजांमध्यें अधिकाराविषयीं आणि मालकपणाविषयीं वाद पडतात, त्यांत कितीएक धर्मसंबंधाचे असतात; कितीएक शुद्ध व्यवहारसंबंधी असतात. दादल्या बायकांचे अधिकार व परस्पर धर्म; वंशपरंपरागत धनाची वांटणी; जातिसंबंधी मान इत्यादि विषय पहिल्या प्रकाराचे आहेत. ह्यांचा निवाडा हिंदू आणि मुसलमान ह्यांच्या शास्त्राप्रमाणें होतो. तें शास्त्र समजण्याकरितां त्याच्या मुख्य ग्रंथाचे तर्जुमे इंग्रेजी भाषेंत केलेले आहेत; आणि त्यांची व्यवस्था सांगण्याकरितां अदालतींत पंडित व काजी ठेविलेले आहेत. केवळ व्यवहारसंबंधीं देणेंघेणें व इतर करार ह्यांप्रकरणीं नवे कायदे केलेले आहेत; त्यांत फार जुने तंटे अदालतीपुढें येऊन त्यांस इजा पडूं नये असें धोरण आहे. बारा वर्षेपर्यंत न मागित-

लेलें देणें देववूं नये, व कोणापाशीं जमीन तीस वर्षेंपर्यंत अविछिन्न चालत असल्यास तीविषयीं फिर्याद ऐकूं नये असे जे निर्बंध केलेले आहेत ते ह्या हेतूनें आहेत.

प्रथम सर्व दिवाणी कज्जांचा तपास करण्याचें काम मुनसफ व सदरअमीन नामें कामदार ह्यांजकडे ठेविलें आहे. दर जिल्ह्याच्या हुजूर तालुक्यांतील इनसाफ करण्यास प्रिन्सिपाल सदर अमीन नामें कामदार ठेविलेले आहेत. हे कामदार बहुतकरून ह्या मुलकांतले आहेत; ह्यांनीं द्रव्यलोभ, पक्षपात वगैरे न बाळगतां प्रामाणिकपणें न्याय करावा, ह्याकरितां त्यांस शंभरांपासून पांचशें रुपयेपर्यंत दरमाहा तैनात नेमून ठेविलेली आहे. ह्यांनीं केलेल्या ठरावास कोणी नाराजी झाल्यास त्यांनीं असिष्टेंट जड्ज, जड्ज, आणि सदर दिवाणी अदालत ह्यांजवळ अनुक्रमें अपील ह्यां नावाच्या फिर्यादी करण्यास मोकळीक असती. मोठ्या मोकद्दम्यामध्यें सदर दिवाणी अदालतच्या निवाड्यांवर इंग्लंड एथील राजाजवळ अपील होतें.

ह्या व्यवस्थेंत ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट ही कीं सरकारी अदालती इनसाफ करण्यांत लहान मोठ्या मनुष्यामध्यें कांहीं भेद करीत नाहींत.* सरकार कामदारांनीं कोणापासून कायद्या बाहेर सारा घेतला असल्यास किंवा केलेला कांहीं करार सरकारानें मोडला असें कोणास वाटल्यास सर-

* पूर्वींच्या सरकारांतील मानकरी वगैरे लोकांचा इनसाफ करण्यास मात्र वेगळे कामदार असतात, आणि त्यांच्या ठरावावर अपील मुख्य सरकाराकडे होतें.

कारावर दिवाणी फिर्याद चालती; व सरकाराचें करणें अयोग्य अशी अदालतीची खातरी झाल्यास वाद्याचें नुकसान भरून देवविण्यास अदालत हुकूम करिती. ही गोष्ट पूर्वीच्या स्वेच्छ सरकाराच्या अमलांत लोकांस ठाऊकही नव्हती; पण लोकांस आपले जिंदगीविषयीं निश्चित राहण्यास हा बंदोबस्त मोठें साधन आहे.

---

## फौजदारी कायदे.

बहुधा पूर्वीच्या सरकाराचे वहिवाटीपेक्षां सांप्रतच्या कायद्यांत लिहिलेल्या शिक्षा हलक्या आहेत. बुद्ध्या द्वेषानें मनुष्याचा जीव घेतला असतां, किंवा सरकाराशीं मोठा फितूर केला असतां मात्र देहांत दंड होतो. बाकीच्या सर्व अपराधांस कैद, दंड, सख्त मजूरी, देश पार करणें, इत्यादि शासनें ठरतात. डोकीवर दगड देणें, हातपाय तोडणें, तळणें, हत्तीच्या पायीं बांधणें इत्यादि जुने संप्रदाय ऐकावयास मात्र राहिले आहेत. सांप्रतच्या शिक्षा जरी हलक्या आहेत तरी झाल्यावांचून त्या चुकत नाहींत; पूर्वी समयविशेषीं पैका देऊन किंवा वशिल्यानें शिक्षेची माफी होत असे, तसें आतां होत नाहीं; ह्यामुळें लोकांस सरकारची दहशत पूर्वीपेक्षां अधिक आहे, व मोठे अपराधही कमी होत चालले आहेत.

फौजदारी बंदोबस्त लाहान गांवांत तेथील मुख्याकडे किंवा

सरकारानें ठरविलेल्या कोणी माणसाकडे असतो. त्याचें हद्दींत गुन्हा झाल्यास तो गुन्हेगारास तालूक्याच्या मामलतदाराकडे रवाना करितो, किंवा त्या गोष्टीची खबर लिहून पाठवितो. अपराधाची चौकशी करणें आणि त्याची शिक्षा ठरविणें हें ज्याचें काम त्यास इंग्लिश भाषेंत माजिस्त्रेट ह्मणतात. हा अधिकार जिल्ह्याच्या कालेक्टराकडे असतो; आणि त्याचे मदतनीस असिष्टेंट माजिस्त्रेट ह्या हुद्यानें त्यास त्या कामांत कुमक करितात.

---

## पुरवणी.

**चीनची लढाई. इंग्लिश सरकारचीं दर्यांतील संस्थानें.**

ईस्त इंदिया कंपनीनें **हिंदुस्थानांत** व्यापार करूं लागल्यानंतर कांहीं वर्षांनीं **चीनचा** उदीम आरंभिला. तिच्या चाकरांस व जहाजांस इतर परदेशी लोकांप्रमाणें **कांतना** शिवाय दुसऱ्या बंदरीं जाण्याची मोकळीक नव्हती, ते युरोपांतून कापडें लोखंडी सामान वगैरे **चिनांत** नेत व तेथून रेशमी कापड चाहा वगैरे युरोपांत आणीत. त्यांचा व्यवहार अवघा **चिनई** लोकांचे **होंगनामें** कितीएक व्यापारी ह्यांबरोबर कायतो असे; त्यांस कांहीं सरकाराजवळ मागणें झाल्यास **होप्पो** नामें खालच्या पदवीचे कामदार ह्यांचे तर्फेनें त्यांनीं अर्जी पाठवावी; त्या कामदारांनीं **मादारीन** नामें जे मोठे अधिकारी ह्यांकडे ती रवाना करावी; त्यांनीं काय

हुकूम करणें तो करावा, अशी चाल होती; आणि हे कामदार आपल्या मनास येई त्याप्रमाणें **इंग्लिश** कंपनीचा व्यापार मना करीत किंवा अधिक जकाती घेण्याचे हुकूम करीत. केव्हां **इंग्लिशांकडून** कांहीं अपराध झाल्यास त्या अपराध केलेल्या माणसास आपले चालीप्रमाणें क्रूरपणाची शिक्षा करीत, ह्याप्रमाणें अनेकप्रकारें **इंग्लिशांचा** अपमान ते करीत असत.

ह्याचा बंदोबस्त करण्याकरितां **इंग्लंडच्या** सरकारानें संन १७९२ वांत **लार्ड माकार्टनी साहेब** नामें वकील पुष्कळ नजरनजराणा देऊन **चीनच्या** राजाकडे पाठविला. त्यानें भेटीचे वेळेस **चिनई** लोकांच्या सांप्रदायाप्रमाणें साष्टांग दंडवत घालावें अशा गोष्टींविषयीं तकरार पडून शेवटीं त्यास **पिकिन** एथें जाण्यास परवानगी मिळाली; आणि **तातार** देशांत मोठ्या तटाच्या पलिकडेस त्याची आणि राजाची भेट झाली; परंतु कामाचा बंदोबस्त कांहीं न होतां त्यास परत निघून यावें लागलें. पुनः संन १८१६ मध्यें **लार्ड आम्हर्स्त साहेब** ह्याची रवानगी तिकडे झाली; परंतु मुजरा वगैरे करण्याविषयींच्या तंट्यामुळें त्यालाही परत येणें प्राप्त झालें. त्या वेळीं **चीनच्या** बादशाहानें **इंग्लंडच्या** राजास पत्र लिहिलें, त्यांत सुचविलें कीं "ह्या उपर इतके दूर डोंगर चढून व समुद्र उतरून तुह्मी वकील पाठवावयाचें कांहीं कारण नाहीं;" आणि हिंगुळाच्या कागदावर सांप्रदायाप्रमाणें कामदारांस त्यानें हुकूम लिहिला तो असा कीं, "हे वकील हांकून काढावे, आणि त्यांनीं केलेल्या मोठ्या अपरा-

धांची त्यांस शिक्षा न करितां त्यांच्या देशास घालवून द्यावें अशी माझी खुषी आहे."

ह्याप्रमाणें **चिनई** लोकांचे मर्जीप्रमाणें संन १८३४ पर्यंत व्यापार चालला. त्या वेळीं व्यापाराची सदरपरवानगी **इंग्लंडांतील** लोकांस झाली, त्यामुळें वारंवार **चिनई** लोकांशीं तंटे होऊं लागले. **चिनांत हिंदुस्थानांतून** अफीण फार येऊं लागली, तेणेंकरून आपली रयत व्यसनाक्रांत होत चालली, व अफिणीचेबद्दल रुपें मुलकांतून फार बाहेर जाऊं लागलें, ह्या गोष्टींची काळजी **चीनच्या** सरकारास उत्पन्न झाली. त्यांच्या बंदोबस्ताकरितां राजानें **लिन** नामें एक कामदार पाठविला; त्यानें **इंग्लिश** सरकारच्या तर्फेचा व्यापारानिसबत **सुपरिंटेंडेंट क्यापटन एलियट साहेब** ह्यास जबरीनें कैद करून व त्याचें आणि इतर **इंग्लिशांचें** दाणापाणी बंद करण्याचें भय घालून **इंग्लिशांच्या** व्यापाऱ्यांची सारी अफीण आणविली, व तिचा नाश केला. ह्या करण्यानें व्यापाऱ्यांचें कोट्यवधि रुपयांचें नुकसान झालें.

हें नुकसान भरून घेण्याकरितां व आपल्या कामदारांची जी बेअब्रू झाली तिजबद्दल शिक्षा करण्याकरितां **इंग्लिश** लोकांनीं युद्ध करण्याचें आरंभिलें. तें मुख्यत्वें करून समुद्रामध्यें जहाजांच्या साधनानें झालें; आणि तें अडीच वर्षेंपर्यंत चाललें. तितक्यामध्यें **इंग्लिशांचा** पराक्रम व जहाजांतल्या आणि जमिनीवरच्या युद्धामध्यें **चिनई** लोकांपेक्षां त्यांचा श्रेष्टपणा स्पष्ट झाला. **चिनासारख्या** मोठ्या राज्याची सत्ता ज्याचे स्वाधीन असा तो राजा मोठा होता खरा,

परंतु दर्याकिनारा **इंग्लिशांनीं** बहुतेक हस्तगत केला, व व्यापार बंद पाडला, ह्यामुळें तो जेरीस आला; आणि त्याचा शूर व चतुर सरदार जो **किशन** त्याचें **इंग्लिशांचा** सेनापति **सर ह्यू गाफ साहेब** व त्यांचा मुखत्यार वकील **सर हेनरी पाटिंजर साहेब** ह्यांच्यापुढें न चालून शेवटीं **इंग्लिशांस** अनुकूल असा तह ठरला. त्यांतील अभिप्राय असा कीं व्यापाऱ्यांचें नुकसान व लढाईचा खर्च ह्यांबद्दल **चीनच्या** राजानें **इंग्लिशांस** दोन कोटि दाहालक्ष *डालर हप्तेबंदीनें द्यावे; **कांटन, आमोय, फचूफू, निंगपो, शंघाई** ह्या पांच बंदरांत राहून उदीम करण्याची मोकळीक **इंग्लिशांस** द्यावी; आणि **हांगकांग** ह्मणून बेट आहे तें **इंग्लिशांस** द्यावें. तेथें त्यांचा **गवर्नर** राहून सर्व वहिवाट त्यांचे चालीप्रमाणें व्हावी.

ह्याप्रमाणें सला होऊन युद्ध समाप्त झालें; आणि **सर हेनरी पाटिंजर** हा विलायतेस गेल्यावर **डेविस** नामें साहेब त्याच्या कामावर गेला.

---

## सिंहलद्वीप.

**सिंहलद्वीप** हें **हिंदुस्थानाच्या** दक्षिण किनाऱ्यासमोर आहे; त्यास कोणी **लंका** ह्मणतात. मुसलमानांस तें सरंदीप ह्या नावानें ठाऊक आहे, व हें दालचिनी व मोत्यें ह्यांविषयीं त्यांच्या जुन्या ग्रंथांतही प्रसिद्ध आहे, ह्मणून एथें आरबांची वहिवाट प्राचीन काळापासून आहे असें अनुमान होतें.

*डालर ह्मणून दोन रूपयांपासून अडीच रूपयेपर्यंत किंमतीचें एक नाणें आहे.

जेव्हां **पोर्तुगीस** लोकांचा सरदार **आल्मेडा** हा इ० संन १५०५ च्या वर्षीं **सिंहलद्वीपाच्या** कांठ्यावर आला, तेव्हां **कोलंबो** एथील बौद्ध राजानें प्रथम आरब लोकांच्या उपद्रवांतून सुटण्याकरितां संतोषानें त्याचा आदर करून त्याची मदत मागितली. त्या लुटारू आरबांपासून मुक्तता झाल्यास दरसाल अडीच लक्ष रत्तल दालचिनी खंडणीबद्दल देण्याची त्या राजानें कबूलात केली. ह्या रीतीनें **पोर्तुगीस** लोकांचा प्रवेश झाल्यावर ते प्रथम वखारी बांधून स्वस्थ राहिले. पुढें ह्या वखारींचे किल्ले झाले; आणि **पोर्तुगीस** लोकांनीं बहुतेक बंदरें हस्तगत करून राजांचे कामदार तेथून काढून लाविले. नंतर ते राजांवर व त्यांचे रयतांवर मनास मानेल तसा जुलूम करूं लागले.

**कांदी** एथील राजास हें असह्य होऊन **पोर्तुगीस** लोकांचे प्रतिस्पर्धी जे **डच** ह्यांस त्यानें कुमकेविषयीं प्रार्थना केली. त्यांनीं इसवी संन १६३२ च्या वर्षीं **हालंडांतून** एक मजबूद आरमार **कांदीच्या** राजाचे कुमकेस पाठविलें; त्याचीं आणि **पोर्तुगीस** लोकांचीं युद्धें चौवीस वर्षेंपर्यंत होऊन शेवटीं **पोर्तुगीस** ह्यांचा शेवटचा किल्ला **कोलंबो** हा **डच** लोकांच्या हातीं लागला. **डच** लोकांच्या कारभाराची वहिवाट बहुत करून **पोर्तुगीस** लोकांप्रमाणें अव्यवस्थित आणि अविचाराची होती, परंतु लोकांस विद्या आणि ख्रिस्ती धर्म शिकविण्याकरितां त्यांनीं शाळा घातल्या हें त्यांपेक्षां ह्यांनीं विशेष केलें होतें.

इसवी संन १७९५ मध्यें **हालंड** देश **फ्रेंच** राज्यांत दाखल झाल्यावर **सिंहलद्वीप** घेण्याकरितां **मद्रासेहून** इंग्लिश

आरमार रवाना झालें; त्यानें तें थोड्या वेळांत अनायासें करून जिंकून घेतलें; तें **इंग्लिश** बादशाहाचे खुद ताब्यांत ठेवण्याचा ठराव झाला. प्रथम **डच** लोकांप्रमाणें **इंग्लिशही** समुद्रकिनाऱ्यावर अमल करून होते; परंतु संन १८१४ मध्यें **कांदी** एथील राजा **राजसिंह** ह्यानें फार जुलूम करण्याचें आरंभिल्यामुळें त्यास काढून देणें प्राप्त झालें; व पुढें अदिगार ह्मणजे मानकरी ह्यांनीं **इंग्लिशांच्या** नाशाविषयीं मसलत केल्यामुळें त्यांचेंही पारिपत्य करून साऱ्या बेटाचें स्वामित्व आपणाकडे घ्यावें लागलें.

**सिंहलद्वीपा**मध्यें जुरीनें तपास करणें व आणखी कित्येक चांगले संप्रदाय चालू झाले आहेत; आणि इतर वहिवाटही लोकांस सुख होण्याजोगी आहे.

---

## पुलोपिनांग.

हें बेट **मलया** द्वीपकल्पाच्या पश्चिम किनाऱ्याजवळ आहे. तें **केडा** एथील राजानें **कपतान लैट** नामें **इंग्लिश** सरदार ह्यास आपले मुलीबरोबर आंदण दिलें, तें त्या **कपतानानें** सरकारच्या स्वाधीन केलें. तेथें सभोंवतालच्या प्रांतांतून सर्व जातींच्या लोकांची वस्ती झाली आहे; आणि तद्देशीलोक तेथून **युरोपचे** व **चीनचे** जिन्नस समोरच्या किनाऱ्यावर व जवळच्या बेटांत घेऊन जातात.

---

## मलक्का.

**मलक्का** हें **ब्रिटिश** संस्थान **मलया** द्वीपकल्पाच्या दक्षिण टोंकाजवळ आहे; त्याची लांबी चाळीस मैल आणि रुंदी तीस मैल आहे. तेथील मुळचे लोक **आफ्रिकेंत** राहणाऱ्या लोकांप्रमाणें काळे, लोंकरीसारख्या केशांचे, जाड ओंठांचे, व चपट्या नाकांचे असे होते. त्यांत **सुमात्रा** बेटांतील कांहीं लोक येऊन मिसळले. तेराव्या शैंकड्याचे अखेरीस त्यांनीं मुसलमानांचा धर्म घेतला. त्यांजपासून संन १५११ मध्यें **पोर्तुगीस** लोकांनीं **मलक्का** शहर मोठ्या श्रमानें हस्तगत करून घेतलें; त्यावर **आचीन** व **जाहोर** एथील राजे नेहमी हल्ले करीतच होते. पुढें **डच** लोकांनीं साहा महिनेपर्यंत वेढा घालून तें **पोर्तुगीस** लोकांपासून जिंकून घेतलें, तें त्यांच्या व्यापाराची मुख्य जागा झाली. **फ्रेंच** लढाई युरोपामध्यें चालू झाल्यावर संन १७९८ मध्यें तें **इंग्लिशांनीं** घेतलें, तेव्हांपासून दोन वेळ **डच** लोकांस देऊन दोन वेळ पुनः सर केलें. शेवटीं संन १८२५ मध्यें **इंग्लिशांनीं सुमात्रा** बेटांतील आपलीं संस्थानें **डच** लोकांस देऊन हें बंदर व **हिंदुस्थानांतील चिनसुरा** हा किल्ला हीं त्यापासून तहानें मागून घेतलीं.

## सिंगापूर.

जावा बेटांत इंग्लिशांस बंदर नाहीं असें झाल्यामुळें अडचण न पडावी ह्मणून संन १८१९ मध्यें सर स्ताम्फोर्ड राफल्स साहेब ह्यानें सिंगापूर ह्मणून एक बेट आहे तेथें वसाहत करावयास आरंभ केला. त्यांत त्यावेळीं दीडशें मात्र लोक होते, त्यांपैकीं सुमारें तीस मनुष्यें चीनचे लोक होते. परंतु ती जागा व्यापारास फार सोईची ह्मणून तेथील वस्ती इतकी वाढत चालली कीं पंधरा वर्षांत वीस हजार लोक जमले. ते अद्यापि अधिक अधिक होत आहेत. हें सिंगापूर हिंदुस्थान आणि चीन ह्यांचे अर्ध्या वाटेवर आहे.

---

## मोरिशस.

मोरिशस हें बेट हिंदुस्थान आणि आफ्रिका ह्यांच्या मध्यें आहे. तें सुमारें बेचाळीस मैल लांब आणि बत्तीस मैल रुंद आहे, व मादागास्कराचे ईशानीस सुमारें ६०० मैलांच्या अंतरावर आहे.

हें व ह्याच्या जवळचें बुर्बो बेट ह्यांचा पोर्तुगीस लोकांनीं प्रथम संन १५०७ मध्यें शोध मात्र लाविला, आणि त्यांजवळ कोणाचेंही तारूं आल्यास त्यास सामग्री मिळण्यासाठीं त्यांवर कांहीं डुकरें, बकरी व माकडें मात्र सोडून

दिलीं, परंतु वसाहत करण्याचा उद्योग केला नाहीं. ते सत्राव्या शेंकड्यांत **डच** लोकांनीं घेतलें; परंतु त्याचा उपयोग नाहीं असें जाणून संन १७१२ मध्यें ते त्यांतून निघून गेले. नंतर थोडीं वर्षें गेल्यावर तें **फ्रेंचांनीं** घेतलें, व त्यांचें नाव ऐलआफ **फ्रान्स** ह्मणजे **फ्रान्सचें** बेट असें ठेविलें. पुढें त्यामध्यें व्यापार वगैरे चांगला चालूं लागला.

**फ्रान्स** देशांत बखेडा होण्यास आरंभ झाला तेवेळीं **मोरिशस** बेटांतील लोकांनींही बंड केलें तें शांत होण्यास तीन चार वर्षें लागलीं. पुढें एथील लोक **इंग्लिशांच्या** गलबतांस लुटावयास व उपद्रव द्यावयास लागले, ह्मणून **इंग्लिशांनीं केप आफ् गुडहोप** आणि **हिंदुस्थान** एथून एकदांच मोठीं आरमारें पाठवून तें संन १८१० मध्यें घेतलें. तें **विएना** एथील तहाचे वेळेस (संन १८१५) त्यांजवळ कायम झालें; परंतु शेजारचें **बुर्बों** बेट **फ्रेंचांच्या** ताब्यांत गेलें.

**मोरिशस** एथें साखर पुष्कळ होती, व शेतांवर खपण्याकरितां **हिंदुस्थानांतून** बहुत मजूर तिकडे जात असतात.

**समाप्त.**

मुंबईमध्यें अमेरिकान मिशन छापखान्यांत छापिलें.

संन १८४९.